म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 7824

# साम्यवाद

## अेक अभ्यास

लेखक : सिडने हूक

अनुवादक : वसंत फेणे

REFBK-0010241

जनपद प्रकाशन, मुंबई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........
38265
25/9/63

# साम्यवाद : अेक अभ्यास

लेखक

सिडने हूक

अनुवाद

वसंत फेणे

किंमत रुपये तीन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७२६५ वि: ...
क्रमांक ...१०२८९... नों दि. २५-१-६३
मराठी ग्रंथ संग्रहालय
१०२८९
दा. क्र.
REFBK-0010241
REFBK-0010241

जनपद प्रकाशन

जनपद प्रकाशन मुंबई

: प्रकाशक :
सौ. शुभांगी जोशी
जनपद प्रकाशन
४, धुरु बिल्डिंग
वल्लभभाई पटेल रोड,
मुंबई ४.

Studies In Communism by Sidney Hook
( From "Political Power and Personal Freedom" )
Copyright, 1959, by Criterion Books, Inc.

: मुद्रक :
अ. द. पोतनीस
गांवकरी मुद्रणालय,
आग्रा रोड, नासिक.

# निवेदन

'जनपद' चें हें दुसरें प्रकाशन. पहिलें 'लोकशाही समाजवाद.' साथी अशोक मेहता यांच्या 'Democratic Socialism' या प्रसिद्ध, जागतिक कीर्तीच्या विद्वानांकडून प्रशंसिलेल्या ग्रंथाचा साथी माधवराव लिमये यांनीं केलेला अनुवाद. 'Political Power and Personal Freedom' हा डॉ. सिडने हूक या अमेरिकन विद्वानांचा व्यासंगपूर्ण ग्रंथराज. त्यांतील 'Studies in Commuuism' या भागाचा अनुवाद म्हणजेच प्रस्तुतचें पुस्तक होय.

हें पुस्तक प्रसिद्ध करतांना विशेष आनंद होतो. याचें कारण चालू जमान्याच्या संदर्भांत या विषयाला असलेलें महत्व. या पुस्तकांत ग्रंथकर्त्याच्या विचारसरणीचा जोरकसपणा दिसून येतो; त्याचप्रमाणें पृथक्करणात्मक दृष्टिकोनाचा आढळहि होतो. लेखकाचा साम्यवादी तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास तर पानापानांतून दृग्गोचर होतो. ते अंधसाम्यवाद–विरोधक आहेत असें म्हणावयास कोणीहि डोळस धजणार नाहीं. साम्यवादाबरोबर इतर दर्शनांचाहि त्यांचा व्यासंगपूर्ण अभ्यास आहे आणि या सर्व विद्वत्तेला पायाभूत झाला आहे त्यांना वाटणारा मानवजातीबद्दलचा अपार जिव्हाळा !

साम्यवादाबद्दल आतांपर्यंत अंधश्रद्धेंतून, अर्धवट ज्ञानांतून, चिकित्सक दृष्टिकोनांतून आणि अंध विरोधांतूनहि बरेंच लिखाण झालें आहे. त्या सर्वांत डॉ. सिडने हूक यांच्या 'साम्यवादाच्या अभ्यासा'ला वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. मराठी बुद्धिवादी वाचकवर्गाला या अभ्यासांत बराच बौद्धिक खुराक सांपडावा.

प्रस्तुत पुस्तकांत कांहीं ठिकाणीं अमेरिकन संदर्भ आले आहेत. कारण लेखकानें मूळ ग्रंथ अमेरिकन वाचकांसाठीं लिहिला आहे. पण

त्यामुळें त्यांचे विचार समजावयास कांहीं अडचण पडूं नये. अुलट चाणाक्ष वाचकांना तर अशा ठिकाणीं समांतर असे भारतीय दाखलेहि आठवावेत.

प्रस्तुत अनुवाद साप्ताहिक 'जनवाणी'तून क्रमशः प्रसिद्ध झाला. पुस्तकरूपानें ज्यावेळीं हा प्रसिद्ध होत आहे ती वेळ भारताच्या इतिहासाला आणि भारतीय जनतेच्या विचारांना वळण लावणारी आहे हें निःसंशय. साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या अुपासकांचें भयानक दर्शन विश्वासघातकी चिनी आक्रमणाच्या रूपानें भारतीय जनतेला झालें आहे.

अशा वेळीं याच पुस्तकांत डॉ. सिडने हूक यांनीं आवर्जून सांगितलेली गोष्ट पटते. ती म्हणजे साम्यवादी नेते व प्रचारक परदेशांसाठीं जें कांहीं लिहितात, घोषणा करतात त्यांवरून त्यांचें तत्त्वज्ञान पारखणें चुकीचें ठरेल. त्यासाठीं आपल्या पक्ष कार्यकर्त्यांच्या अभ्यासासाठीं ते जें लिहितात त्याचा व देशोदेशींच्या साम्यवादी पक्षांना जे आदेश ते देतात त्याचाच अभ्यास करावयास हवा. असा अभ्यास या पुस्तकांत आहे. महाराष्ट्राला राजकारणाचें वेड आहे. म्हणूनच राजकीय तत्त्वज्ञानावरील या अभ्यासाचें विद्वान्, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते स्वागत करतील अशी अुमेद आहे.

**—वसंत फेणे.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२८२
ग्रं. क्र.
ठाणे

# साम्यवाद एक अभ्यास

चालू जमान्याचा राजकीय दृष्ट्या विचार करूं लागलों तर कोणती गोष्ट ठळकपणें नजरेंत भरते बरें ? याचें उत्तर वृत्तपत्रांचे दैनंदिन मथळे तुम्हांला देतील. जगांतल्या मुत्सद्यांचीं भाषणें वा वक्तव्यें पहा, त्यांत तुम्हांला तें सांपडेल. ही गोष्टच अशी आहे कीं तिची दखल घेतल्यावांचून कोणत्याहि प्रश्नांचा विचार करणें राजकारणी लोकांना शक्य नाहीं. मग तो विचार अणुशक्तीबद्दलचा असो वा व्यापाराबद्दलचा असो, करपद्धतीबद्दलचा असो वा विशुद्ध शैक्षणिक असो. जागतिक राजकारणावर, जगांतील देशोंदेशींच्या अंतर्गत राजकारणावर अशा रीतीनें प्रभाव पाडणारी ही गोष्ट म्हणजे रशियन साम्यवादाचें अस्तित्व व त्याचा साम्यवादेतर देशांवर होणारा परिणाम !

पण असें असलें तरी साम्यवादी चळवळीच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाची चर्चा होतांना कुठेंहि कान देऊन पहावा. तेथें त्याबद्दलच्या माहितीचा अभावच आढळून येतो. एवढेंच नव्हे तर अशा चर्चांत संकुचित पक्षीय स्वार्थाचीच भावना प्रबळ असल्याचें दिसून येतें. त्यामुळें साम्यवाद म्हणजे जणू खऱ्याखोटया पक्षीय स्वार्थासाठीं उडवायचा फुटबॉल होतो आणि या गोष्टीचा फायदा नेमका साम्यवाद्यांनाच मिळत असतो.

लोकशाहीवादी व साम्यवादी हे दोन जागतिक गटच झाले आहेत. या दोन गटांच्या परस्पर–संबंधांचा ऐतिहासिक मागोवा घेतला तर काय बरें दिसतें ? एक तर साम्यवादी देश काय करील नि काय नाहीं याबद्दल कमालीची धाकधूक किंवा साम्यवादी देशाबद्दल संपूर्ण उदासीनता. या दोन टोंकांमध्यें हे संबंध घड्याळाच्या लंबकाप्रमाणें हेलकावे घेतात. अर्थात ही गोष्ट लोकशाहीवादी देशांतील जनमानसांतच दिसून येते आणि तें साहजिकहि आहे. देशोंदेशींचे मुत्सद्दी किंवा राजकारणांत ज्यांच्या मतांना किंमत आहे त्यांचीं मनें या संदर्भांत तपासून पहावीत. दोन्ही गटांत शांततापूर्ण सहकार्य सहज शक्य आहे असा अंधविश्वास तरी त्यांच्या मनांत असतो किंवा तितकाच अंध अविश्वास तरी आढळून येतो. या दोन्ही वृत्तींमध्यें साम्य एकाच प्रकारचें. तें म्हणजे दोन्ही वृत्तींचा उगम साम्यवादाबद्दलच्या सारख्याच अज्ञानांतून झालेला असतो.

## पश्चिमी राष्ट्रांच्या आशावादाला सुरुंग

अमेरिकेंत साम्यवादावर जी चर्चा चालते तींत साम्यवादाच्या राजकीय अंगापेक्षां नैतिक अंगाचाच अधिक विचार होत असल्याचें दिसतें. नैतिक मूल्यें किंवा आदर्शवाद व राजकीय विचार यांचें वावडें असतें असें नाहीं. उलट राजकीय विचारांशिवाय आदर्शवाद तोकडा ठरतो, निर्जीव ठरतो आणि आदर्शवादाशिवाय केवळ राजकीय विचारप्रणाली व्यक्तीला श्रद्धाहीन, निष्ठाहीन बनवते.

अमेरिकन लोकमताचा विचार करतांना त्याच्या नैतिक आदर्शाबद्दल आपली खात्री असते, ही गोष्ट आम्ही गृहीत धरूं शकतों. मात्र त्याप्रमाणें राजकीय विचारांचा परिपक्वपणा आपण गृहीत धरूं शकत नाहीं. राजकीय विचारांना परिपक्वता येण्यास ऐतिहासिकतेची जाणीव असावयास हवी.

साम्यवादी वस्तुस्थितीच्या अनुबंधांत या जाणिवेचा अभाव केवळ अमेरिकेंतच नव्हे तर पश्चिम युरोपीय राष्ट्रांतदेखील दिसून येतो. सोव्हिएट रशियाच्या कृत्यांबद्दल या देशांतून सारखें आश्चर्य व्यक्त केलें जातें तें याच गोष्टीचें निदर्शक होय. सोव्हिएट रशियानें ज्या ज्या वेळीं आपल्या फायद्यासाठीं व केवळ संधिसाधूपणानें आपल्या धोरणांत कांहीं फेरफार

केले त्या त्या वेळीं पश्चिमी राष्ट्रांना रशियाच्या ध्येयधोरणांत मूलभूत स्वरूपाचा फरक पडला असा साक्षात्कार झाला होता याची येथें आठवण व्हावी. रपाल्लोच्या तहानंतर, जनता-आघाडीच्या निर्मितीनंतर, सोव्हिएट घटना घोषित केल्यावर, रशिया राष्ट्रसंघाचा सभासद झाल्यावर, कम्युनिस्ट इंटरनॅशनलचें विसर्जन केल्यावर, अॅटलांटिक सनदेला रशियानें मान्यता दिल्यानंतर आणि जिनेव्हाची बैठक झाल्यानंतर –अशा प्रत्येक वेळीं पश्चिमी राष्ट्रांतून अनेकांनीं छातीवर हात ठेवून सांगितलें : "रशिया आणि पश्चिमी राष्ट्रें यांच्या संबंधांना नवें वळण मिळत आहे आणि दोघांमधील स्नेहशील वातावरणाचा दिवस लवकरच उजाडणार आहे." आणि गंमत अशी कीं प्रत्येक वेळीं रशियाच्या कृत्यांनीं त्यांच्या अशा प्रकारच्या आशावादाला सुरुंग लागत होता.

रशियाच्या धोरणांत आजवर अनेक फेरफार झाले आणि पुढेंहि होतील यांत शंका घेण्याचें कारण नाहीं. लोकशाही राष्ट्रें जें कांहीं करतात किंवा करावयाचें टाळतात त्याची प्रतिक्रिया रशियन राज्यकर्त्यांवर जरूर होते. रशियाबरोबरच्या शिखर परिषदा किंवा अन्य पातळीवरील बोलणींहि फायदेशीर होऊं शकतील. पण केव्हां ? ज्या वेळीं पश्चिमी राष्ट्रें आपल्या भ्रामक कल्पना बाजूस ठेवून व ज्यांना आपल्याला तोंड द्यावयाचें आहे त्यांच्याविषयीं व त्यांच्या विचार करावयाच्या पद्धतीविषयीं संपूर्ण माहिती मिळवून अशा परिषदांत भाग घेतील त्यावेळीं. उभयतांनीं वारंवार भेटले पाहिजे आणि परस्परांवर विश्वास ठेवून भेटले पाहिजे. (--मात्र अशा प्रकारची विश्वासाची भावना रशियन मुत्सद्दिगिरींत दिसून येत नाहीं ! ) परंतु केवळ विवेकाशिवाय विश्वास व सद्भावना यांमुळें कोणतेंहि सत्-कृत्य घडून येत नाहीं. आतांपर्यंतचा इतिहास हेंच दाखवितो. पश्चिमी राष्ट्रांनीं रशियाशीं निरनिराळ्या वेळीं बोलणीं केलीं. पण प्रत्येक वेळीं त्याचे परिणाम मात्र भीषणच झालेले दिसून आले. युद्धोत्तर काळांत केलेल्या लाखों निष्पाप निर्वासितांच्या सामुदायिक कत्तलीपासून तों बर्लिन व कोरिया-मधील अमेरिकनांच्या हत्याकांडापर्यंत विविध प्रकारचे अनुभव त्यावेळीं आले. मात्र यावरून रशियाबरोबर वाटाघाटी करणेंच चुकीचें असा निष्कर्ष कोणी काढला तर तें बरोबर होणार नाहीं. योग्य त्या तयारीनिशीं रशिया-

बरोबर वाटाघाटीस बसल्यानें आपल्या कातडीसच नव्हे तर कपड्यांनाहि कांहीं धोका पोहोंचणार नाहीं.

पण त्याकरितां पश्चिमी राष्ट्रांतील मुत्सद्यांना अधिक चांगल्या प्रकारें —आजवर त्यांनीं केली त्याहून अधिक चांगल्या प्रकारें— तयारी करावी लागेल. त्यांना ही गोष्ट लक्षांत ठेवावी लागेल कीं, आतांपर्यंतच्या इतिहासांत केवळ अजोड अशा जन–आंदोलनाशीं किंवा जन–आंदोलनाला प्रेरणा देणाऱ्या शक्तींशीं त्यांना तोंड द्यावयाचें आहे. कोणत्याहि धर्माला इतक्या जलद गतीनें आणि इतक्या प्रचंड प्रमाणावर अनुयायी मिळाले नाहींत. त्याच-प्रमाणें त्यांना हेंदेखील समजून घ्यावें लागेल कीं साम्यवाद कांहीं ठराविक मार्गानेंच जाणारा नाहीं. कोणताहि मार्ग कोणतेंहि, साधन त्याला वर्ज नाहीं. दुतोंडीपणा, दुहेरीपणा व दुटप्पीपणा यांचें त्याला अजिबात वावडें नाहीं.

## साम्यवादाचें सम्यक् ज्ञान नाहीं

पश्चिमी मुत्सद्यांचीं गतकालांतील साम्यवादाबद्दलचीं मतें जर तपासलीं तर तीं चकित झाल्याच्या भावनेपासून तों संभ्रमावस्थेपर्यंत अनेक अवस्थांतून गेलेलीं दिसतात. यावरून पश्चिमी राष्ट्रांतील मुत्सद्यांना साम्य-वादाचें सम्यक्ज्ञान मिळविण्यासाठीं किती वाटचाल करावी लागेल तें उघड व्हावें. ब्रिटिशांचें अजिंक्य असें धैर्य व सारासार बुद्धि यांचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे चर्चिल. त्यांचेंच उदाहरण घेऊं. १९४० सालीं रशियन धोरणाबद्दल ते म्हणाले कीं, "तें गूढ गुप्ततेच्या आवरणांत गुंडाळून ठेवलेलें एक कोडें आहे." पण तीन वर्षांनीं त्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटमध्यें सांगितलें कीं, "पश्चिमी राष्ट्रांबरोबर प्रतिष्ठेवर आधारलेल्या मैत्रीनें रहाणें हें रशियाचें धोरण आहे!" त्या वेळीं नुकतीच याल्टा परिषद झाली होती. पण पुढें तीन वर्षांनीं फुल्टन (मिसोरी) येथें त्यांनीं असे उद्‌गार काढले कीं, "केवळ अमेरिकन अ‍ॅटम बाँबमुळेंच लाल सेना थांबली; नाहीं तर तिनें अ‍ॅटलांटिक महासागरापर्यंत नक्कीच मजल मारली असती." साम्यवादा-बद्दल कोडें, गूढ व गुपित वगैरे विशेषणें लावणारे चर्चिल रशियांतील साम्यवादाच्या विजयानंतर "परकीय हस्तक्षेपानें साम्यवादाची पाळण्यांतच इतिश्री करतां येईल" असें म्हणत होते हेंदेखील लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

जी गोष्ट विन्स्टन चर्चिल यांची तीच गोष्ट प्रे. रुझवेल्ट यांची. तेहरान व याल्टा येथील वाटाघाटींत रशियाला भरपूर सवलती देऊनहि, रूझवेल्ट यांच्या पदरीं निराशाच आली. ते जसे जिम फार्ले यांना आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर जिंकू शकले तसे स्टॅलिनला जिंकू शकले नाहींत. अंतर्गत घडामोडींवर कमालीचें प्रभुत्व दाखविणारे प्रे. रूझवेल्ट पर-राष्ट्रीय धोरणाच्या बाबतींत किंकर्तव्यमूढ झालेले दिसून येत. साम्य-वादाच्या वास्तव स्वरूपाबाबत प्रे. ट्रूमनना देखील कितपत जाणीव होती त्याचें प्रत्यंतर त्यांच्या 'केपहार्ट कमिशन'ला दिलेल्या उत्तरावरून दिसून येतें. पॉटस्डॅम परिषदेला जातेवेळीं त्यांना त्या कमिशनसमोर पाचारण करण्यांत आलें. 'रशियाच्या विस्तारवादी धोरणाबद्दल काय वाटतें?' असा प्रश्न त्यांना करण्यांत आला. त्यावर ते उत्तरले, " मी रशियन साम्य-वादापेक्षां ब्रिटिश साम्राज्यवादाला अधिक घाबरतों!" ऑलियट रूझवेल्ट यांच्या मतें ब्रिटिश साम्राज्यवाद सत्ताधिष्ठित होता; आणि जाहीर वाच्यता जरी झालेली नसली तरी रूझवेल्ट कुटुंबियांत ब्रिटिश साम्राज्य-वादाबद्दल संशयच वसत होता हें सत्य आहे. पॉटस्डॅम परिषदेहून ट्रूमन विजयी मुद्रा आणि एक चतुर्थांश बर्लिन– जो अमेरिकेनें व्यापलेल्या जर्म-नीच्या भागापासून सुमारें दीडशें मैल सुदूर होता आणि तेथपर्यंत जाण्यास रस्तादेखील मिळाला नव्हता-घेऊन आले. याच प्रकारच्या चुका विल्की आणि आयसेनहॉवर यांनींहि केल्या. प्रमाण कमी जास्त असेल, पण प्रकार तोच. सिनेटर मॅक्आर्थी जरी अितरांनीं साम्यवादाच्या बाबतींत केलेल्या चुकांचा देशद्रोह म्हणून अधिक्षेप करीत असे– आणि आपल्या चुका तो त्यांतून अर्थातच वगळीत असे–तरी तोहि विल्की किंवा आयसेनहॉवर यांच्यापेक्षां वेगळा नव्हता. युरोपमधील मुत्सद्दी देखील त्यांच्या अँग्लो–अमेरिकन भावंडांना शोभेसेच होते. डी गॉलनें साम्यवादी पंचमस्तंभियांना आपल्या सरकारांत घेतलें. मासारिक, बेनेस वगैरे पूर्व युरोपमधील नेत्यांना तर आपल्या भ्रमाबद्दल प्राणाचें मोल द्यावें लागलें.

अशा प्रकारच्या या साम्यवादी चळवळींचें आणि पश्चिमी राष्ट्रांना चकित दृष्टीनें पहावयास लावणाऱ्या रशियन वर्तनाचें रहस्य उलगडून दाखविणारी निरतिशय महत्त्वाची अशी एक– तीच केवळ एकमेव आहे असें

नाहीं– गोष्ट आहे. ही गोष्ट म्हणजे रहस्यभेद करणारी किल्लीच आहे म्हणाना. ही गोष्ट साम्यवादी चळवळीची अंगभूत अशी असून तपशिलांच्या आणि प्रतिपादनांत देण्यांत येणाऱ्या भराच्या बाबतींत जरी तीमध्यें फरक आढळला तरी ती नहमींच अढळ राहिली आहे. आणि निरनिराळ्या ऐतिहासिक प्रसंगांत साम्यवादी चळवळीचें धोरण व डावपेंच तिनेंच ठरविलेलें आहेत. ही गोष्ट म्हणजे साम्यवादी तत्त्वज्ञान होय. त्याचा धिक्कार करणें जितकें सोपें तितकेंचें तें समजून घेणें कठीण आहे. अदूरदृष्टीच्या आणि सुमार सारासार बुद्धीच्या अँग्लो अमेरिकन मुत्सद्यांप्रमाणें केवळ एक थोतांड म्हणून तें उडवून लावणें ही त्यांतली सर्वांत सोपी गोष्ट आहे. (हिटलरच्या प्रलापांत अिंग्रजांना कांहींच अर्थ वाटला नव्हता आणि सुरवातीस कुणीहि त्याकडे लक्ष दिलें नव्हतें याची येथें आठवण व्हावी.)

अितिहासांत मोठ्या राष्ट्रांच्या कृत्यांवर अनेक गोष्टींचा परिणाम झालेला आढळून येतो. त्यांत योग्य संधि आणि अज्ञान हींदेखील येतात. ध्येयनिष्ठा आणि ऐतिहासिक कार्य पार पाडीत असल्याची, समर्पितपणाची भावना या गोष्टी राजकारणांत प्रेरणा म्हणून आजकाल तरी फारशा दिसून येत नाहींत हें खरें. पण ज्या वेळीं त्या दिसून येतात त्यावेळीं त्या सर्वांत बलाढ्य जरी नाहीं तरी निर्णायक ठरूं शकतात. व्यक्तीमधील अहंकार मत्सर, तिरस्कार, सत्ताप्रेम, महत्त्वाकांक्षा हे गुणदोष सामाजिक दबावानें, परंपरेनें आणि दुसऱ्या व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षेमुळें खुरटले जातात. परंतु व्यक्तीमधील हेच गुणदोष देशाच्या, पक्षाच्या किंवा एखाद्या कार्याच्या पायीं वाहून त्यांमध्यें आत्यंतिक कडवेपणा आला तर त्यांत कमालीची तीव्रता आणि शक्ति निर्माण झालेली दिसते. त्या शक्तींत निर्घृणपणाहि येतो. कारण त्यागाच्या कैफामुळें सर्वसाधारणपणें न केल्या जाणाऱ्या गोष्टीहि ती शक्ति करून दाखविते. असा निर्घृणपणा हा सर्वसाधारणपणें माथेफिरूपणाचें लक्षण भासण्याचा संभव असतो. परंतु व्यक्तीच्या सर्वसमर्पणाच्या संदर्भांत त्याला वेगळा आशय प्राप्त होतो; एवढेंच नव्हे तर त्याभोंवतीं उदात्ततेचें वलयहि निर्माण होतें. याच कारणामुळें संतांबरोबर राहणें कधींकधीं कठीण होते. अर्धवट किंवा मनाचा तोल गेलेल्या माणसाला एखादी कडवी (माथेफिरूपणाची वाटणारी) चळवळ ही आपली विकृति

लपविण्याची उत्कृष्ट जागा वाटते तेंहि याच कारणामुळें. अर्थात याचा अर्थ असा नाहीं कीं सरसकट सर्वच कडवे लोक हे अर्धवट असतात. ते सर्वच बाबतींत माथेफिरूंसारखे वागतात असेंही नाहीं. फार काय, त्यांतील कांहीं जण तर आपलें ईप्सित साध्य करून घेण्यासाठीं साधनांच्या बाबतींत बराच लवचिकपणा आणि धूर्तपणाहि दाखवितात.

—१—

## राजकीय तत्त्वज्ञान आणि संघर्ष

आपल्या राजकीय चळवळीचें ध्येय आणि दिशा यांच्या समर्थनार्थ एखादा गट निसर्ग, समाज आणि व्यक्तिमात्र यांच्यासंबंधी मूलभूत असे विचार मांडतो त्यालाच तत्त्वज्ञान असें यथार्थतेनें म्हणतां येईल असें मला वाटतें. सर्वच संघर्ष तात्त्विक असतात असें नाहीं आणि साऱ्याच तात्विक संघर्षांमुळें शांतता धोक्यांत येते असेंहि नाहीं. ऐतिहासिक काळांत घडून आलेल्या फार संहारक लढाया या एकाच तत्त्वज्ञानाचे पाअिक असलेल्या, एवढेंच नव्हे तर एकाच धर्माचे अनुयायी असलेल्या गटांत राजकीय वारसदारीच्या प्रश्नावरून घडून आल्या आहेत; याउलट परस्पर-विरोधी तत्त्वज्ञानांच्या उपासक असलेला झारकालीन रशिया व अमेरिका यांच्यांत सशस्त्र संघर्ष घडून आलाच नाहीं, हेंदेखील आपण पाहतों. आतांपर्यंत झालेल्यांत एकतरी मोठें युद्ध केवळ तात्त्विक होतें किंवा काय हा प्रश्नच आहे. मध्ययुगांतील धर्मभावनेनें पॅलेस्टाअिनवर झालेल्या स्वाऱ्या किंवा युरोपांतील त्रिदशवार्षिक युद्ध यांसारख्या– ज्यांना जास्तीत जास्त तात्त्विक कारणांवरून झालेलीं युद्धें असें म्हणतां येईल– युद्धांत देखील अितर प्रकारच्या विरोधाचा अंश दिसून येतो. ख्रिश्चन योद्धयां-मधील विनाशकारी अंतर्गत झगडे आणि त्रिदशवार्षिक युद्धांत कॅथॉलिक ऑस्ट्रियाविरुद्ध कॅथॉलिक फरान्स व प्रॉटेस्टंटपंथी स्वीडन यांची झालेली एकजूट वरील विधानाचीच सत्यता पटवीत नाहीं का?

## तत्त्वज्ञान म्हणजे मनाचा नकाशा

मात्र तात्त्विक संघर्ष हे फार महत्त्वाचे असतात हें मान्य केलेंच

पाहिजे. त्यांच्यामुळेंच केवळ सशस्त्र युद्ध होईल असें नाहीं, परंतु व्यापारविषयक प्रश्न, सीमा प्रश्न, नैसर्गिक साधनसामग्रीविषयक प्रश्न यांसारख्या प्रश्नांवरून धुमसत असणाऱ्या मतभेदांचें रूपांतर तात्त्विक संघर्षामुळें सशस्त्र युद्धांत होण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रमुख राष्ट्रांची तात्त्विक विचारसरणी काय आहे– दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे त्यांच्या मनाचा नकाशा कसा आहे– याचें सम्यक् ज्ञान करून घेणें हें त्यांच्या भौगोलिक नकाशाचें ज्ञान करून घेण्याइतकेंच, नव्हे त्याहूनहि कितीतरी अधिक महत्त्वाचें आहे. मला असें दाखवून द्यावयचें आहे कीं, हिटलरच्या नाझी तत्त्वज्ञानाप्रमाणेंच साम्यवादी तत्त्वज्ञानहि, निराळ्या कारणाकरतां कां होईना पण आपल्या अनुयायांना जगज्जेतेपणाची कांस धरावयास लावते.

## थोडी तुलना आणि बराच बोध

साम्यवादी तत्वज्ञानाचीं वैशिष्टयें स्पष्ट व्हावींत म्हणून अमेरिकन तत्त्वज्ञानांतील विशिष्ट महत्त्वाच्या मुद्यांशीं त्याची तुलना करून पहाण्यासारखी आहे.

लोकशाही तत्त्वज्ञानांतील मूलभूत व केंद्रीय कल्पना अशी आहे कीं, वयांत आलेल्या माणसाला जर आपल्या हितसंबंधांविषयीं माहिती मिळविण्याचें स्वातंत्र्य असेल तर तो आपल्या हिताहितासंबंधीचा निर्णय अितरांपेक्षां अधिक चांगल्या प्रकारें घेअू शकतो. "बूट कोठें चावतो हें तो घालणारालाच समजतें" हा लोकशाही तत्त्वज्ञानांतील जणू दंडकच आहे. त्याच्या अनुषंगानेंच लोकशाही तत्वज्ञानांतील अितर महत्त्वाच्या गोष्टी येतात. विशेषत: विरोध करण्याचा लोकांचा कायदेशीर हक्क आणि आपल्या अनुभवानुसार राजकीय 'बूट बदलण्याचा' बहुसंख्याकांचा अधिकार यांचा त्यांत समावेश होतो. याचा अर्थ बहुसंख्य जनतेचा कौल नेहमींच बरोबर असतो असा नाहीं. परंतु खुली चर्चा आणि चौकशी यांना जोंपर्यंत स्थान आहे तोंपर्यंत अराजकापेक्षां किंवा हुकूमशाहीपेक्षां लोकशाहींत नागरिकांच्या समान किंवा विरोधी हितसंबंधांतून योग्य अशी तडजोड निघू शकते असा विश्वास अधिक असतो. या कल्पनेचा अव्हेर केला तर मग मात्र लोकशाहीच्या स्वीकारास तर्कशुद्ध अशी भूमिकाच रहात नाहीं.

सोव्हियट रशियाच्या साम्यवादी तत्त्वज्ञानाशीं अँग्लो-अमेरिकन वाचकांचा परिचय आहे असें गृहीत धरणें कठीणच. कारण त्यांच्या राजकीय परिभाषेंत "तत्त्वज्ञान" या शब्दालाच स्थान नाहीं. त्याचप्रमाणें सो. रशियात चालतें त्या प्रकारचें राजकारण त्यांना सर्वस्वीं अपरिचित आहे. अुलट अनुभवाच्या कसोटीवर घांसून तेथें अनेक विचार नेहमींच तपासून पहाण्याची परंपरा आहे. याच गुणांमुळें लोकशाहींत अंतर्गत राजकीय विरोधाला प्रच्छन्न यादवीचें स्वरूप येत नाहीं हें त्याचें वैशिष्टच आहे. परंतु लोकशाहींतील या परंपरेमुळें अितर देशांतील आणि अितर गटांचें राजकारण समजून घेण्याच्या प्रक्रियेंत कांहीं अुणीवाहि निर्माण झाल्या आहेत. अेखादा कारखाना किंवा अेखाद्या स्मारकाची वस्तु ही ज्याप्रमाणें आराखड्यानुसार घडवतात त्याप्रमाणें मानवी अितिहासदेखील ठराविक आराखड्याबरहुकूम घडवूं पाहण्याची कल्पना बहुसंख्य लोकशाहीवाद्यांना वेडगळपणाची वाटेल. याचा नैसर्गिक परिणाम असा होतो कीं, दुसऱ्यांच्या प्रेरणांचा किंवा वागण्याचा अन्वयार्थ लावतांना आपण तात्त्विक विचारांना फारशी किंमत देत नाहीं. कारण अशा प्रकारच्या तात्त्विक विचाराला आपल्या प्रेरणांत किंवा वागण्याच्या बाबतींत स्थानच नसतें. पण हुकूमशाही राजवटीच्या बाबतींत असा समज करून घेणें ही मोठी घोडचूक ठरेल.

जोंपर्यंत हा (गैर) समज दूर होत नाहीं, आणि साम्यवादी तत्त्वज्ञानाचें पूर्ण आकलन होत नाहीं तोंपर्यंत, मला वाटतें, परराष्ट्रीय राजकारणांतील प्रमुख प्रश्नांच्या बाबतींत अमेरिकन लोकमत चुकीच्या मार्गानेंच जाणार-बुद्धिवादापेक्षां भावनेचाच त्यावर पगडा असणार.

## प्रचार वाङमयावरून तत्त्वज्ञानाची कल्पना येणार नाहीं

साम्यवादी तत्त्वज्ञानाचें तपशीलवार परिष्करण करण्यापूर्वीं कांहीं गोष्टी लक्षांत ठेवावयास हव्यात. पहिल्याप्रथम आपण साम्यवादी तत्त्वज्ञान हें खरोखरी काय आहे हें कसें समजून घेणार हा प्रश्न आपल्यापुढें उभा राहतो. याचें अुत्तर तसें पाहिल्यास सोपें आहे; पण त्याकडे आपलें दुर्लक्ष होतें. साम्यवादी तत्त्वज्ञान काय आहे हें आपण सोव्हियट रशिया-

कडून आलेलीं पत्रें आणि त्यांच्या राजदूताचीं वक्तव्यें यावरून ठरवितां कामा नये. स्टॅलिननें अेका पत्रांत "सर्व राष्ट्रांचे लोकशाही हक्क व नागरिक स्वातंत्र्य अबाधित राखण्याची" तयारी दाखविली. पश्चिमी राष्ट्रांतील मुत्सद्दी या पत्रावरून स्टॅलिनला खरोखर काय म्हणावयाचें आहे, खुद्द सोव्हियट रशियांत लोकशाहीची प्रभात फांकेल किंवा काय याविषयीं गंभीरपणें चर्चा करूं लागले. तें पाहून रशियन राज्यकर्तें मनांतल्या मनांत खदखदा हंसले मात्र असतील ! रशियन प्रवक्त्यांनीं परकीय पत्रकारांना दिलेल्या मुलाखती, त्यांना लिहिलेलीं पत्रें यांवरूनहि साम्यवादी तत्वज्ञानाचा शोध घेणें चुकीचें ठरेल. कारण त्या मुलाखतींत किंवा पत्रांत रशियन प्रवक्त्यांना आम्ही ज्यावर विश्वास टाकावा असें वाटतें तेंच असतें. सोव्हियट नेते आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठीं जें मूलभूत स्वरूपाचें तात्त्विक लिखाण करतात व ज्याचा अभ्यास पक्षकार्यकर्त्यांना करावा लागतो त्यावरूनच आपल्याला साम्यवादी तत्वज्ञानाचें सम्यक् दर्शन होअू शकेल. साम्यवादी विचारसरणींत वैचारिकतेवर निरतिशय भर दिला जातो; व्यवहाराच्या– आचाराच्या मार्गदर्शनासाठीं वैचारिकता परमावश्यक मानली जाते.

जे आज वयानें मोठे आहेत त्यांना दुसऱ्या महायुद्धापूर्वींचीं कांहीं वर्षे आठवत असतील. त्या वेळीं हिटलरनें थोर शांततावादी जॉर्ज लान्सबरी यांना अेक मुलाखत दिली होती. त्या मुलाखतींत हिटलरनें त्यांची खात्री पटवून दिली कीं, नाझी पक्षाला जागतिक शांततेची तीव्र कळकळ आहे ! जगांतील अितर देशांच्या राज्यकर्त्यांना लिहिलेल्या पत्रांतून हिटलरनें शांततेचा अविरत जप चालविला होता. ज्या ज्या वेळीं म्हणून त्यानें कोणताहि तह लाथाडला त्या त्यावेळीं तो "शांतता", "शांतता" असाच पुकारा करीत असे. भोळसट लोकानीं त्यांवर हिटलरचीं तीं प्रामाणिक मतें म्हणून विश्वास ठेवला. परंतु हिटलरचें मनोगत त्याचें आत्मवृत्त (Mein Kamf) किंवा त्यानें नाझी पक्षापुढें केलेली भाषणें यांचें विश्लेषण केल्यानंतरच समजूं शकतें. त्याचप्रमाणें सोव्हियट रशिया आपल्या कृतींचें समर्थन करण्याकरतां म्हणून जें परदेशासाठीं प्रचारी वाङ्मय निर्माण करतो तें वाचून सोव्हियट रशियाचें मनोगत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
वि:
अनुक्रम
क्रमांक नों: दि:



समजणार नाहीं; तें समजेल स्टॅलिनसारख्यांचें देशोंदेशींच्या पक्ष–कार्यकर्त्यांसाठीं लिहिलेले ‘लेनिनवादाचे सिद्धांत’, किंवा ‘सो. रशियाच्या कम्युनिस्ट पक्षाचा अितिहास’ यांसारखें लिखाण वाचून. अशा पुस्तकांचा खप बायबलचा अपवाद वजा करतां जगांत सर्वांत अधिक आहे अशी शेखी रशिया मारीत असतो. ग्रांथिक लिखाण जेथें संदिग्ध वाटतें–मूलभूत प्रश्नावर तें तसें नाहींच–तेथें त्याचा अर्थ सोव्हियट रशियाच्या आचारावरून सहज समजून येतो. स्टॅलिनच्या बाबतींत जें खरें आहे तें त्याच्या मागून आलेल्यांच्या बाबतींतहि खरें आहे.

**मार्क्सवाद म्हणजे साम्यवाद नव्हे**

साम्यवादी मंदिरांत मार्क्सची प्रतिईश्वर म्हणून प्रतिष्ठापना झालेली असल्यामुळें व साम्यवादी लिखाणांत मार्क्सचा उल्लेख वरचेवर येत असल्यामुळें सांप्रतची साम्यवादी विचारसरणी म्हणजेच मार्क्सवाद किंवा मार्क्सचें तत्त्वज्ञान होय असें समजण्याची गफलत होण्याचा संभव असतो. अशी समजूत करून घेतली तर सांप्रतची साम्यवादी विचारसरणी समजून घेण्याच्या बाबतींत गोंधळ उडून जाईल. सालाझार व फ्रँको यांच्या हुकूमशाहीची येशू ख्रिस्ताच्या विचारांशीं सांगड घालणें– कारण ते दोघेहि “देवाच्या पितृच्छायेखालीं मानवाच्या बंधुभावाबद्दल” बोलतात; आणि त्यांच्या राजवटींत पाद्री लोकांचें स्थान मोठें आहे– हें जितकें शहाणपणाचें तेवढेंच सांप्रतच्या साम्यवादी विचारसरणीची मार्क्सवादाशीं सांगड घालणें शहाणपणाचें होईल. साम्यवादी ज्याप्रमाणें मार्क्सच्या भांडवलशाहीवरील टीकेचा उपयोग करून घेतात त्याचप्रमाणें लोकशाही समाजवादी देखील करतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि साम्यवादी व लोकशाही समाजवादी यांचें तर हाडवैर आहे. याचाच अर्थ असा की, मानवाच्या मुक्तीच्या व प्रतिष्ठेच्या प्रेरणेनें भारलेल्या मार्क्सवादामुळें समकालीन साम्यवादी विचारसरणी अितरांहून वेगळी ठरत नाहीं. काउट्स्की, प्लेखेनॉव्ह व हिलफर्डिंग यांच्यासारखे थोर मार्क्सवादी साम्यवाद्यांना बाकुनिन व नाचेयेव यांच्या परंपरेतील मानतात. अर्थात् हेंदेखील अतिशयोक्त विधानच म्हणावयास हवें. परंतु ज्या तत्त्वज्ञानांत असें सांगितलें होतें कीं समाजवाद हा औद्योगीकरण झालेल्या व पुढारलेल्या पश्चिमी राष्ट्रांतच प्रथम येऊं शकेल त्या मार्क्सच्या तत्त्वज्ञानाशीं, जगांतल्या एका

मागासलेल्या राष्ट्रांत वाटेल त्या मार्गांनीं व वाटेल ती किंमत देऊन समाजवाद प्रस्थापित करूं पहाणें योग्य म्हणणाऱ्या समकालीन साम्यवादी विचारसरणीची सांगड घालणें कसें चुकीचें आहे हें लक्षांत येण्यास हरकत नाहीं. मार्क्सचे विचार हें प्राधान्येंकरून पश्चिम युरोपीय संस्कृतीचें फळ– जर्मन परंपरागत तत्त्वज्ञान, इंग्लिश अर्थशास्त्रीय विचारसरणी, फ्रेंच समाजवादी विचारसरणी यांचा त्याच्या प्रज्ञेनें केलेला समन्वय म्हणजे मार्क्सचें तत्त्वज्ञान. लोकशाहीच्या राजकीय अंगावर मार्क्स अशासाठीं टीका करी कीं त्याचा आधार जोंवर जीवनाच्या अितर अंगांना लाभत नाहीं तोंवर लोकशाही अपुरी असते असें त्याला वाटे. तो लोकशाहीचा संकोच करूं पहात नव्हता तर तिचा सतत आणि सर्वत्र विकासच व्हावा असें त्याला वाटे. फाजील आशावादीपणानें म्हणा किंवा कसेंहि म्हणा राजकीय लोकशाही अस्तित्वांत असेल तरच एक अर्थव्यवस्था म्हणून समाजवाद येऊं शकेल असें त्याला वाटे.

समकालीन साम्यवाद हा बोल्शेव्हिक–लेनिनवाद आहे, मार्क्सवाद नाहीं. त्याची अधिकृत विचासरणी लेनिन व स्टॅलिन या दोघांच्या–ज्यांनीं आतांपर्यंतच्या काळांत फार मोठा इतिहास घडविला परंतु ते मानीत असलेल्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाशीं ज्यांच्या कृत्यांची संगति लावणें कठीण आहे अशांच्या– लिखाणांत, शिकवणुकींत आणि वर्तनांत सांपडतें. आजकाल जरी लेनिनच्या नांवाबरोबर स्टॅलिनचें नांव घेतलें जात नसलें तरीहि त्याची कोणतीहि राजकीय कल्पना किंवा कोणताहि राजकीय विचार अव्हेरला गेलेला नाहीं हें लक्षांत ठेवावयास हवें. हल्लीं तेथें फक्त अंतर्गत दहशतवाद जरा कमी झाला आहे एवढेंच.

–२–

## साम्यवादाचें मूलभूत सिद्धान्त

आतां आपल्याला समकालीन साम्यवादी ध्येयवादाच्या मूलभूत सिद्धान्ताचा विचार करावयाचा आहे.

साम्यवादाचा पहिला सिद्धान्त असा आहे कीं, राष्ट्रीय, त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय पातळीवर ‘नाहीं रे’ वाल्यांचा ‘आहे रे’ वाल्या वर्गांशीं

अपरिहार्य असा संघर्ष चालतो; त्या संघर्षांत 'नाहीं रे' वाल्यांचा विजय होण्यावरच मानवजातीचें कल्याण—म्हणजेच चिरकालीन शांतता, अविरत होणारी समृद्धि आणि पिळवणुकीपासून होणारी अंतिम मुक्तता— अवलंबून असते. हा सिद्धान्त इतर अनेक पायाभूत विचारांचा निष्कर्ष होय. त्यांतील प्रमुख विचार दोन. पहिला असा कीं, भांडवलशाही उत्पादन—व्यवस्थेंत कितीहि बदल केले किंवा तीमध्यें कितीहि सुधारणा घडवून आणल्या तरी ठराविक मुदतीनें येणाऱ्या, वाढत्या तीव्रतेच्या, व ज्याची परिणति युद्ध आणि विनाश यांतच होते अशा प्रकारच्या संघर्षापासून ती कधींच विमुक्त होऊ शकत नाहीं. दुसरा विचार असा कीं या उत्पादन-व्यवस्थेंत राबणाऱ्या कामगार वर्गाचें स्थान मोठें मोक्याचें असतें. उत्पादन—व्यवस्थेंत त्याचें कांहींच हितसंबंध नसतात. त्यामुळें उत्पादन व्यवस्थेत कांहीं सुधारणा घडवून आणाव्यात म्हणून नाहीं तर ती उलथून पाडावी म्हणून चाललेल्या क्रांतिकारक आंदोलनाचा तो वर्ग जनतेमधील पाया होऊं शकतो. वर उल्लेखिलेल्या सिद्धान्तामागें दुसराहि एक महत्त्वाचा विचार आहे. तो म्हणजे कामगार वर्गाचें लोकसंख्येंत प्रचंड संख्याधिक्य असतें; व त्याच्या व इतर वर्गांच्या हितसंबंधांत अनिवार्य असा वर्गीय संघर्ष असतोच असतो. प्रचंड संख्याधिक्य असल्यामुळें त्या वर्गाचा विजय हा केवळ ऐतिहासिक दृष्टया अपरिहार्य आहे असें नसून तो नैतिक दृष्टयाहि न्याय्यच ठरतो. या विजयामुळें उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकी संपुष्टांत येते आणि उत्पादनाचीं साधनें आणि समाज यांवर राज्यसत्तेची मालकी आणि नियंत्रण येतें.

या ठिकाणीं बरेंचसें भाष्य करतां येण्यासारखे आहे : कांटेकोरपणें पाहिल्यास कामगार वर्ग (Proletariat) म्हणजे औद्योगिक कामगार होय. पण औद्योगिक कामगारांची बहुसंख्या कोठेंहि नाहीं— कदाचित् इंग्लंड आणि जर्मनी हे दोन देश अपवाद असावेत. यामुळें रबर ताणावें तसा 'कामगार' शब्दाचा अर्थ साम्यवादी लिखाणांत ताणलेला दिसून येतो. मग 'कामगार' या सदराखालीं कारकून येतात, इतर व्यावसायिक येतात, शेतमजूर येतात— थोडक्यांत कामगार वर्गाच्या नांवाखालीं जो कांहीं कार्यक्रम साम्यवादी पक्ष मांडतो त्याला पाठिंबा देणारे सारेच कामगारांत मोडतात. त्याचप्रमाणें 'भांडवलदार वर्ग' आणि विशेषतः 'मध्यम वर्ग' यांच्या अर्थांची ओढाताण

आश्चर्यकारक रीतीनें केली जाते. कामगार म्हणून वर उल्लेखिलेल्या गटांपैकीं कांहींनीं जर एकादे वेळीं साम्यवादी पक्षाच्या राजकीय कार्यक्रमाचा पाठपुरावा केला नाहीं तर ते एकदम प्रतिक्रांतिकारक– ‘ मध्यमवर्गीय ’ म्हणून धिक्कारले जातात. मग ते गट मोलमजुरी करून पोट भरीत असले तरी हरकत नाहीं ‘ कामगार वर्ग ’ व ‘ मजूर ’ (कामगार) यांच्या अर्थामधील लवचिकपणाचें महत्त्व दिवसेंदिवस अधिकधिक उघड होऊं लागलें आहे.

**पक्षनेतृत्व मान्य करणारा कामगारच क्रांतिकारक**

साम्यवादी विचारसरणींतला दुसरा सिद्धांत असा कीं, कामगार वर्गाचें स्वरुप लढाऊ असूनहि तो स्वतः होऊन वर्गहीन आणि वर्गविग्रहहीन असें ज्याचें वर्णन केलें जातें त्या समाजरचनेंचें ध्येय गांठू शकत नाहीं. मात्र साम्यवादी पक्षानें संघटित केलेल्या धंदेवाईक क्रांतिकारकांचें नेतृत्व कामगारांनीं मान्य केलें तरच प्रस्थापित सत्तेवर ताबा मिळवून आणि ती नामशेष करून नवी समाजरचना उभारतां येते. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे फक्त साम्यवादी पक्ष हाच केवळ इतिहासाच्या वाटचालीकडे आणि अर्थशास्त्र व राजकारण यांकडे पाहण्याच्या आपल्या उच्च कोटीच्या शास्त्रीय दृष्टिकोनामुळें ‘कामगार वर्गा’चें हित कशांत आहे हें कामगार वर्गापेक्षांहि अधिक चांगल्या रीतीनें जाणतो. कामगार वर्ग हें इतिहासाचें लाडकें लेंकरूं आहे; पण असें असूनहि तें चुका करतें आणि साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाचें जोखड मानेवर लादलें जाईपर्यंत स्वतःचें आणि साऱ्या मानवजातीचें रक्षण करण्याचें साम्यवादी ध्येयहि त्याला माहित नसतें. मात्र हें साम्यवादी पक्षाचें नेतृत्व कामगार वर्गांतून निर्माण झालेलें असते असें नाहीं. लेनिन आणि स्टॅलिन या दोघांच्याहि लिखाणावरून आणि त्यांच्या कृतीवरून वरील विधानासंबंधी संशयास जागा रहात नाहीं. ज्यावेळीं कामगार वर्ग साम्यवादी पक्षाच्या कार्यक्रमाच्या व धोरणाच्या (वा डावपेंचाच्या) विरोधी असतो त्यावेळीं तो कधींच बरोबर असूं शकत नाहीं. ज्यावेळीं विधिमंडळें–साम्यवादी पक्षाचें धोरण मान्य करतात त्यावेळीं “ सारी सत्ता विधिमंडळाला” हा जणू अधिनियम असतो; परंतु विधिमंडळाचें स्वरूप यत्किंचितहि बदललेलें नसतांना जर कां साम्यवादी क्षप व विधिमंडळ यांच्यांत मतभेद झाले तर “सारी सत्ता विधिमंडळाला” हा अधिनियम झिडका-

वला जातो. हा मतभेद तीव्र स्वरूपाचा असला तर प्रत्यक्ष कामगारच आदर्शभूत कामगार वर्गाचे प्रतिगामी शत्रू ठरतात! कारण साम्यवादी पक्ष आणि केवळ साम्यवादी पक्षच कामगार वर्गाचें–मग तो कामगारवर्ग अस्तित्वांत कां नसेना–हितसंबंध जाणूं शकतो; इतर कोणीहि नाहीं. म्हणूनच लेनिन व स्टॅलिन यांच्या मतें "कामगार वर्गाची हुकूमशाही ही वस्तुतः साम्यवादी पक्षाचीच हुकूमशाही होय." ते सांगतात कीं, ही हुकूमशाही कधींतरी कां होईना पण निश्चितपणें नाहींशी होईल. हा 'सोनियाचा दिवस' कधीं उगवेल तें सांगतां येत नाहीं. पण तो उगवेल त्यावेळीं परिस्थिति कोणत्या प्रकारची असेल ते सांगतां येतें. ज्यावेळीं जगातील लोकशाहीवादी आणि बिगरलोकशाहीवादी देशातील भांडवलदारीचा शेवटचा अंश नष्ट होईल आणि साम्यवाद अन्तर्गत व बाह्य शत्रूंपासून सुरक्षित राहील त्याचवेळीं हा 'सोनियाचा दिवस' उगवेल. तोंपर्यंतच्या काळांत सांम्यवादी राजवट आणि हुकुमशाही ही आपल्या वर्षानुवर्षं वाढणाऱ्या शक्तींमुळें आस्ते आस्ते नाहींशी होत जातात! सामान्य तर्कशास्त्रानें ही गोष्ट पटणें कठीण आहे; पण विरोधविकासवादी तर्कशास्त्राची कांस धरली म्हणजे उघड उघड दिसणारी विसंगतीहि मान्य होणें कठीण जात नाहीं व मग वरील विधान सहज पटतें! म्हणजेच वास्तवांत असें घडतें कीं, कामगार वर्गाची हुकुमशाही ही "कामगार वर्गावरील हुकुमशाही" ठरते. आणि ही हुकुमशाही जरी भयंकर निष्ठूरपणें लादली जात असली तरी ती लादणारे असेंच समजतात कीं ते इतिहासदत्त–मी तर येथें देवाचेंच नांव घेणार होतों–कार्यच करतात.

## कामगारांची इच्छा आणि हित

साम्यवादी पक्षच कामगारांपेक्षां कामगार वर्गाचें हित अधिक चांगल्या प्रकारें जाणतों हें तत्त्वच मुळीं साम्यवादी विचारसरणींत मूलभूत असें आहे. एखाद्याला जर दुसऱ्या व्यक्तीचें खरें हित कशांत आहे हें माहीत असलें तर तो त्या दुसऱ्या व्यक्तीच्या इच्छेला तिच्या हितासाठीं विरोध करूं शकतो. कामगारांच्या आशा–आकांक्षा कितीहि लोकशाही पद्धतीनें व्यक्त झालेल्या असोत, त्या जर साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाच्या दृष्टीनें कामगारांच्या खऱ्या हिताच्या विरोधी असतील तर

त्या कामगारांना विरोध करणें आणि त्यांचा नाश करणें तात्त्विक दृष्ट्या योग्यच ठरतें. हंगेरीमधील रशियन हस्तक जान कादर यानें १९५९ मधील बुडापेस्ट येथील उठाव निष्ठूरपणें चिरडला. त्यानंतर त्याला कामगार वर्गाची इच्छा आणि त्याचें हित यांत फरक असतो या तत्त्वानुसार आपल्या कृतीचें समर्थन करावें लागलें. ता. ११–५–५७ रोजीं हंगेरीच्या राष्ट्रीय सभेंत साम्यवादी नेतृत्व आणि बहुजनसमाज यांमधील संबंधाविषयीं उहापोह करतांना तो काय म्हणाला तें पहाण्यासारखें आहे :

"लोकांची अिच्छा कार्यवाहींत आणणें हें कांहीं नेत्यांचें काम नाहीं. ......लोकांचें हित कशांत आहे तें समजून घेणें व तें घडवून आणणें हें नेत्यांचें काम आहे. मी लोकांची इच्छा आणि त्यांचें हित यांत फरक कां करतों? कांहीं दिवसांमागेंच आपण अशा घटना पाहिल्या कीं कामगार वर्गांतील कांही गट आपल्याच हिताविरुद्ध वागत होते. अशा वेळीं नेत्यांचें कर्तव्य काय? यांत्रिकपणें चुकीच्या कल्पना कार्यवाहींत आणणें हें अशा वेळीं नेत्यांचें कर्तव्य होईल का? नाही; नेत्यांचें हें कर्तव्य नव्हे. लोकांची अिच्छा आणि प्रगति यांत विसंवाद दिसून येत असेल त्यावेळीं लोकांना दुसऱ्या दिशेनें नेलें पाहिजे. ...... (East Europe July 1957–p. 58).

## हुकुमशाहीचें साम्यवादी समर्थन

साम्यवादी विचारसरणींतील तिसरा महत्त्वाचा सिद्धांत संघटनेबद्दलचा. नेत्यांच्या अिच्छेपुढें स्वतःची अिच्छा गौण समजून समर्पित जीवन जगणाऱ्या धंदेवाईक क्रांतिकारकांची साचेबंद, गटबाजीपासून अलिप्त व सैनिकी शिस्तीनें बांधलेली संघटना असल्याशिवाय साम्यवादी पक्ष कामगार वर्गाचें नेतृत्व करूं शकत नाहीं असें ते म्हणतात. क्रांतिकारी संघटनेच्या स्वरूपाविषयीं स्वतःच्या कल्पनांमुळेंच लेनिननें तो स्वतः व पाश्चिमात्य मार्क्सवादी यांतील फरक स्पष्टपणें दाखवून दिला आहे. कारण त्याच्या कल्पनेप्रमाणें '(साम्यवादी) पक्षाची हुकुमशाही' (येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं कामगार वर्गाची हुकुमशाही व पक्षीय हुकुमशाही या दोन्ही एकरूपच मानल्या आहेत) म्हणजेच 'पक्षाच्या राजकीय समितीची'

हुकूमशाही होय आणि ती वेळप्रसंगीं एका व्यक्तीचीहि हुकूमशाही होऊं शकेल. 'लोकशाही केंद्रीकरणा'चा अर्थ तो कसा लावतो तें त्यानें कधींच दडवून ठेवलें नाहीं.

"नोकरशाही विरुद्ध लोकशाही आणि केंद्रीकरणवाद विरुद्ध स्वायत्ततावाद हे दोन्ही एकच आहेत. क्रांतिकारक राजकीय लोकशाहीच्या संघटनेचें सूत्र व संधिसाधूंच्या सामाजिक लोकशाहीच्या संघटनेचें सूत्र यांत जो फरक तोच तेथेंहि आहे. उत्तरोक्त संघटना खालून वर जाऊं पहाते तर पूर्वोक्त संघटना वरून खालीं येते आणि केंद्राचे हक्क व अधिकार यांची ती तरफदारी करते.' (Lenin : Selected Works 447–448).

नेतृत्वासंबंधीचें हें हुकूमशाही तत्त्व साम्यवादी विचारसरणींत केवळ राजकारणापुरतेंच मर्यादित नसून, सर्व सामाजिक व आर्थिक संघटनांत त्याचाच पाठपुरावा केलेला आढळतो.

'सोव्हिएट धर्तीची समाजवादी लोकशाही ही एखाद्या व्यक्तीच्या हुकुमशाहीशीं विसंगत नाहीं ... हुकुमशहा हा एखाद्या वर्गाची इच्छा कार्यवाहींत आणतो. बऱ्याच वेळां तो एकटाच अधिक कार्य करूं शकतो आणि त्याचीच अनेकदां अधिक गरज असते.' (कित्ता VIII 222).

साम्यवादी पक्षाच्या विचारांचा आणि संघटनेचा सांचेबंदपणा कायम राखणें आणि आचाराविचारांत रुळलेल्या चाकोरीबाहेर जाऊं पाहणाऱ्या प्रवृत्तींचा बीमोड करणें हा साम्यवादी नेतृत्वाच्या कार्याचा एक भाग आहे. वारंवार होणारा जरासाहि विरोध हा तेथें पक्षशिस्तीचा भंग ठरतो. 'जो कोणी कामगारवर्गाच्या पक्षाच्या पोलादी शिस्तीला जरासाहि बाध आणतो–विशेषतः त्याच्या हुकुमशाहीच्या काळांत–तो कामगार वर्गाविरुद्ध भांडवलदारांना प्रत्यक्ष मदतच करतो' असें ते म्हणतात. त्यांचा (पक्षीय) आचारविचार मानवी जीवनाचीं सर्व क्षेत्रें व्यापणारा–सर्वंकष असा असतो. मानवी जीवनाच्या सर्व कूट प्रश्नांचीं उत्तरें विरोध–विकासवादी तत्त्वज्ञानांत सांपडतात व तीं राजकीय दृष्ट्या विश्वासार्ह अशा साम्यवाद्यांनाच ज्ञात असतात ! यावरून कला आणि खगोलशास्त्रापासून तों संगीत आणि जीवनशास्त्रापर्यंत सर्व विषयांत एक विशिष्ट–मग तें वेळोवेळीं बदलणारें कां असेना–पक्षीय धोरणच कां असतें याचा उलगडा होतो. कोण-

त्याहि क्षेत्रांतला (पक्षीय विचारांशीं) विसंवादी सूर कोणता हें ठरविण्याचे अंतिम अधिकार साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाला असतात. त्याच्या निर्णयाविरुद्ध दाद मागणें हें पक्ष-सभासदाला किंवा लोकमतालाहि शक्य नसतें.

## सिद्धान्त आणि निष्कर्ष

या तिन्ही सिद्धांतांच्या संकलित परिणामांची नीट कल्पना यावी म्हणून ते तिन्ही एकत्रित मांडूं :

(१) कामगार वर्गाच्या विजयावर मानवजातीचें कल्याण अवलंबून असतें.

(२) कामगार वर्गाचा विजय हा साम्यवादी पक्षाच्या हुकुमशाहीवर अवलंबून असतो.

(३) साम्यवादी पक्षाची हुकुमशाही ही त्या पक्षाच्या नेतृत्वामुळें-मग तें नेतृत्व राजकीय समितीचें (Politbureau) असो वा स्टॅलिनचें किंवा क्रुश्चेवचें असो-कार्यान्वित होतें !

यावरून अपरिहार्य अशा एका तार्किक संगतीशीं-आणि येथें आपण आपल्या तार्किक सुसंगतीचा अभिमान बाळगणाऱ्यांचा विचार करीत आहोंत आपण पोहोंचतों. ती म्हणजे जो कोणी साम्यवादी पक्षाच्या राजकीय समितीनें जागतिक परिवर्तनासाठीं मांडलेल्या कार्यक्रमाला विरोध करील तो मानवी कल्याणाचा विरोधक ठरतो! साम्यवादी वाक्प्रचार वापरावयाचा म्हणजे तो मानवजातीचा शत्रु ठरतो! !

मात्र ज्या कळकळींतून हा निष्कर्ष काढण्यांत येतो आणि निष्ठुरपणें लादण्यांत येतो तिच्याबद्दल शंका घेण्यास जागा नसतें. जे कोणी साम्यवादी पक्षाच्या अधिकारारूढ गटाच्या निर्णयाला विरोध करतील ते सारे त्यांच्या मतें मानव जातीचे शत्रूच होत-मग ते विरोधक कोणतेहि असोत; ते बुडापेस्ट किंवा बार्सेलोना येथील कामगार असोत; किंवा सायुदायिक शेतीला विरोध करणारे रशियांतील स्वतंत्र शेतकरी असोत; वेगळा कार्यक्रम मानणारा एखादा कामगारांचा वर्ग असो किंवा मेन्शेविक व डाव्या सामाजिक-क्रांतिकारकांसारखे समाजवादी पक्ष असोत; कामगार असोत किंवा सैनिक असोत; किंवा श्लेपनियाकोव्च्या नेतृत्वाखालील पक्षांतील कामगार-विरोधक असोत; एवढेंच काय लेनिनचे अेके काळचे

सहकारी असोत– साऱ्यांना एकाच मापानें मोजण्यांत येते, आणि त्यांना मानवजातीचे शत्रू ठरविण्यांत येते ! जर ते शरण आले नाहींत तर त्यांना शिक्षा ही व्हायलाच पाहिजे–पुढाऱ्यांना सरळ जगांतून नाहींसे करावयाचे आणि अनुयायांना वेठबिगारीला जुंपायचे. तात्त्विक दृष्ट्या मानव जातींतील बहुसंख्य लोक–मग ते कामगार असोत वा नसोत–जर साम्यवादी पक्षाचा मानवाच्या राजकीय मुक्तीचा कार्यक्रम मानायला तयार नसतील तर ते सारे मानवजातीचे शत्रूच ठरतील.

## साम्यवादी कडवटपणा आणि नीति

पाश्चात्यांच्या ऐहिक राजकीय प्रवृत्तीला सर्वस्वीं अपरिचित अशा राजकीय विचारांचा या ठिकाणीं आपण परामर्श घेत आहोंत. पण अपरिचित म्हणून कांहीं त्यांच्या अस्तित्वाबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. साम्यवादी नेत्याना त्यांनीं उद्घोषिलेल्या आदर्शांत व साम्यवादाच्या क्लेशकारक वास्तवांत असलेली भयंकर तफावत समजत नाहीं असेंहि नाहीं. पण त्यांच्या दृष्टीनें प्रगतीकरतां संक्रमणावस्थेंत दिलेली ही किंमत असून तिची भरपाई भविष्यकाळांत वरच्या श्रेणीवर पोंहोंचलेल्या साम्यवादाकडून व्हावयाची आहे.

मार्क्स एकदां म्हणाला होता कीं, " कोणताहि सत्ताधारी वर्ग आपली सत्ता स्वखुशीनें सोडीत नाहीं." आपण हा दंडक साम्यवादी राज्यकर्त्यांना लावूं शकतों आणि असेंहि म्हणूं शकतों कीं, ते राजकीय अत्याचाराच्या मार्गानें मिळविलेल्या हक्काचें कळत नकळत ऐतिहासिक आवश्यकता म्हणून समर्थन करूं पहातात. आपण ज्यांचा विचार करतो त्या साम्यवादी लोकांत घबराटीची भावना नाहीं किंवा ते मूर्ख लोकहि नाहींत. उलट आपल्या कार्यक्रमावर पूर्ण विश्वास असल्यामुळें व त्यांच्या तत्त्वज्ञानामुळें त्यांच्या अंगीं निर्माण होणाऱ्या प्रेषितसदृश भावनेमुळें ते दृढनिश्चयी झालेले आहेत. इतकें कीं त्यांचा कार्यक्रम समजावून घेऊन तो त्याज्य समजतील असे कुणी असतील असें त्यांना वाटत नाहीं. असे कुणी असतीलच तर ते (१) स्वार्थी भांडवलदार असले पाहिजेत (कारण राज्यसत्तेकडे उत्पादनाची मक्तेदारी गेल्यामुळें त्यांच्या हितसंबंधांस आणि सामाजिक स्थानास धक्का पोहोंचतो.) किंवा (२) मूर्ख वा अज्ञानी असले पाहिजेत (साम्यवादाचा

संदेश ज्यांच्या हृदयाला हात घालूं शकत नाहीं असे कांहीं कामगार यांत येतात) किंवा (३) अप्रामाणिक तरी असले पाहिजेत (साम्यवादावर टीका करणारे बुद्धिवादी या वर्गांत मोडतात. त्यांची 'भांडवलदारांचे हस्तक' अशीच संभावना करण्यांत येते.)

## साध्यापुढें सर्व गोष्टी गौण

साम्यवादी नेत्यांमधील कडवेपणा हा सत्प्रवृत्तीबद्दल आहे कीं अपप्रवृत्तीबद्दल आहे हा मुद्दा या ठिकाणीं गौण आहे. हा कडवेपणा एका कार्यक्रमासाठीं आहे आणि एका विशिष्ट साध्यापुढें इतर सर्व गोष्टी दुय्यम मानणारा असा आहे ही गोष्ट लक्षांत ठेवणें अधिक महत्त्वाचें आहे. या साध्यासाठीं सत्तासंघर्षांत कोणतींहि—अक्षरशः कोणतींहि— साधनें चालण्यासारखीं असतात. साम्यवाद्यांच्या आचरणांतील कमालीचा संधि–साधुपणा, त्यांच्या फसव्या घोषणा व डावपेंच यांचा खुलासा यामुळें होण्यासारखा आहे. कोणत्याहि साम्यवाद्यास तो कसल्याहि प्रकारच्या नैतिक तत्वांनीं बांधलेला आहे असें वाटत नाहीं. याचा अर्थ ते अनैतिक आहेत असा होत नाहीं असें लेनिन बजावतो. "आम्ही म्हणतों कीं कामगारांच्या वर्गसंघर्षाच्या हितासाठीं नैतिक मूल्यें सर्वस्वीं गौण मानावयास हवींत" असें त्यानें जाहीरच केलें आहे. स्मरडयाकोव्ह यानें 'दि ब्रदर्स कॅरॅमाझोव्' (The Brothers Karamazov) यांत सांगितलेलें, सत्ता हस्तगत करण्यासाठीं कांहींहि केलें तरी चालेल हें सिद्धान्तसूत्र लेनिन, स्टॅलिन किंवा त्याच्या मागून येणाऱ्या सर्वांनींच कवटाळलें आहे ही गोष्ट त्यांच्या पैकी प्रत्येकाच्या कारकिर्दीवरून सिद्ध होते. यासाठींच जगभरचे साम्यवादी आपल्या नागरिक हक्कांविषयीं पराकाष्ठेचे आग्रही दिसत असले तरी सत्तेवर आल्यानंतर ते आपल्याशीं सहमत नसलेल्यांच्या नागरिक हक्कांची गळचेपी करण्यास मागेंपुढें पहात नाहींत. साम्यवादाच्या विचारसरणीची ओळख नसलेल्या कुणालाहि जर रशियन प्रतिनिधीबरोबर वाटाघाटी करावयाची वेळ आली तर त्यांच्या शब्दांचा अर्थ काय होतो याबद्दल ते बुचकळयांत पडलेले दिसतात ते याच गोष्टीमुळें होय. याच गोष्टीमुळें साम्यवादी लोक नेहमींच्या लोकशाही मार्गांनीं—विशेषतः संसदीय संस्थांमार्फत–आपलें ध्येय हस्तगत करण्यास राजी नसतात. त्यांनीं तसें केलें तर बहुसंख्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

जनतेकडून त्याच्या कार्यक्रमाला विरोध होण्याचा धोका असतो किंवा समाजांत कांहीं सुधारणा घडवून आणून त्यांच्या कार्यक्रमाचें आकर्षण नष्ट होण्याची भीति असते. " कामगार वर्गाच्या उन्नतीसाठीं सुधारणा घडवून आणूं शकेल असें लढयाचें क्षेत्र म्हणून साम्यवादी कोणत्याहि परिस्थितींत संसदेकडे पाहणार नाहींत " असें लेनिननें लिहिलें आहे. " या संदर्भांत भांडवलदारी संस्थांचा त्यांच्या विनाशासाठींच कसा उपयोग होऊं शकेल हाच प्रश्न पुढें येऊं शकतो." पूर्व जर्मनी, फ्रान्स व इटाली या देशांतील लोकसभांतील साम्यवादी प्रतिनिधिचें वर्तन लेनिनच्या वरील म्हणण्याचा आशय स्पष्ट करण्यास समर्थ आहे. संयुक्त राष्ट्रसंघांतील ग्रोम्युको, विशिन्स्की व इतर रशियन प्रतिनिधि लेनिनचा आदेश शब्दशः अमलांत आणतांना दिसतात. हिंसक मार्गांनीं सत्ता उलथून टाकण्यावर साम्यवाद्यांचा नितांत विश्वास आहे ही गोष्ट वरील विवेचनावरून स्पष्ट व्हावी. त्याच–प्रमाणें इंग्लंड–अमेरिकेसारख्या लोकशाहीप्रधान देशांत शांततापूर्ण मार्गांनीं समाजवाद प्रस्थापित होऊं शकेल असा जो मार्क्सचा दावा होता तो लेनिननें ठामपणें खोडून टाकला आहे हें देखील उघड व्हावें. (कित्ता IX 475).

## रशियन व देशोदेशींचे साम्यवादी

या ठिकाणीं असें मत मांडलें जाईल कीं वरील सर्व विवेचन हें फक्त रशियन साम्यवादाला लागू पडतें आणि रशियन साम्यवादांत त्यांच्या इतिहासाचे वैशिष्टचपूर्ण गुणदोष उतरले आहेत. सांप्रतच्या आंतरराष्ट्रीय साम्यवादी विचारसरणीशीं वरील विवेचनाचा कांहीं तेवढासा संबंध नाहीं. झक साम्यवादी वेगळे आहेत; फ्रेंच साम्यवादी भिन्न आहेत; इटालियन आणि अमेरिकन साम्यवादी वेगवेगळे आहेत. अर्थात साम्यवादी विचार-सरणीवर रशियाच्या कित्येक शतकांच्या सर्वंकष वृत्तीचीं पुटें चढलेलीं दिसतात हें मान्य केलेच पाहिजे. त्याचप्रमाणें हेंहि खरें कीं क्रेमलिनमध्यें सत्तास्पर्धेनें भयानक स्वरूपाची राजकीय डोकेफोड झाली म्हणजे इतर देशांतील साम्यवादी पक्षांत कांहींवेळां फूट पडलेली दिसते. परंतु अखेरीस ही फूट नाहींशी होते आणि बहुधां प्रत्येकवेळीं अधिकृत अशा साम्यवादी चळवळींना किंवा पक्षांना क्रेमलिनच्या अधिकृत धोरणाला शरण जाणें आव-श्यक होतें.याला आतांपर्यंत एकच अपवाद आहे. तो पोलंडचा. तेथें विरोधक

तुरुंगातून सुटल्यावर सत्तेवर आले. एवढेंच नव्हे तर त्यांना त्यांच्या पक्षाचा, बिगर–साम्यवाद्यांचा आणि साम्यवादविरोधकांचाहि पाठिंबा मिळाला. परंतु रशियन साम्यवादांत-त्याचा उगम कसाहि असो–आणि इतरत्र असलेल्या अधिकृत साम्यवादी पक्षांच्या विचारसरणींत महत्त्वाचा असा फरक आहे असें मानणें साफ चुकीचें आहे. डावपेंचांच्या बाबतींत थोडाफार फरक त्यांना मंजूर असतो. परंतु मूलभूत प्रश्नासंबंधी जगांतील कोणत्याहि साम्यवादी पक्षाला यत्किंचितहि स्वातंत्र्य नसतें ! सत्तासंपादनाच्या संदर्भांत तर हें अधिकच खरें आहे. मा. टिटो यांचें उदाहरण या संदर्भांत फारच बोलकें ठरावें. कॉमिनफॉर्मचा नवा अवतार असलेल्या–कॉमिनफॉर्म कधींच नष्ट झालें नव्हतें–कम्युनिस्ट इटरनॅशनलला संलग्न होण्यासाठीं एकवीस अटी मान्य कराव्या लागतात. या अटींत रशियन सांच्यालाच सर्वव्यापक स्वरूप देण्यांत आलें आहे. क्रेमलिनहून मिळणाऱ्या आदेशांची जगांतील साम्यवादी पक्ष सहीसही अंमलबजावणी करतात. करतात कीं नाहीं याविषयीं जर कोणाला कांहीं संशय असेल तर ‘ टोवर्ड्स् सोव्हिएट अमेरिका ’ (Towards Soviet America) यांतील विल्यम झेड्. फॉस्टर यांचा खालील बोलका परिच्छेद पहावा.

“ सत्ता हस्तगत करण्याच्या आधींच कामगारांनीं ‘लाल दल’ (Red Guards) संघटना उभारावी....क्रांतीच्या सर्व टप्प्यांत नेतृत्व साम्ययादी पक्षाचेंच राहील...... तिच्या हुकुमशाहीखालीं सर्व भांडवलदारी पक्ष–रिपब्लिकन, डेमोक्रॅटिक, प्रोग्रेसिव्ह, सोशॅलिस्ट वगैरे–नष्ट करण्यांत येतील. फक्त साम्यवादी पक्ष तेवढा श्रमजीवींचा पक्ष म्हणून काम करीत राहील. त्याचप्रमाणें भांडवलदारी सत्तेला राजकीय आधार देणाऱ्या संघटनाहि नष्ट करण्यांत यतील. अशा संघटना म्हणजे व्यापारी मंडळ, मालकांच्या संघटना रोटरी क्लब्स अमेरिकन लीजन, वाय्. एम. सी. ए. व त्यांच्यासारख्या मॅसटस, ओल्ड फेलोज्, अिल्कस् नाअिट्‌स ऑफ कॉलंबस वगैरे होत.”

जेफर्सनच्या लोकशाही कल्पनेचीच ही विसाव्या शतकांतली आवृत्ति आहे असा वरील विचारांचा पुरस्कार करण्यांत आला. कांहीं वेळां साम्यवादी पक्ष लोकशाही कल्पनांचा मोठ्या पवित्रपणें पुरस्कार करतो.

पण तेंदेखील केंद्राकडून (म्हणजेच क्रेमलिनकडून) आदेश मिळाल्यावर व आपलें पितळ उघडें पडूं नये आणि आपण टीकाविषय होऊं नये म्हणून होय. ते आपल्या पक्षाच्या घटनेकडे बोट दाखवतील. परंतु रशियाच्या घटनवरून त्या देशांत लोकशाही नांदते आहे असें समजणें जितकें शहाणपणाचें ठरेल तितकेंच साम्यवादी पक्षांच्या धटनेवरून त्यांचा लोकशाहीवर विश्वास आहे असें समजणें शहाणपणाचें होईल.

—३—

## तात्कालिक डावपेंच

आतांपर्यंतचें विवेचन हा एक भाग झाला. रशियन साम्यवादाची विचारसरणी वर दाखवून दिल्याप्रमाणें मूलभूत आहे असें जरी मान्य केलें तरी असा प्रश्न उरतोच कीं त्याचा आंतरराष्ट्रीय संबधावर कसा काय परिणाम घडतो? प्रत्येक देश आपल्या मगदुराप्रमाणें आपापल्या देशांतील साम्यवादी पक्षाचा प्रश्न सोडवूं शकेल. मग जो रशिया "एका देशांत समाजवाद" प्रस्थापित करण्याच्या घोषणा करतो त्याच्याशीं **स्वतंत्र संबंध** ठेवण्याचा मार्ग कां चोखाळूं नये ? या ठिकाणीं देखील आपल्याला रशियाचें अंतिम ध्येय आणि विशिष्ट परिस्थितींत त्याला घ्यावे लागणारे मुत्सद्दृगिरीचे पवित्रे यांतील फरक जाणून घ्यावयास पाहिजे.

आजकाल एक विशेष समजूत प्रचलित आहे. ती अशी कीं लेनिनच्या मृत्यूनंतर ट्रॉट्स्कीला आंतरराष्ट्रीय क्रांतिकारक साम्यवादाचा लेनिनचा वारसा चालवावयाचा होता. परंतु स्टॅलिननें त्याकडे पाठ फिरवली आणि "एका देशांत समाजवाद" ही घोषणा केली. परंतु सत्य परिस्थिति अशी आहे कीं, स्टॅलिन आणि ट्रॉट्स्की यांमधील मतभेद हे बव्हंशीं व्यक्तिगत स्वरूपाचे आणि डावपेंचाच्या बाबतींतले होते. ते दोघेहि लेनिनच्या मुशींतून तयार झालेलें होते. जेव्हां पश्चिम यूरोपनें रशियाचें अनुकरण केलें नाहीं त्यावेळीं लेनिनपुढें रशियांत शक्य तेवढा समाजवाद प्रस्थापित कसा करावा आणि अितर देशांतील भांडवलशाही विरुद्ध क्रांतिकारक उठावांना उत्तेजन कसें द्यावें हेच प्रश्न उरले होते. स्टॅलिननें समाजवादी

अर्थव्यवस्था उभारण्यावर भर दिला; पण परदेशांतील क्रांतिकारक चळवळीकडे दुर्लक्ष केलें नाहीं. ट्रॉट्स्कीनें परदेशांतील क्रांतिकारक चळवळीवर भर दिला पण रशियांत औद्योगिकरण व्हावें असाहि आग्रह धरला.

"एका देशांत समाजवाज" याचा स्टॅलिनप्रणित अर्थ एवढाच होता कीं जर सोव्हिएट रशियाला आपलें भवितव्य घडविण्याच्या बाबतींत मोकळे सोडलें तर तो स्वतःच्या पायावर उभें राहून समाजवादी ध्येय हस्तगत करूं शकेल. परंतु त्यानें ही गोष्ट कधींच दडवून ठेवली नाहीं कीं सो. रशियाला मोकळे राहतां येणार नाहीं आणि कोणत्याहि एका देशांतल्या समाजवादाचा अंतिम विजय तेव्हांच होईल कीं जेव्हां जगांतील प्रमुख देशांत साम्यवादी क्रांति यशस्वी होईल. लेनिनचा दाखला देऊन स्टॅलिननें लिहिलें आहे: "आपण केवळ एका देशांत रहात नसून निरनिराळ्या प्रकारच्या राजवटी असलेल्या देशसमूहांत रहात आहोंत. आणि साम्राज्यवादी राष्ट्रें आजूबाजूला असतांना सो. प्रजासत्ताक फार दिवस राहूं शकेल अशी कल्पनाहि करतां येत नाहीं. अखेर दोघांपैकीं एकाचा विजय हा व्हायलाच पाहिजे आणि ती अखेर गांठेस्तोंवर सो. प्रजासत्ताक आणि भांडवलशाही राष्ट्रें यांच्यामध्यें भीषण अशा संघर्षाची मालिका चालू राहणें केवळ अपरिहार्य आहे (Problems of Leninism 56). स्टॅलिननें पुढें स्वतः असें लिहून ठेवलें आहे कीं, "लेनिनचें तत्त्व असें आहे का, समाजवादाचा अंतिम विजय हा आंतरराष्ट्रीय पातळीवरच (प्रमाणावरच) होऊं शकतो. कारण आपला 'समाजवादाची उभारणी करणारा देश' म्हणजे रशिया हा जागतिक क्रांतीचा पायाच नाहीं का?"

### भांडवलशाही राष्ट्रांचें विश्लेषण

भांडवलदारांच्या या जगांत सोव्हिएट रशिया एकाकीपणें तग धरूं शकणार नाहीं असें साम्यवाद्यांना वाटतें त्याचीं कारणें अनेक आहेत. परंतु त्यांमधील मुख्य कारण म्हणजे भांडवलदारी रचनेचें स्वरूप हें होय. त्यांच्या मताप्रमाणें भांडवलशाही ही एकतर प्रसरण तरी पावते किंवा नष्ट तरी होते. पण ती नष्ट होण्याआधीं युद्धाचा अवलंब करून प्रसरण पावण्याचा प्रयत्न करते. अंतर्गत उठावानें ती उलथून टाकली गेली तरच तें अशक्य होतें. प्रत्येक प्रकारच्या भांडवलशाहींत अर्थव्यवस्था कोलमडते आणि

तिच्यांतून युद्धाचा प्रादुर्भाव होतो ही त्यांची समजूत मूलभूत स्वरूपाची आहे. दुसऱ्या महायुद्धांत कांहीं भांडवलशाही राष्ट्रे सोव्हिएट रशियाला एका भांडवलशाही राष्ट्राचें आक्रमण परतविण्यासाठीं मदत करीत होती. वास्तविक पाहतां त्यांच्या विचारसरणीप्रमाणें त्या राष्ट्रांनीं आक्रमक राष्ट्राबरोबर एकजूट करावयास पाहिजे होती; परंतु तसें झालें नाही. इतकें असूनहि वरील समजूत साम्यवाद्यांच्या तात्त्विक ग्रंथांतून तशीच पोसली जात होती. अर्थात् सरकारी निवेदनांत याचा आढळ व्हावयाचा नाहीं हें लक्षांत ठेवावयास पाहिजे. आधुनिक तांत्रिक प्रगतीनें निर्मिलेल्या परिस्थितींत राष्ट्राच्या संपूर्ण नियंत्रणाखालीं असलेल्या अर्थव्यवस्थेशिवाय इतर कोणत्याहि प्रकारची अर्थव्यवस्था सर्वांना नोकरीची हमी देऊं शकेल व एकदरींत सुबत्ता निर्माण करील असें मान्य करणें म्हणजे सोव्हिएट समाजरचनेच्या प्रमुख समर्थकांचा आधारच काढून घेतल्यासारखें होईल. रशियन नेत्यांना भांडवलशाहीविषयक समजुतींचा त्याग करणें अशक्यच आहे; कारण तसें केलें म्हणजे साम्यवादी विचारसरणीच कोलमडून पडते.

**सारें कांहीं अखेरच्या लढ्यासाठीं**

सोव्हिएट रशियाच्या प्रभावळीबाहेर असलेल्या राष्ट्रांना त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत प्रक्रियेमुळेंच युद्ध अटळ बनतें असा साम्यवाद्यांचा सिद्धांत. या सिद्धांताचा स्वीकार एकदां केला म्हणजे त्याचे परिणाम काय संभवतात तें बोल्शेविक वास्तववाद तर्कसंगत रीतीनें दाखवूं शकतो. अखेरच्या लढ्यांत विजय मिळवीपर्यंत साम्यवादी अर्थपद्धति ही युद्धकालीन अर्थपद्धति समजावयास हवी, अंतर्गत व परराष्ट्रीय नीतींत वापरल्या जाणाऱ्या सर्व उपायांनीं सैनिकी व लष्करी दृष्टीनें महत्त्व असलेली अशी भौगोलिक सिद्धता वाढवली पाहिजे. इतर देशांत साम्यवादी राजवटी प्रस्थापित झाल्या तर अंतिम लढाई टाळणें शक्य आहे. म्हणूनच इतर देशांतील साम्यवादी पक्षांनीं पंचमस्तंभीय म्हणून काम करणें परमावश्यक आहे. प्रचार करून, आंत शिरकाव करून घेऊन, वर्गीय संघर्ष तीव्र करून, हेरगिरी करून आणि क्रांतिकारक परिस्थिति निर्माण होऊन संधि सांपडली तर सत्तेसाठीं प्रहार करून त्या देशाची घडी विस्कळीत करणें हा त्यांचा कार्यक्रम ठरतो. आणि एकदां कां संघर्ष सुरू झाला म्हणजे कामगारांच्या

पितृभूमीसाठीं–सोव्हिएट रशियासाठीं–स्वदेशाच्या हिताला सुरुंग लावणें हेंदेखील त्यांचें पवित्र कर्तव्य ठरतें.

एकाद्याला कदाचित् असंभवनीय वटेल परंतु 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल'च्या स्थापनेपासून सोव्हिएट रशियानें जणूं पश्चिमेशीं अघोषित युद्ध सुरू केलें आहे हें सत्य आहे. या 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल'ची आवश्यकता साम्यवादी विचारसरणीला ऑक्टोबर क्रांतीच्याहि आधीं भासली होती. हें युद्ध केवळ वैचारिक मतभेदामुळें सुरू करण्यांत आलें होतें. कांहीं पश्चिमी राष्ट्रांनीं सोव्हिएट यूनियनचा पाडाव लष्करी हल्ल्यानें करण्याचा मूर्ख व अपेशी प्रयत्न करून पाहिला त्याच्या कितीतरी आधीं हें अघोषित युद्ध सुरू करण्यांत आलें होतें.

कोणाला आवडो वा नावडो, साम्यवादी विचारसरणी ही संकलित उपदेशाची प्रभावी अशी वस्तु आहे हें मान्य करण्यावांचून गत्यंतर नाहीं. पॉलिटब्यूरोनें प्रकाशिलेल्या कोणत्याहि गंभीर लिखाणांत त्या विचारसरणीचें पोलादी स्वरूप दिसून येईल. अर्थात् त्या लिखाणांतील हंगामी घोषणा आणि मुत्सद्देगिरीची भाषा यावरून जरी तें चटकन् लक्षांत आलें नाहीं तरी चाणाक्षांना तें उमगतें; आपली मतप्रणाली ही प्रत्यक्ष क्रांतिकार्याची मार्गदर्शक आहे असा साम्यवादी पुढाऱ्यांचा नेहमीचा अट्टाहास असतो. अशा परिस्थितींत त्यांची मतप्रणाली म्हणजे एक प्रकारचें ( धार्मिक कर्मकांडासारखेंच ) कर्मकांड आहे असें समजून त्याची उपेक्षा करणें हा केवळ अविचार होय.

## विस्तारवादी तत्त्वज्ञान

अर्थात् येथें कोणी असा प्रश्न उपस्थित करूं शकेल कीं साम्यवाद्यांचें राजकीय वर्तन त्यांच्या मतप्रणालीनें ठरविलेलें असते किंवा काय ? अधिकृत रित्या तें तसें असतें असा त्यांचा दावा असतो हें खरें; पण भौगोलिक रचना, कच्च्या मालावरील नियंत्रण, राजकीय समतोलपणा अशांसारख्या साध्या गोष्टींनीं त्यांचें वर्तन ठरविलें जातें किंवा नाहीं ? जेव्हां रशिया व नाझी जर्मनी यांचा करार झाला त्या वेळीं मोलोटोव्ह यांनीं मतप्रणाली हा ज्याच्या त्याच्या आवडीचा प्रश्न आहे असें सांगितलें; परंतु हिटलरनें रशियावर हल्ला केल्या बरोबर मात्र त्यानें मतप्रणालीला कमी

लेखणारा असा सूर लावला ही गोष्ट वेगळी. मागें सांगितल्याप्रमाणें सो. रशियाचें वर्तन भवितव्य घडविण्यांत कितपत परिणामकारण होऊं शकेल हें जाणून घेण्यासाठीं त्याचें वर्तन केवळ त्याच्या मतप्रणालीनेंच ठरविलें जातें असें समजण्याचें कारण नाहीं. मतप्रणालीमुळें सो. रशियाच्या विस्तारवादी प्रयत्नांवर बराच प्रकाश पडतो अेवढें लक्षांत ठेवलें तरी पुरेसें आहे. आणि सो. रशियाची कोणतीहि व कितीहि आक्रमक असलेली कृति ही त्याच्या भांडवलदारी वेढ्यापासून संरक्षण करण्यासाठींच असते असें तिचें समर्थन करतां येत असल्यामुळें विशिष्ट परिस्थितींत त्याची मतप्रणाली तराजूचें पारडें अुघड युद्धाच्या बाजूनें झुकवूं शकते हें देखील लक्षांत ठेवावयास हवें. भांडवलदारी राष्ट्रांचा वेढा ही भौगोलिक कल्पना नसून राजकीय कल्पना आहे असें स्पष्टीकरण स्टॅलिननें युद्धानंतर केलें होतें. म्हणजे रशिया जितका अधिक बळकट आणि अधिक आक्रमक बनत जाईल तितकी त्याच्यावर राजकीय संकटें अधिक येतील असा पुकारा करणें त्याला सोपें जातें. राजकारणांत केवळ घटनांचा विचार करून भागणार नाहीं; तर ज्यांच्या हातीं धोरणाचीं सूत्रें आहेत ते त्या घटनांचा अन्वयार्थ कसा लावतात याला महत्त्व आहे. भ्रांतचित्त माणसाला वस्तुस्थितीचें ज्ञान करून देऊन सुधारतां येते, त्याचा माथेफिरूपणा कमी करतां येतो. पण सुधारण्याआधीं त्याच्यासाठीं नसलें तरी इतरांच्यासाठीं त्याला आवरणें आवश्यक असतें.

## शांततामय सहजीवनाचा खरा अर्थ

मग अेक प्रश्न अशा उरतो: ‘ शांततामय सहजीवनाबद्दल सो. रशिया जो विश्वास प्रकट करतो, प्रचारांत ज्यावर वारंवार भर दिला जातो आणि दुर्दैवानें ज्याला पश्चिमी राष्ट्रांतील शास्त्रज्ञ किंवा कलावंत सो. रशियाची शांततेची कळवळ समजून बळी पडतात, त्याचें स्पष्टीकरण कसें होऊ शकतें ? ’

१९२२ च्या जानेवारी महिन्यांत ‘ दि न्यूयॉर्क ओीव्हिनिंग जर्नल ’ या वृत्तपत्राच्या बातमीदाराला लेनिननें मुलाखत दिली होती. त्यांत त्यानें असें म्हटलें होतें कीं —अगदीं याच शब्दांत नसेल, पण याच आशयाचें खास— “ अमेरिकेनें आमच्या भानगडींत पडूं नये. आम्हीहि अमे-

रिकेच्या भानगडींत पडणार नाहीं." ही मुलाखत रशियांत तीस वर्षांनीं म्हणजे एप्रिल १९५० मध्यें बोल्शेविक पत्रांत प्रसिद्ध झाली. (पहा : न्यूयॉर्क टाईम्स्, एप्रिल २१ व २२, १९५०). परंतु ज्या वर्षीं वरील मुलाखत दिली होती आणि रशियांत ती अप्रसिद्धच राहिली होती त्याच वर्षीं २६ नोव्हेंबरला लेनिननें रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर एक भाषण केलें. त्या भाषणाच्या अगणित आवृत्त्या आजवर काढण्यांत आल्या असून पक्ष-सभासदांना त्याचा अभ्यास करावा लागतो. त्या भाषणांत तो म्हणतो, "जोंपर्यंत भांडवलशाही आणि समाजवाद अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत आपल्याला शांततेनें रहातां यावयाचें नाहीं. अखेरीला दोहोंपैकीं एकाचा विजय होईल. व एकाचें मृत्युगीत अपरिहार्यपणें गावें लागेल." (Selected works VIII 297).

लेनिनचा आणि त्याच्या अनुयायांचा खरा विश्वास कशावर म्हणायचा? परदेशांतील शत्रुच्या गोटाला उद्देशून एका पाहुण्याकडे केलेल्या विधानावर–जें रशियांत प्रसिद्धहि केलें नव्हतें– कीं पक्षसभासदांसाठीं म्हणून प्रसिद्ध केलेल्या, ध्वनिक्षेपित केलेल्या, त्यांनीं अभ्यासिलेल्या आणि त्यांच्या आचारांचें मार्गदर्शन करण्यासाठीं वारंवार पुनर्मुद्रण केलेल्या अशा त्याच्या भाषणावर? 'शांततामय सहअस्तित्व' या शब्दप्रयोगाचा अर्थ 'अंतिम व अपरिहार्य युद्धाच्या तयारीसाठीं समरप्रसंग नसलेला काल' असाच ते करतात. यालाच ते 'क्रांतिकारक शांततेचें धोरण' म्हणतात. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या काळांत स्टॅलिननें आपल्या 'सोव्हिएट रशियाचें शांततेचें धोरण' या प्रबंधांत म्हटल्याप्रमाणें "युद्ध म्हणजे कामगार वर्गांच्या हुकुमशाहीचा, त्याच्या क्रांतिकारक शांततेच्या धोरणाचाच इतर साधनांनीं चालू ठेवलेला पुढील भाग होय."

**प्रामाणिकपणा वागण्यावरून पारखावा**

कोणत्याहि शब्दप्रयोगाचा आपण काय अर्थ करतों किंवा आपली त्यामागें कळकळ किती आहे हें आपल्या वागण्यावरून ठरविलें पाहिजे, आपण काय बोलतों यावरून नव्हे. या दृष्टीनें पाहतां अमेरिकेनेंच 'शांततामय सह अस्तित्वा'चें धोरण स्वीकारलें असून सोव्हिएट रशियानें नव्हे हें उघड सत्य आहे. अमेरिकेनें यू. एन्. आर्. आर्. ए. व मार्शल योजनेनुसार

साम्यवादी देशांसह युरोप खंडाला पोसले. परंतु सोव्हिएट रशियानें या प्रयत्नाला सुरुंगच लावला. ज्यावेळीं अमेरिकेकडे अणु-बॉम्बची मक्तेदारी होती त्यावेळीं तिनें ती जागतिक मंडळाकडे सुपूर्त करण्याची तयारी दाखविली. फक्त एकच अट होती ती ही कीं अमेरिकेचा अणुशक्तीसहित पर्ल हार्बरचा दुसरा अनुभव येण्यापासून बचाव व्हावा. फक्त सोव्हिएट रशियानेंच संरक्षक तपासणी कलमाविरुद्ध विशेषाधिकार वापरले आणि ती योजना झिडकारली.

मॉस्कोहून मिळालेल्या आदेशानुसार काम करणाऱ्या साम्यवाद्यांनीं झेकोस्लोव्हाकियामध्यें इतर पक्षांबरोबर शांततामय सहअस्तित्वाच्या धोरणाचा पुरस्कार करूनच तेथील लोकशाहीचा गळा दाबला आणि ग्रीसला यादवीच्या खाईंत लोटलें. 'शांततामय सहअस्तित्वा'च्या तत्त्वाला बांधलेल्या सोव्हिएट रशियानें दोस्त राष्ट्रांवर बर्लिन स्वतंत्र असूनहि संतापजनक अडथळे लादले. जर करारांचें पालन 'शांततामय सहअस्तित्वा'ची कसोटी असेल तर तेथेंहि असाच विपरीत अनुभव येईल. सोव्हिएट रशियानें केवळ याल्टा आणि पोट्स्डॅम करार मोडले असे नसून त्याच्या शेजारच्या देशांबरोबर केलेले अनाक्रमणाचे अनेक करार त्यानें पायदळीं तुडविले आहेत. सोव्हिएट रशियानें जरी दक्षिण कोरियाचें आक्रमण आणि चीनचें उत्तर कोरियावरील आक्रमण उघडपणें घडवून आणलें नसलें तरी दोन्ही गोष्टींना त्यानें उघडपणें मान्यता दिली होती. समाजवादी हंगेरीबरोबर सोव्हिएट रशियानें शांततामय सहजीवन कंठण्यास नकार दिला. कारण हंगेरीला आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य पाहिजे होतें. एवढेंच नव्हे तर स्वदेशाच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ उठलेल्या लक्षावधि लोकांची सोव्हिएट रशियानें कत्तल केली.

—४—

## साम्यवादाचा जड़ ठामपणा आणि लोकशाहींतील गतिशीलता

आतां आपण लोकशाही तत्त्वज्ञानाकडे वळू. साम्यवादाशीं असलेले लोकशाही तत्त्वज्ञानाचे मतभेदाचे मुद्दे आतांपर्यंतच्या विवेचनावरून लक्षांत आलेच असतील. या दोहोंतील मतभेद किंवा संघर्ष थोडक्यांत सांगावयाचा

तर तो साम्यवादी कार्यक्रमांचा कडवा ठामपणा आणि लोकशाहींतील गतिशील प्रक्रियेचें (process) तत्त्व यांमधील आहे असें म्हणावें लागेल. या विरोधापेक्षां इतर कोणत्याहि प्रकारचा विरोध अधिक मूलभूत स्वरूपाचा असूं शकणार नाहीं; कारण इतर सर्व विरोध वरील विरोधांतूनच निर्माण होतात. लोकशाहीचा गतिशील प्रक्रियेवरील (process) विश्वास कोणत्याहि अधिकृत अशा धर्मशास्त्रावर किंवा अध्यात्मावर अवलंबून नाहीं. त्याच्या मुळाशीं सर्व सामाजिक संस्थांनीं आपल्या कार्यानें आपल्या अस्तित्वाबद्दलचें समर्थन केलें पाहिजे हा विश्वास आहे. असें समर्थन केवळ धंदेवाईक क्रांतिकारकांच्या वैचारिक नेत्यांनीं मान्य करून उपयोगी नाहीं तर त्याचा बहुजन समाजाला दैनंदिन जीवनांत प्रत्यय यायला पाहिजे. आवश्यकता व इच्छा यांच्या अनुसार स्वतःचा जीवनक्रम आंखण्याचें निवड करण्याचें आणि स्वतःच्या कल्पनेप्रमाणें सुखासाठीं धडपड करण्याचें स्वातंत्र्य लोकशाहीत आहे. विरोधविकासवादी तत्वज्ञानानुसार काढलेल्या सामाजिक आराखड्यापेक्षां लोकशाही म्हणूनच भिन्न आहे.

स्वतंत्र राजकीय प्रक्रियेंतून जर असें आढळून आले कीं मानवी जीवनाच्या समृद्धीकरितां किंवा कांहीं सार्वजनिक संकट चुकविण्याकरितां कांहीं आवश्यक गोष्टी किंवा आपल्या इच्छा यांवर बंधनें घालून घेणें जरूर असेल तर तीं बंधनेंहि या विश्वासापायीं स्वीकारलीं जातात. लोकशाहीवरील विश्वास हा कांहीं आधींच ठरेलल्या अंतिम ध्येयाला निष्ठा अर्पण करीत नाहीं– तसें केल्यास कोणत्याहि मार्गाचें समर्थन करतां येतें– उलट तो संकल्पित ध्येयाची त्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या साधनांच्या परिणामांवरून तपासणी करून पहात असतो.

लोकशाही तत्त्वज्ञान कोणत्याहि एका विशिष्ट अर्थकारणाला बांधलेलें नसतें.तें बांधलेलें असतें फक्त स्वतंत्रपणें मान्यता मिळालेल्या प्रक्रियांना.कारण त्यांच्या योगानें लोकांना आपली अर्थरचना कोणत्या प्रकारची असावी हें ठरवितां येतें. लोकशाही ही व्यक्तिगत धाडसांवर उभारलेल्या अर्थव्यवस्थेशीं किंवा भांडवलशाहीशीं अचूकपणें निगडित असते असें जे समजतात त्यांना लोकशाहीमागील प्रेरणाच समजली नाहीं असें म्हणावें लागेल आणि ते लोकशाहीला अपायच करतात असें ही समजावें लागेल. लोकशाहीला कोणतीहि

अर्थरचना वर्ज्य नाहीं. फार काय, लोकांना पसंत असेल, आणि मागाहून त्यांना ती नकोशी झाली तर तिचा त्याग करण्याचें त्यांना स्वातंत्र्य असेल तर सामुदायिक पद्धतीची अर्थरचनाहि लोकशाहीला चालूं शकेल. मानवाची पिळवणूक खाजगी उद्योगधंदेवालाच करील असें नाहीं तर राज्यसत्तादेखील त्याची पिळवणूक करूं शकेल आणि राज्यसत्तेकडे संपूर्ण दंडशक्ति असल्यामुळें तिची पिळवणूक अधिक क्रूर होऊं शकेल याची जाणीव लोकशाहीला आहे. लोकशाही ही प्रयोगशील आहे आणि खाजगी उद्योगधंद्यांवर उभारलेली अर्थरचना आणि उत्पादनाच्या साधनांवरील संपूर्ण सरकारी मक्तेदारी या दोन संकुचित पोथीबंद प्रणालीहून अनेक निरनिराळ्या अर्थरचनांची शक्यता ती पाहते. म्हणून माझ्या मतें साम्यवाद आणि लोकशाही यांमधील आजच्या संघर्षाचें स्वरूप म्हणजे बऱ्याच लोकांना वाटतें तसें केवळ खाजगी उद्योगधदे विरुद्ध सामुदायिक मालकीचे उद्योगधदे अशा प्रकारचें नाहीं. तशी समजूत करून घेणें म्हणजे भलतीच मोठी चूक होय; आणि तिचे परिणामहि अतिशय भयंकर होण्यासारखे आहेत. तसें पाहिल्यास आज अमेरिकेंतदेखील परंपरागत अर्थाप्रमाणें खाजगी उद्योगधंद्यांचें स्वातंत्र्य कितपत आहे याबद्दलहि प्रश्नच आहे. आणि इंग्लंड, फ्रान्ससारख्या लोकशाही राष्ट्रांनीं नियोजित समाजवादी अर्थरचनेच्या मार्गावर बराच मोठा पल्ला गांठला आहे असें असूनहि या दोन राष्ट्रांच्या आणि सो. रशियाच्या तत्त्वप्रणालींतील विरोध हा कांहीं सोव्हिएट रशिया आणि अमेरिका यांच्यामधील विरोधापेक्षां कमी नाहीं. जे प्रतिगामी व अदूरदृष्टीचें भांडवलदार आपले ताळेबंद व नफातोटा यांपलीकडे पहात नाहींत त्यांच्याबरोबर रशिया व्यवहार जरूर करील; पण मानवी स्वातंत्र्याची कदर असलेल्या तत्त्वनिष्ठ लोकशाही समाजवाद्यांशीं ते तो करणार नाहींत. त्यांनीं हिटलर आणि जपानी युद्धखोरांशीं व्यापार करून हेंच दाखवून दिलें! येथें मूलभूत मुद्दा आर्थिक नाहींच; तो राजकीय आहे, नैतिक आहे.

**निवड करण्याचें स्वातंत्र्य मूलभूत आहे.**

मूलभूत प्रश्न असा आहे कीं, मानवाला त्याचें सरकार, सांस्कृतिक दृष्टिकोन, अर्थरचना यांची निवड करण्याचें स्वातंत्र्य असावें का त्याच्यासाठीं ही निवड दुसऱ्या कोणी करावी? "लोकशाही", "स्वातंत्र्य" वगैरेंसारख्या

शब्दांना भ्रष्ट करेस्तोंवर जरी साम्यवाद्यांनीं त्या शब्दांचा वापर आपल्या प्रचारमोहिमांतून केलेला असला तरी साम्यवादी तत्त्वज्ञानानें निवड करण्याचें स्वातंत्र्य लोकांना निश्चयपूर्वक नाकारलें आहे. ज्या मार्गानें ते सत्ता हस्तगत करतात व ज्या मार्गानें ते ती सत्ता हातांत ठेवतात त्याच मार्गांमुळें लोकांना निवड करण्याच्या स्वातंत्र्याला मुकावें लागतें. कोणत्याहि लोकशाही राष्ट्रांतील शेंकडों वाईट गोष्टी– त्यांपैकीं कांहीं तर शरम वाटण्यांसारख्या असतील– मान्य करावयास हरकत नाहीं; परंतु जोंपर्यंत प्रत्येक साम्यवादी राजवटींत असल्याप्रमाणें टीका, विरोध आणि शिक्षण या प्रक्रियांवर अल्पसंख्य पक्षांची मक्तेदारी नाहीं आणि गुप्त पोलिसांचा त्यांवर पहारा नाहीं, तोंपर्यंत त्यांत सुधारणा करावयास वाव आहे असें म्हणतां येईल. याच कारणासाठीं लोकशाही तत्त्वज्ञानाप्रमाणें राजकीय लोकशाही ही जीवनांतील कोणत्याहि क्षेत्रातील लोकशाहीचा पाया असते.

## उपेक्षा किंवा अनुनय हें प्रभावी मार्ग नव्हेत

राजकीय लोकशाहीच्या नियमांनुसार साम्यवादी तत्त्वज्ञान लोकशाही तत्त्वज्ञानाशीं प्रामाणिकपणें मुकाबला करूं शकणार नाहीं–परंतु तें प्रामाणिकपणें आणि उघडपणें तसा प्रयत्न करील असें मानण्याचें कारण नाहीं. एक गुप्त चळवळ म्हणून राष्ट्रीय पार्श्वभूमीवर साम्यवादाचा प्रश्न सोडविणें कठीण आहे. परंतु अमेरिकन अध्यक्षांच्या नागरिक हक्क समितीनें सुचविलेल्या उपायांचा –दयामाया न ठेवतां त्यांचे हेतु उघड पाडणें आणि अविरत जागरूक राहाणें या उपायांचा– अवलंब करून कांहीं प्रमाणांत त्याचा उपशम होऊं शकेल व कांहीं प्रमाणांत अशा लोकांना सरकारांतील व सामाजिक क्षेत्रांतील महत्त्वाच्या जागा मिळूं नयेत म्हणून उपाय योजण्यानेंहि फायदा होऊं शकेल. अर्थातच अशा वेळीं त्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखायला हें पाहिजेच.

आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिक लोकशाही सत्ता अस्तित्वात आल्याशिवाय –ही फारच दूरची बात आहे– वरील मार्गांनीं हा प्रश्न सोडवितां यावयाचा नाहीं तोंपर्यंत सो. रशिया आणि तिचीं मांडलिक राष्ट्रें, अमेरिका व इतर लोकशाही राष्ट्रें यांच्यामधील थंडें युद्ध चालूच रहाणार. थंड्या युद्धाचें तपमान दिवसेंदिवस वाढत आहे. आणि अशा परिस्थितींत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थळ
अनुक्रम .................. वि. ..........
क्रमांक .................. नों: दि:


तें टाळावें कसें हा पाश्चिमात्य मुत्सद्यांपुढील प्रश्न आहे. हा प्रश्न अधिक जटिल होतो तो यामुळें कीं शांतता राखण्यास दोन्ही बाजूंची आवश्यकता असली तरी तिचा भंग करण्यास एक बाजू पुरेशी असते. "शेजारी देईल तेवढीच शांतता एखाद्याच्या वांटयाला येते" अशी एक चिनी म्हण आहे तिचें मर्म येथें ध्यानांत यावें.

दोन्हीं बाजूंकडून सारखाच धोका नाहीं याची मला येथें नोंद करावीशी वाटते. लोकशाही असलेल्या देशांत प्रातिनिधिक संस्था असतात. लोकमत स्वतंत्र असतें. त्याचें प्रशासकीय अंगावर नियंत्रण रहातें. उलट हुकुमशाही राजवटींत देशाच्या सैन्याला आपल्या हद्दीबाहेर पडून दुसऱ्या देशावर 'पर्ल हार्बर'सारखा अचानक हल्ला करावयास हुकुमशहाचा एक शब्द पुरेसा होतो. या सर्वांचा विचार करतां प्रश्न असा उरतो: साम्यवादी विचारप्रणालीला वाहून घेतलेल्या सो. रशियासारख्या कडव्या राजवटीला भांडवलदारी वेढ्यापासून संरक्षण करण्याच्या सबबीखालीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष आक्रमणानें एकामागून एक देश घशाखालीं घालण्यापासून कसें रोखावें?

साम्यवादी विचारप्रणाली कितीहि माथेफिरू असो तिला वठणीवर आणावयाची एक शक्ति आहे. ती शक्ति म्हणजे पराभवाची भीति! साम्यवादी आंदोलन हें अलौकिकत्वापासून अलिप्त आहे; तें ख्रिश्चन पाखंडीपणापेक्षां ऐहिकवादी इस्लाम धर्माला अधिक जवळचें आहे (टोयन्बीचें मत उलट आहे) ही महत्त्वाची गोष्ट आपण विसरतां कामा नये आणि तिचा वास्तवतापूर्ण दृष्टिकोणानें उपयोग करून घेतला पाहिजे. सो. रशियाचा इतिहास पाहूं गेल्यास केवळ आपल्याहून वरचढ —ज्यांच्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं— अशा शक्ति आपल्या विरोधाला ठाकतील अशी भीति वाटली म्हणजेच ते परराष्ट्रीय साहसखोरींत यशस्वी माघार घेतात याची नोंद आपल्याला आढळते. सो. रशियाचा कितीहि औदार्यपूर्ण असा अनुनय केला तरी तो कधींहि सफल होणें शक्य नाहीं. कारण सो. रशियाच्या मतें अनुनयाची प्रवृत्ति कमकुवतपणांतूनच निर्माण होते, बळकटपणांतून नाहीं. साम्यवादी नेतृत्व हें स्वतःच्या तत्त्वज्ञानाचें इतकें कैदी झालेलें असतें कीं कितीहि चांगली आणि उदार योजना (आंतर-

राष्ट्रीय अणुनियंत्रणाची अचेसन–लिनियन्थाल योजना) त्यांच्यापुढें ठेवली तरी ते तिचा स्वीकार करणार नाहींत. अशा योजना म्हणजे वर्गीय संघर्षातिले–जागतिक यादवी युद्धांतले–डावपेंच आहेत असेंच त्यांना वाटतें. यामुळें लोकशाही राष्ट्रांनीं एकजूट करून आपली शक्ति एकवटावी, कोण-तेंहि मोठें आक्रमक पाऊल उचलणें सो. रशियाला धोकादायक वाटेल अशी परिस्थिति निर्माण करावी हाच एक मार्ग अशा परिस्थितींत उरतो.

या संदर्भात असें सांगण्यांत येतें कीं, सैनिकी शक्तीनें किंवा आर्थिक वा इतर मदतीनें विचारांचा प्रसार थांबवितां येत नाहीं. लोकशाही तत्त्व-ज्ञानाचें संरक्षण कल्याणकारी अर्थरचना आणि नागरिक हक्कांच्या कायद्यांचें परिपालन यांनींच होऊं शकेल. येथें दोन निरनिराळ्या मुद्यांची गल्लत करण्यांत येते. ते वेगवेगळे ठेवण्यांत आले पाहिजेत. लोकशाहीवादी जनतेनें अधिक चांगली आणि अधिक स्वातंत्र्य असलेली समाजरचना करण्यापूर्वी हुकुमशाही प्रवृत्तीच्या हस्तक्षेपापासून तिचें संरक्षण केलें पाहिजे. इंग्लंड व फ्रान्समधील सामाजिक सुधारणांनीं ज्याप्रमाणें नाझी आक्रमण अशक्य होणें असंभवनीय, त्याचप्रमाणें सो. रशियाचें आक्रमण थोपविणेंदेखील असंभवनीयच होय. १९४८ मध्यें झेकोस्लोव्हाकियाला आपलें स्वातंत्र्य गमवावें लागलें तें तेथें काय आर्थिक आपत्ति होती कीं नागरिक स्वातं-त्र्याचा लोप झाला होता म्हणून? नॉर्वे, हॉलंड व फिनलंड १९४१ सालीं सो. रशियाच्या टांचेखालीं आले ते कां ?

सो. रशियाच्या वैचारिकतेपासून लोकशाहीला भय नाहीं. भय आहे आहे तें त्यांच्या लष्करी तयारीपासून आणि बेकायदेशीर रीतीनें काम करणाऱ्या साम्यवादी पक्षाच्या कृतिसमित्यांकडून आणि पंचमस्तंभियांकडून याची नीट जाणीव ठेवावयास पाहिजे व त्या दृष्टीनें लोकशाही राष्ट्रांच्या सरक्षणाचा विचार व्हावयास पाहिजे. यासाठींच बिगर–साम्यवादी लोक-शाहीवादी देशांनीं उपासमार आणि दारिद्र्य यांना निपटून काढण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांबरोबरच स्वसंरक्षणाचे पुरेसे उपायहि योजले पाहिजेत.

लोकशाही तत्त्वज्ञानानें साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या चढाओढीनें घाबर-ण्याचें कारण नाहीं. उलट तशा चढाओढीचें लोकशाहीनें स्वागतच करा-वयास हवें. चढाओढीची भीति आहे ती साम्यवादालाच ! लोकशाही

देशांतील वाङ्मय वाचण्याचें किंवा ध्वनिक्षेपण ऐकण्याचें स्वातंत्र्य कोणत्याहि साम्यवादी राजवटींत लोकांना मिळत नाहीं. लोकशाहीवादी देशांतील लोकांच्या राहणीबद्दल व त्यांच्या संस्कृतीबद्दल हुकुमशाही राष्ट्रांतील जनता संपूर्ण अंधारांतच असते. प्रकाशनाच्या सर्व साधनांवर अशा राजवटींची संपूर्ण सत्ता असल्यामुळें त्या देशांतील अज्ञानाच्या भिंती पाडणेंहि जवळपास अशक्यच ठरतें. पाश्चिमात्य राष्ट्रांबद्दलच्या वृत्तांवर आणि वस्तुस्थितीविषयक माहितीवर इतकें कडक नियंत्रण तेथें असतें कीं ज्यावेळीं रशियन सैनिकांनीं बर्लिन व व्हिअेन्ना येथील कामगारांच्या कपड्यांच्या दुकानांची लुटालूट केली त्यावेळीं त्यांना वाटत होतें कीं आपण मोठमोठ्या थलीशहांचीं घरेंच लुटत आहोंत. तेथील आणि विशेषतः रुमानियांतील लोकांचें जीवनमान पाहून लाल सैन्याची निष्ठा ढवळली जाऊं नये म्हणून जागरूक राहण्याबद्दल रशियन सरकारतर्फे त्या काळीं एक हुकूमहि काढण्यांत आला होता! जागतिक लोकमताच्या बाजारांत लोकशाही व हुकुमशाही तत्त्वज्ञानांच्या चढाओढींत घाबरण्याचें तर कारणच नाहीं: उलट आपणच विचार आणि व्यक्ति यांची देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहन दिलें पाहिजे. अर्थात् सो. रशिया पाश्चात्यांच्या तांत्रिक प्रगतीपासून फायदा उकळण्यासाठीं तांत्रिक क्षेत्रांतील व्यक्तींची अदलाबदल करण्यास तयार असतो; पण अशी अदलाबदल अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राज्यशास्त्र वगैरे क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींचीहि व्हावयास हवी.

लोकशाहीवादी शांततेचा आणि सुरक्षिततेचा भोक्ता असतो; परंतु तो जर आपल्या तत्त्वज्ञानाचा चांगला जाणकार असेल तर त्याला हें माहीत असावयास हवें कीं केवळ शांतता आणि सुरक्षितता या पुरेशा नाहींत. त्या दोन मूल्यांसाठीं नैतिक आणि राजकीय स्वातंत्र्याचा बळी द्यावा लागत असेल तर त्यांच्या रक्षणासाठीं लोकशाहीवाद्यांना फार मोठी जबर किंमतहि द्यावी लागते. ज्या लोकांनीं मालमत्तेचें आणि जीविताचें रक्षण व्हावें म्हणून आपलें स्वातंत्र्य हिटलरच्या चरणीं अर्पण केलें त्यांना आपलें स्वातंत्र्यच नव्हे तर आपला स्वाभिमानहि आपण गमावून बसलों याचा साक्षात्कार झाला आणि स्वाभिमानशून्य माणूस म्हणजे केवळ भक्ष्यार्थ वापरावा असा भित्रा पशूच होय. सरतेशेवटीं खरोखरीची

सुरक्षितता आणि स्वातंत्र्य अविभाज्य असल्याचेंच दिसून येतें. कारण सत्तेवर नियंत्रण घालणें शक्य नसलें– तसें स्वातंत्र्य नसलें– तर व्यक्तिमत्त्वाला मिळणाऱ्या सुरक्षिततेवर कोणत्याहि क्षणीं धाड घालणें सत्तेला शक्य होतें. लोकशाहीवाद्यांच्या दृष्टीनें व्यक्ति, संस्था व कायदा यांना मान्यतापद बहाल करणारा अधिकार ही प्रक्रियात्मक सत्ता आहे. वैयक्तिक मतभेदांस भरपूर वाव देऊनहि लोकमताचें जास्तीत जास्त एकमत होणें ज्यामुळें शक्य होतें ती माहिती करून घेण्याच्या त्याचप्रमाणें चौकशीच्या अधिकारामुळें ती साकार होते. सर्व जग एकाच प्रकारें सांचेबंद व्हावें हें कांहीं लोकशाहीवाद्याचें लक्ष्य नव्हें तर विविधतेनें नटलेलें सहिष्णु वृत्तीचें एक जग निर्माण व्हावें असें त्याला वाटतें. साऱ्या जगावर एका राष्ट्रानें राज्य करावें असें त्याला वाटत नाहीं तर लोकशाही राष्ट्रांचें जागतिक लोकशाही मंडळ असावें अशी त्याची इच्छा असते.

◆ ◆ ◆

# ऐतिहासिक अपरिहार्यतेचें तत्व आणि सो. साम्यवादांतील राजकीय हुकुमतीचें स्वरूप

सो. रशियाबद्दल पाश्चात्य राष्ट्रांतील मुत्सद्यांना आणि लष्करी अधिकाऱ्यांना बरीच काळजी वाटते. परंतु ते सो. रशियाची विचारप्रणाली समजून घेण्यास फारसे उत्सुक नसतात ही वस्तुस्थिति आहे. पाश्चात्य राष्ट्रांतील राजकारणाचा आणि स्रिश्चन धर्माचा जसा आणि जेवढा संबंध तसा आणि तेवढाच संबंध सो. रशियाचें राजकारण आणि त्याची विचारप्रणाली यांचा असावा असें त्यांना वाटतें. परंतु जे सो. रशियाच्या धोरणाचे अभ्यासक आहेत त्यांना हें माहीत आहे कीं सो. रशियाचें धोरण समजून घेण्यास त्याच्या विचारप्रणालीचें ज्ञान आवश्यक आहे. मात्र भौतिक आणि तात्त्विक गोष्टींचा विचार करण्याची पाळी जेव्हां येते तेव्हां त्या विचारप्रणालीचा प्रभाव सो. रशियाच्या धोरणावर कितपत पडतो याबद्दल त्यांच्यांत मतभेद आहेत.

रशियन नेत्यांच्या किंवा स्लाविक लोकांच्या मानसशास्त्राच्या आधारें कुणी सो. रशियाच्या धोरणाचें स्पष्टीकरण करतात. तर कुणाला पीटर धी ग्रेट पासून तें दुसऱ्या निकोलसपर्यंत रशियन राज्यकर्त्यांत दिसून येणारी आक्रमक वृत्तीच सो. रशियाच्या धोरणांत दिसून येते. कांहींच्या मतें जागतिक सत्ता–समतोलासाठीं जगभर मोक्याचीं ठिकाणें कबजांत ठेवणें हेंच रशियन धोरणाचें मूलभत असें मर्म आहे. कांहीं विचारवंत वेगळाच दृष्टिकोन मांडतात. त्यांना असें वाटतें कीं साम्यवाद म्हणजे विकृत स्वरूप लाभलेला व बायझंटिनवादाच्या अवशेषांत गुरफटलेला ख्रिती धर्मच आहे. सर्व आध्यात्मिक आणि पार्थिव गोष्टींचें अधिष्ठान ऐहिक किंवा भौतिक सत्तेतच असतें असें तो उघडपणें सांगतो.

या सर्व कारणपरंपरांची खुद्द रशियन साम्यवादीच 'तात्त्विक मत-प्रदर्शन' म्हणून टर उडवतील. कारण रशियन शब्दकोषांत 'तात्त्विक' म्हणजे 'खोटेपणाच' होय! आणि त्यापायीं त्यांच्या मतें ऐतिहासिक घटना-देखील विपर्यस्त स्वरूपांत मांडल्या जातात. त्यांच्या मतें ऐतिहासिक सत्यें म्हणजे तींच कीं, जीं त्यांच्या भौतिक विरोधविकासवादाच्या मूलभूत विचारांचा व कल्पनांचा पाठपुरावा करतील!

हे मूलभूत विचार म्हणजे काय हें थोडक्यांत सांगावयाचें तर असें म्हणतां येईल : सर्व सामाजिक परिवर्तनें ही समाजाच्या **अंतर्गत आणि अपरिहार्यपणें** निर्माण होणाऱ्या कारणांमुळेंच घडून येतात. परिवर्तन घडून येण्यास किंवा रोखण्यास बाह्य कारणें मदत करूं शकतील. परंतु **अंतर्गत व अपरिहार्य** अशा कारणांमुळें घडून येणारें परिवर्तन कोणतेंहि बाह्य कारण कायमचें रोखूं शकत नाहीं. यामुळें कोणत्याहि समाजाचा इतिहास पाहतांना भौगोलिक परिस्थिति हवामान, कच्च्या मालाचें अस्तित्व, थोर विभूतींचा प्रभाव वगैरे कारणांस नाममात्रच स्थान देण्यांत येतें. उत्पादन प्रकारावर त्याचा प्रत्यक्ष प्रभावच थोडा पडतो! आणि इतिहासाचा विचार मुख्यत्वें उपादन प्रकाराच्या अनुषंगानेंच व्हावयास हवा. निरनिराळ्या संस्कृतींची जवळीक किंवा त्यांचा समन्वय हीं सामाजिक परिवर्तनास थोडाबहुत हातभार लावूं शकतील परंतु तीं कांहीं सामाजिक परिवर्तनाचीं कारणें होऊं शकत नाहींत. दोन संस्कृतींमधील संघर्षांतून मूलभूत असें परिवर्तन घडून येईल; पण तें केव्हां? तर ज्यावेळीं एका किंवा दोन्ही बाजूनीं अंतर्गत कारणामुळें असें परिवर्तन जवळ आलेलें असेल तेव्हांच. म्हणजे असा दोन संस्कृतींचा संघर्ष जरी घडून आला नसता तरी तसें परिवर्तन अपरिहार्य-पणें घडून आलेंच असतें. विचार व कल्पना अशा परिवर्तनास सहाय्य करतात. परंतु तीं देखील सर्व सामाजिक परिवर्तनास आवश्यक अशा मूलभूत स्वरूपाच्या 'आर्थिक अंतर्विरोधा'च्या दृष्टीनें दुय्यमच समजलीं जातात.

अशा प्रकारची सर्व गोष्टींना वरचढ ठरणारी ऐतिहासिक अपरि-हार्यता ही सर्व देशांतील साम्यवाद्यांच्या दृष्टीनें जणुं धर्माज्ञाच. जगभरच्या साम्यवाद्यांनीं आणि विशेषेंकरून लेनिननें सांगितल्याप्रमाणें ती मार्क्स-वादाचा मूलाधार ठरली आहे; आणि अजूनहि ती तशीच मानली जाते.

माउ–त्से–तुंगचें लिखाण ज्यानें वाचलें आहे त्याला समजून येईल कीं हेंच विचार अगदीं उदाहरणांसहित त्यानें स्टॅलिनकडून उचलले आहेत. स्टॅलिननें ते लेनिनच्या लिखाणांतून व लेनिननें ते एंजेल्सकडून घेतले आहेत.

या ऐतिहासिक अपरिहार्यतेला जणु सर्वत्रच वेठीला धरलें आहे. सर्व धोरणाचें समर्थन तिच्या नांवें करण्यांत येत आहे– ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीचेंहि ! साम्यवादी स्वतःला अगदीं निश्चयी आणि कमालीच्या त्यागास तयार असलेले असे अभिमानानें म्हणवतात. परंतु ज्या आर्थिक गरजांसाठीं ते धडपडत असल्याचें सांगतात त्यांची पूर्ती करण्याचें नैतिक बंधन ते पाळावयास तयार नसतात ! कारण त्यांना 'वर्गविहीन समाजासाठीं' लढा द्यावयाचा असतो. हुकूमशाहीची स्थापना असो, औद्योगीकरण किंवा शेतीचें सामुदायीकरण असो, पोलादी पडद्याची उभारणी असो किंवा परराष्ट्रीय राजकारणांतील कोलांट्या उड्या असोत साऱ्यांचें समर्थन भांडवलशाही राष्ट्रांत आर्थिक अवनति होत असल्याकारणानें त्यांच्यापासून समाजवादी अर्थरचनेचें संरक्षण करावयास हवें अशा युक्तिवादानें करण्यांत येतें.

सो. रशियाच्या क्रांतीचे पाश्चात्य देशांतील पुरस्कर्तेहि बव्हंशीं असेंच मत मांडीत असतात. क्रांतीसाठीं अनंत अडचणी भोगणाऱ्या व त्याग करणाऱ्या रशियन जनतेला दुसरा पर्यायच नव्हता असें त्यांना वाटतें. सो. रशियाचीं कृत्यें कठोर आणि निर्दय असतील, पण तीं कांहीं एखाद्या व्यक्तीनें स्वखुषीनें घेतलेल्या निर्णयामुळें घडली नव्हतीं तर त्यांशिवाय त्यांना गत्यंतरच नव्हतें. आर्थिक घटनांनीं रशियन सरकारचे हात बांधले होते. दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें गेल्यास त्यांना समाजवादाची उभारणी करतां आलीच नसती असें त्यांना वाटतें. हॅरॉल्ड जे. लास्कींनाहि तसेंच वाटत असे. रशियन समाजवाद म्हणजे पाश्चात्य समाजाची प्रतिमा ठरेल असा त्यांना उत्तरायुष्यांत विश्वास वाटूं लागला होता. ते म्हणतात कीं रशियन जनतेचें जीवनमान खालीं आणणें, स्वतंत्र कामगार संघासकट सर्व लोकशाही संस्था निपटून काढणें, दहशतीची आणि वेठ बिगारीची (Concentration Camps) राजवट चालू ठेवणें हाच एक मार्ग समाजवादाच्या उभारणीसाठीं अपरिहार्य होता. लोकशाही कारभार सुरू ठेवला असता तर जनतेकडून

जीवनावश्यक वस्तूंचा त्याग करून मूलभूत उद्योगधंद्यांची उभारणी करणें त्यांना जमलें नसतें. याचा परिणाम असा झाला असता कीं सो. रशिया हिटलरला तोंडच देऊं शकला नसता. ऐतिहासिक अपरिहार्यतेच्या सिद्धान्तानुसार भांडवलग्राही आक्रमणशील असते व त्याकरितां तिला युद्ध करणें अपरिहार्य होतें याचा विचार सो. रशियाला करावा लागला. उलट सो. रशियानें लोकशाही समाजवादाचा आश्रय घेतला असता किंवा अिंग्लंड अथवा अमेरिका यांच्याप्रमाणें कल्याणकारी अर्थरचनेचा प्रयत्न केला असता तर हिटलरचा पराभव झालाच नसता असे विचार ते मांडीत.

—१—

आतां या ठिकाणीं मला सो. रशियाच्या धोरणासंबंधीं विचार करावयाचा आहे. त्यासाठीं त्यांचा आचार हा त्यांच्या विचारप्रणालीला धरूनच असतो काय, ते मानीत असलेल्या मार्क्सवादाशीं त्यांचा ऐतिहासिकतेचा सिद्धांत जुळतो काय आणि जर तसें नसेल तर त्यांचें धोरण ठरवितांना कोणत्या गोष्टींचा ते विचार करतात हें साकल्यानें जाणून घ्यावयास हवें.

साम्यवादाकडे पूर्वग्रहाशिवाय पहाणाराला असेंच आढळून येईल कीं, मार्क्सवादांतील अपरिहार्यतेचें तत्व त्यांनीं इतकें ताणलें आहे कीं त्यांचें तत्त्वज्ञान मार्क्सवादाच्या चौकटीबाहेर गेलें आहे. अर्थात् साम्यवादी लोकांच्या दृष्टीनें हा अत्यंत खोटा आणि गलिच्छ असा आरोप ठरेल. साम्यवादी हा मार्क्सवादी नाहीं असें म्हणणें म्हणजे कॅथॉलिकपंथीय व्यक्ति ख्रिस्ती नाहीं म्हणण्यासारखें (किंवा ब्राह्मण हा हिंदु नाहीं म्हणण्यासारखें) आहे असें वाटण्याचा संभव आहे. परंतु साम्यवाद्यांच्या आचाराचा प्रामाणिकपणें विचार केला तर वरील विधानांतील– साम्यवादी हा मार्क्सवादी नाहीं यांतील– सत्य उमगून येतें. मग मार्क्सवाद बरोबर आहे किंवा चुकीचा आहे याबद्दल आपलें कांहींहि मत असो.

ऐतिहासिक भौतिकवादाचा मार्क्सनें मांडलेला सिद्धान्त ही संस्कृतिविषयक अभ्यासाला मार्क्सवादाची मौलिक आणि मूलभूत महत्वाची अशी देणगी होय. अर्थात् तो सिद्धान्त संदिग्धता, सैल सूत्रीकरण व इतर

गोष्टींनी डागाळला आहे. परंतु त्यांतील अर्थ स्पष्ट आहे. तो असा कीं राजकारणावर अर्थकारणाचा परिणाम निर्णायक स्वरूपांत पडलेला असतो आणि व्यक्तीची इच्छा संपूर्ण स्वरूपांत स्वतंत्र नसते. ऐतिहासिक संघर्षांतून निर्माण होणाऱ्या पर्यायांपैकींच त्याला निवड करावी लागते आणि या निवडीचें क्षेत्रहि संकुचित असतें. सामाजिक परिवर्तनास आवश्यक असलेली परिस्थिति असल्याशिवाय केवळ राजकीय कारवाईनें कोणतेंहि सामाजिक परिवर्तन घडून येणार नाहीं, अशी सर्वच मार्क्सवाद्यांची श्रद्धा असते. मार्क्स, एंजल्स, काऊट्स्की, प्लेखेनॉव्ह आणि पहिल्या महायुद्धापूर्वी खुद्द लेनिन यांनीं या परिवर्तनासाठीं आवश्यक असलेल्या आर्थिक परिस्थितीचें आणि तदनुषंगानें येणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीचें वर्णन केलें आहे. उत्पादनाच्या साधनांवर मालकी हक्क नसलेला पण आधुनिक तंत्रविद्येंत कुशल असलेला असा कामगार वर्ग ज्यांत आहे अशी प्रगत अवस्थेस पोहोंचलेली भांडवलशाही राजवट ही वर्गविहीन समाजरचना बनविण्यास आवश्यक असें परिवर्तन घडवून आणण्यासाठीं अपरिहार्य आहे. समाजवादी क्रांति औद्योगीकरणांत फार प्रगति केलेल्या इंग्लंड–अमेरिका या देशांत अपेक्षित होती. युरोपमधील एका सर्वांत मागासलेल्या देशांत ती घडून येईल असें कुणीहि समजत नव्हता. परंतु मार्क्सवादाचे अत्यंत जहाल अनुयायी असलेल्या साम्यवाद्यांनीं रशियांतीलच सत्ता हस्तगत केली. येथें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं तोंपर्यंत खुद्द लेनिन रशियाचें वर्णन 'जगांतील सर्वांत अधिक स्वतंत्र देश', 'जनतेची पिळवणूक नसलेला देश' असें करीत असे. मार्क्सनें त्याच्या Introduction to the Critique of Political economy या ग्रंथांत लिहून ठेवलें आहे कीं "ज्या सामाजिक अवस्थेंत उत्पादक शक्तींचा कमाल विकास झालेला नसेल, तेथें सामाजिक परिवर्तन घडून ती सामाजिक अवस्था बदलत नाहीं. १९१७ सालीं त्या वेळच्या रशियांत उत्पादक शक्तींचा विकास व्हावयाला कितीतरी वाव होता ! आणि अमेरिकेनें १९१७ नंतर आपली उत्पादनक्षमता दुपटीहून अधिक वाढविली त्या मानानें १९१७ सालीं रशियाला आपली उत्पादन क्षमता कितीतरी पट वाढवितां आली असती.

साम्यवाद्यांच्या रशियांतील सत्तासंपादनाचें समर्थन पहिल्या प्रथम

लेनिन व ट्रॉट्स्की यांनीं केलें. त्यांनीं असा विचार मांडला कीं "सबंध जगाच्या एकूण अर्थकारणाचा या ठिकाणीं विचार केला पाहिजे. यापुढें जगांत आणखी उत्पादक शक्तीच्या विकासाला वाव नाहीं." हें कारण किती निखालस खोटें ठरतें तें दाखविण्याची जरुरीहि नसावी. कारण तेव्हां-पासून जगांतील भांडवलशाही देशातील उत्पादन प्रचंड प्रमाणांत वाढलें आहे. लेनिननें असाहि दावा होता कीं "भांडवलशाही कमकुवत दुव्याच्या ठिकाणीं कोलमडते." ट्रॉट्स्कीनें 'संयुक्त विकासाच्या सिद्धान्ता'चा शोध लावला. त्या सिद्धान्तानुसार मागासलेल्या देशांना औद्योगिक विकासाची एक पायरी चुकवून पुढील सामाजिक प्रगतीची पायरी गांठतां येते. अशा प्रकारच्या रशियन क्रांतीच्या समर्थनासाठीं निर्मिलेल्या कोणत्याहि कारण-परंपरेनुसार त्यावेळीं स्पेन किंवा तुर्कस्तान यांत क्रांति होणें आवश्यक होतें. कारण भांडवलशाहीसांखळींतील हीं राष्ट्रें रशियापेक्षां अधिक कमकुवत होतीं आणि हीं कारणें खरीं असतीं तर त्याचा पडताळा मार्क्स आणि एंजेल्स यांच्या आधींच्या भाकितांना खोटें पाडून त्यांच्या हयातींतच दिसून आला असता.

पण या साऱ्या क्लृप्त्या म्हणजे मार्क्सवादाचा संपूर्ण त्याग करण्याची पूर्वतयारीच होती. लेनिन व ट्रॉट्स्की यांचें असें मत होतें कीं एकदां रशि-यांत साम्यवादी पुढाऱ्यांच्या हातीं सत्ता आल्यानंतर औद्योगिकरित्या पुढारलेल्या देशांकडे जागतिक समाजवादी चळवळीचें नेतृत्व जाईल आणि रशिया त्यांच्या पाठीशीं राहील. परंतु वास्तवांत हें घडून आलें नाहीं. तेव्हां जें मार्क्सवादांत अशक्य म्हणून सांगितलें तेंच करण्याच्या तयारीस रशियन साम्यवादी नेते लागले म्हणजे– आवश्यक अशी परिस्थिति नसतांनाहि तेथें ते सामाइक अर्थरचना उभारण्याचा ते प्रयत्न करूं लागले. ज्या तत्त्वप्रणालीनें त्यांचें मार्गदर्शन केलें त्याच तत्त्वप्रणालीचा त्यांनीं पराभव केला ! उत्पा-दनाच्या साधनांवरील सामुदायिक मालकी म्हणजे जर समाजवाद असेल तर मार्क्सच्या अत्यंत कडव्या अनुयायांनींच त्याला खोटें पाडून जागतिक इतिहासांतील एक मोठा विरोधाभास निर्माण केला असें म्हणावें लागेल.

केवळ सामुदायिक अर्थरचना म्हणजेच समाजवाद अशी समाजवादाची व्याख्या करतां येणार नाहीं. राजकीय लोकशाही नियंत्रणाखालींच समाजवादाचें अस्तित्व संभवतें. हुकुमशाहीखालील समाजवाद हा वदतो

व्याघाताचा प्रकार होय. परंतु मार्क्सवाद हा कोणत्याहि संस्कृतीची आर्थिक चष्म्यांतूनच पहाणी करीत असतो. लोकशाही काय किंवा हुकुमशाही काय ती एका विशिष्ट अर्थकारणाला बाहेरून दिलेली जोड आहे. ज्याप्रमाणें लोकशाहीखालीं किंवा हुकुमशाहीखालीं भांडवलदारी पद्धति ही भांडवलदारी पद्धति रहाते त्याचप्रमाणें समाजवाद हा लोकशाहीखालीं आणला काय किंवा हुकुमशाहीखालीं प्रस्थापित केला काय तो समाजवादच रहातो. कांहीं झालें तरी समाजवाद हा अर्थरचनेचा प्रकार आहे, राजवटीचा नाहीं.

या ठिकाणीं आपणांस पोथीबंद मार्क्सवादामधील मतभेदांशीं कांहीं करावयाचें नाहीं. पण जीं डोळ्यांत भरणारीं अशीं ऐतिहासिक सत्यें आहेत व ज्यांची संगति मार्क्सवादाप्रमाणें लावतां येत नाहीं त्यांचाच येथें उहापोह केला आहे. साम्यवाद्यांनीं रशियांतील सत्ता हस्तगत केल्यावर एका वर्षानें लेनिननें मार्क्स व अेंजेल्स यांच्या स्मारकाचें उद्‌घाटन केलें. त्या वेळीं भांडवलशाहीच्या विनाशाच्या ऐतिहासिक अपरिहार्यतेबद्दल व त्यांतून होणाऱ्या समाजवादी परिवर्तनाबद्दल त्यांनीं केलेल्या विश्लेषणाचे गोडवे गाऊन त्यांवरून त्या दोघांची ऐतिहासिक थोरवी लेनिननें विशद केली होती. मात्र त्याच वेळीं लेनिन आणि त्याच्या पक्षांतील सहकारी हे अपरिहार्य अशी घटना घडूं नये म्हणून प्रयत्न करीत होते. त्यावेळीं घडणाऱ्या घटना केवळ त्यांच्या सत्तालालसेपायीं घडत होत्या. त्यांचा कोणत्याहि सामाजिक किंवा आर्थिक गरजेशीं संबंध नव्हता.

— —

मार्क्सवादाचा अर्थ ताणून त्याला विकृत स्वरूप देण्याची साम्यवाद्यांची रीत त्यांच्या अंतर्गत धोरणांत, 'कामगारवर्गाची हुकुमशाही' या मार्क्सच्या कल्पनेला त्यांनीं जी विलक्षण कलाटणी दिली आहे त्यावरून अगदीं स्पष्ट दिसून येते. ('कामगारवर्गाची हुकुमशाही' म्हणजे 'कामगारांची लोकशाही' असा उल्लेखहि मार्क्सनें केला आहे.) पण साम्यवाद्यांनीं त्या कल्पनेला कलाटणी देऊन तिला 'साम्यवादी पक्षाची हुकुमशाही' असा अर्थ प्राप्त करून दिला आहे.

मार्क्सनें पक्ष आणि कामगारवर्ग यांत स्पष्ट फरक कधींच केला नाहीं. 'पॅरिस कम्यून'च्या धर्तीवर कामगार आपलें राजकीय आणि औद्यो-

गिक जीवन लोकशाही प्रथेनुसार नियंत्रित करतील अशी त्याची कल्पना असावी असें वाटतें. ज्यावेळीं समाजवादी क्रांति होईल त्यावेळीं तिला एकूण लोकसंख्येंतील बहुसंख्य जनतेचा पाठिंबा असेल असें त्याला वाटत असावें. फेब्रुवारीच्या क्रांतीनंतर सोव्हिएटस् (विधानसभा) या कामगार, सैन्य आणि शेतकरी यांच्याच खास संस्था बनल्या. हीं सोव्हिएटस् तेव्हांच्या तात्पुरत्या सरकारहून भिन्न होतीं. तें तात्पुरतें सरकार घटनासमितीला जबाबदार होतें–सोव्हिएटस्ना नाहीं. सोव्हिएटमधून रशियन जनतेच्या मतांचें प्रतिबिंब कधी तरी पडलें असें पुराव्यानिशीं म्हणतां येईल असें वाटत नाहीं. त्यांतील प्रतिनिधित्वांत फार विषमता होती. शहरी विभागांतील सोव्हिएटचा वरचष्मा जबर होता. प्रांतिक किंवा सबंध देशाच्या सोव्हिएटस्च्या प्रत्यक्ष निवडणुका झाला नव्हत्या. परंतु एवढें खरें कीं त्यांत रशियन कामगार व सैन्य यांच्या प्रतिनिधींना चर्चा करण्याचें थोडेंफार स्वातंत्र्य होतें.

१९१७ सालच्या एप्रिल महिन्यांत ज्यावेळीं लेनिन परदेशाहून मायभूमीस परत आला त्यावेळीं त्यानें " सर्व सत्ता सोव्हिएटस्ना " अशी घोषणा करून सर्व राजकीय सत्ता सोव्हिएटस्च्या हातीं देण्याची मागणी केली. ' आम्ही (म्हणजे बोल्शेविक) सोव्हिएटस्मध्यें अल्पसंख्य असलों तरी हरकत नाहीं, पण सत्ता सोव्हिएटस्च्या हातीं पाहिजे' असें त्याचें त्यावेळीं म्हणणें होतें. कारण कामगार वर्गाची हुकुमशाही ज्यामधून निर्माण करतां येईल अशा संस्था म्हणजे सोव्हिएटस् याच होत्या. 'सर्व सत्ता सोव्हिएटस्ना' या घोषणेचें त्यानें खूप भांडवल केलें. ज्यावेळीं सोव्हिएटस्ना समजून आलें कीं या डावपेंचांनीं बोल्शेव्हिकच सर्व सत्ताधारी होऊं पाहत आहेत त्यावेळीं (म्हणजे त्याच वर्षाच्या जुलई महिन्यांत) त्यांनीं तात्पुरत्या सरकारचें रक्षण करण्याचें व बोल्शेव्हिकांच्या विध्वंसक धोरणास आळा घालण्याचें ठरविलें. लेनिननें त्यानंतर " घोषणा " म्हणून एक निबंध लिहिला. तो बराचसा दुर्लक्षित राहिला आहे. त्यांत त्यानें कबूल केलें आहे कीं ' सर्व सत्ता सोव्हिएटस्ना ' या घोषणेची लोकशाही तत्त्व म्हणून तरफदारी केलेली असली तरी ती एक निव्वळ पोकळ घोषणाच होती आणि नंतर सोव्हिएटस्मध्यें बहुसंख्य कामगारांचे आणि शेतकऱ्यांचे प्रतिनिधि असतांनादेखील त्या घोषणेचा त्याग करण्याचा आणि सोव्हिएटस् उलथून

पाडण्याचा आदेश त्यानें दिलाहि होता. त्यानें लिहिलें आहे कीं "अशावेळीं सर्व सत्ता सोव्हिएटस्ना हें तत्त्व मूर्खपणाचें आणि हास्यास्पद ठरेल."

बोल्शेव्हिक पक्षाच्या सहाव्या अधिवेशनांत लेनिनचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आला. त्या प्रस्तावाचा अर्थ असाच होता कीं सोव्हिएटच्या पाठीमागें राहून बोल्शेविकच सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करतील. कॉर्निलोव्ह प्रकरणानंतर लेनिननें 'सर्व सत्ता सोव्हिअेटना' या घोषणेचा पाठपुरावा केला; पण ज्यावेळीं शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या इतर पक्षांचा त्याच्या नेतृत्वाला विरोध झाला तेव्हां त्यानें त्या घोषणेचा त्याग केला आणि अखेर ज्यावेळीं पिटर्सबर्ग आणि मास्को येथील सोव्हिअेटमध्यें बोल्शेविकांना बहुमत मिळालें तेव्हां पुनः त्या जुन्या घोषणेचा त्यानें पुनरुच्चार केला. ट्रॉट्स्कीनें प्रामाणिकपणें कबूल केलें आहे कीं त्या घोषणेचा खरा अर्थ "सर्व सत्ता बोल्शेव्हिक सोव्हिएटस्ना" असाच होता.

लेनिन व स्टॅलिन या दोघांनींहि "कामगार वर्गाची हुकुमशाही" ही एक "ऐतिहासिक अपरिहार्यता" आहे असें सांगितले आहे. त्यांत लोकप्रतिनिधित्वाचा पाया भौगोलिकतेऐवजीं व्यवसायाकडे जातो हें समजूं शकतें. परंतु या हुकुमशाहीच्या विशिष्ट प्रकारामुळें देशाच्या राजवटीचें स्वरूप कसें निश्चित होतें याचा उहापोह त्यांनीं कुठेंच केलेला नाहीं. संसदीय लोकशाही – मग तेथील संसद कितीही कां लोकशाही स्वातंत्र्य उपभोगित असेना – व हुकुमशाही राजवटींत "भांडवलदारांची किंवा आहे रे वाल्यांची हुकुमशाही" असते असें ते मानतात. परंतु अशा राजकीय हुकुमशाहीचा किंवा प्रत्यक्ष फासिझमचादेखील भांडवलशाहीशीं अविभाज्य संबंध आहे असें बोल्शेव्हिकांनीं कुठेंच म्हटलेलें नाहीं. राजकीय कमकुवतपणा किंवा दगलबाजी यांतूनच राजकीय हुकुमशाही निर्माण होतें असें ते म्हणतात. मग 'कामगार वर्गाची हुकुमशाही' अशाच राजकीय हुकूमशाहींचें स्वरूप घेतें याचा अर्थ काय समजावा? लेनिन किंवा दुसरा कोणीहि साम्यवादी पंडित या प्रश्नाचें त्याच्या स्वतःच्याच मार्क्सवादी तत्त्वप्रणालीनुसार समाधानकारक उत्तर देत नाहीं.

या सर्व विवेचनावरून असें दिसून येईल की सत्ता हस्तगत करण्याची संधि मिळाल्यावर साम्यवाद्यांनीं मार्क्सवादांतील सर्व लोकशाही परंपरा-

रामराम ठोकला. "लोकशाही" "नेतृत्त्व" वगैरे शब्दांचें जंजाळ जरी त्यांनीं उभें केलें असलें तरी लेनिन किंवा स्टॅलिन यांच्या लोकशाहीच्या कल्पनेंत बहुमतवाल्यांच्या हातीं सत्ता हें तत्त्व बसत नाही हें उघड आहे. लेनिनचें वचन आपल्या मान्यतेसह स्टॅलिननें ऊद्धृत केलें आहे : "जर कामगार वर्गाला बहुसंख्य जनतेवर विजय मिळवावयाचा असेल तर त्यानें पहिल्या प्रथम भांडवलशाही उलथून सत्ता काबीज केली पाहिजे. पहिल्यानें सत्ता बळकावून मग बहुमत कोणामागें आहे याचा विचार करावा" अशीच त्याची धारणा.

"कामगार वर्ग" ही मोठी लवचिक संज्ञा आहे आणि साम्यवादी ती आपल्या सोयीनुसार ताणत असतात. कांटेकोरपणें पाहिल्यास मागास देशांतील कामगार वर्ग (proletariat) हा देशांतील जनतेच्याच नव्हे तर एकंदर श्रमजीवींच्या मानानेंहि अल्पसंख्यच असतो. १९१७ च्या रशियांतहि हीच परिस्थिति होती आणि म्हणून बहुसंख्य श्रमजीवींच्यावर विजय प्राप्त करण्यासाठी "यशस्वी कामगार वर्गानें" (Victorions proletariat) सत्ता हस्तगत केली पाहिजे. "तरच त्याला कामगार वर्गांत मोडत नसलेल्या श्रमजीवींची पिळवणूक बंद होऊन त्यांच्या गरजा पुरविण्याची संधि लाभत असल्यामुळें त्यांचा पाठिंबा व सहानुभूति लाभूं शकते."

येथें एक प्रश्न करावयास हवा. म्हणजे या गूढावरील शेवटचा पडदा दूर सरकूं शकेल. तो प्रश्न असा कीं सत्ता हस्तगत करणारा, भांडवलशाही उलथून पाडणारा, मतदानाचे नवे नियम ठरवणारा, मतमोजणी करणारा आणि बहुसंख्य कामगारांचा आणि बहुसंख्य जनतेचा पाठिंबा कधीं मिळाला हें ठरवणारा "क्रांतिकारक कामगार वर्ग" म्हणजे नेमका कोणता ? साम्यवादी आपला आचार आणि आपलें लिखाण याबाबतींत संशयास जागा ठेवीत नाहींत. ते स्पष्टपणें सांगतात कीं "याचें उत्तर 'बोल्शेव्हिक पक्ष' हें आहे."

पक्ष आणि वर्ग यांचे संबंध हा साम्यवादी पंडितांना त्रासदायक प्रश्न वाटतो. कारण त्यांना माहीत आहे कीं मार्क्सनें पक्षीय हुकुमशाहीचा कोठेंहि उल्लेख केला नाहीं. उलट बाकुनिन आणि ब्लँकी यांच्या यासारख्याच विचारास तो 'कटास उत्तेजन देणारे विकृत विचार' म्हणत असे.

'पक्षीय हुकुमशाही' व 'वर्गीय हुकुमशाही' यांची तुलना करूं पाहणाऱ्यांचा लेनिन तिटकारा करीत असे. त्याच्या मतें पक्षाला कामगार वर्गाचें हित खुद्द कामगारांपेक्षां अधिक चांगल्या रीतीनें समजत असल्यामुळें त्यांच्या स्वतंत्र मतप्रदर्शनाची आवश्यकताच नाहीं. मग राजकीय नियंत्रणाच्या यंत्रणा त्याला कामगार व जनता यांजपासून लपवून ठेवाव्याशा वाटल्या तर आश्चर्य काय?

या सर्वांवरून साम्यवाद्यांची तथाकथित 'कामगार वर्गाची हुकुमशाही' ही उघड उघड 'पक्षीय हुकुमशाही' ठरते, किंवा पक्षीय पुढारीपणाची कामगारांवरील व जनतेवरील हुकुमशाही ठरते. लेनिन व त्यानंतर स्टॅलिन या दोघांनींहि 'कामगार वर्गाची हुकुमशाही' ही बव्हंशीं पक्षीय हुकुमशाहीच ठरते असें कबूल केलें आहे. स्टॅलिनच्या कितीतरी आधी रशियन घटनेनें त्याला कायद्याचें स्वरूप दिलें होतें. "जेथें कामगारवर्गाची हुकूमत जारी आहे अशा सो. रशियांत कोणताहि महत्त्वाचा राजकीय वा संघटनात्मक प्रश्न चर्चा करून सोव्हिअेटमध्यें किंवा सार्वजनिक संस्थांतून सोडविण्यांत येत नाहीं. पक्षीय आदेशानुसारच त्यासंबंधी येथें निर्णय घेण्यांत येतात" असें लेनिननें कबूल केलें आहे. लोकशाहीचें केंद्रीकरण तत्त्वतः आणि प्रत्यक्षतःहि पक्षांतर्गत गटबाजी व केंद्रीय उच्चाधिकार समितीच्या (Poitbureau) हुकुमशाहीची वाटचाल करीत असते.

हे सारे मुद्दे सो. रशियाची ज्याला तोंडओळख आहे त्याच्या पूर्ण परिचयाचे आहेत. हें सत्य सो. रशियापुरतें मर्यादित नाहीं. जेथें जेथें म्हणून साम्यवादी सत्तेवर आहेत तेथें तेथें हाच प्रकार आढळून येतो. त्यांचा उल्लेख वर जरा विस्तारानें एवढ्यासाठींच केला कीं मार्क्सवाद बरोबर असो, चुकीचा असो वा गोंधळांत पडलेल्या विचारांची तो एक गाथा असो, त्यांत आणि साम्यवादी विचार आणि आचार यांत मूलगामी फरक आहे हें स्पष्ट व्हावें. साम्यवादी म्हणजे कांहीं सामाजिक क्रांतीचें दाअीपण करावयाला त्याच्या जन्माची वाट पहात बसलेल्या दाया नव्हत. कुठेंहि आणि कोणत्याहि वेळीं क्रांति घडवून आणणारे ते धंदेवाइक तंत्रज्ञ किंवा कारागीर आहेत!

साम्यवादी तत्वज्ञानाचे मूळ सिद्धान्त समजून घेतले म्हणजे त्याचे

उपसिद्धांत लक्षांत येतात. आपण मार्क्सवादी असल्याचा साम्यवाद्यांचा मोठा दावा असतो आणि इतर आदर्शवादी समाजवाद्यांपेक्षां आपण वेगळे आहोंत असाहि त्यांचा दावा असतो. इतरांना वास्तवाची जाणीव नसते पण आपण वास्तववादी आहोंत असें त्यांचें म्हणणें असतें. त्यांचा वास्तववाद हा भौतिकवाद्यांपेक्षां सर्वस्वीं वेगळा आहे. समाजवादापूर्वी आवश्यक असलेल्या आर्थिक परिस्थितीविषयीं, भांडवलाच्या संचयाच्या पर्यायाविषयीं, तांत्रिक प्रगति लादली तर द्याव्या लागणाऱ्या किंमतीविषयीं त्यांचा दृष्टिकोन वास्तववादी कधींच नसतो.ते फक्त सत्ता हस्तगत करण्याबद्दलच काय ते वास्तववादी आहेत असें म्हणावें लागतें. ज्या वेळीं ते एखाद्या देशांत सत्ता हस्तगत करतात व ती टिकवूं असा त्यांना विश्वास वाटतो तेव्हांच तो देश समाजवाद स्थापन करावयास परिपक्व (!) होतो अशी त्यांची समाजवादाच्या तयारीची व्याख्या असते. पक्षीय हुकुमशाहींतून कोणत्याहि देशांत कोणत्याहि वेळीं समाजवाद निर्माण करतां येतो! फक्त सत्ता हस्तगत करण्यांत कितपत यश मिळतें याचें काळजीपूर्वक मोजमाप घ्यावयास हवें. म्हणजे, साम्यवादी पक्ष हा कांहीं त्याच्या कार्यक्रमामुळें केवळ क्रांतिकारी पक्ष नसतो तर तो क्रांति घडवून आणणारा पक्ष असतो.

— ३ —

समाजवादाच्या स्थापनेस ज्या भौतिक परिस्थितीची गरज असते तिचा विचारच जर करावयाचा नाहीं असें ठरविलें तर मग त्याच्या प्रस्थापनेसाठीं उदाहरणें पुढें ठेवून किंवा दडपशाही करून प्रयत्न करणें तर्कसंगतच ठरते. त्याचप्रमाणें राजकीय हुकुमशाही म्हणजे कांहीं विसाव्या शतकांतली सर्व सांस्कृतिक जीवनावर नियंत्रण ठेवणारी हुकुमशाही नव्हे. स्टॅलिनच्या कारकिर्दींत ज्याप्रकारें जीवनाच्या सर्व अंगांवर पक्षाच्या नियंत्रणाचा वाढता प्रभाव दिसून येऊं लागला त्याप्रमाणें लेनिनच्या कारकिर्दींत दिसून येत नव्हता हें खरें. परंतु त्याची चाहूल मात्र त्यावेळीं लागली होती. पक्षाकडून सर्व बाबतींत निर्णय घेतले जात. केवळ तांत्रिक बाबतींतच नव्हे तर नैतिक गोष्टींतहि निर्णय घेतले जात. कारण नैतिक विषयांतल्या निर्णयांचा प्रभाव अधिक आणि इतर गोष्टींवरहि परिणाम घडवणारा

असतो. युद्धानंतरचा कांहीं काळ सोडला तर स्टॅलिनच्या मृत्यूपर्यंत पक्षानें घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा परिणाम सो. रशियाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावरील आटे अधिक आवळण्यांत झालेला आढळून येतो. आणि गंमत अशी कीं प्रत्येक वेळीं त्यांनीं ते निर्णय घेतांना साम्यवादास साक्षी ठेवून घेतले व ते निर्णय ऐतिहासिक अपरिहार्यतेमुळें आपणांस घ्यावे लागतात अशीहि आपली समजूत त्यांनीं करून घेतली. वास्तवांत मात्र ते सामाजिक विकासाची गति वाढविण्यासाठीं स्वतःच्या हातांतील सत्ता वाढविण्याचा प्रयत्न करीत होते ! मागासलेल्या देशांत सत्ता हस्तगत करण्याचा निर्णय घेतल्यामुळें सत्तेचा वापर त्यांनीं ज्या प्रकारें केला त्याच प्रकारें करणें त्यांना भाग पडलें असें म्हणतां येणार नाहीं. कारण तसा पुरावा उपलब्ध नाहीं.

या दृष्टिकोनांतूनच सक्तीची सामुदायिक शेती आणि कला व शास्त्रांत आणलेला विरोधविकासवादी एकसुरीपणा याकडे पहाणें बोधप्रद ठरेल.

मार्क्सनें भांडवलदारीखालील औद्योगिक व शेतकी उत्पादनाबद्दलचे नियम सारखेच असतात असें सांगितलें. पण त्याचें हें भाकित वास्तवापासून अितके दूर होतें कीं सगळीकडील लोकशाही समाजवाद्यांना शेतकीविषयक कार्यक्रमांत बदल करावा लागला. शेतीचें राष्ट्रीयीकरण हा कांहीं केवळ समाजवादी कार्यक्रम असूं शकेल असें नाहीं; भांडवलशाहीखालींहि शेतीचें राष्ट्रीयीकरण होऊं शकेल असें मार्क्सचें मत होतें. परंतु बहुतेक समाजवाद्यांनीं शेतकीप्रधान देशांत– जेथें सरंजामी पार्श्वभूमीविरहित स्वतंत्र शेतकरी वर्ग आहेत तेथें– या कार्यक्रमाबाबत फारसा उत्साह दाखविला नाहीं. ऑक्टोबर क्रांतीनंतर रशियांत शेतीच्या राष्ट्रीयीकरणाचा हुकूम निघाला; परंतु त्याचा परिणाम एवढाच झाला कीं जमीनदारांकडून नुकसानभरपाईशिवाय जमिनी काढल्या जाऊन लाखों स्वतंत्र शेतकरी जमीनदार निर्माण झाले. म्हणजेच साम्यवाद्यांनीं बिगर–मार्क्सवादी सामाजिक क्रांतिकारकांचा मार्ग अनुसरला. १९२७ पर्यंत सामुदायिक अथवा सरकारी शेतांची संख्या केवळ नगण्यच होती. मार्क्सवाद असे मानीत असे कीं, शेतकी व्यवसायांतील भांडवलदारी वाढल्यावर शेतकरी जमिनीला वंचित होऊन तो उत्पादन साधनें हातीं नसलेला असा कामगार वर्गच बनेल. पण

हें त्याचें भाकित भांडवलशाही देशांतच प्रत्यक्षांत उतरलें नाहीं. मग जेथें भांडवलशाहीचा नायनाट झाला होता तेथें हें कसें घडून यावें ?

अर्थातच साम्यवाद्यांचा भर उदाहरणांनीं शेतकऱ्यांना सामुदायिक शेतीचें महत्त्व पटवून देण्यावर– सामुदायिक शेतीतून होणारें वाढतें उत्पादन, यांत्रिक उपकरणांची मदत मिळण्याची शक्यता वगैरे गोष्टींनीं शेतकऱ्यांच्या मनावर परिणाम घडविण्यावर–असावा हें साहजिकच होय. परंतु सामुदायिक शेतीचें यश डोळयांत भरण्यासारखें नव्हतें. मग शेतकऱ्यांच्या मनावर त्याचा प्रभाव कसा पडणार ? समाजवादी अर्थकारणांत तुटवडा पडला तो गव्हाचा, पोलादाचा नव्हे. धान्य बाहेर यावें म्हणून सामुदायिक शेतीची आवश्यकता नव्हती. औद्योगीकरणाचा वेग किंचित मंदावून शेतकऱ्यांच्या यांत्रिक अवजारांच्या गरजाहि हळुहळू भागवितां आल्या असत्या. शेतीचें सामुदायीकरण करण्याची गरज अर्थकारणांतून निर्माणहि झाली नव्हती आणि ज्याप्रकारें चार वर्षांत सामुदायीकरणाची घिसाडघाई केली त्याप्रकारें करण्याची तर कांहींच आवश्यकता नव्हती. कारण सो. रशियांतील आजची स्थिति कांहीं बाबतींत सामुदायीकरणाच्या आधींपेक्षांही अधिक वाईट आहे. सामुदायीकरण लादतांना जी भयंकर दडपशाही केली गेली किंवा ज्या लक्षावधि जीवांची हत्त्या झाली त्यांचा विचारहि करावयास नको. त्या निष्ठुरपणानें अपेक्षित असलेले आर्थिक फायदेहि धुळीस मिळविले. क्रांतीनंतर दहा वर्षांनीं हातांत घेतलेल्या सामुदायीकरणाच्या कार्यक्रमाचा त्या आधींच्या दहा वर्षांत केलेल्या कार्यापेक्षां अधिक खोल असा सामाजिक परिणाम घडून आला असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. या क्रांतीची घडण वरून खालीं आली होती. अर्थात हें सत्य दडवून ठेवण्यांत आलें. पण त्याचा परिणाम एवढाच झाला कीं रशियन शेतकरी पुन्हा एकदा गुलाम बनला. पूर्वींच्या गुलामगिरींत आणि आतांच्या गुलामगिरींत दोनच फरक आहेत. पहिला म्हणजे तो आतां शासनाचा गुलाम झाला आहे आणि दुसरा म्हणजे या कार्यास त्यानें लावलेला हातभार आणि त्याला त्यामुळें मिळालेलें बक्षीस हीं आतां जमाखर्चाच्या रीतीनें दाखविण्यांत येत आहेत.

खेड्यांतील सहकारी संस्थांना शासनाकडून इंधन आणि वीज

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२८९

यांचा पुरवठा झाला म्हणजे त्यामधून रशियंत शेतकरी–वर्गांत समाजवादाची स्थापना करतां येईल अशी लेनिनची कल्पना होती, ती रास्तहि होती. परंतु स्टॅलिननें शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था मोडीत काढल्या व त्यांच्यावर सामुदायिक शेती लादली. तो त्यांना बीज-पुरवठाहि करूं शकला नाहीं आणि जेव्हां जनतेला अन्न, वस्त्र आणि निवारा यांची निकड होती त्यावेळीं त्यानें भांडवली मालाच्या उत्पादनाची मोहीम उभारली. लेनिन आणि ट्रॉट्स्की यांच्या 'अखंड क्रांती'मधून 'अखंड तुटवडा' आणि 'अखंड राजकीय अस्थिरता' यांचाच जन्म झाला. या घटना अपरिहार्य होत्या असें मुळींच नाहीं. एकदां कोणत्याहि बाबतींत निर्णय घेतला म्हणजे अर्थातच पर्यायी योजनांना वाव कमी मिळतो. परंतु प्रत्येक वेळीं कमीअधिक प्रमाणांत लोकशाहीचे किंवा माणुसकीचे पर्याय जरूर अस्तित्वांत होते त्यांचा अवलंब मात्र करण्यांत आला नाहीं.

साम्यवाद्यांचे जे मार्क्सवादी टीकाकार आहेत ते असें म्हणतात कीं मार्क्सवादी तत्त्वज्ञानापासून साम्यवाद्यांचें पहिल्या प्रथम जें स्खलन झालें त्याचाच हा अपरिहार्य परिणाम होय. म्हणून सो. रशियाच्या जीवनांत गंभीर दोष दिसून येतात. कांहीं निर्णयामुळें तदनुषंगिक कारवाई करणें अपरिहार्य बनतें हें खरें. कड्यावरून एकदां पाऊल पुढें टाकलें रे टाकलें कीं पुढील विनाश अटळ असतो हें देखील खरें. पण हें म्हणणें ग्राह्य धरले तर साम्यवाद्यांच्या क्रांतीनंतरच्या चुकांबद्दल त्यांना नैतिक दृष्ट्या जबाबदार धरतां यावयाचे नाहीं. परंतु रशियांत किंवा इतरत्र कुठेंहि सर्व घटना या एखाद्याच कृत्यावर अवलंबून असतात असें म्हणावयास ऐतिहासिक पुरावा मिळत नाहीं. एका चुकीमुळें त्या घडल्या असें त्यांचें समर्थनहि होऊं शकत नाहीं. सो. रशियानें सांस्कृतिक जीवनावर जीं नियंत्रणें घातलीं आहेत त्यावरून हें स्पष्ट होईल.

—४—

सो. रशियांतील संस्कृतीमधील सर्वंकषपणा एवढ्या थराला गेला आहे कीं आधुनिक काळांतील ती एक एकमेव व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृति ठरावी. साम्यवादी मानतात त्या मार्क्सवादाच्या अनुषंगानें ती आली

आहे कां? औद्योगीकरण किंवा सामुदायिकरण यांना अशा सर्वंकषपणाची आवश्यकता आहे कां? सर्वंकषपणामुळें वरील कार्मक्रमाला कांहीं मदत होते कां?

संस्कृति ही सर्वस्वी उत्पादनाच्या प्रकारावरच अवलंबून असतें असें मार्क्सवाद सांगतो. तिचा विकास हा उत्पादन प्रक्रियेच्या सुधारणेच्या विकासाबरोबर होतो. अन्य मार्गांनीं तिला धष्टपुष्ट करतां येत नाहीं. कायदे कानू, राजकीय घटना आणि अर्थरचना यांचा एकमेकांवर परिणाम होतो. परंतु साहित्य, कला, संगीत किंवा तत्त्वज्ञान यांत कायदे कानू घडवून बदल करतां येत नाहीं. कला म्हणजे निरनिराळ्या प्रवृत्तींचा, आशांचा, निराशांचा व स्वप्नांचा नकळत झालेला आविष्कार होय. परंतु वर उल्लेखिलेल्या सोपपत्तिक मताप्रमाणें शास्त्रीय प्रगति–आणि यांतच शुद्ध संशोधनहि आलें– देखील उत्पादनाच्या गरजांतूनच होतें असें म्हणावें लागेल. मार्क्स किंवा अेंजेल्स यांनीं कल्पना केलेल्या समाजांत या प्रकारें योजनाबद्ध सांस्कृतिक जीवनाचा आढळ होत नाहीं. त्यांनीं राजकीय व आर्थिक दडपणापासून विमुक्त अशी सांस्कृतिक स्वायत्तता अपेक्षिली होती. ही त्यांची कल्पना त्यांच्या शासनविमुक्तीच्या भाकिताएवढीच ढोबळ आहे. परंतु यांत सांस्कृतिक स्वातंत्र्याच्या कल्पनेचा आढळ होतो. दंडसत्तेकडून त्यांत सुसूत्रता अपेक्षित खास नाहीं.

वर विचारलेल्या दुसऱ्या (औद्योगीकरणाला किंवा सामुदायीकरणाला सर्वंकषतेची आवश्यकता आहे कां?) प्रश्नाचें सोदाहरण उत्तर कुणी दिलेलें नाहीं. रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी समितीनें ज्यासंबंधी आपलें मत व्यक्त केलें आहे अशा वाङ्मयांतील समाजवादी वास्तववाद किंवा इतर कोणत्याहि कल्पना यांमुळें रशियांतील औद्योगिक किंवा शेती उत्पादनावर जरासाहि परिणाम घडला असें आढळून येत नाहीं. आअिन्स्टाइनच्या सापेक्षतावादापासून तों त्याच्या अणु विज्ञानविषयक वापरासंबंधी शास्त्राच्या शुद्ध संशोधनाबद्दलहि हेंच म्हणतां येईल.

या संबंधांत जास्तीत जास्त अेवढेंच म्हणतां येईल कीं, ज्या अर्थीं विरोध विकासवादी तत्वज्ञान म्हणतें कीं सर्व गोष्टी परस्परसंबद्ध असतात त्या अर्थीं कोणत्याहि– अगदीं कलेपासून प्राणिशास्त्रापर्यंत– क्षेत्रांतल्या

तात्त्विक गोष्टींचा प्रत्यक्षांत राजकीय परिणाम दिसून यावयास पाहिजे आणि ज्या अर्थीं फक्त साम्यवादी पक्षानेंच केवळ अचूक राजकीय भूमिका घेतलेली असते त्याअर्थीं काय बरोबर किंवा काय चुकीचें हें ठरविण्याचे–अचूकच असें जरी म्हणतां आलें नाहीं तरी–विश्वासार्ह निकष त्यांच्यापाशींच असतात.

या दाव्याची भूमिकाच चुकीची आहे. सर्वच गोष्टी परस्परसंबद्ध असतात असें नाहीं; आणि वादाकरितां त्या असतात असें जरी मानलें तरी ती विचारसरणी बरोबर आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. तसें झाल्यास राजकीय समितीच्या (Politbeauro) निर्णयांचा शास्त्रावर परिणाम होईल आणि शास्त्रासंबंधीचे तज्ञ म्हणून आपलाच अधिकार आहे, अतएव राजकीय समितीच्या निर्णयावर आपल्याला विशेषाधिकार हवेत असें शास्त्रज्ञ म्हणूं शकतील. ट्रुमन, स्टॅलिन, चर्चिल आणि हिटलर यांचे नवकला किंवा अभिजात कला किंवा लोकनृत्यें यांबद्दल बहुतांशीं एकमतच होतें. झेडनॉव्ह (Zhednov) यांनीं काव्य, संगीत, कला यांमधील नव-संकेतांबद्दल जे फूत्कार काढले तसेंच इतर देशांतील त्यांच्या टीकाकारां-नींहि काढले. फरक एवढाच–पण हा फरक फार मोठा आहे–कीं इतर देशांतील टीकाकारांना आपल्या मतांचें कायद्यांत रूपांतर व्हावें असें वाटलें नाहीं. संगीताबद्दलचें साम्यवादी पक्षाच्या धोरणाचें रहस्य आर्थिक किंवा विरोधविकासवादी विचारांत नसतें तर तें फक्त स्टॅलिन किंवा त्याचा जो कोणी वारसदार असेल त्याच्या कानांत असतें. सांस्कृतिक अव-नतीचा सारा इतिहास हा पक्षाच्या– पर्यायानें नेत्याच्या किंवा नेतृत्वाच्या– हुकुमशाही प्रवृत्तीनें घडवून आणला आहे. दुसऱ्या एखाद्या नेतृत्वाखालीं राजकीय जीवनावर पोलादी नियंत्रण ठेवूनहि कदाचित् सांस्कृतिक स्वातंत्र्य अबाधित राहिलें असतें.

--५--

सो. रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाच्या– विशेषतः शत्रूकडून लष्करी हल्ला होणार हें आधीं हेरल्यामुळें परराष्ट्रीय धोरणास मिळालेल्या कला-टणीच्या–अनुषंगानें त्याचें अंतर्गत धोरण ठरवलें जातें असें सांगण्यांत येतें. या

दाव्याचा विचार करावयास हवा. हिटलरच्या हल्ल्याला तोंड द्यावयास सो. रशियानें केलेल्या औद्योगिकरणाचा फार फायदा झाला हें सत्य आहे. त्यामुळें युद्धासाठीं शस्त्रें आणि इतर युद्धोपयोगी साहित्य उपलब्ध झालें. दोस्त राष्ट्रांकडून युद्धकाळांत सो. रशियाला प्रचंड मदत मिळाली हें खरें; तरी पण लाल सेनेला पुरविण्यांत आलेल्या युद्धसामुग्रींतील मोठा हिस्सा रशियाचाच होता. मग रशियानें औद्योगीकरण व सामुदायीकरण यांसाठीं अवलंबिलेल्या धोरणास दोष कसा देतां येईल? त्यामुळेंच शस्त्रास्त्रें व अन्नधान्य यांचा सांठा करतां आला नाहीं का? युरोपियन अर्थरचना व राजकारण यांचें डोळस पृथक्करण करून त्यावर जर सो. रशियानें आपलीं धोरणें ठरवलीं असतील तर त्यांत मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा शहाणपणानें आणि महत्वपूर्ण असा उपयोग केला गेला असें कां समजूं नये? सो. रशियाचे नेते हे इतर देशांतील त्यांच्या मार्क्सवादी टीकाकारांपेक्षां कमी तत्वनिष्ठ नव्हते पण अधिक सर्जनशील होते असें यावरून म्हणण्यास काय हरकत आहे?

या प्रश्नांची होकारार्थी उत्तरें देण्यापूर्वीं सो. रशियाचें परराष्ट्रीय धोरण त्याच्या अलिप्ततेस किंवा अग्निदिव्यास किती प्रमाणांत कारणीभूत झालें याचा विचार व्हावयास हवा. दुसरा प्रश्न असा कीं सो. रशियाला एकट्यालाच जर नाझी जर्मनीच्या हल्ल्याला तोंड द्यावें लागलें नसतें–असा प्रकार झाला नाहीं हें कांहीं सो. रशियाच्या धोरणामुळें घडलें असें म्हणतां यावयाचें नाहीं–जर तो परतविणें रशियाला कितपत शक्य झालें असतें?

पहिल्या प्रश्नाचें उत्तर देतांना जर्मनी व इटाली या दोन देशांत फासिझमचा उदय होण्यास सो. साम्यवादी नेते जबाबदार होते किंवा नाहीं हें तपासून पहावयास हवें. या दोन देशांपैकीं एकांत जरी एकजुटीची कामगार चळवळ असती तरी हिटलर किंवा मुसोलिनी सत्तेवर येऊं शकले नसते. परंतु साम्यवाद्यांनीं त्यावेळीं भांडवलशाहीवर जेवढ्या जोरानें प्रहार केले नसतील तेवढ्या जोरानें त्यांनीं समाजवादी लोकशाहीवाद्यांचा (Social democratics) नायनाट करावयासाठीं त्यांच्यावर हल्ले केले. 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल'ची संघटना, वायमार प्रजासत्ताकाला (Weimer Republic) लावलेला सुरुंग, घातपाती उठाव आणि समाजवादी हुकुमशाहीच्या तत्वांचा केलेला पाठपुरावा या साऱ्या गोष्टी समाजवादी–लोकशाहीवाद्यांवर अविरतपणें

अनुक्रम .................. वि. ..................
...आंक .................. नों: दि: ..................



केलेल्या हल्ल्यांतील घटना होत. हॅरॉल्ड लास्कीसारख्या सो. रशियाच्या पाठिराख्याला आणि सो. रशियाला जगाचें आशास्थान मानणाऱ्यालादेखील याबाबतींत काय वाटलें तें पहाण्यासारखें आहे. ते म्हणतात, " कम्युनिस्ट अिंटरनॅशनल"मध्यें अनुस्यूत असलेली कामगार चळवळींतील प्राणघातक फूट जर लेनिननें निर्माण केली नसती तर मुसोलिनी कदाचित् सत्तेवर येऊं शकला असता पण हिटलर मात्र खासच अधिकारपदीं चढूं शकला नसता !"

लेनिननें १९२४ सालीं मांडलेली समाजवादी हुकूमशाही विषयक मतप्रणाली स्टॅलिननें अधिकच विकृत स्वरूप देऊन ताणली आणि १९३५ च्या कम्युनिस्ट अिंटरनॅशनलच्या सातव्या अधिवेशनापर्यंत जागतिक साम्यवादी चळवळीनें तिचा पुरस्कार केला. या मतप्रणालीनुसार 'समाजवादी लोकशाहीवादी' म्हणजे फासिझमचें मवाळ स्वरूप होय, या दोन्ही संघटना (समाजवादी लोकशाही आणि फासिझम) परस्पर पूरक आहेत, ते परस्पर विरोधी नाहींत तर जुळे भाऊ भाऊ आहेत. त्यामुळें साहजिकच फासिझमच्या विनाशासाठीं समाजवादी लोकशाहीवाद्यांबरोबर सहकार्य करणें मूर्खपणाचेंच होय. कारण तसें करूं पहाणें म्हणजे फासिझमच्या एका गटाविरुद्ध दुसरा गट लढवूं पहाणें होय, असें प्रतिपादण्यांत येई.

वस्तुस्थिति अशी आहे कीं एक राजकीय किंवा सामाजिक चळवळ म्हणून फासिझमचा उदय होईल अशी कल्पनाच मार्क्सवादी किंवा अितर कोणत्याहि तत्त्वज्ञानानुसार साम्यवाद्यांना नव्हती. जेव्हां फासिझम मूर्तिमंत पुढें ठाकला तेव्हांहि त्याचें यथार्थ मूल्यमापन करणें साम्यवाद्यांना जमलें नाहीं. फासिझमचा पाडाव तो सत्तेवर आल्यावर लवकरच होअील असें त्यांना वाटलें. एवढेंच नव्हे तर त्याचा पाडाव झाला नाहीं तर आपण त्याचा पाडाव करूं असा आत्मविश्वास त्यांना होता. पण हा पाडाव "समाजवादी लोकशाहीच्या प्रेतावरच" करावयाचा होता. १९३३ च्या मे दिनाच्या घोषणेंत– जेव्हां हिटलर सत्तेवर येऊन पांच महिने लोटले होते– त्यांनीं म्हटलें होतें कीं "जर्मन कामगारांचा शत्रू हिटलर हा नसून जर्मन समाजवादी लोकशाहीवादी हेच त्यांचे नंबर एकचे शत्रू होत" आणि मौज अशी कीं २ मे १९३३ रोजीं हिटलरनें समाजवादी लोकशाहीवादी आणि साम्यवादी नियंत्रणाखालील ट्रेड यूनियनवर सारखाच घाला घातला.

सो. साम्यवाद्यांनीं फासिस्टांना सत्तेवर येण्यास मदत केली आणि मनांत 'पाश्चात्य साम्राज्यशाही राष्ट्रें' परपस्परांचा नाश करतील तोंवर थांबता येईल असे मांडे खाल्ले. परंतु साम्यवाद्यांविरुद्ध जागतिक मोहीम सुरू झालेली पाहून व आपण आतां एकाकीं पडूं या आशंकेनें त्यांची लवकरच गाळण उडाली. यावर उपाय म्हणून त्यांनीं दोन परस्पर विरोधी मार्गांचा अवलंब केला. पहिला म्हणजे, 'जनतेच्या आघाडी'चा डाव आणि दुसरा म्हणजे हिटलरला चुचकारण्याचा. पहिल्या मार्गासाठीं साम्यवाद्यांना 'लोकशाही'चा घोष करावा लागला. 'म्युनिक'च्या घटनेनंतर त्यांचा दुसरा मार्ग यशस्वी झाला. स्टॅलिननें हिटलरबरोबर तह करून आणि त्याला दुसऱ्या आघाडीचें भय नाहीं असा दिलासा देऊन दुसरें महायुद्ध ओढवून घेतलें असें म्हणावयास हरकत नाहीं. जेव्हां हिटलर स्टॅलिनवरच उलटला त्यावेळीं दोघांनाहि असें वाटत होतें कीं भांडवलशाहीखालील लोकशाहीवादी किंवा बिगर–लोकशाहीवादी राष्ट्रांत तह होईल. आणि जरी लेनिन व स्टॅलिन हे दोघेहि भांडवलशाही राष्ट्रांतील 'अंतर्विरोधा'बद्दल सतत बोलत असत तरी तीं राष्ट्रें सो. रशियाविरुद्ध जागतिक मोहीम उभारतील अशीं भाकितेंहि ते करीत. अर्थात या मोहिमेचें नेतृत्व निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या देशांकडून केलें जाईल असेंहि भाकित ते करीत ही गोष्ट निराळी. पण गंमत अशी कीं साम्यवादापासून युरोप आणि ख्रिस्ती धर्म यांचें संरक्षण करण्याचें कंकण हातीं बांधलेल्या एका भांडवलदारी राष्ट्राविरुद्ध युद्धासाठीं दुसऱ्या भांडवलदारी राष्ट्रांशीं सो. रशियानें दोस्ती केली. याला मार्क्सवादांत कुठेंहि आधार आढळत नाहीं. कारण मार्क्सच्या मताप्रमाणें युद्ध म्हणजे आर्थिक हितसंबंधाचाच संघर्ष होय.

हिटलरच्या हल्ल्याला रशिया पाश्चात्यांच्या मदतीशिवाय आपल्या एकटयाच्या सामर्थ्यानें यशस्वी रित्या तोंड देऊं शकला असता किंवा काय हा मोठा प्रश्नच आहे. युद्धाच्या सुरुवातीस लक्षावधि रशियन सैनिक व शेतकरी हिटलरला फितूर झाले यावरूनही वरील संशय बळकटच होतो.

या सर्व विवेचनावरून औद्योगीकरण, सामुदायीकरण, पराकाष्ठेची दडपशाही या गोष्टी स्वसंरक्षणासाठीं अवलंबिलेल्या परराष्ट्रीय धोरणाचा परिपाक होत्या असें म्हणणें कठीण जातें. परकीय हस्तक्षेपाचा संभव दुहेरी

होता. यादवी युद्धाच्या आधीं किंवा तें चालू असतांना आणि नंतर साम्यवाद्यांनीं इतर देशांच्या कारभारांत क्रांतिकारक चळवळीच्या मार्गानें हस्तक्षेप करण्याच्या आपल्या आकांक्षा उघड रित्या व्यक्त केल्या आहेत. अशा हस्तक्षेपांत सो. रशियन सेनेनें आपल्या देशाच्या सरहद्दीपलीकडे जाऊन अितर देशांत कांहीं कारवाअी करणें ही गोष्टदेखील बसत असे हें अनेक उताऱ्यांतून स्पष्ट दिसून येतें. १९५३ सालीं प्रसिद्ध झालेल्या स्टॅलिनच्या 'Problems of Leninism' या ग्रंथांत स्टॅलिननें जागजागीं लेनिनचा आधार देऊन जगांतील पहिला समाजवादी देश अितर देशांतील साम्यवादी पक्षांना कशा प्रकारची मदत देऊं शकतो याचें विवेचन केलें आहे.

ही मदत कशी करतां येईल?

सर्व देशांतील क्रांतिकारक जागृतीसाठीं, विकासासाठीं आणि साहाय्यासाठीं विजयी देशानें जास्तीत जास्त यश संपादून ही मदत करतां येईल. (पहा लेनिन XXI १३८५).

दुसरी गोष्ट म्हणजे 'विजयी कामगार वर्गानें' भांडवलशाहीचा बींमोड केल्यावर व समाजवादी उत्पादन संघटित केल्यावर सर्व भांडवलशाही राष्ट्रांविरुद्ध उभें ठाकून अशी मदत करतां येईल. अशा भांडवलशाही राष्ट्रांतील पिळल्या जाणाऱ्या वर्गांना आकृष्ट करून तद्देशीय भांडवलशाहीविरुद्ध बंड चेतवून आणि वेळप्रसंगीं ह्या देशांतील पिळणाऱ्या वर्गाविरुद्ध सशस्त्र बळ वापरून अशी मदत करतां येईल. (पहा, लेनिन XVII २३२ ३३).

साम्यवाद्यांच्या मतें या सर्व गोष्टी विरोधविकासी मार्गानें शांततामय सहअस्तित्वाशीं निगडित झाल्या आहेत. वरील उतारा व स्टॅलिनचा दुसरा एक उतारा —ज्यांत सत्ता हस्तगत करण्यापूर्वीं केलेल्या प्रत्येक आक्रमणाला संरक्षणाचा उपायच कसें म्हटलें आहे तें दाखविलें आहे— यांचा चांगला बारकाईनें विचार करावयास हवा.

--६--

सारांशरूपानें कांहीं विचार मांडून मी हें विवेचन आवरतों:

(१) शुद्ध मार्क्सवादी सामाजिक विकासविषयक विचारसरणीचें

खंडन मार्क्सवादाचा जगभर प्रसार करूं पहाणाऱ्याकडूनच निर्विवादपणें केलें गेलें आहे.

(२) साम्यवाद्यांचें धोरण मार्क्स, अेंजल्स यांच्या तथाकथित शास्त्रीय समाजवादानुसार ठरविलें जात नाहीं. ऐतिहासिक किंवा आर्थिक अपरिहार्यता तें ठरवूं शकत नाहीं. 'तत्त्वज्ञान म्हणजे खोटी जाणीव' अशा मार्क्सनें सांगितलेल्या अर्थानुसार मार्क्सवादी तत्वज्ञान सो. रशियांत वापरांत आहे. 'खोटी जाणीव' किंवा ही आत्मवंचना त्या तत्त्वज्ञानाच्या पुरस्कर्त्यांपासून त्यांच्या कृत्यांचीं कारणें, त्यामागील भूमिका आणि हेतु लपवून ठेवीत असतात.

(३) साम्यवाद्यांचें ध्येय सबंध जगांत वरपासून खालपर्यंत नियोजित केलेली आणि सर्वंकष नियंत्रणाखालीं असलेली तसेंच दंडशक्ति, लबाडी आणि दडपशाही यामुळेंच जी अस्तित्वांत येऊं शकेल अशी अर्थरचना निर्माण करणें हें आहे. परंतु तोंपर्यंत शासनसंस्था कधींतरी नाहींशीं होईल ही मृगजळी आशा दिलासा देण्यासाठीं राबवली जाते. सो. रशियाचा आंतरराष्ट्रीयवाद म्हणजे सो. रशियाचा राष्ट्रवादच होय. या राष्ट्रवादांत आणि रशियाच्या पूर्वींच्या राष्ट्रवादांत फारच थोडें साम्य आहे.

(४) सो. रशियाचें मार्गदर्शक तत्त्वज्ञान त्याच्या अधिकृत अशा मार्क्सवादाहून भिन्न आहे. तें मार्क्सनंतर निर्माण झालेलें एक प्रकारचें कल्पनारम्य व आदर्शवादी तत्त्वज्ञान आहे. वैज्ञानिक किंवा जीवशास्त्रीय अशक्यतेशिवाय दुसरी अशक्यता तें मानीत नाहीं आणि त्याचीं साधनें कमालीचीं लवचिक आहेत. त्याचीं उद्दिष्टें ठरलेलीं आहेत; त्यांचा पाठपुरावा कडवेपणानें, माथेफिरूपणानें करण्यांत येतो आणि आपण वापरीत असलेल्या साधनांच्या परिणामाच्या संदर्भात त्या उद्दिष्टांचा विचार करण्यांत येत नसतो. जर आपल्याला साम्यवाद्यांच्या वर्तनाची आगाऊ चाहूल घ्यावयाची असेल व त्यांच्या मागें पडावयाचें नसेल तर साम्यवाद्यांच्या मानसिक तत्त्वज्ञानापेक्षां जागतिक क्रांतीची साम्यवादी विचारसरणी, तिचे डावपेंच आणि धोरणें यांचींच ओळख करून घेणें आवश्यक आहे.

(५) साम्यवाद्यांचा प्रचार 'आर्थिक' किंवा 'भौतिक' गोष्टींपेक्षां 'आदर्शा'च्या नांवानें अधिक होतो. शांतता, स्वातंत्र्य, न्याय, समता,

राष्ट्रवाद आणि इतर भावनांना आवाहन करणाऱ्या गोष्टी त्यांच्या प्रचारांत मध्यवर्ती असतात. सो. रशियाचें अस्तित्वच जेव्हां डळमळीत झालें त्यावेळी सो. रशियाच्या नेत्यांनीं 'समाजवादाच्या संरक्षणा'ची हांक दिली नाहीं तर '(रशियन) मातृभूमीच्या संरक्षणा'चा पुकारा केला म्हणजे तेथें मानसशास्त्रीय अंगाचा विचार केला जातो तें काय करणें शक्य होईल याचा विचार करून नव्हे तर आपल्या घोषणांवर लोकांचा विश्वास कसा बसवितां येईल हें ठरविण्याच्या दृष्टीनें.

(६) सो. रशियाचें अस्तित्व मार्क्सवादाच्या ऐतिहासिक भौतिकवादी तत्त्वाच्या विरुद्ध आहे असें जरी मानलें तरी मार्क्सवादांतील मानवतावादी मूल्यांचा पडताळा सो. रशियन संस्कृतीमुळें येतो असा दावा करण्यांत येतो. एका विशिष्ट भौतिक अवस्थेच्या अस्तित्वाशिवाय समाजवाद येऊच शकणार नाहीं असें म्हणण्यांत मार्क्स चुकला. परंतु त्यानें मानवाच्या कांहीं गरजा व कांहीं नैतिक मूल्यें गृहीत धरलीं होतीं. त्यांच्यामुळें मानवाच्या राजकीय कर्तृत्वाला मार्गदर्शन लाभतें आणि दुसऱ्यासाठीं झटण्याची त्याची शक्ति सीमित होते. मागासलेल्या देशांत नैतिक दृष्ट्या ज्याचें समर्थन होऊं शकणार नाहीं अशी किंमत दिल्याखेरीज समाजवादी अर्थरचना उभारली जाऊं शकत नाहीं. हाच समाजवादी मानवतावादाचा अर्थ. मानवी जीवन आणि त्याला सहन कराव्या लागणाऱ्या हालअपेष्टा यांचा जर आपण विचार केला नाहीं तर मग राजकीय कर्तृत्वाच्या सीमा वैज्ञानिक आणि जीवशास्त्रीय मर्यादा याच होतात. सुरुवातीच्या काळांतील जनतेला सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा जरी सोडल्या तरी सो. रशियांतील जनतेला औद्योगीकरणापायीं ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्याच जपानला या कारणासाठीं तीस वर्षेपर्यंत किंवा जर्मनीला चाळीस किंवा इंग्लंडला पन्नास वर्षेपर्यंत सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टांपेक्षां कितीतरी पटीनें अधिक होत्या. मार्क्सवाद्यांनीं प्रत्येक परिवर्तनाला नैतिक समर्थनाची आवश्यकता असते हें कांहीं कांहीं वेळां अप्रत्यक्ष रीतीनें मान्य केलें आहे. १९१७ च्या क्रांतिपूर्वकालांत खुद्द लेनिननेंदेखील हें जाणलें होतें. त्यानें रशियाच्या संदर्भांतच एके ठिकाणीं म्हटलें आहे : "राजकीय लोकशाहीव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि मार्गानें समाजवादाकडे कुणी जाऊं

पाहील तर तो अपरिहार्यपणें राजकीयदृष्टचा आणि आर्थिक दृष्टचा चुकीच्या प्रतिगामी स्वरूपाच्या निर्णयाप्रत येऊन पोहोंचेल."

लेनिनचें हें विधान खरें ठरलें आहे. मानवी अिच्छा आणि कर्तृत्व-शक्ति यांना मर्यादित वाव ठेवणाऱ्या परंपरागत ऐतिहासिकतेचा विनाश करण्यास लेनिन व त्याचे अनुयायी कारणीभूत झाले आहेत. पण त्यामुळें नैतिक अधिष्ठानाच्या आणि ऐतिहासिक घटनांबाबत बाळगावयाच्या जबाबदारीचें महत्त्व त्यांनीं संवेदनाक्षम आणि विचारी माणसांच्या मनावर बिंबवलें आहे.

◆ ◆ ◆

# सर्वाधिकारशाहींतील व्यक्तिजीवन

उदारमतवादी संस्कृतीमधील वैशिष्ठ्यें अनेक रीतींनीं आणि मार्गांनीं सांगतां येतील. समाजांतील संस्था मनाचें आणि व्यक्तीचें स्वातंत्र्य सुरक्षित ठेवून व्यक्तित्वाचा विकास साधतात हें उदारमतवादी संस्कृतीचें सर्वांत मोठें आणि महत्वाचें असें लक्षण म्हणून सांगतां येईल. त्या संस्कृतींत मानव म्हणजे केवळ अेक प्राणी किंवा समाजरूपी सिंधूमधील एक नगण्य बिंदू असें मानलें जात नाहीं. उलट मानव म्हणजे संपन्न व्यक्तिमत्व कमावूं शकणारा, आपल्या अनुभवांतून तो ज्या संस्था–जीवनांत राहतो त्याचें आपल्या बुद्धिवादानें मूल्यमापन करूं शकणारा असा सामाजिक प्राणी म्हणजे मानव असें उदारमतवादी संस्कृति मानते. जगणें म्हणजेच व्यक्तिजीवन कंठणें. म्हणून व्यक्तित्वाविषयीं किंवा व्यक्तिमत्वाविषयींचें विवेचन करणें अधिक योग्य. मग उदारमतवादी दृष्टिकोनांतून समाजाकडे पाहण्याचा निकष कसा असेल ? समाजांतील संस्थात्मक जीवनांतून विविधता, स्वातंत्र्य, व्यक्तिमत्वाची संपन्नता, कितपत दिसून येते हाच तो निकष असेल.

समाजाच्या संस्थात्मक जीवनावर मी भर देतों. कारण समाजांत व्यक्तिस्वातंत्र्याचें अस्तित्व किती प्रमाणांत आहे हें पडताळून पहाण्याचा तोच अेक प्रभावी मार्ग आहे. शब्द हे फसवे किंवा शुद्ध असत्य असूं शकतात. समाजाच्या घोषणांवरून त्या समाजाची परीक्षा करणें सर्वथैव चुकीचें होईल. प्रत्यक्ष हिटलरदेखील जीवनाकडे पाहाण्याचा आपला नाझी-वाद इतरांपेक्षा कसा वेगळा आहे हें सांगतांना म्हणत असे कीं, "तो केवळ वंशाचेंच महत्व जाणतो असें नाहीं; तर व्यक्तीचें महत्वहि जाणतो आणि म्हणूनच व्यक्तीला समाजाचे आधारस्तंभ बनवतो."

सर्वाधिकारशाहींतील किंवा एकतंत्री हुकूमशाहींतील व्यक्तीच्या जीवनाचा ऊहापोह करण्याचें मी येथें योजलें आहे. एकतंत्री हुकुमशाही-खालील समाज असें केव्हां म्हणतां येईल ? तर जेथें सत्तेची–आर्थिक,

न्यायविषयक, लष्करी, शैक्षणिक आणि राजकीय अशी सर्वंकष मक्तेदारी अल्पसंख्य गटाकडे आहे आणि त्यांला विरोध करण्याचा किंवा स्वतंत्र मतदानाच्या पद्धतीनें सत्ताभ्रष्ट करण्याचा जेथें कायदेशीर मार्ग नाहीं तेथील समाज सर्वाधिकारशाहीखालीं किंवा एकतंत्री हुकुमशाहीखालीं आहे असें म्हणतां येईल. अर्थात् सर्वाधिकारशाही सर्वत्र सारखीच असते असें नाहीं. त्यांच्यांत फरक आढळतो. पण तो तात्त्विक नसतो तर व्यावहारिक तपशीलाबाबतच असतो. टोजोचा जपान, मुसोलिनीची इटाली, हिटलरचा जर्मनी आणि स्टॅलिनचा रशिया हे एकमेकांपासून भिन्न होते. त्या देशांत आध्यात्मिक व सांस्कृतिक बाबतींत जेवढें स्वातंत्र्य देत असत तेवढ्या प्रमाणांतच त्यांच्यांत फरक आढळे. मुसोलिनीच्या राजवटींत बेनेडिट्टो क्रोशी (Benedetto Croce) सारखा विचारवंत जिवंत राहूं शकला तर जर्मनींत व रशियांत त्याच्यासारख्या विचारवंतांची वाट लावण्यांत आली. परंतु या सर्व सर्वाधिकारशाह्यांबाबत एक गोष्ट स्पष्ट आहे ती ही कीं त्यांचा ओढा समाजावरील सर्वंकष नियंत्रणाकडे असतो. जेव्हां त्यांच्या भोंवतालीं सर्वाधिकारशाही राज्यें नसतात तेव्हां हा ओढा अधिकच प्रभावी होतो. जर युद्ध आणि मुसोलिनीचें हिटलरवर अवलंबून राहणें चालू राहतें तर अिटालीमध्यें ज्यू द्वेष शिरला असतां एवढेंच नव्हे तर बेनेडिट्टो क्रोशीसारख्या विचारवंताचीहि खोटेनाटे कबुलीजबाब घेऊन किंवा तेहि न घेतां तेथें वासलात लावली गेली असती. या जगांत शंभर टक्के नियंत्रण शक्य नाहीं ही गोष्ट खरी. पण चालू जमान्यांतील दळणवळण व शस्त्रास्त्रें यामध्यें झालेल्या आधुनिक तांत्रिक विकासामुळें इतिहासांत आतांपर्यंत कधींहि शक्य न झालेली दडपशाही शक्य कोटींत आली आहे हें विसरून भागण्यासारखें नाहीं. म्हणून अैतिहासिक उदाहरणांवरून आपली फसगतच होण्याचा संभव आहे.

सांप्रतकालीं सो. रशियांतील सर्वाधिकारशाही ही सर्वांत प्रबळ असल्यामुळें व चीनसकट इतर सर्व साम्यवादी राष्ट्रांनीं नियंत्रणाच्याबाबतींत त्याचा कित्ता तरी गिरवला किंवा तीं लादून तरी घेतली असल्यामुळें येथें सो. रशियन समाजांतील व्यक्तिजीवनाचा विचार करावयाचें ठरविलें आहे. विशेषेंकरून व्यक्तित्वाचा प्रभावी आविष्कार

ज्या क्षेत्रांत विशेष होतो अशा कला, साहित्य आणि शास्त्र ह्यांच्या बाबतींत प्रामुख्यानें विचार करावयाचा मानस आहे.

त्यामुळें त्या दृष्टीनें सो. रशियांतील समाजांतल्या व्यक्तीवर होणाऱ्या सांस्कृतिक व बौद्धिक परिणामांची चर्चा करणें योग्य होईल. या संदर्भांत दोन गोष्टी ध्यानांत ठेवावयास पाहिजेत.

पहिली अशी कीं पुढील विवेचनांतील भर हा व्यक्तींवर असणार नाहीं. त्याचें कारण उघड आहे. पोलिसी राज्यांत व्यक्तिमात्राला प्रामाणिकपणें काय वाटतें हें समजणें अशक्यच. म्हणून विवेचन हें तात्त्विक आणि संस्था– जीवनविषयक राहील. तेथील जाहीर भाषणें हीं अधिकृत वृत्तपत्रें व नेतृत्व यांचें अनुवादन ठरतात. जनमत अजमाविण्यासाठीं मुलाखती घेणारे किंवा प्रश्नावल्या फिरवणारे म्हणजे तेथील गुप्त पोलीस ! तेथील वातावरणच असें असतें कीं राजवटीबद्दल किंवा नेतृत्वाबद्दल किंवा शासनाबद्दल टीका करणें हा दंडनीय गुन्हा ठरतो. मग व्यक्तिमात्राचा कोणत्याहि प्रश्नाला मिळणारा प्रतिसाद हा साहजिकच संशयी, अविश्वासू आणि दस्तअैवजी दाखल करण्यासाठीं म्हणून दिलेला असतो.

त्याचप्रमाणें लोकशाही जगांत आढळणारी वस्तुस्थिति व सर्वाधिकारशाहींत आढळणारी वस्तुस्थिति यांचें तुलनात्मक विवेचन येथें करावयाचें आहे. त्यामुळें दोन्ही ठिकाणच्या संस्थात्मक जीवनाचा परिचय होईल. त्याचप्रमाणें स्वतंत्र लोकशाही देशांत सर्वाधिकारशाही आक्रमणाला विरोध करण्याच्या केविलवाण्या प्रयत्नामुळें व सांस्कृतिक क्षेत्रांतल्या मूर्खपणामुळें पोलिसी राज्य निर्माण होत आहे या पिसाट आरोळ्यांत कितपत तथ्य आहे तेंहि समजून येईल.

सो. रशियांतील संस्थात्मक जीवनांत निवडीच्या स्वातंत्र्याला स्थान नाहीं. आणि तें नसेल तर स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा विकास साधणें अशक्य आहे. सो. रशियाशीं संपूर्णपणें एकनिष्ठ असणाऱ्या नागरिकांनाहि प्रस्थापित राजवटीला विरोध व्यक्त करण्याचा मार्ग सो. समाजांत नाहीं. कमालीच्या मुद्रण नियंत्रणामुळें अधिकृत वृत्तपत्रांशिवाय तेथें अन्य वृत्तपत्रें नाहींत त्यामुळें राजकीय टीकेला किंवा मतभेदाला तेथें जरासाहि वाव नाहीं. ज्याला ते 'आत्मटीका' म्हणून म्हणतात ती फक्त एखाद्या व्यक्तीनें साम्यवादी

पक्षाच्या नेत्यांनीं घेतलेला निर्णय अंमलांत आणतांना दाखविलेल्या दोषा-पुरतीच मर्यादित असते. मिमिओग्राफपासून रेडिओपर्यंत प्रसिद्धीचीं सर्व साधनें शासनाच्या ताब्यांत असल्यामुळें शासनवर्ग निर्माण करील तेंच तेथील लोकमत !

कामगाराला जी सुरक्षितता लाभते ती त्यानें व्यवस्थापकाच्या फर्मानांपुढें मुकाट्यानें मान लववली तरच. अंतर्गत परवान्याची पद्धत अंमलांत आणून तेथें हालचालींवर निर्बंध घालण्यांत आले आहेत. स्वतंत्र कामगार संघटना उभारण्याचें स्वातंत्र्य तर नाहींच आणि संपाचा हक्कहि त्याला नाहीं. २६ जून १९४० च्या हुकुमानुसार कामावर येण्यास उशीर झाला तर शिक्षा होते आणि वारंवार गैरहजर राहिल्यास तुरुंग दाखविला जातो किंवा त्याच्या कामाच्या ठिकाणींच किंवा अन्यत्र त्याला वेठ बिगारीला लावलें जातें. उत्पादनाच्या साधनांचें राष्ट्रीयीकरण केलें आहे हें खरें. परंतु उत्पादनाच्या वांटपावर हक्क आहे तो अेका अल्पसंख्य गटाचा. उत्पादनाच्या वांटपांत हम करेसो कायदा असून त्यामुळें समाजाच्या निरनिराळ्या थरांच्या जीवनात कमालीची विषमता निर्माण झाली आहे. कामगारांची पिळवणूक तेथून नष्ट झालेली नाहीं तर तिला नवें स्वरूप आलें आहे येवढेंच.

सामाजिक यंत्रणा पिरॅमिडसारखी असून तिच्या शिखरापासून तळा-पर्यंत अधिकारमालिका निर्माण करण्यांत आली आहे. या यंत्रणेंत कोणा-लाहि हक्क आणि सुरक्षिततेचा लाभ व्हावयाचा असेल तर त्याला आपल्या वरच्या अधिकाऱ्याच्या म्हणण्यापुढें बिनतक्रार मान वांकवावी लागते. त्यावरील अधिकाऱ्यालाहि त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशीं तसेंच वागावें लागतें. अशी ही मालिका वरपर्यंत गेलेली असते. त्या सामाजिक यंत्रणेंत व्यक्ति कितीहि श्रेष्ठ पदावरील असली तरी तिला बंडखोर किंवा संशयित म्हणून मृत्युदरींत फेंकण्याची किंवा वेठबिगारीला लावण्याची शक्यता नाहींच असें म्हणतां यावयाचें नाहीं. तेथें अधिकृतरित्या जरी लोकशाही शब्दाचा वापर करतां येत असला तरी तेथें लोकशाही स्वातंत्र्याचा उगम तळापासून होऊं दिला जात नाहीं. १९३६ ची गाजावाजा केलेली "लोकशाही" घटना ही कांहीं सो. रशियाच्या राज्ययंत्रणेचें खरें चित्र

रेखाटीत नाहीं; ती फार तर सो. रशियाचें ध्येयदर्शन घडवितें असें म्हणतां येईल. खुद्द स्टॅलिननें तिचा महान् गुण म्हणून काय सांगितलें असेल तर तें हेंच कीं, 'त्या राज्यघटनेनें साम्यवादी पक्ष हाच एकमेव राजकीय पक्ष म्हणून ठेवण्याच्या परिस्थितींत कांहीहि फरक केलेला नाहीं!' तेथें स्वतंत्र न्यायखातें नाहीं, हेबिअस कॉर्पस् किंवा हेबिअस कॅडाव्हर अर्ज़ करण्याचेंहि स्वातंत्र्य नाहीं. न्यायखातें, व्यापार उद्योग, शेती, लष्कर, शाळा या सर्वस्वी एम्. व्ही. डी. किंवा गुप्त पोलिसांच्या नियंत्रणाखालीं आहेत; आणि गुप्त पोलिसांच्या प्रमुखाची नियुक्ति होत असते पॉलिट ब्युरोकडून म्हणजेच पक्षाच्या राजकीय समितीकडून!

सो. रशियांतील जीवनाच्या पार्थिव बाजूचें इतकें दर्शन पुरेसें प्रातिनिधिक ठरावें. त्याचें संपूर्ण चित्र काढण्याचें येथें कारण नाहीं. त्यापेक्षां या एकूण जीवनपद्धतीचें रहस्य शोधून काढणें हें अधिक महत्त्वाचें आहे. पण तसें करण्यासाठीं आपल्याला तेथील नागरिकांचें किंवा प्रजाजनांचें मानसिक जीवन कसें असतें हें पहावयास हवें. मानसिक किंवा सांस्कृतिक जीवन पहातांनाच व्यक्तीला समाजांत कितपत स्वातंत्र्य दिलें आहे तें आढळून येतें.

सोव्हिएट संस्कृतीचें एकूण अेक अंग राजकारणमय झालेलें आहे. त्यावर मानवी इतिहासांत केवळ अभूतपूर्व ठरेल अशा प्रकारचें नियंत्रण आणि दडपशाही असते. कलेपासून खगोलशास्त्रापर्यंत किंवा संगीतापासून सापेक्षतावादापर्यंत प्रत्येक बाबतींत पक्षाचें धोरण जाहीर केलेलें असतें. तें पारितोषिक आणि पारिपत्य यांच्या सहाय्यानें अंमलांत आणण्यांत येतें. विरोधकांची डाळ अजिबात शिजूं शकत नाहीं. तो परागंदा तरी होईल किंवा त्याला या जगांतून नाहींसें तरी करण्यांत येईल. जी गोष्ट उच्च कला किंवा ज्ञान यांच्याबाबतींत खरी तीच लोककलांच्या बाबतींतहि खरी आहे. सर्कस, सिनेमा किंवा पशुसंवर्धन अशा प्रत्येक बाबतींत तोच प्रकार. फार काय, हास्य हेंदेखील राजकीय हत्यार म्हणून ठरलें आहे. गपचुप रहाण्याचा व्यक्तीचा हक्कहि हिरावून घेण्यांत आला आहे. आधुनिक संस्कृतींत ही गोष्ट केवळ अपूर्वच होय. पण पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीनें गपचुप रहाणें हादेखील कधीं गुन्हा होतो हें ठरवून टाकलें

आहे. ठराविक कालानें दडपशाही व सक्तीचा वरवंटा फिरविण्यांत येतो, त्यामागील निष्ठुरतेची कल्पना त्या वरवंटयाखालीं सांपडणारांखेरीज इतरांना येणेंच कठीण !

या ठिकाणीं सक्तीची यंत्रणा कशी असते हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. श्री. क्रँकशॉं यांना असें वाटतें कीं, रशियन वंशाच्या रक्तांतच हुकुमशाहीची आवड आहे. पण हें म्हणणें रास्त नाहीं. सो. रशियांतल्याप्रमाणें जेथें अन्न, वस्त्र, निवारा यांची उपयुक्तता राजकीय सक्तीसाठीं राबविण्यांत येईल, रेडिओ, वृत्तपत्रें आदि प्रसिद्धीच्या साधनावर सर्व शक्तिमान् गुप्त पोलिसखात्याचें नियंत्रण असेल तेथें सो. रशियाप्रमाणें समाजावर सर्वंकष नियंत्रण सहज आणतां येतील.

सांस्कृतिक जीवनावरील कडक नियंत्रणाचें समर्थन कसें करण्यांत येतें तें विचारांत घ्यावयास हवें. अशा प्रकारच्या नियंत्रणाचें किंवा सांस्कृतिक देवाण–घेवाण बंद करण्याचें अनेक रीतीनें समर्थन करण्यांत येतें. त्यांतील प्रमुख मुद्दे थोडक्यांत पुढीलप्रमाणें मांडतां येतील :

(१) **समाजवादी वास्तववाद** : त्याचें उल्लंघन केल्यानें बाह्योपचाराच्या दिशेनें घसरगुंडी सुरू होते. (२) **पक्षाभिमानाचें तत्व** : याचा त्याग करणें म्हणजे आत्मनिष्ठ दृष्टिकोनाचा स्वीकार करणें होय. (३) **सोव्हिएट आंतरराष्ट्रीयवाद** : ही तत्वप्रणाली राष्ट्रवाद व विश्वजनीनवाद यांची दखल घेत नाहींत.

पाश्चात्यांची निसर्गपरता म्हणजे सोव्हिएट जमान्याचा वास्तववाद नव्हे हें लक्षांत ठेवावयास पाहिजे. आतां अस्तित्वांत असलेल्या राजवटीची थोरवी दाखविणाऱ्या निवडक अनुभूति चितारणारे शब्द, रंग, लय म्हणजे सोव्हिएट वास्तववाद होय. त्यामुळें प्रत्यक्षत: व अप्रत्यक्षत: उत्पादनवाढीस मदत व्हावयास हवी. स्टॅलिन पारितोषिकें दरवर्षीं मिळविणाऱ्यांनीं रंगविलेल्या स्टॅलिनच्या व्यक्तिचित्राचें उदाहरण या दृष्टीनें उल्लेखनीय आहे. त्यांना बक्षिसें मिळत तीं कांहीं त्यांतील साधर्म्य किंवा बारकावे यासाठीं नसत. स्टॅलिनच्या चेहऱ्यावरील व्रण इत्यादि किंवा रशियन साम्यवादी चळवळीच्या सुरुवातीच्या काळांतील त्याचें महत्त्वशून्य स्थान या गोष्टी चितारणें शक्यच नसे. त्या व्यक्तिचित्रणांत पारितोषिकें मिळत तीं

केवळ स्टॅलिनला आदर्श दाखविलें जाओ म्हणून. स्टॅलिनच्या चेहऱ्याचें कितीहि हुबेहूब चित्रण केलें तरी त्यांच्या वास्तववादी कल्पनेप्रमाणें अशी आदर्शीकृत चित्रणेंच अधिक वास्तववादी ठरतील. कारण अशा चित्रणांतून 'आपला पुढारी हुषार, दयाळू आणि चांगला आहे' अशी लोकांची कल्पना होते! संगीतदेखील असेंच असावें कीं काम करतांकरतां कामगाराला शीळ घालीत त्यांतील स्वर ओळखतां यावेत. शॉस्टाकॉव्हिच यांच्या 'ग्रेट फ्रेंडशिप' या पुस्तकाचा तकलुपी तंत्रवादी (Formalist) म्हणून पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीनें धिक्कार केला आणि स्वरसंभारानें नटलेली रचना करण्याचा आदेश तिनें गीतकारांना दिला! बिगर राजकीय विषयांवर अमूर्त रीतीनें तेथें लिहितां येत नाहीं. उलट वाचकांच्या मनावर देशभक्ति व अेकनिष्ठा हे गुण बिंबतील या हेतूनें समकालीन किंवा अैतिहासिक विषयांवरच लिहिणें भाग पडतें.

पक्षाभिमानाच्या किंवा पक्षनिष्ठेच्या तत्त्वावरून सर्व ज्ञान विशिष्ट मूल्यांच्या दृष्टिकोनांतूनच मांडलें पाहिजे हें स्पष्ट होतें. आतां निरनिराळ्या मूल्यांत संघर्ष असतो म्हणून साहित्यांतून निःसंदिग्धपणें वर्गीय मूल्यांच म्हणजेच पक्षीय धोरणांचाच पाठपुरावा करणें आवश्यक बनतें. कोणतेंहि सत्य निरपेक्ष असूंच शकत नाहीं असेंच मानलें जातें. "आधुनिक समाजांत इतर सर्व सांस्कृतिक गोष्टींप्रमाणेंच विज्ञान हेंदेखील आकारानें राष्ट्रीय आणि आशयानें वर्गीय स्वरूपाचेंच असतें." त्यांच्या मतें ध्येयनिष्ठा म्हणजे वर्गातीत, राष्ट्रातीत आणि विश्वात्मक असें सत्य असतें यावरील विश्वास. सत्य म्हणून जें जाहीर करावयाचें तें अशा दृष्टीनें आणि अशा रीतीनें मांडावयाचें कीं त्यामुळें साम्यवादी पक्षाचा मार्गच अधिक चांगला वाटावयास पाहिजे.

विश्वजनीनवाद हा खोटा आंतरराष्ट्रीयवाद होय. खरा आंतरराष्ट्रीयवाद हा राष्ट्रवाद नव्हे. आंतरराष्ट्रीयवाद म्हणजे देशभक्ति खरी; पण ही देशभक्ति इतर कोणत्याहि प्रकारच्या देशभक्तीहून वेगळी आहे. ती सोव्हिएट (देश)भक्ति होईल पण युक्रेनी सोव्हिएट भक्ति नव्हे; कारण तो युक्रेनी राष्ट्रवाद होईल. युद्धकाळांत ज्याचा त्यांनीं पाठपुरावा केला तो बृहद्रशियन राष्ट्रवाद म्हणजे देखील आंतरराष्ट्रीयवाद होऊं शकत नाहीं.

खरें पाहूं गेल्यास आंतरराष्ट्रीयवाद कशास म्हणावें हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे. ज्याला 'पॉलिटब्यूरो' आंतरराष्ट्रीयवाद समजेल त्यासच आंतरराष्ट्रीयवाद म्हणायचें.

ज्यांची समाजवादी वास्तववादावर नितांत श्रद्धा आहे आणि जे साहित्यांतील औपचारिकतेचा, हेतुनिष्ठेचा व विश्वात्मकतेचा मनापासून तिरस्कार करतात तेदेखील पक्षांतून हाकलले जाणार नाहींत याची खात्री देतां येणार नाहीं. हें चमत्कारिक वाटतें खरें, पण वस्तुस्थिति तशीच आहे. कारण समाजवादी वास्तवता, पक्षनिष्ठा किंवा प्रामाणिक आंतरराष्ट्रीयवाद यांची परिपूर्ति कशानें होऊं शकेल हें अधिकृतरित्या जाहीर होईपर्यंत कोणीच सांगूं शकत नाहीं. हे निकष वारंवार बदलणारे--नव्हे वेळप्रसंगीं परस्पर विरोधी असतात. त्यामुळेंच फादे येव्ह यांच्या 'यंग गार्डस्' या पुस्तकाचा समाजवादी वास्तववादाचें आदर्श म्हणून मुक्तकंठानें गुणगान केल्यावर लगेच दुसऱ्या वर्षीं त्यांत पक्षनिष्ठा नाहीं म्हणून त्याचा धिक्कारहि करण्यांत आला. एवढेंच काय विद्यार्थ्यांना 'पारंगत' म्हणून दिलेल्या पदव्यादेखील (Doctoral degree) सुरक्षित नसतात. विद्यार्थ्यांनीं करावयाच्या संशोधनासंबंधीचें धोरण बदललें तर चारचार पांचपांच वर्षांनींहि त्यांना पदव्या देण्यांत येतात किंवा दिलेल्या पदव्या माघारीं घेण्यांत येतात हें निकष बदलण्यांत इतका लहरीपणा नि हम करेसो वृत्ति दिसून येते कीं त्यावरून कांहीं उलगडा करून घेऊं म्हटलें तरी शक्य होत नाहीं. त्यासाठीं त्या निकषांच्या मागील मूलभूत तत्त्वें काय आहेत हें आपण समजून घेतलें पाहिजे.

सो. रशियांतील सर्जनशील लेखकाच्या मनाची अवस्था कशी असेल याची आपण कल्पना करूं शकतों. त्याला लिहिल्याशिवाय रहावत नाहीं, समाजवादी वास्तववादाची व्याख्या बदलणार नाहीं अशी त्याला खात्री नाहीं आणि भूतकालांत ज्या लिखाणाबद्दल त्याचा गौरव करण्यांत आला त्याचा पुढेंहि गौरव होईल अशीहि त्याला शाश्वती नाहीं. म्हणून त्यांच्यापैकीं बरेचसे लेखक पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची आपल्या लिखाणांत मदत करण्यासाठीं म्हणून मागणी करतात. हो, न जाणों नकळतदेखील फट् म्हणतां समाजवादी वास्तववादाची हत्या व्हायची. मग त्यांच्या लिखाणाला

वाचक कुठले? त्यांना स्वत:ला रहायला जागा कुठली आणि खायला अन्न कुठलें? उगीच नाही सोव्हिएट शास्त्रीय अकादमीचें अध्यक्षपद भूषविणाऱ्या वाव्हिलॉव्हनें स्टॅलिनचा 'शास्त्रीय महामानव' व 'आमच्या काळांतील सर्वश्रेष्ठ व्यक्ति' म्हणून--एवढेंच नव्हे तर 'शास्त्राला मार्गदर्शन करणारा प्रकाश' म्हणून गौरव केला. मग या शास्त्राला प्रकाश दाखविणाऱ्या महामानवानें खुद्द वाव्हिलॉव्हच्या जननशास्त्रज्ञ भावाला व इतर प्रामाणिक शास्त्रज्ञांना त्यांचा लायझेन्कोबरोबर मतभेद झाला म्हणून अंधार कोठडीचा मार्ग दाखविलेला कां असेना! तसेंच सोव्हिएट तत्त्वज्ञानी कवि लिओनॉव्ह यानें स्टॅलिन हा कमीत कमी ॲरिस्टॉटल, शेक्सपीअर, गॅलिलिओ आणि न्यूटन यांच्याइतका थोर असून त्यानें मानवजातीला त्याचें 'कुटुंब आणि स्वातंत्र्य' यांची देणगी दुसऱ्या वेळीं दिली अशी आरती गायली ती कांहीं उगीच नाहीं. एवढ्यानेंहि संपलें नाहीं तर ऐतिहासिक अपरिहार्यतेच्या तत्त्वाकडे संपूर्ण कानाडोळा करून "सोव्हिएट राजवटीचें नेतृत्व स्टॅलिनकडे आलें नसतें तर या भूगोलाचा इतिहास पार वेगळा झाला असता" अशी स्तुतिसुमनें त्यानें स्टॅलिनवर उधळलीं आहेत. नाहीं, दिवसेंदिवस वाढत जाणारी आर्जवी व खुशामतखोरी आरतीची धून है कांहीं रशियन आत्म्याचे स्वर नाहींत तर गुलामगिरीच्या ग्रहणांत सांपडल्यामुळें जीवित शाश्वतीकरितां काढलेले ते उद्गार आहेत. पण सोव्हिएट राजवटीला ते आवश्यक कां वाटावेत व दैनंदिन कार्याचा एक भाग म्हणून त्याकडे तिनें कां पहावे?

या गोष्टींचा उलगडा होण्यासाठीं बोल्शेविक लेनिन-स्टॅलिनवादी विचारसरणीचें सखोल परीक्षण करावयास पाहिजे. या विचारसरणीची मूलभूत कल्पना गूढ अशा विरोधविकासी भौतिक वादांतून उचलली आहे. या कल्पनेच्या आधारावरच सांस्कृतिक जीवनावरील सर्वंकष नियंत्रण ठेवलें जातें. ही कल्पना थोडक्यांत अशी: जीवनाचीं सर्व क्षेत्रें एकमेकांशीं विरोध विकासी पद्धतीनें निगडित आहेत. म्हणून एका क्षेत्रांत चुकीचा विचार स्वीकारला तर त्याचे वाईट परिणाम इतर क्षेत्रांवर अपरिहार्यपणें होतातच आणि विचार आणि आचार हें एकमेकांशीं संलग्न असल्यामुळें एका क्षेत्रांतील चुकीच्या विचाराचा परिणाम म्हणून लवकर किंवा उशीरा राजकीय

क्षेत्रांत चुकीचा आचार अपरिहार्यपणें घडून येतो. प्रत्येक क्षेत्राचा अंतिम परिणाम राजकारणावर होत असल्यामुळें पक्षाच्या केंद्रीय उच्चाधिकार समितीला (Politbureau) कोणत्याहि क्षेत्रांतील विचारसरणी बरोबर आहे का चूक आहे हें ठरविण्याचा अधिकार आणि बौद्धिक हक्कहि मिळतो. त्यामुळेंच कला व जीवनशास्त्र या परस्परापासून अतिशय दूर असलेल्या विषयासंबंधींहि पक्षाचीं धोरणें ठरवणें आवश्यक वाटतें. अशा पक्षधोरणाचा केवळ अवलंब केल्यानें किंवा त्यापुढें मान तुकविल्यानें भागत नाहीं तर तीं धोरणेंच सत्य आहेत म्हणून त्यावर विश्वास ठेवावा लागतो आणि त्याचा जाहीर उच्चार करावा लागतो.

जगाच्या बौद्धिक इतिहासांत इतका सर्वंकष आणि श्वास रोखायला लावील असा दावा कुणी केला नाहीं. पोप स्वत:ला अस्खलनशील समजतो. पण तें केवळ धार्मिक आणि नैतिक क्षेत्रांत. साम्यवादी पक्षाची केंद्रीय उच्चाधिकार समिति स्वत:ला अशी अस्खलनशील समजत नसली तरी मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांतील आचारविचाराबाबत सर्वांत विश्वासार्ह अधिकारी समजते. हा दावा ती आतांपर्यंतच्या कोणत्याहि धर्मापेक्षां अधिक क्रूर, अधिक पोथीबंद आणि ज्ञानविषयक अहंतेंत अधिक सर्वंकष अशा तत्त्वज्ञानाच्या नांवानें करते. या समितीमागें अमर्याद दंडशक्ति आहे. मग शास्त्रज्ञांत असा कोण हरीचा लाल निपजेल कीं जो उच्चाधिकार समितीनें त्यानें काढलेल्या निष्कर्षांत विरोधविकासी प्रज्ञेनें ढवळाढवळ केली तर त्याविरुद्ध आपला आवाज उठवील? 'प्रावदा'च्या १५ ऑगस्ट १९४८च्या अंकांत दिलेल्या प्रोफेसर झेब्राक यांच्या शब्दांचा पुनरुच्चार करण्यापलीकडे तो काय करूं शकेल ? प्रो. झेब्राक म्हणाले होते :

"सोव्हिएट जननशास्त्रासंबंधीं ज्यावेळीं पक्ष दोन्हीं सिद्धान्त मानीत होता; त्यावेळीं मी माझ्या सिद्धान्ताचा सतत पुरस्कार केला. त्या सिद्धान्तांचा व लायझेन्को यांच्या सिद्धान्तांत संपूर्ण एकमत नव्हतें. परंतु पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या उच्चाधिकार समितीनें सोव्हिएट जनन-शास्त्रांतील मिथुरिन यांचेच सिद्धान्त प्रमाण मानल्याचें स्पष्ट झाल्यानें, पक्षाचा एक सभासद म्हणून आतां मी पक्षानें चुकीचे म्हटलेले शास्त्रीय सिद्धान्त बरोबर आहेत असें म्हणू शकत नाहीं."

आपल्या "धि ग्रेट फ्रेंडशिप" या संगीत–नाटयावर उच्चाधिकार समितीमधील संगीत–टीकाकारांकडून जहरी टीका झाल्यावर शॉस्टाकोव्हिच् (Shostatkovitch) म्हणाला, "पक्षाचींच मतें बरोबर आहेत हें मी जाणतों. पक्ष माझ्या हिताची काळजी वाहतो हेंहि मला माहीत आहे. मी आतां वास्तववादी सोव्हिअेट लोक–कलेप्रत नेणारे कलात्मक मार्ग धुंडाळावयास हवेत." बोरिस पिलनिआकप्रमाणें धडगत व्हायला नको असेल तर तो याहून अन्य तें काय बोलूं शकला असता ?

परंतु ही गुलामगिरी केवळ भीतीमुळें किंवा बक्षिसाच्या आशेनेंच लादली जाते असें समजणें चुकीचें होईल. हे विचारवंत किंवा कलावंत अप्रामाणिक असतात असेंहि नाहीं. प्रतिभावंत किंवा प्रज्ञावंत यांमध्यें बाह्य दडपणाचा जांच कमी करण्यासाठीं त्या दडपणाचा खुशीनें स्वीकार करण्याकडे कल असतों. झेस्लो मिलोज्झ (Czeslaw Milosz) हा स्वदेशांतून पळून आलेला पोलिश कवि आहे. त्यानें पोलादी पडद्याआडील बुद्धिवाद्यांची मनोरचना कशी असते तें मोठ्या मार्मिक रीतीनें दाखविलें आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणें हे बुद्धिवादी स्वतःला फार सुधारलेले समजतात परंतु त्यांना जिथें जिथें तडजोड करावी लागते त्या ठिकाणीं आपल्या वागण्याचें समर्थन ते सामाजिक किंवा नैतिक दृष्टिकोनांतूनच करतात; आणि नकळतेपणीं झालेल्या आत्मवंचनेमुळें समाधानांत रहातात. अशांवरच जुलुमी राज्यकर्ते विश्वास ठेवूं शकतात. जे अश्रद्ध आहेत किंवा केवळ संधिसाधू आहेत त्यांच्यावर ते विश्वास ठेवूं शकत नाहींत. अर्धवट विश्वास बाळगणारे किंवा अर्धवट तयार असलेले व स्वतःच्या गुलामगिरीला साहाय्यभूत ठरणारे असेच बुद्धिवादी त्यांना बळी पडतात. यावरून अेवढें स्पष्ट व्हावें कीं उच्चाधिकार समितीसमोर मान तुकविणारे सारेच कांहीं पोटापायीं आणि भीतीपायीं तसें करीत नाहींत.

परंतु–आणि याच ठिकाणीं खरी मख्खी आहे–पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचें धोरण जागतिक घडामोडीमुळें बदलते त्यावेळीं फिरून एकदां हकालपट्टी आणि शुद्धीकरण यांची मोहीम सुरू होते. मग केंद्रीय कार्यकारिणीच्या आदेशाप्रमाणें वागण्यास तयार असलेल्या बुद्धिवाद्यांसहि उजळमाथ्यानें फिरावयाचें असल्यास स्वतःचें मन आणि इच्छा मारूनच तसें

करतां येतें. या वानगीवरूनच बोल्शेविक-लेनिन-स्टॅलिनवादाला मार्क्सवाद म्हणणें म्हणजे फ्रँकोच्या हुकुमशाहीला खिरस्ती धर्म मानण्यासारखें आहे हें लक्षांत येईल. "लोकापवाद सहन करीत मार्ग चाल एकला" (Follow your own course and let people talk) या डांटेच्या काव्य-पंक्तीनें मार्क्सनें आपल्या 'कॅपिटल' ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना संपविली आहे. सर्जनशील व्यक्तित्वाचें जणू चैतन्यच त्या काव्यपंक्तींत आहे. मार्क्स हयात असता तर स्टॅलिनच्या दडपशाहींत कदाचित् याचाच पहिल्या प्रथम बळी घेतला गेला असता. कारण मार्क्सला मानवाच्या प्रतिष्ठेची किंमत होती. एके ठिकाणीं तो म्हणतो कीं "कामगाराच्या दृष्टीनें देखील मानवी प्रतिष्ठा ही त्याच्या भाकरीइतक्याच मोलाची आहे."

जातां जातां अेवढें स्पष्ट करावयास हरकत नाहीं कीं जगांतल्या अेकून अेक गोष्टीचे परस्परांशीं संबंध असतातच असें नाहीं. विज्ञानामधील किंवा गणितशास्त्रांतील सत्याची वा कलाक्षेत्रांतील सर्वच कलाकृतींची राजकीय धोरणाशीं सांगड घालूं पहाणें किंवा त्यांच्या खरेखोटेपणाबद्दलचा पडताळा राजकीय धोरणावरून ठरविणें चुकीचेंच होईल. सर्वसाधारण तर्क-शास्त्राला हें पटणारें नाहीं. हें साम्यवादी तत्त्व जर खरें असेल तर उलट असेंहि म्हणतां येअील कीं राजकारणांतील चुकांचे वाईट परिणाम शास्त्रीय संशोधनावरहि दिसून येतील; मग शास्त्रज्ञांना स्टॅलिनच्या राजकारणांतील घोडचुका सुधारण्याचा हक्क असावयास नको का? स्टॅलिनला त्याच्या राज-कीय द्रष्टेपणामुळें विज्ञान किंवा भाषाशास्त्र यांची दुरुस्ती करण्याचा जेवढा अधिकार आहे तेवढा तरी शास्त्रज्ञांना (आपल्या विषयांतील अभ्यासामुळें) स्टॅलिनचीं धोरणें सुधारण्याचा हक्क नसावा काय? परंतु ही इतकी उघड गोष्टहि सुचविण्याचें धैर्य कोणताहि शास्त्रज्ञ दाखवूं शकला नाहीं.

स्टॅलिननें एकदां जाहीर केलें होतें कीं, "परदेशांतील कोणत्याहि लब्धप्रतिष्ठितांच्या मानानें सोव्हिअेट रशियांतील सामान्यांतील सामान्य नागरिक देखील कितीतरी श्रेष्ठ असतो. कारण परदेशांत नागरिकांच्या बोकांडी भांडवलदारीची पकड असते तर सोव्हिएट रशियांतील नागरिक भांडवलशाहीच्या पकडीपासून मुक्त असतात."

स्टॅलिनच्या या सोव्हिएट रशियांतील नवमानवावर कांहीं वर्षांनीं

'प्रावदा'नें केलेली टीका फारच बोलकी आहे. "सोव्हिएट रशियानें कामगारांचा दर्जा किती अुंचावला आहे हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं" अशी 'प्रावदा'नें या संदर्भांत तक्रार केली होती.

प्रत्यक्षांत घडणाऱ्या घटनांनीं त्यांच्या विचारांतील फोलपणा जितका अधिक दिसून येईल तितका त्यांचा कल दुर्बोध व गूढ तात्त्विकतेकडे अधिक वळत जाईल. सर्वसाधारण सारासार विचार आणि निर्णयशक्ति यांच्याशीं त्या तात्त्विकतेचें कधीं पटायचें नाहीं. सोव्हिएट सर्वंकषतेचें हें एक वैशिष्टय आहे. शासन संस्था नष्ट होण्याऐवजीं राष्ट्रीयकरणावर उभारलेल्या अर्थकारणानंतर ती उघड उघड दंडशक्तीचें रूप घेऊं लागली आणि ती जबाबदार कुणाला? तर पक्षाच्या उच्चाधिकार समितीला! उत्पादनाचीं साधनें ज्यांच्या मालकीचीं असें सांगण्यांत येतें त्या कामगारांना भांडवलशाही राष्ट्रांतल्या कामगारांपेक्षां स्वातंत्र्य कमी आहे. त्यांना अर्थकारणावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार कमी; संचाराचेंहि स्वातंत्र्य कमी. जेव्हां ते वेठबिगारीखालीं (Concentration Camps) भरडले जात नाहींत तेव्हादेखील त्यांची अशी स्थिति असते. वर्गसंघर्षाचें नांव बदललें तरी त्याचें स्वरूप अजिबात बदललेलें नाहीं. लोकशाही राष्ट्रांतील मालकवर्गाच्या हातीं जेवढी सत्ता असते त्याहून कितीतरी अधिक सत्ता तेथील व्यवस्थापक व राजकारणी लोकांच्या हातांत असते. आचारी, पाणके, खाण कामगार अशांनादेखील सत्तेचा भाग मिळेल असें आश्वासन लेनिननें दिलेलें असलें तरी प्रत्यक्षांत सत्ताधारी हे अधिक सर्वंकष आणि निर्दय झालेले आढळून येतात. त्यांना दूर सारण्याची ताकद त्यांच्या हाताखालीं काम करणाऱ्या कामगारांत नसते. त्यांचो हकालपट्टी होऊं शकते ती 'वरून' आदेश आला तरच! शास्त्रानें भाकडकथांचें उच्चाटन झालेलें नसून तेथें नव्या आणि अधिक निकृष्ट प्रतींच्या भाकडकथांना मानाचें स्थान दिलें आहे. तेथें धर्मभावनेचा लोप झालेला नाहीं, तर एका जुलमी व्यक्तीच्या विभूतिपूजनांत तिचें रूपांतर झालें आहे. या सर्व गोष्टींचें स्पष्टीकरण दुटप्पीपणें केलें जातें. मग त्यांना युद्धालाच शांतता समजावी लागते, समता ही विषमता ठरते, बंधुप्रेम याचा अर्थ नोकरशाहीचा क्रोध किंवा गुलामगिरी असा केला जातो.

शास्त्रीय दृष्टिकोनावर उभारल्याची फुशारकी मारणाऱ्या राजवटींत आपल्या नेत्याला काव्यांतून कसें आळवलें जातें हें खालील ओळींवरून दिसून येईल.

आमुच्या बापा! आम्हांला तूं किती प्रिय आहेस
हें सांगण्यास कवींना शब्द तोकडे पडावेत!
क्रांतिसैनिकांच्या आघाडीवर तूंच तळपलास!
आमच्या हाताच्या पाळण्यांत तुला जोजवावेसें
आम्हांला किती तीव्रतेनें वाटतें.
कडाक्याच्या हिवाळ्यांत आमचा अुबेचा निवारा तूं
धगधगणाऱ्या ग्रीष्मऋतूंत सुखशीतल बगीचाहि तूंच
आकाशांत विहरावयास लाभणारे पंखद्वय तूं
भूगर्भांत शिरणाऱ्यास होतोस प्राणवायु तूंच
शत्रूंसमोर तूँ भीषण वादळ मेघ होतोस
कष्टकरी जनतेचा तूं तेज़ोभास्कर बनतोस
वादळांतील नौकांचा तूंच कुशल कर्णधार
निष्कपट हृदयांना तूंच केवळ प्यार!......
......या भूमीचा सुपुत्र तूँ
अमुचा रक्षक बाप तूं
तुला नमितों आम्ही शतवार!
नत मस्तक असतां तुजसमोर घेतों शपथ
जिवापाड सतत रक्षिण्याची तुला
तुझें स्वप्न तें स्वप्न आमुचें
तुझे विचार हिजे, तेच आमुचे
मनांत चैतन्याचा गाभा–
तूंच; नि रक्तामधली आभा
प्रतीक अमुच्या बलशाली–
शक्तीचें केवळ महान तूं!

अमेरिकेच्या अध्यक्षांचें असें कुणी वर्णन केलें अशी कल्पना करतां येते कां पहा. अशा प्रकारें आपण देवतांचीच आळवणी करीत असतों. राज्य-

यंत्रणा ज्याअर्थी अशी खुशामतखोरी खपवून घेते–नव्हे त्याला उत्तेजन देतें त्या अर्थी शासनाचे विरोधविकासी तत्त्वज्ञान जनतेला अफू म्हणून पाजलें जातें हेंच सिद्ध होत नाहीं का? आमच्या कोणत्याहि धार्मिक किंवा अध्यात्मिकतेपेक्षां ही अफू कमी परिणामकारक खास नाहीं.

स्वतंत्र जगावर ज्याची छाया पडली आहे त्या सोव्हिएट व्यक्तित्वाची किंवा सोव्हिएट सर्वंकषतेची मूर्ति ही अशी आहे. या छायेमागें प्रचंड शक्ति आहे. ती शक्ति केवळ सो. युनियनच्या मानवी व भौतिक समृद्धीमुळेंच निर्माण झालेली नाहीं तर स्वतंत्र जगांत तिच्याविषयीं जें अज्ञान आहे त्यामुळें निर्माण झाली आहे. स्वतंत्र जगांतील लोक ही मूर्ति स्पष्ट पाहूं शकत नाहींत आणि आपल्या इच्छेनुसार तिचें चित्र ते रंगवीत असतात.

या सर्वंकष संस्कृतीची वाढती छाया कशी रोधावी, किंवा ती कशी नष्ट करावी या विषयीं उहापोह करण्याचें हें स्थळ नव्हे. बर्ट्रांड रसेल यांनीं म्हटलें आहे, "कोणतीहि हुकुमशाही चिरकाल टिकत नाहीं. आणि कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्यांना सत्ताधारी कितीहि बलाढ्य व जुलमी असला तरी तो अटकाव करूं शकत नाहीं" हें आश्वासन पुरेसें आश्वासक नाहीं. कोणतीहि राजवट, मग ती चांगली असो वा वाईट असो चिरकालीन नसतेच. १९४० सालीं जेव्हां ब्रिटिश जनता हिटलरचा हल्ला सहन करूं शकली त्यावेळीं हिटरलचा जय झाला तरी त्याची राजवट चिरकालीन नाहीं हें सांगण्यांत स्वारस्य तें काय? आतां जे जिवंत आहेत त्यांना त्यांच्या मृत्यूनंतर ५०० किंवा ६०० वर्षांनीं जुलमी सत्ता अस्तंगत होईल म्हणून सांगितल्यानें दिलासा थोडाच मिळणार आहे! आपल्यापुढील प्रश्न आहे तो आपलें स्वातंत्र्य कसें टिकवावें हाच केवळ नाहीं तर आपल्याप्रमाणेंच जेथें जेथें स्वातंत्र्य अस्तित्वांत आहे त्याचें संरक्षण कसें करावें हा आहे. लोक–शाही स्वातंत्र्य जेव्हां आक्रमक पवित्रा घेईल तेव्हांच आपल्या लोकशाही संस्था अधिक बळकट होतील व जुलूम, अज्ञान आणि भीति यांविरुद्ध अविरतपणें लढणाऱ्या मानवतेच्या बाजूनें आपल्यानंतर जे लढ्यासाठीं उभे ठाकतील त्यांच्याकरतां उज्ज्वल असा वारसा ठेवूं शकतील.

● ● ●

# विज्ञान आणि विरोधविकासी भौतिकवाद

विरोधविकासवादी तत्त्वज्ञान हें एक पार्थिव किंवा भौतिक तत्त्वज्ञान आहे. मानव व त्याचा जगाशीं असलेला संबंध यांविषयींचीं जीं अनेक तत्त्वज्ञानें प्रसृत आहेत त्यांतीलच तें एक. त्याचप्रमाणें सो. रशिया व त्याच्या प्रभावळींतील राष्ट्रें यांचा तें राजकीय तत्त्वज्ञान हा राजधर्म आहे.

विशिष्ट विषयांवरील शास्त्रांत सांपडतात त्याहून अधिक व्यापक असे निष्कर्ष पाश्चात्य उत्क्रांतिवादांत आढळतात. त्यांचा परिणाम विरोध-विकासवादी तत्त्वज्ञानावरील विचारांवर झालेला आहे. असा एक निष्कर्ष म्हणजे जेथें कांहीं मूल्यांचा मानवी हितसंबंधांशीं संबंध पोहोंचतो तेथें मानवी जाणीव किंवा त्याची इच्छाशक्ति राजकीय दृष्टचा तटस्थ असते.

या दृष्टीनें पाहूं जातां विरोधविकास–वादांतील विचारांची साम्य-वाद, लोकशाही किंवा फासिझम यांपैकीं कोणत्याहि तत्त्वज्ञानांतील विचा-रांशीं तार्किक सुसंगति आढळते आणि याच दृष्टीनें वैयक्तिक वा सामा-जिक जाणिवा जगांत घडून येणाऱ्या भौतिक बदलाबरोबर निर्माण होतात, वाढतात व विलय पावतात असें म्हणणारा विरोधविकास–वाद हा आकुंचनशील भौतिकवादाच्या ( Reductive materialism ) विरुद्धच गणावयास हवा. त्या तत्त्वज्ञानानुसार वैयक्तिक व सामाजिक परिस्थितीला वळण लावण्यास मानवी विचार आणि कृति समर्थ आहेत. या अर्थानें विरोधविकास–वादाचा मी विचार करणार नाहीं.

सो. रशियाचा राजधर्म बनलेला विरोधविकास–वाद हा वरील विचारापासून संपूर्णपणें वेगळा आहे. कारण एक राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रणाली म्हणून साम्यवादाचा स्वीकार त्यांत अनुस्यूत असतो. आणि त्यांच्या साम्यवादांत विरोधविकास–वादाचा स्वीकार गृहीत धर-लेला असतो. तात्त्विक विचारांच्या इतिहासांत हा विचार फारच मह-त्त्वाचा आहे. कारण 'विरोधविकासी' संबंधांबद्दलच्या कांहीं असंदिग्ध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि. ........
क्रमांक ........ नों. दि. ........



कल्पनांच्या बरोबरीनें हा विचार विरोधविकासी भौतिकवादावर विश्वास असणारांच्या दृष्टीनें "आधुनिक समाजांतल्या संस्कृतीप्रमाणेंच शास्त्र हें देखील आकारानें राष्ट्रीय व आशयानें वर्गीय असतें" अशासारख्या विधानांचें समर्थन करूं पाहतो. शास्त्रीय संशोधन व प्रकाशनें यांवरील राजकीय आदेशानुसार घातलेल्या निर्बंधांचें वरील भूमिकेवरून समर्थन केलें जातें. या प्रकारची विचारसरणी केवळ सो. रशियांतच नव्हे तर त्याच्या प्रभावळींतील राष्ट्रांनींहि आत्मसात केली आहे. म्हणूनच ज्यांना असें वाटते कीं, राजकीय सत्तेचा वापर करण्यासाठीं हें तत्त्वज्ञानाचें थोतांड उभें केलें आहे त्यांनींदेखील ही विचारसरणी जो दावा मांडते त्याचें स्वरूप समजून घेतलें पाहिजे.

भौतिक विरोधविकास–वाद म्हणजे निसर्गाच्या प्रक्रिया अभ्यासण्याची आणि समजून घेण्याची एक प्रक्रिया आहे. तर ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे वरील पद्धतीनुसार सामाजिक प्रक्रियांविषयीं व्यक्त केलेलीं मतें होत. असें लेनिन, स्टॅलिन व इतर अधिकृत प्रवक्त्यांनीं म्हटलें आहे यांवरून विरोधविकासी पद्धत ही या तत्त्वज्ञानाच्या मध्यवर्ती स्थानीं आहे हें स्पष्ट होईल. परंतु कोणीहि अधिकृतपणें ही विरोधविकासी पद्धत काय आहे याचें विवेचन करूं लागला कीं अध्यात्मांत दिसून यावींत त्या प्रकारचीं विधानें करतो. उदाहरणार्थ निसर्ग हा विविधांगांनीं संयुक्त व त्याचवेळीं संपृक्त असून त्यांतील प्रत्येक अंग दुसऱ्या अंगाशीं सेंद्रियरित्या संबंधित, त्याच्यावर अवलंबित व त्यामुळें निश्चित असें असतें.' 'निसर्ग अविरतपणें गतिबद्ध आणि बदलत जाणारा असतो.' 'ही गति खालून वर जाणारी असते'. 'निसर्गांतली कोणतीहि गोष्ट किंवा नैसर्गिक प्रक्रिया अंर्तविरोधापासून अलिप्त नाहीं' वगैरे वगैरे. गतिशास्त्र (Dynamics) किंवा अितर विज्ञान शास्त्राचे प्रयोग सिद्ध निष्कर्ष मांडावेत त्या प्रकारें अशीं विधानें वरील पद्धतीनुसार एखाद्यानें प्रायोगिक रित्या जणू सिद्धच केलीं आहेत अशा ऐटींत करण्यांत येतात. विरोधविकासी पद्धति आणि शास्त्रीय पद्धति यांचें संबंध मुद्दामच संदिग्ध ठेवण्यांत येतात आणि जरी विरोधविकासी तत्त्वांच्या अनुषंगानें शास्त्रीय विकास होतो असें वारंवार सांगितलें जात असलें तरी या दोहोंतील संबंधाबद्दल स्पष्ट व सुसंगत असें कुठेंच लिहिलेलें आढळत नाहीं.

विरोधविकासाचे तथाकथित वस्तुनिष्ठ नियम आणि भौतिक व सामाजिक शास्त्रांच्या संबंधांचीं लक्षणें बहुधा तीन प्रकारें सांगितलीं जातात. (१) कधीं कधीं विरोधविकासाचे नियम हे भौतिक व सामाजिक शास्त्राचीं गृहीत कृत्यें आहेत असें सांगण्यांत येतें, (२) तर कधीं कधीं शास्त्रीय संशोधनाचें सार म्हणजेच विरोधविकासाचीं तत्त्वें होत असें सांगण्यांत येतें, (३) तर कधीं ती स्थूल विचार– (सतत ज्यांचा पडताळा विकास पावणाऱ्या शास्त्रीय निष्कर्षामुळें मिळतो–) आहेत असें सांगण्यांत येतें.

अ) गृहीत कृत्यांच्या तत्त्वाचें मूल्यमापन करावयाचें म्हटल्यास पहिली अडचण उभी रहाते ती विरोधविकासविषयक विधानांच्या असंदिग्धतेची. उदाहरणार्थ "निसर्गाच्या सर्व प्रक्रियांत आणि वस्तूंत अंतर्गत विसंवाद असतोच" हें स्टॅलिनचें विधान पहा. विसंवाद याचा रूढ आणि सुसंगत असा वापर विधानांच्या बाबतींतच करतां येतो. परंतु ही गोष्ट आपण क्षणभर विसरूं. वरील विधान हें इतर विरोधविकासी तत्त्वांप्रमाणें विश्वव्यापक आहे असें म्हटलें जातें. परंतु तसें असलें तरी कोणत्याहि शास्त्रीय ज्ञानाच्या सत्याला तें गृहीत कृत्य म्हणून आवश्यक नाहीं. उदाहरणार्थ विशिष्ट परिस्थितींत विद्युत्प्रवाह चुंबकीय क्षेत्र निर्माण करतो. परंतु या शास्त्रीय सत्याला वरील विधान गृहीत कृत्य म्हणून आवश्यक वाटते का ? हें किंवा इतर कोणतेंहि सत्य वरील विरोधविकासी विधान खरें असलें किंवा खोटें असलें तरी सत्यच राहील. वस्तूमधील अंतर्गत विसंवाद सिद्ध करण्यासाठीं एखाद्या शास्त्रीय सत्याचा दाखला दिला तरी त्यावरून विरोधविकासी तत्त्वांची विश्वव्यापकता खरी ठरत नाहीं. निसर्गांतील कांहीं वस्तूंसंबंधी एखादा गुणविशेष खरा असेल म्हणून तो कांहीं विश्वांतील सर्वच वस्तू आणि प्रक्रिया यांच्या संबंधांत खरा नसतो. यावरून दिसतें तें एवढेंच: विरोधविकासी तत्त्व हें काहीं वस्तू किंवा कांहीं प्रक्रिया यांच्या बाबतींतलेंच सत्य आहे.

विरोधविकासवादी तत्त्वें ही शास्त्रीय सत्याहून वरच्या पातळीवरील नाहींत, तर शास्त्रांमुळें टप्प्याटप्प्यानें त्यांचें सत्य प्रत्ययास येतें असें जेव्हां विरोधविकासवादी म्हणतात तेव्हां तें बरोबर वाटतें. परंतु मग विरोधविकासी तत्त्वें म्हणजे एकेका काळांतील शास्त्रीय सत्यांची

केवळ गोळाबेरीजच ठरेल. हें खरें असेल तर गेल्या शतकांत शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रांत कमालीची क्रांति घडून आली तरी विरोधविकासी तत्त्वांत काहींच फरक कसा आढळून येत नाहीं असा प्रश्न अुपस्थित होतो. त्याचप्रमाणें शास्त्रीय संशोधन करतांना शास्त्रज्ञ नकळत का होईना पण विरोधविकासी तत्त्वांचा अवलंब करीत होते या त्यांच्या विधानांत मग अर्थच उरणार नाहीं. विरोधविकासाच्या व्याख्येप्रमाणें बरोबर निष्कर्ष काढणारी कोणतीहि पद्धति ही विरोधविकासीच असते आणि नव्या ज्ञानाच्या संपादनास विरोधविकासी तत्त्वें मार्गदर्शन करतात यांतहि मग तथ्य आहे असें म्हणावयाचें कारण नाहीं.

(क) अेंजेल्सचा दाखला देअून स्टॅलिननें लिहिले आहे कीं "विरोधविकासाची परीक्षा निसर्गावरून घेतां येते, आणि आधुनिक विज्ञानांनीं या संदर्भांत नित्य नवा पुरावा अुभा केला आहे...." निसर्गावरून परीक्षा घेतां येते ती विरोधविकासवादाच्या भौतिकवादाची नव्हे हें लक्षणीय आहे. आतां परीक्षा म्हणजे कसोटी, प्रश्न! त्यांचीं अुत्तरे तात्त्विकरित्या तरी अनेक प्रकारें देतां येतील. जर विरोधविकासवादाची परीक्षा निसर्गावरून करतां येत असेल तर तीं तत्त्वें आतांपर्यंतचें ज्ञान कवटाळून अुरलेलीं अशीं अधिक व्यापक असावसास हवींत. भविष्यकालीन परीक्षांत ती अुतरावयास हवींत. कितीहि स्थूल स्वरूपाची असलीं तरी तीं गृहीत प्रमेयें असलीं पाहिजेत. म्हणून 'यापुढील काळ कोणत्या प्रकाराचा आहे, आपल्याला कसले शोध लावावयाचे आहेत, आणि नेमकें काय घडून आलें तर विरोधविकासाची तत्त्वें चुकीचीं आहेत हें सिध्द होईल? असे प्रश्न करणें या ठिकाणीं रास्तच होओल.

—१—

पण वरील प्रश्नांचीं उत्तरें कोणताहि विरोध–विकासी भौतिकवाद माननारा देणार नाहीं. दैववादी माणूस घडलेली कोणतीहि गोष्ट ही देवाच्या इच्छेनें घडून आली किंवा दैवी योजनेनुसार घडली असें ज्या श्रद्धाळूपणानें समजतो तेवढ्याच अंधश्रद्धेनें प्रत्येक घटना ही विरोधविकासी तत्त्वज्ञानानुसारच झाली आहे असें साम्यवादी मानतो. विरोधविकासी तत्त्व-

ज्ञानाचा खरेखोटेपणा पडताळून पहाण्याची सोय नाहीं, कारण तो पहाण्याचा निकष कोणता हेंच मुळीं सांगण्यांत येत नाहीं. विरोधविकासी नियमांच्या पुष्टयर्थ उदाहरणांची रेलचेल आहे, पण अमुक एक गोष्ट घडल्यास ते नियम खोटे पडतील असें सांगण्यांत येत नाहीं. (जें जें कांहीं घडतें तें तें सारें विरोधविकासी तत्त्वज्ञानानुसार घडतें असेंच त्यांचें दैववाद्यांसारखें म्हणणें !) त्यामुळें विरोधविकासी तत्त्वज्ञान एक हें गृहितकृत्य म्हणून कितपत समजावें हें चित्य आहे. या तत्त्वज्ञानानें शास्त्रीय संशोधनाच्या कार्यास हातभार लावला आहे असें कधी घडलेंच नाहीं. उलट ऐतिहासिक कालांत जुनाट धार्मिक समजुती शास्त्रीय संशोधनाच्या आणि विचारांच्या आड आल्या; तद्वतच विरोध विकासाच्या भ्रामक समजुती आज शास्त्रीय प्रगतीच्या आड येत आहेत. त्याचा विरोध शास्त्रीय सत्यावर आधारलेला नसतो तर अितर कारणांमुळें तो विरोध होतो. सापेक्षतावाद व जननासंबंधीची जीवशास्त्रीय मतप्रणाली यांना विरोधविकासवाद्यांनीं केलेला विरोध हा अशाच स्वरूपाचा होय.

मात्र निरनिराळ्या शास्त्रीय व वैज्ञानिक मतप्रणालींना किंवा सत्यांना होणारा विरोध हा विरोधविकासी भौतिकवादांत अनुस्यूत नाहीं हे लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. कारण विरोधविकासी भौतिकवादांशीं या सर्व वैज्ञानिक शाखोपशाखांचा संबंधहि नाहीं.मग त्यांतील एक गोष्ट बरोबर किंवा एक गोष्ट चुकीची असें त्या तथाकथित तत्त्वज्ञानानुसार कसें म्हणतां येअील ? विरोधविकासी तत्त्वज्ञानाशीं निगडित झालेल्या या विज्ञान विरोधी अडसरांचा उगम दुसऱ्याच गोष्टींत आहे. बहुधा तो उगम सामाजिक किंवा राजकीय गोष्टींत असतो. साम्यवाद्यांच्या दृष्टिकोनांतून विरोधविकासी भौतिकवाद हें वर्गीय पक्षीय तत्त्वज्ञान आहे. एवढेंच नव्हे तर शास्त्रीयसंशोधन किंवा शास्त्रीय संशोधनास विरोधविकासी नियमांचें अधिष्ठान देणें या गोष्टीदेखील वर्गीय व पक्षीय मानल्या जातात ! शास्त्रज्ञाकडून जी अपेक्षा व्यक्त केली जाते त्यावरून व साम्यवाद्यांच्या जाहीर घोषणांवरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट झाली आहे. मॉरिस कॉर्नफॉर्थ हा इंग्रज साम्यवादी म्हणतो, "विरोधविकासी भौतिकवाद हा भांडवलदारी संकटांतून आणि युद्धांतून मार्ग काढण्यास परिणामकारक मदत करूं

शकतो किंवा नाहीं यावरूनच त्याची पारख करावी आणि केली जाईल ! ( Dialectical Materialism (London 1952) I 140 ) शास्त्रीय संशोधनाला विरोधविकासी तत्त्वज्ञान लागू करण्याच्या बाबतींतहि हाच नियम असल्यानें कोणती वैज्ञानिक मतप्रणाली स्वीकारावयाची हें त्यासंबंधीच्या शास्त्रीय किंवा प्रयोगसिद्ध पुराव्यावरून ठरत नाहीं. तें ठरतें सत्तासंपादनासाठीं व ती टिकविण्यासाठीं काय उपयोगी पडेल त्यावरून !

यामुळें होतें काय कीं, तर्कदुष्ट किंवा अशास्त्रीय घोषणांचा प्रत्यक्षांत फारच परिणाम होतो. त्यामुळें सत्ताधाऱ्यांचा वैयक्तिकदृष्टया, मानसशास्त्रीय दृष्टया किंवा सामाजिक वा ऐतिहासिकदृष्टया फायदा होतो. याचा इन्कार अनेक वेळां करण्यांत आला आहे. उदाहरणार्थ, बर्ट्रांड रसेल म्हणतात कीं, "तात्त्विक विचारांचा व्यवहारांशीं प्रत्यक्ष संबंध असतो असें म्हणणें तर्कदृष्टया असमर्थनीयच होय !" हेंच जर बर्ट्राण्ड रसेलनीं तात्त्विक विचारांचा व्यवहाराशीं तार्किक किंवा तर्कसंगत संबंध असतो असें म्हणणें चुकीचें असें म्हटलें असतें तर तें अधिक खरें ठरलें असतें. कारण तात्विक विचारांत अनुस्यूत नसतांहि इतर कारणामुळें विचारांचा व्यावहारिक गोष्टींवर पगडा बसलेला दिसून येतो. सो. रशियांतील विरोधविकासी भौतिकवादाचा इतिहास हें या संदर्भांतील उत्तम उदाहरण आहे. साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीनें तात्विक व शास्त्रीय चर्चांत वारंवार हस्तक्षेप करून त्याबाबतींत निर्णय दिले आहेत; विरोध विकासवादांतील कोणत्या प्रमेयांवर भर द्यावा आणि कलेपासून जीवशास्त्रापर्यंत सर्व क्षेत्रांत कोणत्या मतप्रणाली शिकविल्या जाव्यात याचे आदेश दिले आहेत. कधीं योगायोग, संधी अशा कल्पनांचा धिक्कार करण्यांत आला तर कधीं त्याच कल्पनांचा पाठपुरावा करण्यांत आला. कारण त्याशिवाय लेनिन किंवा स्टॅलिन हे त्यांच्यासारख्या परिस्थितींतच वाढलेल्या इतरांहून असामान्य कसें हें ठरवितां येणें शक्य नाहीं. भाषेविषयींच्या कल्पनांतहि तोच प्रकार. एकेकाळीं ती सांस्कृतिक घडणीचा भाग म्हणून त्यांतहि वर्गीय संघर्षाचें प्रतिबिंब दिसतें असें म्हटलें जात असें, तर कांहीं काळांनें भाषा हा समाजाचा सामाजिक ठेवा आहे असा आदेश देण्यांत आला आणि त्यामुळें भाषेच्या संदर्भांत वर्गसंघर्षाच्या गोष्टी करणें चुकीचें ठरविण्यांत आलें. एके काळीं तर्कशास्त्र हें आध्यात्मिक

विचारसरणीचा एक प्रकार आहे म्हणून अभ्यासक्रमांतून डावललें गेलें; तर नंतर अ–वर्गीय शास्त्र म्हणून त्याची प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली! का? तर "तर्कशास्त्राचा सोव्हिएट जनतेच्या सेवेसाठीं उपयोग व्हावा, भांडवलशाहीविरुद्धच्या लढ्यांतील तें तात्त्विक हत्यार ठरावें" यासाठीं. हें अवतरण आहे तत्संबंधीच्या सो. सरकारच्या ठरावांतील. निर-निराळ्या वेळीं अशीं परस्परविरोधी धोरणें स्वीकारूनहि प्रत्येक धोरणाचें समर्थन मात्र विरोधविकासाच्या मतप्रणालीनेंच करण्यांत येतें ही यांतील खरी मौज आहे!

सो. रशियाच्या धोरणांत वेळोवेळीं परस्परविरोधी मतप्रणालींचा अवलंब केलेला दिसतो. त्याला कारणें बरींच असूं शकतील. विरोधविकासी तर्कशास्त्राच्या जागीं परंपरागत तर्कशास्त्राची प्राण-प्रतिष्ठा करण्यांत किंवा आपल्या 'विरोधविकासी आणि ऐतिहासिक भौतिकवाद' या ग्रंथांत 'नकारात्मकतेची नकारात्मकता' (Negation of negation) हें सुप्रसिद्ध विरोधविकासवादी तत्व अनुल्लेखित ठेवण्यांत स्टॅलिनचा सो. रशियांतील राजवट कायम ठेवण्यासाठीं तर्कशास्त्राचा आधार देण्याचाच हेतु होता असें म्हटलें जातें. विरोध विकासवादी मतप्रणालींतलि गतिशीलता व सर्व गोष्टी आणि सर्व संस्था (यांत राजकीय संस्थाहि आल्याच) यांत सतत होणाऱ्या परिवर्तनावर देण्यांत आलेला भर हीं स्टॅलिनला अवघड वाटलीं असावींत (Prof. A. Phillipes कित्ता). वरील भाष्य कितपत बरोबर आहे हें ठरविणें कठीण आहे. कारण स्टॅलिनचीं भाषा 'नकारात्मकतेची नकारात्मकता' या नियमाच्या विवेचनाशी समा-नार्थी वाटते. मात्र एवढें खरें कीं कोणतेहि राज्यकर्ते एकदां सत्तेवर आले म्हणजे त्यांना तेथें चिरकाल रहावें असें वाटतें. परंतु राजकीय घटना कितीहि निर्णायक वाटल्या तरी केवळ त्याच संपूर्णपणें निर्णायक ठरतात असें नाहीं. तत्वज्ञानविषयक आणि शास्त्रीय विचारसरणींचे ताण आणि तणावे यांनाहि महत्व असतें. राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय अभिमान यांनाहि तेथें स्थान दिसून येतें. कला आणि संगीत यांच्या संदर्भांत स्टॅलिनची वैयक्तिक मतेंच महत्त्वाचीं ठरलीं. तीं मतें पाश्चात्य देशां-तील कर्मठ आणि अतिसामान्य लोकांहून वेगळीं नव्हतीं. स्टॅलिननें

डबोरिनचा "फाजील आदर्शवादी" (Menshevizing Idealist) म्हणून धिक्कार केला याचें खरें कारण स्टॅलिनला डेबोरिनच्या भाषेचा उलगडाच झाला नाहीं हेंच होय. त्याचप्रमाणें स्टॅलिननें शोस्टाकोव्हिच आणि प्रोकोफिव्ह यांच्या संगीताचा धिक्कार केला. या सर्व गोष्टींचा त्याच्या राजकारणाशीं किवा राजकीय तत्वज्ञानाशीं काय बरे संबंध होता? तेथें सबंध होता केवळ स्टॅलिनच्या कर्णेंद्रियाचा. (आणि त्याच्या संगीतविषयक ज्ञानाचा किंवा अज्ञानाचा!) आणि मौज अशी कीं स्टॅलिनच्या मृत्यूनंतर विरोधविकासी नियमांत कांहीं एक सुधारणा न होता आणि साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या संगीतादि कलाविषयांतील निर्णायक अधिकारांत कांहीं एक बदल न होतांहि त्यांच्यावरील बंधनें दूर केलीं गेलीं. आणि हे सारे प्रकार विरोधविकासाला स्मरून करण्यांत येतात हें विरोधविकासवादी तत्वज्ञानाचें मोठें वैशिष्टच गणावें लागेल!

सो. रशियांतील शास्त्रज्ञांच्या माथीं विरोधविकासी भौतिकवाद मारण्यांत आलेला असला तरीहि त्याचें समर्थन शास्त्रज्ञांनीं मिळविलेल्या यशामुळें करतां येत नाहीं अशी वस्तुस्थिति आहे! सो. रशियांतील शास्त्रज्ञांकडून अपेक्षेप्रमाणें काम होत नाहीं म्हणून परवां परवांपर्यंत त्यांच्यावर शस्त्र धरण्यांत येत होतें. उलट झारकालीन शास्त्रज्ञांचा–जे विरोधविकासवादी तत्वज्ञानाचें पायिक नव्हते – उदोउदो करण्यांत येत आहे. झारकालीन पॉवलोव्हचें स्तोम अवास्तव वाढविण्यांत आलें असून मानसशास्त्र व शरीरशास्त्र यांत त्यानें केलेल्या कामाचा विस्तार सांप्रतचे सो. शास्त्रज्ञ करीत नाहींत म्हणून त्यांच्यावर कोरडे ओढण्यांत येत आहेत. ही घटना पुरेशी बोलकी नाहीं का? जे रशियन शास्त्रज्ञ विरोधविकासवादी नव्हते त्यांनीं आजच्या विरोधविकासी तत्वज्ञानानुसार कार्य करणाऱ्या सो. रशियन शास्त्रज्ञांपेक्षां अधिक यश कमवावें आणि सो. राज्यकर्त्यांना त्यांचा आदर्श आपल्या शास्त्रज्ञांपुढें ठेवावा लागावा हें कशाचें लक्षण? फार काय, विरोधविकासावर विश्वास न ठेवणाऱ्या पाश्चात्य देशांतील शास्त्रज्ञांच्या बरोबरीनें येण्यासाठीं सो. रशियांतील शास्त्रज्ञांना त्यांच्या राज्यकर्त्यांकडून वारंवार केलें आवाहन जातें हें कशाचें बरे निदर्शक आहे?

साम्यवादी याला ठराविक उत्तर देतात. सगळीकडील चांगले शास्त्रज्ञ जेव्हां यशस्वी होतात तेव्हां नकळत विरोधविकासी तत्वज्ञानानुसारच कार्य करतात हें त्यांचें आवडतें उत्तर आहे. हा त्यांचा सिद्धांत जर बरोबर असेल तर साहजिकच त्याचा एक उपसिद्धान्तहि बरोबर गणावा लागेल. तो उपसिद्धान्त असा कीं पॉव्हलाव्ह, लॉरेंझेस् वगैरे झारकालीन शास्त्रज्ञांच्या कार्यांत भर पडावी म्हणून आजच्या सो. रशियांतील शास्त्रज्ञांना विरोधविकासी तत्वज्ञानाच्या जाणिवेचा त्याग करण्यास मुभा द्यावी. कारण विरोधविकासाच्या जाणिवेनें कार्य करणाऱ्यांपेक्षां त्याच्या नेणिवेनें कार्य करणारे अधिक यशस्वी झालेले दिसतात!

—२—

सो. रशियाप्रणित विरोधविकासी भौतिकवादाचा खरेपणा पारखून पहाणें ही कांहीं कठीण किंवा गोंधळांत टाकणारी गोष्ट नाहीं. जेथपर्यंत तें तत्त्वज्ञान आकलनीय भाषेंत मांडलें जातें तेथपर्यंत तें तत्त्वज्ञान म्हणजे सामान्य आणि असंबद्ध शास्त्रीय विचार व असत्य आणि तर्कदुष्ट विधानें यांची विचित्र गोधडी आहे हें दृष्टीस पडतें. सर्व गोष्टी एकमेकांशीं विरोधविकासी नियमांनुसार संबंधित आहेत असें सांगणारें कोणतेंहि तत्त्वज्ञान कोणत्याहि शास्त्रीय संशोधनाला मार्गदर्शक ठरणार नाहीं हें उघड आहे. कारण कोणत्याहि एका शास्त्रीय सत्याशीं किंवा प्रयोगाशीं सर्वच गोष्टी संबंधित आहेत असें शास्त्र मानीत नाहीं. कांही गोष्टींचा त्याच्याशीं कांहीं एक संबंध नाहीं असा शास्त्राचा दावा असतो. ठराविक गोष्टींचे ठराविक गोष्टींशीं असलेले संबंध आणि आंतरिक नातीं शास्त्रज्ञ हुडकून काढीत असतो; प्रत्येक गोष्टीचा इतर प्रत्येक गोष्टीशीं संबंध आहे असें जो मानणार नाहीं त्याला कांहीं एक कार्यकारणभाव शोधून काढावयाचा किंवा प्रस्थापित करावयाचा असतो. म्हणून त्याला निरनिराळ्या गोष्टींचे एकमेकांशीं असलेले संबंध शोधावे लागतात. तो अशा संबंधांच्या शोधांत असतांनाच असे संबंध प्रस्थापित करण्यासाठीं त्याला चुकीच्या मार्गानें नेणाऱ्या एखाद्या तत्त्वज्ञानाची जरुरीच काय ? त्याचें प्रयत्नच मुळीं सत्यशोधनार्थ होत असतात !

विरोधविकासी भौतिकवाद एक तत्त्वज्ञान म्हणून शास्त्रीय संशोधनास मार्ग दाखवतें असें अजिबात म्हणता यावयाचें नाहीं. शास्त्रीय संशोधनाचें कारण अमुक एक आहे असें म्हणता येणार नाहीं. एखाद्या साहित्यिकाला तंबाखू किंवा उत्तेजक द्रव्यामुळें आपली प्रतिभा बहरते असें वाटतें त्याप्रमाणें एखाद्या शास्त्रज्ञालाहि एखाद्या समजुतींत आपल्या यशाचें बीज आहे असें वाटणें शक्य आहे. उदाहरणार्थ फेच्नर यांना वाटे कीं साऱ्या जगाचा मिळून एक आत्मा आहे तर केपलर यांची समजूत होती कीं, ग्रहांना आपल्या कक्षेंत फिरण्यास देवदूत मदत करतात! संशोधकांच्या आध्यात्मिक विचारांचा व शास्त्रीय संशोधनाचा परस्पर संबंध सिद्ध करणारा पुरावा जोंपर्यंत उपलब्ध होत नाहीं तोंपर्यंत एखाद्या शास्त्रज्ञानें स्वतःचा म्हणून सांगितलेला एखादा अनुभव हा त्याच्या जीवनांतला एक मजेदार किस्सा येवढीच त्याची किंमत होऊं शकेल. जे. बी. एस. हाल्डेननें केलेला दावा या संदर्भांत लक्षांत घेण्यासारखा आहे. त्यांचे म्हणणें असें कीं लेनिनचा 'साम्राज्यवाद' हा ग्रंथ वाचून त्यांचा आंतड्याच्या व्रणाचा विकार बरा झाला. हा त्यांचा दावा खरा मानला तरी त्या विशिष्ट रोगावरील उपचार म्हणून वैद्यक शास्त्रांत लेनिनच्या साम्राज्यवाद पुस्तकाच्या वाचनाचा अंतर्भाव करतां येईल का? याचा अर्थ असा नव्हे कीं शास्त्रज्ञाला त्याच्या एखाद्या वैयक्तिक समजुतीमुळें संशोधनाला मदत होणारच नाहीं; किंवा त्यानें तशी समजूत बाळगणें चूकच आहे. परंतु अशा वैयक्तिक समजुतीवरून एखादा सर्वंकष सिद्धांत तयार करणें किंवा तिला कायद्याचें अधिष्ठान प्राप्त करून देणें हें सांस्कृतिक रानटीपणाचेंच लक्षण आहे.

सो. रशियाच्या राज्यकर्त्यांनीं शास्त्रज्ञांवर विरोधविकासी मतप्रणाली लादण्याचें कारण काय? असा प्रश्न येथें साहजिकच निर्माण होतो. याचें सर्वांत महत्त्वाचें कारण रशियाच्या राज्यकर्त्यांच्या चुकीच्या पण दृढ अशा समजुतींत आहे. त्यांना असें वाटतें कीं विरोधविकासी भौतिकवादानुसार काढलेले निसर्गासंबंधींचे नियम सिद्ध होण्यानें साम्यवादी विचारसरणीच्या खरेपणास व तिच्या ध्येय धोरणास बळकटी येईल. या चुकीच्या समजुतीमुळें सृष्टिक्रम, त्याचप्रमाणें इतिहास ही दोन्ही आपल्याच बाजूचीं आहेत अशी त्यांची नितांत आत्मवंचना होते आणि अंतिम विजय हा अपरिहार्यपणें

साम्यवादाचाच होणार अशी त्यांची भावना बनते. या दृष्टीनें विरोधविकासी भौतिकवाद म्हणजे एक धर्मच म्हणावयास हरकत नाहीं.

१) विरोधविकासी नियमापासून काढलेले उपसिद्धान्त हे राजकीय व सामाजिक असतात. स्टॅलिनच्या लिखाणांतून हें अगदीं स्पष्ट होतें. "मंदगतीनें होणाऱ्या संख्यात्मक बदलांची गति वाढणें आणि त्यांतून अचानकपणें गुणात्मक बदल घडून येणें हा जर विकासाचा नियम असेल तर पिळलेल्या जनतेकडून क्रांति घडणें हें नैसर्गिक आणि अपरिहार्यच आहे हें स्पष्ट आहे." (स्टॅलिन op. cit. chap. 4, sec. 2) त्याचप्रमाणें वस्तुनिष्ठ विरोधाच्या प्रक्रियेंतून विकास होतो हा समज वर्गसंघर्ष आणि क्रांतिकारक हुकुमशाही या गोष्टी "नैसर्गिक व अपरिहार्य" आहेत या विचारांच्या मुळाशीं असतो.

आपण पाहिलेंच आहे कीं या संबंधाचें स्वरूपच तर्कदुष्ट आहे. एखादा नियम चुकीचा असेल; पण (उदाहरण स्वरूप किंवा अनुमान स्वरूप) प्रक्रिया बरोबर असूं शकेल. (अर्थात या ठिकाणीं ती सुद्धां चुकीचीच आहे) संख्यात्मक बदलामुळें गुणात्मक बदल घडून येतात हा सिद्धान्त प्रस्थापित करण्यापूर्वींच अनेक क्रांति घडून आल्या आहेत. नऊ महिने गर्भाची वाढ झाल्यावर तो मातेच्या उदरांतून एकदम बाहेर येतो. विरोध विकासाच्या तथाकथित नियमानें आपल्या ज्ञानांत यासंबंधी अधिक ती काय भर टाकली आहे ? "संख्यात्मक बदलांतून गुणात्मक बदलाचा" अर्थ निरनिराळ्या क्षेत्रांत निरनिराळ्या प्रकारें करण्यांत येत असतो. सर्व क्षेत्रांतल्या बदलांसंबंधी एकच एक असा सर्वसामान्य नियम प्रत्यक्षांत उपयोगी पडत नाहीं. चीडीमधून राग अनावरपणें प्रगट होतो, सुप्त ज्वालामुखीचा उद्रेक होतो, बाचाबाचींतून गुद्दागुद्दी सुरू होते, घन पदार्थाचें वायु अथवा द्रवांत रूपांतर होतें, माघारीमधून धुव्वा उडतो आणि असंतोषांतून क्रांति होते. या सर्वांचे स्थूल साधर्म्य दाखवून तर्कदुष्ट विधानें एखादा कवि करूं शकेल; कारण तशा विधानांना वैचारिकतेचा पाया नसतो. आणि अशीं विधानें करतांना कवि हेंहि जाणतो कीं नेहमींच चिरडींतून राग बाहेर पडत नाहीं; प्रत्येक घनपदार्थाचें रूपांतर वायूंत होत नाहीं वगैरे. जेव्हां आपण कोणत्याहि गोष्टीचा शास्त्रीय विचार करूं पाहतो तेव्हां तत्संबंधीच्या

दैनंदिन जीवनांतील अशास्त्रीय साधर्म्याच्या कल्पना झटकल्या पाहिजेत; त्याशिवाय आपण शास्त्रशुद्ध विचार करूं शकत नाहीं.

सामाजिक प्रक्रियांना व घटनांना विरोधविकासी नियम नैसर्गिक ठरवूं पहातात हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जणू त्या घडून आल्या हीच गोष्ट त्यांना नैसर्गिकतेचा दर्जा देऊं शकत नाहीं. परंतु अशा प्रक्रियांचा किंवा घटनांचा (उदा. क्रांति) अभावसुद्धां तेवढाच नैसर्गिक म्हणावा लागेल. विरोधविकासी नियमांतील असंबद्धपणा असा हा उघडा पडतो. वस्तुतः विज्ञानशास्त्रांत ज्या अर्थानें 'नैसर्गिक' हा शब्द वापरण्यांत येतो त्याच अर्थानें सामाजिक शास्त्रांत तो वापरता येत नाहीं. विज्ञानक्षेत्रांत जें कांहीं घडतें तें सारें नैसर्गिक असतें असें विरोधविकासी नियम म्हणतात. परंतु समाजांत जें कांहीं घडतें तें किंवा इतिहासांत जें घडून आलें तें सारेंच कांहीं 'नैसर्गिक' म्हटलें जात नाहीं. कारण कांहीं गोष्टी करणें हें 'नैसर्गिक' आहे आणि न करणें हें अनैसर्गिक आहे अशी विरोधविकासवादाची शिकवण असते. निसर्गाचें नियम उल्लंघितां येत नाहींत; परंतु इतिहास आणि समाजाचें नियम उल्लंघिता येतात. मग त्यांना नैसर्गिक म्हणावें कसें? विज्ञान आणि नीतिशास्त्र यांच्यामधील गल्लत ही केवळ विरोधविकासी भौतिकवाद्यांतच दिसून येते असें समजण्याचें कारण नाहीं. स्टोईक वगैरें पाश्चात्य विचारवंतांपासून तों 'चांगुलपणाचें स्वरूप' (Platonic forms of good) ठरविणाऱ्या आदर्शवादी विचारापर्यंत अशा प्रकारची गल्लत दिसून येते. परंतु आधुनिक शास्त्रांच्या उदयानंतर अशी सतत गल्लत करणारा 'विरोधविकासी भौतिकवाद' ही एक प्रमुख विचारसरणी होय. आपल्या सामाजिक विचारसरणीचा खरेपणा दाखविण्यासाठीं तींमधील तत्त्वें नैसर्गिक प्रक्रियांना लागूं होतात असें सिद्ध करण्याची धडपडहि अनेकांनीं केली आहे. केवळ विरोधविकासी भौतिकवाद्यांनींच तसें केलें आहे असें समजण्याचें कारण नाहीं. अणूमध्यें फिरणारा एखादा परमाणु (Electron) अचानक आपली कक्षा सोडून दुसऱ्या कक्षेंत जातो ही गोष्ट मानवी मनाच्या स्वातंत्र्याकांक्षेचा पुरावा म्हणून कांहीं पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं दिली आहे! परंतु विरोधविकासी भौतिकवादाचा आश्रय घेणारे त्यास मान्यता देत नाहींत;

उलट याच गोष्टीवरून साम्यवादी क्रांतीची अपरिहार्यता ते सिद्ध करूं पहातात. वैज्ञानिक प्रक्रिया आणि सामाजिक घटना यांना एकाच अर्थानें 'नैसर्गिक' समजण्याचाच हा परिणाम!

विज्ञानशास्त्रांतील सिद्धांतावरून सामाजिक सिद्धान्त काढून पहाण्याचें आतांपर्यंतचें प्रयत्न सफल झालेले नाहींत. पण तसा प्रयत्न करण्यांत कांहीं वावगे आहे असें नाहीं. वास्तविक सामाजिक सिद्धान्त स्वतंत्रपणें प्रस्थापित करणें शक्य आहे. त्यासाठीं वैज्ञानिक सिद्धान्ताच्या पुष्टीची आवश्यकता नाहीं. मग अशा सामाजिक सिद्धान्ताचें बीज वैज्ञानिक सिद्धांतांत कां असेना! शरीरशास्त्रांतील सिद्धांत हे स्वतंत्रपणें सिद्ध होऊं शकतात त्यासाठीं विज्ञान किंवा रसायन शास्त्रांतील सिद्धान्ताची पुष्टीच हवी असें नाहीं. आजच्या घटकेला जास्तीत जास्त एवढेंच म्हणतां येईल कीं विज्ञानांतील किंवा प्राणिशास्त्रांतील प्रस्थापित सिद्धान्तांना डावलूं शकणारी अशी समाजव्यवस्था निर्माण करतां येणार नाहीं. मात्र हें मान्य केलें तरी अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेसाठीं मानवी प्रयत्न होणारच नाहींत असें म्हणतां येणार नाही. कारण अशक्य तें शक्य करण्याचा प्रयत्न मानव वारंवार करतो—मग त्यास त्यांत भलेंहि अपयश येवो. विज्ञानाच्या मूळ सिद्धान्तास न डावलतांहि अनेक प्रकारच्या समाजव्यवस्था जर प्रचलित असूं शकतात तर मग विज्ञानाच्या सिद्धान्ताहून अधिक व्यापक असलेल्या विरोधविकासाच्या सिद्धान्तानुसार समाजव्यवस्थेचे कितीतरी अधिक प्रकार असणें शक्य आहे!

लोकशाही, भांडवलशाही, समाजवाद, फासिझम व साम्यवाद यांच्या समर्थनाचे मुद्दे हे कांहीं तात्त्विक, अध्यात्मिक किंवा विरोधविकासवादी सिद्धान्तांवर अवलंबून असत नाहींत. ही गोष्ट नीतितत्त्वांच्या आणि सामाजिक दंडकांच्या बाबतींतहि खरी आहे. ज्या तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून त्यांचें समर्थन करावयाचें त्यांत कांहीं विशिष्ट मूल्यें अनुस्यूत नसतील तर त्या तत्त्वज्ञानामुळें नीतितत्त्वांचें समर्थन होऊं शकणार नाहीं. इष्टानिष्टतेचा विचार नसेल तर सामाजिक दंडकांचें समर्थन करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें विज्ञानाच्या सिद्धान्तावरून समाजव्यवस्थेचा विचार निघूं शकणार नाहीं आणि तशा समाजव्यवस्थेकरितां केलेल्या प्रयत्नांना वैज्ञानिक

सिद्धान्तावरून पुष्टीहि मिळत नाहीं. परंतु विरोधविकासी भौतिकवादांत साम्यवादाच्या संघर्षाची आणि जागतिक अंतिम विजयाची अपरिहार्यता प्रमाणभूत मानली गेली आहे.

२) शास्त्रीय विधानांच्या बाबतींत दुरुस्ती शक्य असल्यामुळें आणि सर्व भाकितें सशर्त असल्यामुळें शास्त्रीय निकाल भविष्य-काळाची खात्री देऊ शकत नाहींत. म्हणूनच शास्त्रबाह्य व शास्त्रपूत मार्गास अग्राह्य असें 'सत्य' प्रस्थापित करण्यासाठीं विरोधविकासी मार्गाचा अवलंब करण्यांत आला आहे. मार्क्सवाद–लेनिनवादाचें राजकीय धोरण जितकें संकुचित तितकें त्याचे संधिसाधू डावपेंच आणि 'कधीं तरी' साम्यवादी ध्येय हस्तगत होईल यावरील अंधविश्वास अधिक. या अंधविश्वासाचा अेक मानसशास्त्रीय परिणाम असा होतो कीं समाज परिवर्तनाच्या इतर मार्गांकडे ते कानाडोळा करू शकतात. अशा मार्गांनीं इतिहासकालांत विशिष्ट उद्दिष्टें प्राप्त करून घेतली आहेत या गोष्टीकडे ते दुर्लक्ष करूं शकतात. दुसरा महत्त्वाचा परिणाम म्हणजे ते आपल्या उद्दिष्टांसाठीं द्याव्या लागणाऱ्या मानवी जीवाच्या मोलाकडे संपूर्ण दुर्लक्ष करूं शकतात. कारण त्यांच्या या अंधविश्वासामुळें महत्त्व प्राप्त होतें तें ऐतिहासिक परिवर्तनाच्या सिद्धान्तास. त्या सिद्धान्तानुसार 'आपोआप' घडून येणाऱ्या नैसर्गिक प्रक्रियेस किंवा मानवी जीवनास महत्त्व उरत नाहीं. मानवाच्या मर्यादा, त्याचें अज्ञान, त्याचा भित्रेपणा, त्याच्या पदरीं येणारीं अपयशें–या कशामुळेंहि साम्यवादी समाजरचनेसाठीं लागणाऱ्या शक्ति निर्माण होण्याचें थांबत नाहीं. सामाजिक विरोधविकासवादाला निसर्गांतील विरोध विकासवादाची जोड देणेंहि त्यांना आवश्यक वाटतें. कारण मानव हादेखील सृष्टीचा अेक भाग आहे. समुद्राची भरती आहोटी, भूकंप, हवामानांतील अतिरेकी शीतोष्णपणा यांच्यामुळें ऐतिहासिक परि-णाम घडून येतात; आणि केवळ ऐतिहासिक प्रक्रिया एखाद्या नैसर्गिक उद्रेकानें–अपघातानें मानवी जीवन सृष्टीवरून नष्ट करतील असें सांगू शकत नाहींत. सर्व चढउतार आणि दैवी आपत्ति या जमेस धरूनहि नैसर्गिक विकास हा स्टॅलिनच्या शब्दांत 'खालून वर' होत असतो आणि म्हणून जो विश्वास इतिहासांतून मिळूं शकत नाहीं तो विश्वास

विरोधविकासवादाच्या अशा विश्वात्मकतेमुळें, अपरिहार्यतेमुळें मिळतो आणि साम्यवादाचा पराभव होणार नाहीं असा दिलासा त्यांना लाभतो. मानवाचा पृथ्वीवर नष्टांश झाला तरी दुसरीकडे कुठेंतरी मानवी वंश विकास पावेल आणि आपल्या विहीत ध्येयाप्रत जाईल असें विरोधविकासी भौतिकवादी म्हणतात

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस उदित झालेल्या 'निसर्ग तत्त्वज्ञाना'चा हा राजकीय अविष्कार आहे असें अेखाद्यास वाटल्यास आश्चर्य नाहीं. हेगेलच्या List Der Vernult मधील 'साधना'चें कार्य येथें विरोधविकासवाद करतो. यंत्रशास्त्राबद्दल बोलतांना इंग्रज साम्यवादी प्रो. एच्. लेव्ही 'निसर्गाच्या फासिझम'ची चर्चा करतात तें अनवधानानें झालें असें नाहीं. (A Philosophy for Modern Man–P. 125) विरोधविकासवाद हा भविष्यकाळासंबंधी ग्वाही देतो असें विरोधविकासी भौतिकवादाचें पुरस्कर्ते नेहमींच उघडपणें सांगत असतात. म्हणूनच लाल सैन्याच्या पाठोपाठ हंगेरीला गेलेल्या एका रशियन साम्यवाद्यानें लिहिले आहे :

विरोधविकासी भौतिकवाद कामगार वर्गाला केवळ त्याच्या ऐतिहासिक कार्यांचेंच मार्गदर्शन करतो असें नाहीं तर तो कामगार वर्गाला विजयाची निश्चिति देत असतो. कांहीं अंशी खुद्द तीच **या विजयाची ग्वाही आहे.** (L. Rudes– " Dialectical Materialism and Communism–Labour Monthly Sept & Oct 1933)."

थोडक्यांत असें कीं, जो कोणी विरोधविकासी भौतिकवादाच्या दृष्टिकोनांतून विश्वाकडे योग्य रीतीनें पाहील त्याला खालील गोष्टी स्पष्ट दिसतील : (अ) जगांत निसर्गाची आणि मानवी समाजाची जी स्थिति आज दिसून येते त्याहून ती निराळी असूंच शकली नसती आणि साम्यवादाचा विजय अजून शक्य आहे. (ब) सृष्टीची रचनाच अशी आहे कीं विरोधविकासी पद्धतीनें शोधून काढलेल्या तिच्या आंतरिक संबंधांतच हा विजय तार्किक दृष्टया दिसून येतो ! हें निर्मितीचेंच वचन आहे. आपल्या कक्षेंत फिरतांना ग्रहगोल याच वचनाचा पुकार करीत आहेत; सागर तळाचाहि याला आधार आहे आणि मानवाला आपल्या क्षणभंगुर

आयुष्यांत याची प्रचीति येत आहे. या पृथ्वीवरील मनुष्यजात नष्ट झाली तरी ती दुसरीकडे कोठे तरी जन्माला येईल आणि ती याच दिशेनें आपल्या प्रगतीची वाटचाल करील– ज्या दिशेनें खुद्द निसर्गाचीही वाटचाल चालू आहे ! कधीं कधीं साम्यवाद लोप पावेल अशी कबुली दिलेली आढळते. परंतु ज्या नैसर्गिक प्रक्रियेमुळें हा लोप पावेल त्याच प्रक्रियेमुळें त्याचें पुनरागमन अपरिहार्य होईल असेंहि सांगण्यांत येतें.

**“ या विश्वांत एके ठिकाणीं जें नष्ट होतें तेंच दुसऱ्या ठिकाणीं उदित होतें. ”** एक सूर्यमालिका नाहींशीं होते पण दुसऱ्या तिची जागा घेतात. या पृथ्वीवरून जीवाचा नाश झाला तरी दुसरीकडे तो नव्यानें जन्म घेतो. या अर्थानें विरोधविकासी भौतिकवाद एका चिरंतन विकासाचें तत्त्व प्रतिपादत असतो. ज्याला अस्तित्व आहे त्याचा विकास होतो ! त्याचा विकास होतो कारण प्रत्येक गोष्टीची विरोधविकासी प्रगति हीच विकासाची प्रेरक शक्ति आहे. विनाश हा विशिष्ट बाबतींतच घडतो.

या सर्व गोष्टींवरून धर्म देऊं पहात असलेल्या समाधानाची आठवण आल्याशिवाय रहात नाहीं. संपूर्ण आदर्शवादी धर्मविचारांचा आविष्कार करतांना तार्किक अडचणी निर्माण होतात, त्याचप्रमाणें त्या विरोधविकासी भौतिकवादाच्या विचारांच्या मांडणींतही आढळून येतात. विरोध विकासाच्या प्रबंधाचें रूप पालटून त्याला त्याच्या नेमक्या विरोधी गोष्टीचें विपरीत स्वरूप यावें हेंच विरोधविकासाचें उत्तम उदाहरण म्हणावयास हरकत नाहीं ! धर्माला कडवा विरोध असणारा विरोधविकासी भौतिकवाद हा धर्माप्रमाणें भावनिक आवाहनावर आधारलेला आढळून येतो ! याचा जोरदार इन्कार रूडास व या वादाच्या इतर पुरस्कर्त्यांनीं केला आहे. पण तो इन्कार म्हणजे त्यांच्या विसंगत विचारांचा आणखी एक पैलूच म्हणावयास हरकत नाहीं. धर्म भावनेचें मूळ तत्त्व काय याचा त्यांना उलगडाच झालेला नाहीं असेंच दिसून येतें. केवळ “देव” किंवा “परमेश्वर” यांचा उल्लेख केला नाहीं किंवा विश्वाच्या रहाटीची प्रेरक शक्ति बाहेरून येत नाहीं तर ती विश्वरचनेतच स्वयंसिद्ध आहे असें म्हटल्यानें त्यांना वाटतें कीं आपण धर्मापासून सुदूर आहोंत ! परंतु वस्तुतः त्यांनीं धर्माच्या अलौकिकत्वाच्या जागीं लौकिकत्व आणलें येवढेंच. कारण धर्म भावनेचें

मर्म ‘ देव ’ किंवा ‘ परमेश्वर ’ वगैरे शब्दांत नसून ते एका विशिष्ट श्रद्धेंत आहे. ती श्रद्धा अशी कीं हें विश्व मानवाशीं व त्याच्या आकांक्षाशीं सहानुभूति बाळगणारे आहे; निसर्गाचा क्रमच असा आहे कीं त्यामुळें मानवाचें उच्चतम ध्येय साध्य होण्यास मदत होते (मग तें ध्येय म्हणजे साम्यवादाची प्रस्थापना का असेना) हें मानल्याखेरीज निसर्गाच्या प्रक्रियांचा उलगडाच होत नाहीं. आणि तात्पुरती पिछेहाट झाली किंवा अपयश आलें तरी अंती मानवाच्या सर्वश्रेष्ठ ध्येयाचा ( उदा. वर्गविहीन समाजरचना ) विजयच होतो. कारण निसर्ग आणि समाज यांच्या प्रक्रियाच तशा आहेत ! आपल्या अनुयायांत ही श्रद्धा निर्माण करणें हेंच मुळीं पोथीबद्द विरोधविकासी भौतिकवादाचें कार्य. हें धर्मभावनेच्या कार्यापेक्षां कितीसें वेगळें आहे ?

अध्यात्माची किंवा धर्मभावनेची भूक भागावी म्हणून विरोधविकासी भौतिकवादाचा अवतार झाला आहे किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. परंतु हें खात्रीपूर्वक सांगतां येतें कीं यशाच्या निश्चितीसाठीं केलेला तो शोध आहे; विल्यम जेम्स ज्याला “ अभयदानाची भावना ” ( Sumphuosity of Security ) म्हणत असे व जी कोणतेंहि शास्त्र देऊं शकत नाहीं तिच्यासाठीं केलेला तो शोध आहे ! आणि या श्रद्धेला तडे जातील अशा शास्त्रीय किंवा तात्त्विक विचारांवर साहजिकच त्यांचा दांत असतो. कारण ही श्रद्धाच मुळी त्यांना स्फूर्ति देणारी आणि समाधान करणारी असते. रसायन शास्त्रांतल्या प्रतिध्वनि विचारप्रणालीसारख्या–ज्यांचा राजकारणाशीं कांहीं एक संबंध नसतो–विचारप्रणालींना विरोध होतो तो याच भीतीमुळें. तत्त्ववेत्त्यांना किंव शास्त्रज्ञांना आपलें संशोधन आणि सत्यान्वेषण करावयाचें संपूर्ण स्वातंत्र्य दिलें तर त्यांच्या संशोधनांतून या श्रद्धेला तडे जाण्याची भीति आहे म्हणूनच त्यांना असें स्वातंत्र्य मिळत नाहीं !

विरोधविकासी भौतिकवादाचें नावीन्य त्यांत सांगितलेल्या तात्त्विक सत्य आणि विरोधविकासी सत्य या दोन सत्याच्या विचारसरणींत नाहीं तर संरक्षणाच्या अभयाच्या हेतूनें कला आणि शास्त्र यांवर त्यानें कोणत्या मर्यादेपर्यंत बंधनें लादलीं आहेत यांत त्याचें वैशिष्टच आहे. त्यांच्या राजकीय कार्यक्रमाचें– ज्यामुळें लाखों लोकांना संशयास्पद भवितव्यासाठीं

कल्पनातीत त्याग करावा लागतो व इतकें करूनहि भविष्यकाळ भूतकाळांहून फार चांगला असेलच असें सांगतां येत नाहीं–समर्थन करूं शकत नसल्यामुळें त्यांना गूढ तत्त्वज्ञानाचा आश्रय घेणें भाग पडते. तें गूढ उलगडण्याची किल्ली फक्त सोव्हिएट राज्यकर्त्यांपाशींच असतें ! "प्लेखेनॉव्ह आणि बुखारिनसुद्धां विरोधविकासी भौतिकवादाचें निरपवाद असें निरूपण करूं शकले नाहींत. कारण त्यांना निरपवाद असें राजकीय धोरणच नव्हतें". असें पक्षाच्या तत्त्वज्ञान्यानें नमूद केलें आहे. ( L. Rudas : The American Communist P. 348. ) आणि रशियांतील राजकारणांत निरपवाद धोरण कुणाचें असू शकतें ? अर्थात् ज्याच्या हातीं संरक्षक दलाची शेंडी असते त्याचेंच ! लोकशाहीवादी राष्ट्रांतील शास्त्रज्ञांत कितीहि मतभेद असले तरी एक गोष्ट सर्वांनाच मान्य करावी लागेल. ती म्हणजे सो. रशियाच्या वाढत्या सत्तेमुळें व सांचेबंद तात्त्विक विचारांच्या प्रसारामुळें त्यांच्या शास्त्रज्ञ म्हणून काम करण्याच्या स्वातंत्र्यावर वाढता धोका येऊं लागला आहे. कोणत्याहि मतप्रणालीचे अनुयायी असले तरी तत्त्वज्ञान्यांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांत राजकीय हुकूमनाम्यापुढें मान तुकवावी लागेल. तत्त्वज्ञान हा पोलीस खात्याच्या अखत्यारींतील प्रश्न बनेल. हें कांहीं कल्पनेच्या भरारीनें केलेलें वर्णन नाहीं. सो. रशियांत तत्त्वज्ञानाच्या नशिबीं सांप्रत जें आलें आहे त्याचें हें एका वाक्यांत रेखाटलेलें वास्तव चित्र आहे.

● ● ●

# राजकीय भ्रमनिरास झालेल्यांचें वाङ्मय

जॉर्ज संतायना यांनीं 'Dialogues in Limbo' हें पुस्तक लिहिलें आहे. त्या पुस्तकाची तुलना प्लेटोच्या 'Dialogues'शीं करण्यांत येते. त्यांत संतायना यांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं अवास्तवावरील विश्वास व अशक्यतेचा ध्यास म्हणजेच वेड होय. या प्रकाराचें वेड हें नैसर्गिक असून त्यांत कोणत्याहि प्रकारची विकृति नाहीं असेंहि ते म्हणतात. हें वेड दुसऱ्या वेडांहून भिन्न आहे. तें नैसर्गिक असलें तरी विकृतींतून जन्मलेलें असतें व न्यायालयासमोर शिक्षेलाहि पात्र होतें. संतायनांची भाषा वैशिष्टयपूर्ण आहे. तींतून लोकशाही भौतिकवादाच्या तत्त्वप्रतिपादनाचा उत्साह ओसंडतो. ते म्हणतात कीं पहिल्या प्रकारचें वेड ही प्रकृति आहे आणि तें जिवंतपणाचें लक्षण आहे. जिवंत असणें म्हणजेच कल्पितावर विश्वास ठेवणें, त्याचा ध्यास घेणें आणि त्यासाठीं प्रयत्नशील रहाणें होय. अशा वेडाशिवाय रहाणें म्हणजे मेल्यासारखें जगणें असें ते म्हणतात.

समतोल विचारांच्या मानसशास्त्रज्ञांच्या दृष्टीनेंहि मानवी जीवनाचें स्वरूप 'ध्येयाच्या शोधार्थ धडपणारें' असें आहे. इतर प्राण्यांच्या जीवनांत आणि मानवी जीवनांत हा मोठा फरक आहे. इतर प्राणीहि विशिष्ट हेतूंनीं धडपड करीत असतील; पण मानवालाच आपल्या धडपडीमागील हेतूंची जाणीव असते. आपण प्रयत्नशील कां आहोंत याचें आपणांस ज्ञान असतें. मानवेतर प्राण्यांत आदर्शाचा अभाव असणें जेवढें नैसर्गिक तेवढेंच मानवांना आदर्श असणें स्वाभाविक होय.

प्रत्येक व्यक्ति आपल्या जीवनास सुरुवात करते ती दुसऱ्यांपुढील आदर्श स्वतः स्वीकारून. प्रथम ही गोष्ट संवयीनें होते आणि नंतर ती वैचारिक विश्वासामुळें होऊं लागते. समाजांत रहायचें याचा अर्थच मुळीं असा आहे. बौद्धिक विकास व परिपक्वपणा हा आदर्शांचा त्याग करण्यांत नसतो,

तर आदर्श संपूर्णपणें जाणण्यांत, त्यांत पूरक गोष्टींची भर घालण्यांत आणि वेळप्रसंगीं त्याच्या जागीं पर्यायी आणि घडून येणाऱ्या बदलांत स्थिर राहील अशा नव्या आदर्शाची स्थापना करणें यांत असतो.

अशा प्रकारच्या प्रभावी आदर्शावरूनच एखाद्या समाजाच्या मूलभूत निष्ठा ठरत असतात. आजच्या युगांतील अराजक (Crisis) म्हणून ज्याचें वर्णन करण्यांत येतें तें अराजक प्रामुख्यानें मूलभूत निष्ठांच्या बाबतींतील नसून धर्मनिष्ठेच्या वळणावर गेलेल्या राजकीय निष्ठांच्या बाबतींतील आहे. धर्माचा विचार पोथीबंदपणें न करतां धर्म म्हणजे श्रेयसाचा विचार असें मानलें म्हणजे आजचे मोठे धर्म हे राजकीयच आहेत याबद्दल कुणी दुमत दर्शविणार नाहीं. परंपरागत धार्मिक विचारांपेक्षां राजकीय धर्मच श्रद्धा आणि निष्ठा कितीतरी अधिक प्रमाणांत ठरवीत असतात. व्यक्तीच्या धर्मावरून त्याच्याबद्दल फारशी माहिती मिळावयाची नाहीं; परंतु त्याच्या राजकीय धर्मावरून–साम्यवाद, फासिझम, निरनिराळ्या विशेषणांनीं युक्त अशी लोकशाही यावरून– याच्या विचारांबद्दल माहिती मिळूं शकते.

राजकीय उद्दिष्टांतील संघर्षांत कलावंत आणि लेखक–कवि गोवले जातात हें नैसर्गिकच म्हणावें लागेल. आधुनिक काळांत राजकारणानें जीवनाचीं सर्व अंगें व्यापलीं आहेत. सर्व मानवी अनुभवांतून तें आकारत असतें आणि त्यांना आकारहि देऊं पहातें. हें मानवी अनुभवविश्व हाच कलेचा आणि साहित्याचा विषय असतो. त्यामुळें राजकीय उद्दिष्टांच्या संघर्षांत लेखक–कवि गोवले जातात हें साहजिकच होय.

साहित्यांत सांप्रत दिसून येणाऱ्या राजकीय उद्दिष्टांच्या संघर्षांमागे मोठा इतिहास आहे. परंतु तो प्रकर्षत्वानें आणि नाटचपूर्ण रीतीनें पुढें आला तो रशियाच्या ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीनें आणि रशियांतील सोव्हिएटच्या स्थापनेनें. इंग्लिश कवि डल्ब्यू. एच्. ऑडेन हा वर्डस्वर्थच्या काळाशीं आपल्या काळाची तुलना करतांना म्हणतो :

आमचें स्वातंत्र्य अजून फार दूर आहे
कारण त्यापासून जेवढें दूर रोम
तेवढेंच दूर पॅरिस
आणि हन्त ! तेवढेंच दूर मॉस्कोहि

अर्थात् फ्रेंच राज्यक्रांति आणि रशियन राज्यक्रांति यांत आणि त्यानंतर घडून आलेल्या घटनांत महदंतर आहे. ऑडेनदेखील रशियाला कामगारांच्या राजवटीचा देश म्हणणार नाहीं. मात्र रशियन क्रांतीनें तत्त्वज्ञानापासून कलेपर्यंतच्या विविध क्षेत्रांत जेवढ्या प्रमाणांत प्रतिसाद उठले तेवढे इतिहासांत अन्य कोणत्याहि घटनेनें उठले नाहींत ही गोष्ट निर्विवादच आहे. रशियन राज्यक्रांतीनें झालेल्या प्रतिक्रियांची बरोबरी बॅस्टिलच्या पाडावानंतरच्या प्रतिक्रियांशींच होऊं शकेल.

फ्रेंच राज्यक्रांतीमुळें उठलेले सांस्कृतिक पडसाद आणि रशियन राज्यक्रांतीमुळें सांस्कृतिक जगांत उठलेले पडसाद यांत एक महत्त्वाचा फरक आहे : रशियन राज्यक्रांतीनंतर उठलेल्या पडसादांना संकुचित राजकीय स्वरूप आलें. फ्रेंच राज्यक्रांतीमुळें ज्या प्रतिक्रिया घडून आल्या त्या उत्स्फूर्त होत्या. त्या कमी अधिक प्रमाणांत दोषदर्शी होत्या. परंतु त्या पा ीमागें सहानुभूति होती आणि मुख्य म्हणजे त्यांचा पुढील काळांत झालेला विकास हा स्वतंत्र होता. परंतु रशियन क्रांतीच्या प्रतिक्रियांना कांहीं वर्षांनींच 'संघटित' करण्याचा प्रयत्न झाला; निरनिराळ्या प्रकारांनीं त्यांना साचेबंद करण्यांत आले आणि अखेर पद्धतशीरपणें रशियन राज्यक्रांतीच्या संपूर्ण स्वीकाराचें स्वरूप त्यांना देण्यांत आलें.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर स्थापन झालेली फ्रेंच 'असेंब्ली', 'कन्व्हेन्शन', 'डायरेक्टोरेट' किंवा 'साम्राज्यसत्ता' यांनीं राज्यक्रांतीपासून झालेल्या फायद्यांचा लाभ उठवला असें इतिहासकार मानतात. पण त्यांपैकीं कुणीहि परदेशांत राजकीय पक्षांची स्थापना करण्यासाठीं आंतरराष्ट्रीय संघटना उभारली नाहीं किंवा विशिष्ट दृष्टिकोनांतून परदेशांतील सांस्कृतिक चळवळी संघटित केल्या नाहींत. परंतु सोव्हिएट राजवटीनें 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल'तर्फे परदेशांत आपल्या नियंत्रणाखालीं राजकीय पक्ष संघटित केले. ऑक्टोबर क्रांतीनें भारावलेल्या बुद्धिवाद्यांच्या कानीं त्यांच्या मनांतील पडसाद वारंवार पडतील अशा यंत्रणा त्या त्या देशांतील पक्षाच्या अनुयायांनीं निर्माण केल्या. परिणामतः सोव्हिएट राजवटीच्या प्रेरणेनें निर्माण झालेले राजकीय पक्ष व सहानुभूतीदार बुद्धिवादी यामध्यें दृढ संबंध निर्माण झाले. यामुळेंच लेखक संघ, कलावंतांच्या संघटना, शास्त्रज्ञांच्या

समित्या बहुतेक सर्व देशांतून निर्माण झाल्या. त्यामुळें साहजिकच ठिकठिकाणीं कलावंत व बुद्धिवाद्यांचें जथे राजकीय हेतूंनीं संघटित झाले. सोव्हिएट राजवटीनें केलेल्या या कार्यास इतिहासांत तुलना नाहीं.

ऑक्टोबर क्रांतीनें निर्माण झालेल्या भावनात्मक उधाणाचा फायदा राजकीय हेतूंनीं फार मोठ्या प्रमाणांत घेण्यांत आला. पण त्या उधाणाचें स्वरूप अेकच अेक नव्हतें. बऱ्याच ठिकाणीं त्यांत प्रामाणिक धर्मांतराचा उत्साह होता. त्याला वेळप्रसंगीं विरोध झाला, खूप विरोध झाला; पण त्यामुळें त्याची वाढच झाली. त्यांतूनच सोव्हिएट रशियाच्या राजवटीची, त्याच्या तत्त्वज्ञानाची आणि त्याच्या कार्यक्रमाची तरफदारी करणाऱ्या वाङमयाची प्रचंड निष्पत्ति झाली. या वाङमयाचा प्रचंडपणा वजा केला तर त्या वाङमयाचा खास असा वेगळेपणा दिसून येत नाहीं. फ्रेंच राज्य-क्रांतीनंतर, अमेरिकन राज्यक्रांतीनन्तर किंवा इटली व जर्मनीमधील राष्ट्रीय उठावणीनन्तर एकोणीसाव्या शतकांत त्यांना सहानुभूति दर्शविणारे किंवा त्यामुळें भारलेलें आणि त्याचा प्रामाणिक अन्वयार्थ लावूं पहाणारें वाङमयहि मोठ्या प्रमाणांत निर्माण झालें होतें. वाङमयाची निष्पत्ति हा कांहीं रशियन राज्यक्रांतीचा आगळेपणा नाहीं. परन्तु वाङमयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रांत रशियन राज्यक्रांतीमुळें घडलेल्या प्रतिक्रियेचें ऐतिहासिक वैशिष्टय माझ्या मतें वेगळें आहे. तें म्हणजे साम्यवादी तत्त्वज्ञान कवटाळ-लेल्यांनीं भ्रमनिरास झाल्यावर केलेली वाङमयनिर्मिति हें होय. आतां ऑडेनबरोबरच तेही म्हणतात :

स्वातंत्र्य फार दूर आहे
फार दूर आहे

तेथून दूर रोम जितुकें
मॉस्कोहि दूर तितुकें
तितुकेंच दूर पॅरिसहि !

कदाचित् भ्रमनिरास झालेल्यांपैकीं कांहीं म्हणतील कीं स्वातंत्र्यापासून मॉस्कोच सर्वांत अधिक दूर आहे.

—१—

समकालीन वाङ्मयाच्या संदर्भांत विचार करतां साम्यवादाबद्दल भ्रमनिरास झाल्यावर लेखकांनीं जें साहित्य निर्माण केलें आहे त्यास जीवनाचें चित्रण करणारें साहित्य म्हणून खास स्थान द्यावें लागेल. ज्या पाश्चात्य मूल्यांकडे दुर्लक्ष करण्यांत आलें होतें त्यांचा आढळ व त्या मूल्यांसाठीं सर्वसमर्पण करण्याची भावना यांचा आढळ सर्व देशांतील या लेखकवर्गाच्या लेखनांतून होतो. भ्रमनिरास झाल्यानंतर अशा प्रकारचें लिखाण करणारांत इंग्लिश लेखकांपैकीं रसेल, ऑडेन, स्पेंडर आणि ऑर्वेल; फ्रान्समधील आंद्रे गाअिड, हिजमय; बेल्जियममधील सर्ज (Serge); इटालियन लेखक अिग्नेझिओ सिलोने (Ignazio Silone), ग्रीसमधील इस्त्राटी; मध्य युरोपचे ऑर्थर कोएस्लर; बाल्कन लेखक अॅण्टन सिलिगा, अमेरिकेचे ईस्टमन डॉस पॅसॉस, विल्सन, हिक्स्, फॅरेल वगैरे लेखक अग्रगण्य आहेत.

अशा प्रकारच्या लेखकांचें वाङ्मय आणि साम्यवादी पक्षाचा त्याग केलेल्या कार्यकर्त्यांचीं निवेदनें यांत फार फरक आहे. साम्यवादी पक्षाचा त्याग करणारांचीं कारणें अनेक प्रकारचीं असतात. कांहीं त्या तत्त्वज्ञानाविरुद्ध बंड करून बाहेर पडतात, धमकावणीला भिऊन कुणी पक्षत्याग करतात तर कुणी कट, हेरगिरी आणि अितर पक्षांत शिरून ते पोखरण्याच्या तंत्रानुसार पक्षाचा त्याग करतात. अशांचा खास विचार मागाहून करण्यांत येईल. येथें ‘धंदेवाईक क्रांतिकारकां’चा विचार करावयाचा नाहीं; तर संघटनेपेक्षां तत्त्वज्ञानाचें ज्यांना आकर्षण अधिक असतें आणि ज्यांचा प्रभाव राजकीय कार्यकर्त्यांपेक्षां कांहींवेळां अधिक पडतो अशा बुद्धिजीवींचा विचार करावयाचा आहे.

वर्डस्वर्थ किंवा डोस्टोव्हस्की ((Dostoevsk) यांच्यामध्यें सुरुवातीला क्रांतिवाद होता. परंतु पुढें उसळणारा क्रांतिवाद संपुष्टांत येऊन ते आपल्या सुरुवातीच्या मतप्रणालीच्या संपूर्ण विरोधी टोंकास जाऊन बसलेले आढळतात. परंतु या लेखकांमध्यें—त्यांच्यांतील बहुसंख्यांकांत तरी— अशी वृत्ति दिसून येत नाहीं हा लक्षांत ठेवण्यासारखा फरक आहे. त्यांच्या वाङ्मयांत वर्डस्वर्थच्या Ecclesiastical Sketches, किंवा Devotional Incitements

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि. ........
क्रमांक ........ नों: दि: १९......

यांत व्यक्त केलेल्या भावनांचा आढळ होत नाहीं. त्यांच्या वाङ्मयानें डोस्टॉव्हस्कीच्या Grand Inquisitor या (कडू) कहाणीनें गांठलेली उंची गांठली नसेल, पण त्याचबरोबर हेंहि खरें कीं मानवी जीवनांत गूढवादाला, चमत्काराला डोस्टॉव्हस्कीनें दिलेलें मध्यवर्ती स्थान ते देत नाहींत.

संवेदनाक्षम आणि उदार मनाचे हे बुद्धिजीवी इतक्या संख्येनें साम्यवादाकडे कां आकर्षित झाले? कितीहि त्याग करावा लागला तरी देखील ते त्याचा पुरस्कार करीत राहिले त्यामागील कारणें कोणतीं? त्याचें उत्तर बेन्थाम देतात त्याप्रमाणें देतां येत नाहीं; किंवा मार्क्सच्या पोथीबंद आर्थिक कारण परंपरा पुढें करूनहि तें देतां येत नाहीं. त्यामागें बरीच गुंतागुंतीची कारण परंपरा आहे. परंपरागत करुणा आणि निष्ठा यांजवर त्यांचा पिंड पोसलेला. त्याचा त्याग त्यांनीं स्वार्थ बुद्धीनें, भीतिगंडानें किंवा दिखाऊपणास बळी पडून केलेला नाहीं. त्याचप्रमाणें अशांपैकीं कोणत्याहि कारणानें ते साम्यवादापासून दूर सरले नाहींत. सोव्हिएट राजवटीच्या सुरुवातीच्या काळांतील अधिकृत निवेदनें आणि तेथील कायद्यांचीं वर्णनें रेडिओवरून ऐकून समानता आणि मानवतेची मुक्ती या कल्पनेनें ते जसे भारून गेले होते त्याचप्रमाणें युद्धोत्तर कालांतील युरोपचें भीषण स्वरूप पाहून, निराश अवस्थेंत होणारी तेथील पडझड आणि संकटपरंपरा पाहून त्यांच्या मनानें पलट खाल्ली. सुरवातीचा त्यांचा उत्साह आणि नंतरचा दारूण भ्रमनिरास या दोहोंचीं पाळेंमुळें संवेदनाक्षम नैतिकतेंत रुजलीं होतीं. ही नैतिकता पाश्चात्य परंपरेनें निर्माण केलेल्या धाग्यांनीं विणलेली होती. साम्यवादाचा स्वीकार करतांना आपण कांहींतरी परकीय तत्त्वज्ञानाचा स्वीकार करीत आहोंत असें नवउत्साहानें भारलेल्या वेळीं त्यांना वाटलें नाहीं. तें तत्त्वज्ञान सर्वस्वी वेगळ्या परिभाषेंत लिहिलें होतें, तरीहि तें आपल्या उच्च परंपरेशी विसंगत आहे असें त्या वेळीं त्यांना वाटलें नाहीं ही गोष्ट फार महत्वाची आहे. साम्यवादाकडे आकर्षिलेल्या एका इंग्लिश लेखिकेचे शब्द हे थोड्याफार फरकानें सर्वांच्याच बाबतींत खरे आहेत. ती म्हणते :

"मी साम्यवादापाशीं आलें तें ग्रीक इतिहास, फ्रेंच राज्यक्रांतीचें वाङ्मय यांचा माझ्यावर बालपणीं परिणाम झाला त्यामुळें. एकोणिसाव्या शतकांतील इंग्रज कवींच्या स्वातंत्र्याच्या उद्घोषांचा परिणामहि झाला होता

..माझ्या दृष्टीनें परिक्लसचें अंत्ययात्रेच्या वेळचें सुप्रसिद्ध भाषण, शेली आणि स्विण्डबर्नच्या कविता आणि मार्क्स-अँजेल्स यांचें लिखाण हें सारें पिळवणुकीपासून मानवांच्या मुक्तीसाठीं चाललेल्या प्रयत्नांचा सारख्याच महत्त्वाचा भाग आहे. (Freda Uttey Lost Illusion page 2;43)

स्टीफन स्पेंडर हे दुसरे. इंग्रज कवि. तेंहि साम्यवादी तत्त्वज्ञानानें सुरुवातीला भारले होते. त्यांनाहि वाटे कीं गेल्या शतकांत होऊन गेलेल्या ब्लेक, गॉडविन, मिल या उदारमतवादी आदर्शवाद्यांच्या विचारसरणींत व या शतकांतल्या लेनिन-स्टॅलिन-ट्रॉट्स्की यांच्या साम्यवादी विचारसरणींत सलगता आहे ! ते लिहितात :

"मी साम्यवादी आहे कारण मी उदारमतवादी आहे. जीवनांत जे निस्वार्थी असतात त्यांची विचारसरणी म्हणजे उदारमतवाद. निस्वार्थीपणा म्हणजे मानवी जीवनाविषयीं उदासीनता नव्हे; तर वस्तुनिष्ठ सत्याबद्दल आदर ठेवून राजकीय न्यायासाठीं क्रियाशील रहाणें म्हणजे निःस्वार्थीपणा होय. शांततेच्या आणि प्रगतीच्या काळांत उदारमतवाद हा केवळ राजकीय चर्चेपुरताच मर्यादित रहात नाहीं तर शास्त्रीय संशोधन, काल्पनिक विचार व कलानिर्मिति यांतहि तो दिसून येतो."

येथें मौज अशी आहे कीं स्पेंडर हे निःस्वार्थीपणा, वस्तुनिष्ठ सत्य, न्याय, राजकीय चर्चेचें आणि चौकशीचें स्वातंत्र्य आणि कलेची प्रतिष्ठा या मूल्यांमुळें साम्यवादी झालें-आणि नेमक्या याच मूल्यांचा विरोधविकासी भौतिकवादी विचारवंतांनीं सोव्हिएट राजवटीच्या सुरुवातीपासून धिक्कार केला होता. कां तर हीं मूल्यें म्हणजे भांडवलशाहीनें उभीं केलेलीं थोतांडें आहेत. स्पेंडर साम्यवादी विचारसरणीपासून आतां दूर गेले आहेत, पण त्यांना उदारमतवादाला तिलांजलि नाहीं द्यावी लागली.

बुद्धिवादाचा आणि मानवतावादाचा वर दिसून येणारा प्रभाव पहा आणि ज्यांनीं नंतर नाझी राजवट सोडली अशा राउशिंग (Rausching), स्ट्रासर (Strasser) आणि थायसेन (Thysen) अशा जर्मन राष्ट्रीय-समाजवाद्यांच्या अशा कबुलीजबाबांशीं त्याची तुलना करा. नाझी राजवटीतल्या व विचारसरणीतल्या कोणत्या गोष्टींनीं त्यांचीं मनें, भावना व इच्छा भारावून गेल्या होत्या? त्याचीं उत्तरें देतांना "राष्ट्रीय जागृति", "शिस्त आणि

90289

सुव्यवस्था ", " सामर्थ्य आणि यश यांचें प्रचंड प्रदर्शन " त्यांच्या नव्या वेगामुळें आणि वाढत्या लयीमुळें लोक ' रोजच्या रटाळ जीवनांतून ' केवळ उचलले गेले वगैरे गोष्टींचा ते उल्लेख करतात. त्यांच्या ऐहिक व धार्मिक परंपरेशीं अनुरूप अशा आदर्शांमुळें या व्यक्ति किंवा त्यांचे अनुयायी या आंदोलनांत ओढले गेले असें झालें नाहीं. ते ओढले गेले सत्तेच्या जोरदार गतिशक्तीमुळें. अंतर्गत क्रांतीचा किंवा संस्थांच्या स्वरुपांत मूलभूत बदल घडवून आणण्याचा येथें सवालच नव्हता.

कोणत्याहि तत्त्वामुळें—चुकीच्या तत्त्वामुळेंहि— ते या आंदोलनांत गेले नाहींत तर राष्ट्रीय उन्माद व हिटलरच्या व्यक्तिमत्वाभोंवतीं तयार केलेलें गूढतेचें वलय या गोष्टींनीं ते या आंदोलनांत सामील झाले. " मी त्याच्या डोळयांत पाहिलें आणि त्यानें माझ्या डोळयांत पाहिलें.आणि मग मला त्या महान् अनुभवांशीं एकरूप व्हावें असें वाटलें " असे उद्‌गार एखाद्या उन्मनस्क स्त्रीनें काढले नाहींत तर एका वरिष्ठ न्यायाधिशानें आपल्या सहकाऱ्यांशीं हे उद्‌गार काढले" असें राउशिंगनें सांगितलें आहे.

नाझीवादाचें खरें स्वरूप दिसून आल्यावर ज्यांचा भ्रमनिरास झाला अशा लेखक–कवींनीं नंतर केलेल्या लिखाणांत आणि एके काळच्या भ्रांत साम्यवाद्यांनीं साम्यवादाविषयीं भ्रमनिरास झाल्यानंतर केलेल्या लिखाणांत फरक आहे हें मुद्दाम सांगण्याचें कारण नाझीवाद आणि हिदंतर सांपडतें. नाझीवादापासून त्यांनीं फारकत कां घेतली हें येथें पहावयास हवें. राउशिंगसारख्या लेखकाला नाझी राजवटींतले अत्याचार सहन झाले नाहींत. सुरुवातीला हे अत्याचार तात्पुरतेच ठरतील अशी त्याची कल्पना होती. पण पुढें अत्याचारांचा नित्य खुराक त्याच्या प्रकृतीला मानवला नाहीं. थायसेन (Thyssen) सारख्या लेखकाला नाझीवादाला रामराम ठोकावा लागला त्याचें कारण त्याचे खाजगी हितसंबंध संकटांत आले. स्ट्रासेर (Strasser) सारख्या लेखकाच्या महत्वाकांक्षा फलद्रुप झाल्या नाहींत म्हणून ते नाझीवादापासून दूर गेले.

साम्यवादाविषयीं भ्रमनिरास झालेल्यांचें साहित्य आणि नाझीवादासंबंधीं डोळे उघडल्यानंतर कांहीं जर्मन लेखकांनीं केलेली साहित्यनिर्मिति यांत फरक आहे. हें मुद्दाम सांगण्याचें कारण नाझीवाद आणि साम्यवाद यांचें समीकरण मांडणें चुकीचें आहे हें लक्षांत यावें. लोकशाही

स्वातंत्र्याचीं मूल्यें ठोकरण्यांत नाझीवाद आणि साम्यवाद यांत साधर्म्य जरूर आढळतें. परंतु पाश्चात्यांच्या उदारमतवादी मूल्यांना भुरळ घालण्याच्या दोघांच्या सामर्थ्यांत कमालीचा फरक आहे. टॉयन्बीना वाटतें कीं रशियन साम्यवादाचें मूळ ख्रिस्ती विचारसरणींत आहे. साम्यवादी विचारसरणींत पाश्चात्य संस्कृतींतील वर्गीकरणाचा मोठा आकर्षक उपयोग केला आहे म्हणून टॉयन्बींना तसें वाटतें. पण त्याच्याशीं सहमत होण्याचें कारण नाहीं. कारण पाश्चात्य संस्कृतींतील अनेक गोष्टींचा वापर त्याच गोष्टी नष्ट करण्यासाठींच साम्यवादांत केलेला आढळतों. हीच गोष्ट ख्रिस्ती धर्माच्या सुरुवातीच्या काळांत पहावयास सांपडते. जेथील राज्यकर्त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला अशा प्रजेचें मन वळविणें सोपें जावें म्हणून मूर्तिपूजा विरोधी असलेल्या ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांनीं तेथील मूर्तिपूजकांच्या देवळांचा उपयोग केला. त्याचप्रमाणें स्वातंत्र्य, मानवी हक्क वगैरे परिभाषेंत अनुस्यूत असलेला अर्थ सर्व मानवतावाद्यांस प्रिय असतो म्हणून त्या परिभाषेचा वारेमाप उपयोग साम्यवाद करीत असतो. म्हणूनच स्वातंत्र्याधिष्ठित संस्कृतीचा उघडपणें नाश करावयास निघालेल्या कोणत्याहि विरोधकापेक्षां साम्यवाद हा अधिक जबरदस्त असा विरोधक आहे. साम्यवादाची यथार्थ ओळख नसलेल्या आणि राजकीय दृष्टचा भोळ्या अशा सत्प्रवृत्त आणि भावनाप्रधान स्त्री–पुरुषांवर याचा परिणाम अधिक होतो. कारण त्यांना आशावादांतून निर्माण झालेल्या भाबडेपणापासून संरक्षण करण्यास बुद्धीला विचक्षणवृत्तीची जोड द्यावयास हवी याची कल्पना नसते.

सोव्हिएट रशियाच्या भ्रामक समजुतींना जे बळी पडतात त्यांच्यापैकीं बहुतेकांना राजकारणाचा कांहीं उपयोग नसतो ही गोष्ट लक्षणीय आहे. त्यांना राजकारणांत लोटलें तें त्यांच्या भावनेच्या उद्रेकानें. ज्या मार्गांचा स्वीकार करावयाचा त्याचा त्यांनीं गंभीरपणें विचार केला किंवा इतर पर्यायी मार्गांचा विचार केला असें होत नाहीं. राजकारणांतल्या या नहमींच्या आणि विचारी पद्धतीला फांटा मिळालेला दिसून येतो. प्रेमाच्या गरजेंतून निर्मिति होते; त्याचप्रमाणें श्रद्धेच्या गरजेंतून एखाद्याच्या इच्छा आणि जरुरीप्रमाणें भ्रामक समजुतींची निवड केली जाते आणि सांस्कृतिक

वातावरणांत– जेथें उच्चतर मूल्यांचा ध्यास असतो, निष्कपटपणा असतो आणि राजकारणाविषयीं भरपूर अज्ञान असतें– सोव्हिएट विचारसरणी तिच्या अनुषंगानें येणारा नैतिक आदर्शवाद आणि तथाकथित शास्त्रीय सिद्धान्त यांचा प्रभाव पडला तर आश्चर्य कसलें ? ती विचारसरणी त्यांच्या सर्वोच्च आशावादाच्या पूर्ततेची केवळ ग्वाहीच देते असें नाहीं तर त्यांच्या आशावादाला सृष्टिक्रमाचा आधार दाखवून देते.

ऑगस्टिनच्या 'देवभूमि' (City of God) पासून सॅारेलच्या 'सार्वत्रिक संपा' General Strilke पर्यंत इतिहासांत अनेक समजुती भ्रामक ठरूं शकल्या; कारण त्यांचे दर्शन घडविणें, अनुभव देणें या गोष्टी अशक्य कोटींतल्या होत्या. मात्र सोव्हिएट तत्त्वज्ञानाची मानवातावादी, बुद्धिनिष्ठ, वर्गविहीन, लोकशाहीप्रधान समाजरचना ही कांहीं दुसऱ्या जगांत घडणारी गोष्ट नव्हे तर याच जगांत ठराविक जागीं ठराविक वेळीं ती अवतरणार आहे अशी ग्वाही देऊन तिचा गौरव करण्यांत आला होता. इतिहासांतून आपल्या तत्त्वज्ञानाला बळकटी मिळते हें दाखविण्यासाठीं ऐतिहासिक घटनांनाहि त्यांनीं मतलबी हेतूंची जोड देण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. आज सोव्हिएट रशियांत या तथाकथित तत्त्वज्ञानाचे संस्कार पूर्वप्राथमिक शाळांपासून तो उच्च शिक्षणापर्यंत सर्वत्र करण्यांत येतात; गुप्त पोलिसांचें जाळें तर केवळ सर्वव्यापी आहे आणि वेठबिगारीच्या छावण्यांचें देशाभोंवती कडेच पडलें आहे; अशा परिस्थितींत रशियन जनतेला या तत्त्वज्ञानाची प्रचीति कशी काय आली आहे हें सांगता येणार नाहीं. परंतु दुसऱ्या देशांतील जे लोक या तत्त्वज्ञानाच्या प्रभावाखालीं आले त्यांच्याबद्दल एक गोष्ट सांगता येण्यासारखी आहे. ती म्हणजे या लोकांचा भ्रमनिरास झाला तो ते जेव्हां रशियांत–त्यांच्या स्वप्नभूमींत कांहीं काळ राहिले त्यानंतर किंवा अशांचे स्वप्नभूमिबद्दलचे अहवाल वाचनांत आल्यावरच ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

या प्रकारच्या राजकीय श्रद्धावंताच्या मनांत अशा वेळीं जें द्वंद्व निर्माण झालें असेल तें रंगविणें एखाद्या कवीला खास आवडावें. ज्यावेळीं क्रांतिकारक बंधुतेच्या अग्रदूतांचा सोव्हिएट रशियाच्या एकखांबी राजवटीवरील आणि एक खांबी तत्त्वज्ञानावरील निष्ठेला तडा गेला त्यावेळीं त्यांच्या मनाला ज्या दारुण यातना झाल्या असतील, आत्मान्वेषणानें आणि आंत-

रिक विरोधानें ते ज्या प्रकारें तडफडले असतील त्याची कल्पना केलेलीच बरी. आस्तिक व्यक्ति नास्तिक बनल्यावरदेखील त्यांना असा अनुभव आला नसावा.

—२—

मानवाच्या आकलन शक्तीबद्दल एक प्राथमिक आणि मानसशास्त्रीय सत्य असें आहे कीं ती बऱ्याच वेळां त्याच्या श्रद्धेवर व अपेक्षेवर अवलंबून असते. श्रद्धा जेवढ्या दृढमूल असतील तेवढ्या त्या समजशक्तीवर हुकुमत चालवतात. त्याचें सत्य प्रयोगानीं सिद्ध व्हावयास पाहिजे असेंहि त्यास वाटत नाहीं. अपेक्षा किंवा आकांक्षा यादेखील इतक्या सर्वंकष असू शकतात कीं त्या व्यक्तीच्या भावनांचें स्वरूप आणि त्यांचा पल्ला यांवरहि खोलवर परिणाम घडवूं शकतात. त्यामुळें परिणाम विपरित होतो. वास्तवाच्या ज्ञानामुळें सर्वसाधारणतः जे परिणाम व्यक्तीवर अपेक्षित असतात ते मग होणें दुरापास्त बनतें आणि धक्का देणाऱ्या वास्तवतेच्या घटनांत मानवाला शिक्षण देण्याचें सामर्थ्य असतें तें अशा व्यक्तींच्या संदर्भांत लुळे पडलेलें दिसून येतें. एखादा माणूस एखाद्या अमूर्त कल्पनेकडून पकडला आणि बदलला गेला आहे असें म्हणणें अलंकारिक असेल; परंतु तशा प्रकारचें विधान हें एक अनुभवाधिष्ठित सत्यच सांगत असतें. कारण कांहीं कल्पना या व्यक्तीला मार्गदर्शक बनण्याऐवजीं त्यांच्या संवयी, त्यांच्या भावना, त्यांचा समाज यांना पार बदलून टाकीत असतात. हा बदल इतक्या प्रमाणांत झालेला आढळून येतो कीं त्यामुळें त्याच्या व्यक्तिमत्वांतहि लक्षांत येण्या-इतका बदल घडून आलेला दिसतो.

पाश्चात्य देशांतल्या साम्यवादी तत्त्वज्ञानानें भारलेल्या बुद्धिजीवी व्यक्तींनीं जेव्हां प्रथमतः सो. रशियाला भेट दिली त्यावेळीं असाच प्रकार होणें अपेक्षितच होतें. त्यांनीं तेथें जें कांहीं पाहिलें तें त्यांच्या वैचारिक कल्पनांच्या वस्त्रांतून गाळून घेतलें. तेथें घडून येणाऱ्या घटनांचा संकलित परिणाम होऊन त्या वस्त्राला छिद्र पडेपर्यंत कांहीं काळ जावा हे रास्तच होय. अशा छिद्रांतूनच मग वास्तवाचें आणि अनुभवाचें ज्ञान झिरपूं शकतें. त्याच वेळीं यातनामय अशा संशयाला व आत्मसंशोधनाला सुरुवात होते.

अशा सर्व व्यक्ति एकच अनुभव सांगतात. फरक काय असेल तो तपशीलांतच. ज्यावेळीं पहिल्या प्रथम अनिष्ट गोष्टी या अनिष्टच आहेत याचें आकलन त्यांना झालें त्यावेळीं त्यांची अपेक्षा अशी होती कीं कांहीं काळानें त्या नाहीशा होतील. पण त्या अनिष्ट गोष्टी काळाबरोबर नाहीशा होण्याऐवजीं वाढत गेल्या. तेव्हां त्यांचें समर्थन करण्यांत आलें, कां तर म्हणे भविष्यकाळांतील सुखासाठीं त्या गोष्टीं आवश्यक आहेत. तथाकथित आवश्यकतेलाच जेव्हां आव्हान देण्यांत आलें तेव्हां इतर देशांतील अधिक वाईट गोष्टींकडे अंगुलीनिर्देश करण्यांत आला. त्याबरोबर दोन प्रश्न या साहित्यिकांच्यापुढें 'आ' वासून उभे राहिले. इतर देशांतील अनिष्ट गणलेल्या गोष्टी या रशियांतील अनिष्ट गोष्टीहून खरोखरच अधिक वाईट आहेत कां ? आणि जरी त्या तशा आहेत असें गृहीत धरलें तरी त्या देशांत अशा गोष्टींवर टीका करण्याचें स्वातंत्र्य आहे. रशियांतच तें का नसावें ?

साम्यवादी तत्त्वज्ञनाचा स्वीकार करते वेळीं त्यांच्या मनावर विरोधविकासी विचारसरणीचा भडीमार करून आतां अयोग्य आणि अनिष्ट वाटणाऱ्या गोष्टी योग्य आणि इष्टच आहेत हें बिंबवलें होतें. त्यामुळें साहजिकच या तत्त्वज्ञानापासून फारकत घेणें त्यांना कठीण झालें. कोणत्याहि भ्रामक कल्पनेचा स्वीकार करण्यापेक्षां एकदां स्वीकार केलेल्या भ्रामक कल्पनेचा त्याग करावयाला अधिक बौद्धिक धैर्य लागतें. या स्त्री-पुरुषांच्यामुळें जे साम्यवादी तत्त्वज्ञानाकडे वळले त्यांच्याबद्दल एक प्रकारची नैतिक जबाबदारी त्यांना वाटत होती. आपल्यावर शिव्याशापांची खैरात होईल, फितूर म्हणून आपली संभावना होईल याची त्यांना कल्पना होती. आपलें पूर्वींचें मित्र आपल्या मतभेदाचें कारण वैयक्तिक भीति किंवा स्वार्थ यांत आहे असा आरोप करतील याचीहि त्यांना खात्री होती. मग लोकमताचा पाठिंबा किंवा आर्थिक फायदा यांना ते किंमत देत नाहींत याचा बिनतोड पुरावा सादर करूनहि कांहीं फायदा होणार नाहीं हेंहि त्यांना मा ीत होतें. त्यांना एकाकी आणि एकटें रहावें लागणार याचीहि त्यांना ज णीव होती. बरट्रांड रसेल हे या तत्त्वज्ञानांतील भ्रामकपणा हेरणाऱ्यांपैकीं पहिले. त्यांनीं सांगितलें आहे कीं, साम्यवादी विचारसरणीचा त्याग केल्या-

नन्तर त्यांना जेवढ्या मित्रांना मुकावें लागलें तेवढ्या मित्रांना इंग्लंड–जर्मनीबरोबर जीवनमरणाच्या लढाईंत गुंतलें असतांना त्यांनीं त्याला शांततावाद्याच्या भूमिकेवरून विरोध केला तरीहि मुकावें लागलें नव्हतें !

त्यांनीं आपलीं तोंडें बंद ठेविलीं याला तशींच महत्त्वाचीं कारणें होतीं. त्यांनीं साम्यवादावर टीका केली म्हणजे प्रतिगामी लोक त्याचा दुरुपयोग करतील अशी त्यांना भीति वाटत होती. दुसरें आणि अधिक महत्त्वाचें कारण म्हणजे त्यांना पर्यायी असें निष्ठास्थान दिसत नव्हतें. त्यांचें श्रद्धास्थान हरवलें; पण त्यांची श्रद्धेची भूक कांहीं हरवली नाहीं. जी व्यक्ति ' देवा मी श्रद्धा ठेवतो; माझा संशय तूं नाहींसा कर! ' असें म्हणते तिला श्रद्धास्थान मिळतें आणि तिला मानसिक शांतता लाभते. परन्तु ज्या व्यक्तीच्या मनांत अश्रद्धेचें पोखरणारें द्रव्य वाहूं लागलें आहे अशा व्यक्तीला परत नव्या श्रद्धास्थानाचा लाभ होऊन पहिल्याप्रमाणें मानसिक शांतता लाभणें दुरापास्तच. अशा व्यक्तीचा निष्पापपणा संपलेला असतो आणि म्हणूनच शेवटीं पक्षाचा अधिकारी म्हणूनच त्याचा उपयोग होऊं शकतो.

परन्तु सोव्हिएट रशियाच्या वाढत्या स्थैर्याबरोबर आणि वाढत्या शक्तीबरोबर तेथील रक्तमय अत्याचार वाढूं लागले, असहिष्णुता फैलावूं लागली आणि अंतर्गत दडपशाही अधिकाधिक तीव्र होऊं लागली त्यावेळीं त्यांना पूर्वीं त्यांनीं ज्याला निष्ठा वाहिली होती त्याच गोष्टीबद्दल जाहीर रीत्या नापसंति दर्शवावी लागली. या ठिकाणीं एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती म्हणजे ज्या नैतिक मूल्यांच्या आकर्षणामुळें ते साम्यवादाकडे आकर्षिले गेलें त्याच नैतिक मूल्यांमुळें त्यांना साम्यवादी तत्त्वज्ञानाचा त्याग करावा लागला. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें शासन नष्ट झालें नाहीं. नष्ट झालें राजकीय स्वातंत्र्य आणि त्याबरोबर ऑक्टोबर क्रांति-कालांतील उद्दिष्टें!

या वर्गांतील कोणताहि लेखक स्वप्नाळू किंवा अति आदर्शवादी होता असें कोणालाहि प्रामाणिकपणें म्हणतां येणार नाहीं. त्यांच्यापैकीं बहुतेक स्वतःला कोणत्या ना कोणत्या प्रकारचे मार्क्सवादी म्हणत. इति-हासाच्या रोकड्या गरजांकडे पहातांना दूरवरपर्यंत पहाण्याचें शिक्षण त्यांना

मिळालें होतें. हेगेलची विचारसरणी जरी त्यांनीं पचविली नव्हती तरी त्यांच्याप्रमाणें अनिष्ट वाटणाऱ्या गोष्टी बऱ्याच वेळां या विरोधविकासाच्या चक्रांतील अकरणात्मक बाजू आहेत असें ते मानीत किंवा आज टोयन्बी म्हणतात त्या प्रकारचें तें नित्यनूतन आव्हान आहे–जें पुढील काळांतील सर्जनशील प्रतिसादाकरितां आवश्यक आहे–अशा प्रकारचें त्यांचे विचार असत. म्हणून नव्या सामाजिक न्यायाच्या कल्पनेखालीं होणाऱ्या घोडचुकांकडे आणि अत्याचारांकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें.

पण एखाद्या घटनेचा ऐतिहासिक अर्थ लावणें किंवा तिची कारणमीमांसा करणें वेगळें आणि तिचें समर्थन करणें वेगळें. कारण मीमांसा आणि समर्थन जर एकच झालीं तर जें कांहीं अस्तित्वांत आहे तें सारें समर्थनीयच ठरणार; नाहीं का? मग भांडवलशाही, फासिझम हीं ज्या ठिकाणीं असतील तेथें तीं आहेत यामुळेंच समर्थनीय ठरतील! या गोष्टींच्या नैतिक पातळीवरून केलेल्या धिक्काराभुळें तर पहिल्यानें साम्यवादाचा पाया तयार झाला. अर्थात् तोहि मग ढांसळेल. जर इतिहास हा नैतिक प्रश्न उपस्थित करतो एवढेंच नसून त्यांचीं उत्तरेंहि देतो असें मानलें तर मग कोएस्लर यांच्या Darkness at Noon मधील ग्लेटकिनची रुबाशेबरोबर चर्चा करतानाची सारी विचारधारा मान्यच करावी लागेल. चूक हा गुन्हा, यशस्वी झालेला बळी हा नेहमींच बरोबर, जे दुर्बल असतात ते स्वभावतःच चुकत असतात, जें जें कांहीं अयशस्वी होतें तें तें सारेंच चुकीचें असतें अशा प्रकारची विचारसरणी शब्दांत मांडून दाखविणें सोपें असेल; परंतु त्याप्रमाणें नेहमीं वागणें हें कुणाहि सुजाण माणसाला शक्य नाहीं. यामुळेंच या वर्गांतील लेखक कवि हें जरी ऐतिहासिक नैसर्गिकता आणि शास्त्रीय निर्णयिकता मानणारे असले तरी त्यांना ते जें कांहीं पहात तें सारेंच कांहीं ऐतिहासिक गरजेंतुन निर्माण झालें नाहीं व कांहीं गोष्टी वेगळ्या रीतीनें घडू शकल्या असत्या हें मान्य करणें भाग पडलें.

--३--

या लेखक–कवींचा सोव्हिएट राजवटीबद्दल भ्रमनिरास होण्यास नेमक्या कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या? सोव्हिएट रशियांतील जनतेचें कमालीचें दैन्य पाहून त्यांचें डोळे उघडले का? नाहीं. त्यांच्या

कानावर सोव्हिएट रशियाच्या प्रचारकांकडून रशियांतील स्थितीबद्दल भरमसाठ अतिशयोक्त वर्णनें आलीं होतीं. त्यामुळें तेथील वास्तव स्थितीचा स्वीकार करणें त्यांना जड गेलें हें खरें, परन्तु यामुळें त्यांचें डोळे उघडलें गलें असें म्हणतां यावयाचें नाहीं. पुढील पंचवार्षिक योजनांमुळें तें दूर होईल असें त्यांना आश्वासन मिळालें. त्यांनीं आपल्या मनाची तशी समजूत घालून घेतली हें या ठिकाणीं लक्षांत ठेववयास हवें. त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला तो तेथील राजवटीच्या **क्रौर्याचा**. नाहक वाटणाऱ्या या क्रौर्याचा सोव्हिएट शासनाच्या प्रत्येक अंगांतून अविष्कार झालेला दिसून येत होता

फॅसिस्ट देशांतहि क्रौर्याचा अविष्कार होई, तो राक्षसी असे. सोव्हिएट रशियांतील या क्रौर्याचा विशेष असा कीं तो पद्धतशीर असे. राज्यकर्त्यांच्या धोरणाचा तो एक अविभाज्य भाग असे आणि ज्यांना धडे शिकवावे म्हणून त्याचा अवलंब करण्यांत येई, त्यांचा कांहींच फायदा होऊं शकत नसे–कारण धडे शिकविण्याच्या प्रक्रियेंतून ते जीवानिशी सुटतच नसत. पोटाला भाकरी देणें हें एक राजकीय हत्यार होऊं शकतें याचे दाखले इतिहासांतून हवे तेवढे मिळतील. परन्तु संपूर्ण मतैक्य घडून यावें–मतभेदाला जरासाहि वाव नसावा म्हणून पद्धतशीरपणें ती तोडण्यांत येत असे आणि हा प्रकार केवळ अभूतपूर्व होता. राजकीय कैद्यांना सुधारण्यासाठीं म्हणून काढलेल्या वेठबिगारीच्या छावण्यांच्या बाबतींतहि हीच गोष्ट दिसून येई. झारच्या काळांत राजकीय गुन्ह्यासाठीं ज्यांना तुरुंगवास घडला अशा लेनिन आणि त्याचे अनुयायी यांची तुरुंगांतली स्थिति व स्टॅलिनच्या तुरुंगांतील राजकीय कैद्यांची स्थिति यांतील भयानक तफावतीचें वर्णन सिलिगा, (Ciliga) सर्ज (Serge) वगैरेंनीं अत्यंत कडवटपणें केलें आहे. आणि हुकुमशाही नियंत्रणाखालीं असलेल्या राष्ट्रीकृत अर्थव्यवस्थेंत कोणताहि गुन्हा हा राजकीय गुन्हा ठरूं लागला. संयुक्त शेतीच्या मालकीच्या धान्यांतील पसाभर धान्य चोरलें काय, एका गांवाहून दुसऱ्या गांवीं गेलें काय किंवा योग्य ते कागदपत्र घेतल्याशिवाय सीमा ओलांडली काय सर्व प्रकारचें अपराध हे शासनाविरुद्ध केलेले दंडनीय गुन्हे ठरत!

नोकरशाहीच्या उदासीनतेंतूनच या क्रौर्याचा प्रादुर्भाव होई असें नाहीं.

तर शासनाकडून अधिकृतरीत्या जें वारंवार सांगण्यांत येई कीं क्षमा, दया, कींव हे गुण भांडवलशाहीचे अवशेष आहेत त्यावरूनहि तें उघड होई. आमच्या माहितीप्रमाणें व्यक्तिमात्राचा विचारच तेथें होत नसे. व्यक्ति म्हणजे केवळ लोखंड, कोळसा किंवा इतर गोष्टींसारखा कच्चा माल. त्याचा उपयोग उत्पादनवाढीसाठीं करावयाचा. उत्पादनाचे आंकडे कसे फुगतील यासाठीं त्यांचा विचार करावयाचा हीच वृत्ति वरपासून खाल-पर्यंत दिसून येई.

अर्थात् व्यक्तिगत तक्रार किंवा गरजा किंवा हालअपेष्टा यांकडे नोकरशाहीकडून केवळ सो. रशियांतच दुर्लक्ष होतें असें नाहीं. याची प्रचीति इतरत्रहि येते आणि ही गोष्ट या लेखकवर्गाला माहिती होती. शासनाचे हितसंबंध जेथें गंभीरपणें धोक्यांत आलेले दिसतात, तेथें क्रौर्याचा अवलंब होणें क्षम्य आहे. मग शासनाचे हितसंबंध धोक्यांत आले ही कल्पना चुकीची असली तरी हरकत नाहीं. परंतु जेव्हां क्रौर्याला धाऊक अन्यायाची जोड मिळते तेव्हां पाश्चात्य संस्कृतींत वाढलेल्या मनाला तें केवळ असह्य होतें. त्यांच्या वाङ्मयावरून पहातां अशा अन्यायाचे दोन प्रकार त्यांना भयंकर वाटलेले दिसतात. पहिला प्रकार म्हणजे "तात्विक साधर्म्याचा किंवा मतैक्या"च्या आरोपाचा. शासनाविरुद्ध कोणत्याहि प्रकारचा गुन्हा केलेल्या व्यक्तीच्या मतांशीं एखाद्याच्या मतांत साधर्म्य आढळलें कीं त्याच्यावर आरोप लादण्यांत येत असे. ज्यांना कधी पाहिलेंहि नाहीं किंवा ज्यांच्याविषयीं कधीं कांहीं ऐकलेंहि नाहीं अशा एकेकाळीं गुन्हेगार ठरलेल्यांशीं "तात्विक साधर्म्य" आढळलें या आरोपावरून हजारों लोकांना शिक्षा ठोठा-वण्यांत आल्या व कित्येकांना नष्ट करण्यांत आलें. दुसऱ्या प्रकाराचा वापर खुद्द कोएस्लर यांच्यावर करण्यांत आला. तो प्रकार म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाबद्दल सबंध कुटुंबालाच ओलीस ठेऊन घेणें होय! एखादी व्यक्ति जर सो. रशियांतून पळून गेली व त्याच्या पलायनाची माहिती त्याच्या कुटुंबीयांना माहित नाहीं हें जरी दिसून आलें तरी त्यांना "सैबे-रियांतील दूरवर ठिकाणीं पांच वर्षें डांबावें" असा एक हुकूमच निघाला आहे. अशा शिक्षांची बजावणी त्यांना वेठबिगारीच्या छावण्यांत पाठवून

होई आणि शिक्षेची मुदत शासनाच्या मर्जीप्रमाणें वाढविण्यांत येई !

नैतिकतेविरुद्ध केलेल्या या अत्याचारांना तात्त्विक अधिष्ठान मिळावें व सहानुभूतीदारांच्या ओठावरील अनुच्चारित निषेधांना उत्तर द्यावें म्हणून जनतेच्या न्यायाधिशानें अधिकृत सरकारी पत्रांतून जाहीर केलें : " उदारमतवाद्यांच्या आणि सर्व प्रकारच्या संधिसाधु लोकांच्या मतें देश जितका बळकट तितका तो विरोधकांच्या बाबतींत सौम्य असू शकतो...नाहीं. निखालस नाहीं ! देश जितका बळकट, जितका सामर्थ्यशाली..तेवढ्या प्रमाणांत समाजवादाच्या उभारणीस अडथळे आणणाऱ्याविरुद्ध कडक उपाय योजणें हें न्याय्य असतें. (Izvestia No. 37 Dec 2, 1936)

मौज अशी कीं ज्यानें हें लिहिलें त्याला तो पुरेशा प्रमाणांत कडक नाहीं या आरोपावरूनच नष्ट करण्यांत आलें ! ही जर समाजवादी मानवता असेल तर जे मानवतेच्या नांवानें अशाच प्रकारच्या अत्याचाराविरुद्ध फॅसिस्ट देशांतून लढले त्यांच्या पचनीं पहिल्याप्रथम ती कशी बरें पडेल ? भ्रमनिरास झालेल्या पाश्चात्य बुद्धिजीवी वर्गानें पहिल्याप्रथम जो निषेध केला त्याचा त्यांच्या व्यवसायक्षेत्राशीं संबंध नव्हता हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. त्यांनीं निषेध केला तो ते मानव आहेत म्हणून आणि इतर मानवांच्या करण्यांत येणाऱ्या अधःपाताविरुद्ध त्यांनीं तो निषेध व्यक्त केला किंवा समाजवादी या नात्यानें सत्ता आणि दर्जा यांतील वाढत्या विषमतेविरुद्ध—ज्यामुळें नवे वर्गीय भेद दिसून येऊं लागले—त्यांनीं निषेध केला. ऐतिहासिक परिस्थितीकडे मुद्दाम केलेल्या डोळेझांकीमुळें व मानवाच्या सहनशक्तीच्या मर्यादांकडे केलेलें दुर्लक्ष यांमुळें त्यांनीं मार्क्सवादी म्हणून निषेध केला. कोणत्याहि भूमिकेवरून निषेध प्रगट झालेला असो त्यांना उत्तर एकच मिळें—" या सर्व गोष्टींचीं कारणें शासकीय आहेत !" ज्यांना हें उत्तर मिळालें ते हीं " शासकीय कारणें " पाहूं शकले नाहींत, परंतु ते कबूल करतात कीं त्या उत्तरानें ते आश्चर्यचकित झाले आणि भांबावलेहि ! सरते शेवटीं इतिहासांत एवढी विविधता आढळून येते, भविष्यकाल हा इतका अनिश्चित आहे कीं कशासाठी कशाची गरज आहे हें कोण खात्रीपूर्वक सांगू शकणार ?

परंतु तेथें चाललेल्या एका विशिष्ट प्रकारच्या दडपशाहीचें समर्थन

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळप्रत
अनुक्रम... वि...
नों: दि



"शासकीय कारण" म्हणून होऊं शकत नव्हतें. ही दडपशाही म्हणजे सांस्कृतिक दडपशाही होय. कला आणि शास्त्र यांचें कोणतेंहि क्षेत्र या दडपशाहीपासून मुक्त नव्हतें. हे सर्व पाश्चात्य बुद्धिजीवी अशा वातावरणांत वाढले होते कीं जेथें एखादें पुस्तक, एखादी चित्रकृति दडपण्याचा प्रयत्न झाला तरी त्याला तीव्र विरोध होत असे–तेथें मुद्रण नियंत्रण नाममात्रच असलें तरी हा विरोध होत असे आणि वाईटांत वाईट गोष्ट घडली म्हणजे त्या पुस्तकाच्या खपावर परिणाम होई. लेखकाच्या स्वातंत्र्याचा किंवा त्याच्या जीवाचाच अपहार होत नसे. सर्वंकष मुद्रण नियंत्रणाच्या अनुभवानें ते केवळ दिङ्मूढ झाले. कारण हें नियंत्रण केवळ साहित्यावरच नव्हतें तर चित्रकला, संगीतकला आदि कलांवरहि होतें. केवळ राजकीय विचारावरच या नियंत्रणाचा वरवंटा फिरत नव्हता तर तत्त्वज्ञान आणि शास्त्र हे विषयहि त्याच्या तडाख्यांतून सुटले नव्हते. निर्मिति काय असावी या पुरतेंच तें नियंत्रण नव्हतें तर ती कशी असावी यावरहि तें होतें–शैली तंत्र आणि आशय सर्व कांहीं या नियंत्रणाच्या कक्षेंत येत असे. आधुनिक जगांत असा प्रकार इतरत्र कोठेंहि दृष्टीस पडत नाहीं. कला आणि शास्त्र हे पोलीसदलाच्या अधिपत्याखालील विषय केल्यानें या पाश्चात्य विचारवंतांच्या, लेखकांच्या व कलावंतांच्या दर्जाचा आणि त्यांच्या प्रामाणिकपणाचा अधिक्षेप झाला. त्यांच्या अस्मितेचाहि घोर उपमद झाला असें त्यांना वाटलें.

बुद्धिजीवी हा "मानवी आत्म्याचा शिल्पकार" असतो असें स्टॅलिन सांगत असें. हें मान्य करणें या पाश्चात्य लेखकवर्गाला जड गेले. शिवाय इतरांच्या मनाप्रमाणें शिल्पकृति करावयाची, येवढेंच नव्हे तर ती देखील ज्यांना शिल्पशास्त्रांतील नेम–नियम माहित नाहींत अशांनीं घालून दिलेल्या नेम–नियमानुसार–हें सारें पाहून त्यांना सांस्कृतिक क्षेत्रांत एक प्रकारचा रानटीपणा लादला जात आहे असें वाटलें. या सर्वांवर ताण म्हणजे जे या गोष्टींना मान्यता देणार नाहींत त्यांना शिक्षा भोगावी लागे. प्रकाशनाचीं सर्व साधनें सरकारच्या स्वाधीन असल्यामुळें अशा शिक्षांचा परिणाम स्वतंत्र प्रज्ञेच्या, विचारवंताच्या किंवा लेखकाच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या जीवनाचें साधन हिरावून घेण्यांत होई. कांहीं वेळां जन्मठेपेची

किंवा मृत्यूचीहि शिक्षा होई. या सर्वांमुळें या लेखकवर्गांचें सो. रशिया-बद्दलचें गूढ आकर्षण नाहीसें होऊन त्यांच्या मनानें पलट खाल्ली.

सोव्हिएट राजवटीच्या उद्दिष्टांच्या संदर्भांत त्यांनीं सांस्कृतिक क्षेत्रांत उभारलेल्या हकालपट्टीच्या मोहिमेचें वैय्यर्थ उघड होतें. म्हणून हा लेखकवर्ग दिङ्मूढ झाला होता. उदाहरण द्यायचें म्हणजे सापेक्षतावादाच्या एखाद्या उपसिद्धान्तावर विश्वास ठेवणाऱ्या वैज्ञानिक व ज्यौतिर्विद यांच्या हकालपट्टीचा कोणत्याहि सामाजिक धोरणाशीं काय बरें संबंध आहे ? तीच गोष्ट नवकलेंतील गूढतेसंबंधी, कादंबरींतील उद्‌भुततेसंबंधी, काव्यांतील आकृतिवादासंबंधी म्हणतां येईल. साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीनें सर्वंकष अधिकारानें निरनिराळ्या कला व शास्त्रांच्या क्षेत्रांत काय बरोबर व काय चुकीचें याबाबतींत हुकूम काढले ते नीट वाचावयास पाहिजेत. त्यावरून कला व शास्त्र यांच्यावरील हें नियंत्रण किती बारीकसारीक गोष्टींपर्यंत पसरलें होतें हें लक्षांत येतें. "सो. प्राणिशास्त्राचे–" या शब्दप्रयोगानें "नाझी प्राणीशास्त्राची" आठवण येणें अपरिहार्य आहे– दंडक देखील या धोरणाचें चांगलें उदाहरण ठरेल. मेंडोलिन मॉर्गन यांची वंशशास्त्रीय मतप्रणाली. निषिद्ध ठरविणारे दंडक त्यांत आहेत.

या मतप्रणालीचे राजकीय स्वरुपाचे कांहीं तार्किक परिणाम संभवूं शकतात असें म्हणावें तर तसेंहि नाहीं. सुप्रसिद्ध अमेरिकन वंशशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते प्रो. एच्. जे. मुल्लर यांना रशियन प्राणिशास्त्रज्ञांच्या हृदयद्रावक हकालपट्टीचा प्रत्यक्ष अनुभव होता. ते या 'साधित गुणांच्या अनुवांशिकते'बद्दल म्हणतात कीं त्या सिद्धान्तानुसार ज्याप्रमाणें मानवाच्या भोंवतालच्या वातावरणांत बदल घडवून आणून त्याच्यांत बदल घडवून आणणें शक्य आहे हा निष्कर्ष निघूं शकतो त्याचप्रमाणें शासक वर्गांतील व्यक्तींचीं मुलें हीं सर्वसाधारण लोकांच्या मुलांपेक्षां मानव म्हणून उच्चतर प्रतीचीं निघतील असाहि निष्कर्ष काढतां येतो. कारण शासक वर्गाच्या व्यक्तींच्या मुलांच्या भोंवतालचें वातावरण हें सामन्यांच्या मुलांना लाभणाऱ्या वातावरणापेक्षां नेहमींच अनेक दृष्टींनीं अधिक अनुकूल असतें. अर्थात् हे दोन्ही निष्कर्ष चुकीचे आहेत हें सांगावयास नकोच. यावरून एवढेंच दिसून येतें कीं शास्त्रीय सत्य किंवा एखादी मतप्रणाली ही तिच्या सामाजिक परिणामाच्या कसोटीवर घासून तिचा खरेखोटेपणा तपासला जावा हा सोव्हिएट राजवटीचा

हट्ट आहे. गेलिलिओच्या काळापासून चालत आलेल्या सिद्धान्ताला हें सोव्हिएट राजवटीनें दिलेलें आव्हान होतें. त्यामुळें या पाश्चात्य बुद्धिजीवींना दिङ्मूढ झाल्यासारखें वाटल्यास नवल काय?

पक्षीय धोरणाचा अवलंब सांस्कृतिक क्षेत्रांत केल्यामुळें दुसराहि एक भयावह परिणाम घडून आला. ज्यांनीं याचें निरीक्षण केलें त्यांनीं तसें जाहीरहि केलें आहे. सांस्कृतिक क्षेत्रांतील पक्षाचें धोरण हें त्याच्या अन्तर्गत आणि परराष्ट्रीय राजकारणाबरोबर बदलणें अपरिहार्य आहे. त्यामुळें त्या धोरणांत अनेक वळणें आणि वाकणें व कोलांटउड्या दिसून येतात. त्यामुळें ज्यांनीं एकदां पक्षीय धोरणाचे आदेश दिले ते पुढील आदेशांचे बळी झाले. याचा परिणाम असा झाला कीं साधारणतः कांहीं बोलणें हेंच धोक्याचें झालें. मौन राखण्यांत त्याहूनहि अधिक धोका होता. त्यामुळें या धोक्यापासून मुक्तता करण्यासाठीं राजमान्य असा कर्मठपणा स्वीकारणें, बळी देण्यास काढलेल्या अजापुत्राविरुद्ध प्रक्षोभ दाखविणें आणि पुराणांत शोभेल अशा भाषेंत स्टॅलिनचा उदोउदो करणें या मार्गांचा अवलंब करणें त्यांना भाग पडलें. खुशामतखोरीच्या आणि भीतीच्या नित्य वाढत जाणाऱ्या एका वावटळींत प्रत्येकजण सांपडला होता. आंद्रे गाईड यांनीं युरोपीय राष्ट्रांच्या वसाहतवादी धोरणाचा तीव्र धिक्कार केला होता. पण रशियाला भेट देऊन आल्यावर त्यांनीं लिहिलें : 'जगांतील कोणताहि देश, हिटलरचा जर्मनी धरूनहि, रशियापेक्षां स्वातंत्र्याचा कमी उपयोग घेणारा, अधिक नमवलेला, अधिक दडपशाही असलेला आणि अधिक दास्यांत रुतलेला असेल किंवा काय याची मला शंका आहे.'

या पाश्चात्य बुद्धिजीवींनीं साम्यवादाचा स्वीकार करण्यास दुसरेंहि अेक कारण होतें. तें म्हणजे त्यांचा आंतरराष्ट्रवाद. ते स्वतःला जगाचें नागरिक समजत आणि स्वतंत्र लोकांच्या आदर्श अशा जागतिक पार्लमेंटच्या स्थापनेसाठीं आपलें जीवन समर्पित केलें आहे, अशी त्यांची भावना असे. हें ध्येय हस्तगत होण्याच्या कामीं रशिया अेक मजबूत किल्ला होईल अशी त्यांची कल्पना होती. परंतु रशियांत ज्या मार्गानें सत्ता हस्तगत केली तोच मार्ग इतरांनींहि चोखाळावा अशी सक्ति रशियाकडून होते हें पाहिल्यावर ते अस्वस्थ झाले. फिरून त्यांच्या जेव्हां

असें लक्षांत आलें कीं इतर देशांतील समाजवादी आंदोलनें हीं रशियाचीं सीमा रक्षण करणारीं रक्षकदलें आहेत असें मानलें जातें तेव्हां त्यांच्या मनांत दाट शंका निर्माण झाली. सरते शेवटीं सांस्कृतिक क्षेत्रांत आक्रमक रशियन राष्ट्रवादाचा उदोउदो सर्व बाजूंनीं होऊं लागला अेवढेंच काय, पण अिव्हॅन धी टेरिबल्, पीटर धी ग्रेट यांना साम्यवादाचे अग्रदूत ठरविण्यांत आलें त्यावेळीं मात्र त्यांना भावनिक परकेपणा जाणवल्याशिवाय राहिला नाहीं. तोंपर्यंत ते आपल्या देशांना व इतर पाश्चात्य देशांना अेक प्रकारच्या जाड तात्त्विक धुक्यामधून पहात होते. सोव्हिअेट रशियाच्या या विपरीत अनुभवानें त्यांना आपल्या देशाबद्दल अचानकपणें नव्यानें अधिक आपुलकी वाटूं लागली.

अेकदां निष्ठा ढासळल्यावर अनेक गोष्टी त्यांच्या निदर्शनास आल्या. पहिली अशी कीं, साम्यवादाचें प्रमुख लक्षण म्हणजे स्थूल स्वरूपांतली आर्थिक समता असें मार्क्स व लेनिन मानत; त्या दृष्टीनें रशिया त्या ध्येयापासून फार दूर होता–इतर कांहीं सुवर्णमध्य ठेवणाऱ्या देशांच्या मानानें तर अतिशयच दूर होता. दुसरी म्हणजे सोव्हिअेट प्रचाराचा खोटेपणा आणि त्यामुळें त्याविषयीं त्यांचा तिरस्कार वाढत गेला. इतके दिवस आपण या अपप्रचारास बळी पडलों या विषादानें त्यांच्या तिरस्कारास धारहि चढली. शब्दार्थास भ्रष्ट करून त्यांचा हत्यारासारखा उपयोग करण्याच्या त्यांच्या वृत्तीची त्यांना किळस येऊं लागली. या संदर्भांत देण्यासारखें अेक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे रशियांत किंचित्हि मतभेद हा दंडनीय गुन्हा ठरत असतांना तो लोकशाही या शब्दाचा करीत असलेला सर्रास उपयोग!

— ४ —

पाश्चात्य लेखकांचा भ्रमनिरास होऊन त्यांना दारुण अशा मानसिक यातना सहन कराव्या लागल्या. पण या गोष्टीला त्यांच्या दृष्टि-कोनांतील सदोषताच कारणीभूत होती. तिचा विचार केल्याशिवाय राजकीय भ्रमनिरासाचें विवेचन अपुरेंच राहील. या पाश्चात्य लेखकवर्गाचें म्हणणें असें कीं त्यांच्यामध्यें कांहीं फरक झाला नाहीं; फरक झाला तो

सोव्हिएट राजवटींत. परंतु हें कांहीं संपूर्ण सत्य नाहीं. क्षणभर तसें गृहीत धरलें तरी या लेखकवर्गाला आपल्या दोषापासून मुक्त होतां येत नाहीं. कारण असा फरक होण्याची शक्यता ते अजमावूं शकले नाहींत, हा दोष सर्वस्वीं त्यांचाच होय. पण यासंबंधी याहूनहि अधिक कांहीं सांगतां येण्यासारखें आहे. मानवाची स्खलनशीलता गृहीत धरली तरी भ्रामक समजुतींस बळी पडण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावरच रहाते.

पहिली गोष्ट म्हणजे त्यांनीं राजकारणावर अतिरिक्त विश्वास ठेवला. मानवी जीवनांत राजकारणाला अनन्यसाधारण स्थान आहे, राजकारणामुळें मानवी जीवनांत हवें तें घडवून आणतां यईल असा विश्वास त्यांनीं बाळगला. सर्वगामी स्थैर्य, भावनिक सुरक्षितता या ज्या गोष्टी त्यांनीं सोव्हिएट रशियाच्या राजकारणापासून अपेक्षिल्या होत्या त्या यदाकदाचित् साध्य होणें शक्य असतें तरी त्यापूर्वींच आणि रास्तपणें त्याग केलेल्या धर्मापासूनच साध्य होऊं शकल्या असत्या. सत्ताधाऱ्यांशीं एकरूपता दाखविण्यांत त्यांनीं बुद्धिवाद्यांच्या वास्तव स्थानाचा त्याग केला. अल्पसंतुष्ट आणि समाधानी लोकांची विचारी सदसद्बुद्धि म्हणून वागणें हें त्यांचें कार्य. प्रतिभावान् म्हणून कोणत्याहि परिस्थितींत अंतिम सत्याचा सतत शोध घेत रहाणें हें त्यांचें वास्तव कार्य. पण या कार्याचा त्यांनीं त्याग केला.

स्वतःशीं प्रतारणा करावयास लावणारी अशी कोणतीहि निष्ठा असूं शकत नाहीं. मग निष्ठास्थान एखादा समाज असो, एखादें राष्ट्र असो, एखादा धर्म असो वा एखादा राजकीय पक्ष असो. मानवतेच्या संरक्षणासाठीं येणाऱ्या कोणत्याहि गोष्टीकडून कमीत कमी एका गोष्टीची अपेक्षा केली पाहिजे. केवळ अपघात म्हणून निसर्गाची मिळालेली देणगी म्हणजेच प्रतिभावंतांच्या मनांत जागत असलेली पावित्र्याची ज्योत ही ती गोष्ट होय.

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचा राजकारणासंबंधीचा अतिरिक्त अपसमज. राजकारणानें संपूर्ण शोषणमुक्ति होऊं शकेल असा त्यांचा एक गैरविश्वास होता. या ठिकाणीं ते कांहीं महत्त्वाच्या गोष्टी विसरले. एक म्हणजे राजकारण हें माणसांनींच बनविलें असतें आणि कोणत्याहि मतप्रणालीचा किंवा संस्थेचा दुरुपयोग होऊं लागल्यास तो थांबविण्याचें अंगभूत सामर्थ्य

त्या मतप्रणालींत किंवा संस्थेंत नसतें. त्यामुळें त्यांचा भ्रमनिरास होणें अपरिहार्य होतें. कारण कोणत्याहि समाजरचनेनें मानवाचा देव होऊं शकत नाहीं. एवढेंच नव्हे तर तो देवदूतहि बनूं शकत नाहीं. मोहवश होणें ही मानवाची प्रकृति आहे आणि मोहवशतेनें कधींच चुकणार नाहीं असा कुणीहि नाहीं. आपल्या दुबळेपणामुळें किंवा अज्ञानामुळें अशा चुका होणें स्वाभाविकच आहे. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत आणि अधिक स्पष्टपणें सांगावयाची म्हणजे मानसशास्त्र जाणण्याइतपत त्यांची बुद्धिच प्रगल्भ नव्हती.

त्यांची तिसरी चूक सर्व धर्मनिष्ठ लोक करतात त्याच प्रकारची होती. धर्मनिष्ठ लोकांप्रमाणें तेहि ही गोष्ट विसरले कीं निदान या जगांत तरी श्रद्धा ही बुद्धीला पर्यायी होऊं शकत नाहीं. अर्थव्यवस्थेचें परिवर्तन ही कांहीं अशी समस्या नाहीं कीं जी पोथीबंदपणानें, काव्यात्मकपणानें किंवा तात्त्विकपणानें सोडवितां येईल. ती अनेक समस्यांची मालिका आहे. तीमधील प्रत्येक समस्या कठीण आहे व ती सोडविण्यासाठीं प्रदीर्घ अभ्यासाची आवश्यकता आहे. त्याच्याशिवाय शब्द, स्वर किंवा रंगरेषा यांच्या ज्ञानानें ती सोडवितां येण्यासारखी नाहीं. अर्थव्यवहाराची गहनता जाणून प्रसिद्ध वैज्ञानिक प्लँक यांनीं त्या क्षेत्रांतून तरुणपणींच माघार घेतली होती. परंतु अशी गोष्टदेखील केवळ नैतिक धिक्काराच्या हत्यारांनीं उधळून लावतां येईल असें समजण्यांत त्यांच्या बुद्धीचा अपक्वपणाच जाणवत नाहीं काय ?

राजकीय लोकशाहीचा आपला वारसा विसरण्यांत त्यांनीं मोठी चूक केली. ही त्यांच्या दृष्टिकोनांतील चौथी चूक म्हणतां येईल. लोकशाही प्रक्रियेंतील स्वशुद्धिकारक शक्तीचें त्यांनीं योग्य मूल्यमापनच केलें नाहीं. त्यामुळें आपल्या काळांतील आर्थिक अडचणी आणि अन्यायावर उपाययोजना करण्याचें व योग्य वेळीं त्या नष्ट करण्याचें अंगभूत सामर्थ्य लोकशाहींत आहे, तें त्यांनीं अतिशयच कमी लेखलें. इतर सर्व बाबींकडे ऐतिहासिक दृष्टिकोनांतून पहाण्याचा त्यांचा आग्रह असतांना केवळ पाश्चात्य लोकशाहीचा विचार ऐतिहासिक दृष्टिकोनांतून करण्याचें त्यांनीं जणू नाकारलें. मार्क्सचा 'कॅपिटल' हा ग्रंथ त्यांना इतका पवित्र वाटतो कीं ते तो हातांत धरून वाचतहि नाहींत. नाहींतर त्यानें त्या काळांतील इंग्लंडमधील

कामगार वर्गाच्या हलाखीचें केलेलें वर्णन त्यांच्या ध्यानीं आलें असतें आणि तेव्हांपासून आतांपर्यंतच्या काळांत ब्रिटिश कामगार वर्गानें केलेली प्रगति त्यांच्या लक्षांत आली असती. जोंवर राजकीय लोकशाही प्रक्रिया शाबूत असते तोंवर लोकशाही जीवनास नैतिक दृष्टचा जरूर तसा आकार देतां येतो. त्याची मर्यादा आपलें धैर्य, आपली प्रयत्नशीलता आणि मतपरिवर्तन करण्याची आपली शक्ति यांवर अवलंबून असते ही गोष्ट ते पार विसरले.

आणखी एक दोष त्यांच्या दृष्टिकोनांत होता. सामाजिक समस्या ही मुळांत एक नैतिक समस्या असते हें त्यांनीं जाणून घेतलें नाहीं. कोणतीहि सामाजिक संस्था किंवा योजना हें साध्य होऊं शकत नाहीं; परंतु सुरक्षितता, स्वातंत्र्य, न्याय, ज्ञान आणि दया यांसारख्या प्राथमिक मूल्यांसाठीं वापरावयाचीं तीं साधनें आहेत हा विवेक त्यांनीं दाखविला नाहीं. जगांतल्या घडामोडी या आपण वापरतों तीं साधनें आणि आपण मानतों तीं साध्यें यांच्या संकलित परिणामस्वरूप असतात. त्यांनीं साध्यावरून साधनांचें समर्थन करतां येतें हें वारंवार ऐकलें होतें; परंतु जीं साधनें वापरतों त्यामुळें साध्य हें जवळ येतें कां दूर ढकललें जातें हें पहाण्याची तसदी त्यांनीं कधीं घेतली नाहीं. अर्थात् तशी तसदी घेतली असती तरी फारसा उपयोग झालाच असता असें म्हणतां आलें नसतें; कारण विरोधी पुरावा समोर आला तरी त्यांनीं तो मानलाच नसता. कारण मौजेची गोष्ट अशी कीं ते आपलीं मतें शास्त्रशुद्ध आहेत असा दावा करीत असले तरी अगदीं तात्त्विक दृष्टचासुद्धां कोणता पुरावा समोर आला तर आपलीं मतें चुकीचीं म्हणून त्याज्य किंवा दुरुस्त करण्याजोगीं ठरतील तें ते कधींच सांगत नसत. जें कांहीं घडून येई तें सारें त्यांच्या मतांना पुष्टि देणारेंच ठरे! त्यांच्या प्रवृत्तींत मूलमूत असा फरक पडेपर्यंत ते मानीत असलेल्या शास्त्रशुद्ध सत्यावर कोणत्याहि अनुभवाचा परिणाम घडत नसे.

हा लेखकवर्ग भ्रामक तत्त्वज्ञानाला बळी पडला त्याची जबाबदारी त्यांच्यावर असली तरी त्यांनीं भ्रमनिरासानंतर जें लिखाण प्रसिद्ध केलें आहे तो वाढत्या बौद्धिक आणि भावनिक प्रगल्भतेचा दस्तऐवज मानावयास हरकत नाहीं. त्यांचा अधिक्षेप करावयाचा कुणालाच अधिकार नाहीं आणि जे कोणत्याहि सामाजिक बदलाबद्दल उदासीन असतात; ज्यांची आपल्या

बांधवांबद्दलची सहानुभूति कधींच सक्रिय होत नाहीं आणि विचार–आचाराचा धोका इतरांनींच पत्करावा असें जे मानतात त्यांना तर नाहींच नाहीं. १९१९ किंवा १९२९ मध्यें ज्यांवर विश्वास बसणें शक्य होतें त्यावर १९३९ सालीं विश्वास बसणें शक्य नाहीं. याला अपवाद जे नैतिकदृष्टचा विकृत किंवा अधःपतित असतील तेच. यापुढील पिढींतील ज्या लेखक–कवींना राजकीय मोहिमेंतील आघाडीचे सैनिक म्हणून कार्य करणें आवश्यक आहे असें वाटेल अशांना हें वाङमय म्हणजे एक प्रकारचें आव्हानच ठरेल. त्यांनीं मानवाच्या मूर्खपणाचीं जणू पाठचपुस्तकेंच तयार केलीं आहेत. केवळ त्याबद्दलच आपण त्यांच्याशीं कृतज्ञ राहिलें पाहिजे असें नाहीं तर मानवी निष्ठेच्या आणि विनयशीलतेच्या भव्यपणाचें जें दर्शन त्यांच्या लिखाणांतून होतें त्याबद्दलहि आपण त्यांचे ऋणी रहावयास पाहिजे.

जोंपर्यंत मानवजात आहे तोंपर्यंत आदर्शवादहि असतील आणि भ्रांतिवादहि असतील. त्यांच्याबद्दल आतांच कांहीं प्रतिज्ञेवर सांगतां येणार नाहीं. चांगल्या समाजव्यवस्थेंत चांगल्या प्रकारच्या जीवनाचा शोध घेण्यासाठीं आपण आपल्यापुढें कोणतें ध्येय ठेवतों यापेक्षां आपण तें कसें ठेवतों याला अधिक महत्त्व आहे; आपल्या निष्ठा कोणत्या आहेत यापेक्षां आपण त्यांच्याप्रत कसें गेलों याला अधिक महत्त्व आहे ही गोष्ट त्यांच्या वाङमयानें मनावर चांगलीच ठसते. तेंच त्यांचें सर्वांत मोठें वैशिष्टच आहे.

व्यक्तिव्यक्तीमधील अनेक प्रकारच्या फरकांपैकीं मूलभूत फरक मनाच्या परिपूर्णत्वाचा गंड असलेल्या वृत्तींत आणि प्रयोगशीलवृत्तींत आहे. आपण परिपूर्ण आणि नेहमीं बरोबरच असतों अशा गंडानें पछाडलेल्यांच्या बाबतींत त्यांचे पूर्वग्रह म्हणजेच त्यांचीं मूलतत्त्वें.

आणि यांतूनच जे आपल्याशीं सहमत होत नाहींत त्यांच्याविषयींच्या निर्दयतेचा जन्म होतो. दुसरी वृत्ति आपल्या कार्यांत कमी निश्चयी नसते असें नाहीं; परंतु योग्यायोग्यतेबद्दल किंवा इष्टानिष्टतेबद्दलचा अंतिम निवाडा देणें मानवाला शक्य नाहीं हें ती जाणते. म्हणून ती वृत्ति कोणताहि नवा अनुभव किंवा पुरावा पहाण्यास व त्यावर आपलीं मतें पारखून घेण्यास ती राजी नसते. नवीन अनुभवांच्या आणि पुराव्यांच्या संदर्भांत आपल्या मूलतत्त्वांचा फेरविचार करण्याची तयारी असणें हें मनाच्या उदारतेचें आणि परिपक्वतेचें लक्षण आहे.

● ● ●

# साम्यवाद्यांचे सहप्रवासी : त्यांचें मानसशास्त्र

आजच्या जमान्यांत साम्यवाद्यांच्या 'सहप्रवाशां'चें अस्तित्व ही एक विलक्षण अशी गोष्ट आहे. आपल्या वैशिष्टयानें ती केवळ एकमेव अशी आहे असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. त्यांची संख्या शीतयुद्धावर अवलंबून असते. शीतयुद्धाचा पारा वर चढला कीं ही संख्या रोडावते व तो खालीं आला कीं सहप्रवाशांची संख्या फुगते. एका दृष्टीनें साम्यवादी पक्षाच्या सभासदांपेक्षा त्यांच्या सहप्रवाशांचे उद्योग हे लोकशाहीला अधिक मारक ठरत असतात. कोणत्याहि गोष्टीचें मूल्यमापन करावयाचें त्यांचे दोन मानदंड असतात. एक खास सो. रशियासाठीं असतो व दुसरा इतर (कम्युनिस्टेतर) देशासाठीं असतो. या दुसऱ्या देशांत त्यांचा स्वतःचाहि देश मोडतो हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. मूल्यमापनाच्या या दुहेरी पद्धतीमुळें ते त्यांच्याशीं मतभेद असणाऱ्या सर्वांबद्दल एक प्रकारचा संशय निर्माण करतात व तो बळकट करूं पहातात. प्रामाणिक टीकाकारांच्या सद्भावनेवर ते कपटीपणानें कोरडे ओढीत असतात.

त्यांच्याशीं ज्यांचा ज्यांचा मतभेद होतो त्यांना त्यांना ते देशद्रोहाचें लेबल चिकटविल्याशिवाय रहात नाहींत. ही त्यांची वृत्ति सर्वांत अधिक धोकेबाज आहे. त्यामुळें आपल्या देशाच्या राष्ट्रीय व परराष्ट्रीय धोरणांतील चुका किंवा उणीवा यांवर स्वतंत्रबुद्धीनें जे टीका करूं पाहतात त्यांचें काम कठीण होऊन बसतें. परंतु अशा प्रकारच्या टीकेचें स्वातंत्र्य जर हिरावून घेतलें तर त्या ठिकाणीं स्वातंत्र्याचा लोप झालाच म्हणून समजावें.

'सहप्रवासी' हा शब्दच मुळीं Poputchiki (पॉपुटचिकी) या रशियन शब्दावरून बनला आहे. रशियन भाषेंतील पॉपुटचिकी या शब्दाचा अर्थ 'एकाच मार्गावरून जाणारे प्रवासी' असा होतो. रशियांत बोल्शेविक क्रांति यशस्वी झाल्यावर हा शब्द वापरांत येऊं लागला. आपल्या राजवटीला विस्तृत पाठिंबा आहे हें दर्शविण्याच्या उद्देशानें सोव्हिएट साम्यवादी पक्षानें त्यावेळीं कांहीं अपक्षीय व्यक्तींना प्रतिष्ठेच्या– पण वास्तवांत कांहीं अधिकार नसलेल्या– जागांवर नेमलें. त्यांच्या संदर्भांत 'सह–

प्रवासी ' हा शब्दप्रयोग वापरांत येऊं लागला. परंतु थोड्याच वर्षांनीं या शब्दप्रयोगास शिवीचें स्वरूप प्राप्त झालें. केवळ 'सहप्रवासी'च रहाणें म्हणजे सो. राजवटीवर संपूर्ण श्रद्धा नसल्याचेंच द्योतक नाहीं का ? म्हणून 'सहप्रवासी' हे संशयास्पद प्राणी वाटल्यास नवल नाहीं ! जे एकाच मार्गावरून प्रवास करणारे सहप्रवासी साम्यवादी पक्षाला सामील झाले नाहींत, त्यांचा मार्ग अचूकपणें वेठबिगारीच्या छावण्यांना किंवा मृत्यूच्या खाईलाच भिडला. आणि आतां खुद्द सो. रशियांत 'सहप्रवासी' ही चीज अस्तित्वांत नाहीं.

मात्र सो. रशियाबाहेर विशेषतः लोकशाही देशांत 'सहप्रवासी' जमातीला सक्रिय उत्तेजन देण्यांत येतें आणि त्यांचा मतलबी उपयोगहि करून घेण्यांत येतो. सहप्रवासी हें साम्यवादी प्रचार यंत्रणेचें एक महत्त्वाचें अंग आहे तसेंच उत्कृष्ट माध्यम ही आहे. त्या माध्यमांतून सो. रशियाला अनुकूल असें मत समाजाच्या निरनिराळ्या स्तरांत निर्माण करण्यांत येतें. कामगार संघटनांसारख्या निरनिराळ्या सामाजिक व धंदेवाईक संस्थांच्या सल्लागार समित्या किंवा धोरण समित्या यांच्यांत व शक्य त्यावेळीं सरकारी यंत्रणेंत शिरकाव करून घेण्यासाठीं त्यांचा फार उपयोग होत असतो. पण त्यांचा याहूनहि महत्त्वाचा उपयोग निराळा आहे. हे सहप्रवासी निरनिराळ्या नांवाखालीं राष्ट्रीय व स्थानिक समित्या, संमेलनें घडवून आणतात आणि त्यांतून व त्या त्या वेळच्या साम्यवाद्यांच्या धोरणास अनुकूल असें लोकमत तयार करण्याचा प्रच्छन्नपणें प्रयत्न करतात.

## सहप्रवाशांची जमात

अमेरिकेंतील सहप्रवाशांच्याबाबत असें म्हणतां येईल कीं सांप्रत काळीं त्यांची संख्या थोडी आहे; आणि ते सध्यां आहेतहि शांत. कोरिया प्रकरण आणि हंगेरींतील रशियन दडपशाही यामुळें बऱ्याच जणाचे डोळे उघडले. परंतु स्मरणशक्ति ही क्षीण असते, त्यामुळें ज्यांच्या ध्येयवादाला ज्ञानाची जोड नाहीं व ज्यांचा कडवेपणा अखेर त्यांच्या हृदयांतील अनुकंपेचे झरे आटविण्यास कारणीभूत होतो त्यांच्या वागणुकीबद्दल भाकित करणें फारसें कठीण नाहीं. जेव्हां सो. रशिया तात्विक पातळीवर चढाओ सुरू करील त्यावेळीं त्यांच्यांतील श्रद्धाळूपणा व भाबडेपणा त्यांच्यावर पुन्हा ताबा

मिळवील. म्हणून या विषयावरील आपलें विवेचन केवळ इतिहासाचा मागोवा घेणारें असणार नाहीं. या विषयाच्या विवेचनांत चित्तवेधकपणा आहेच शिवाय त्यामुळें प्रतिबंधक उपाय योजनेचें दिग्दर्शन होऊं शकेल.

अमेरिकन लोकमतावर या 'सहप्रवाशां'चा नेमका किती प्रभाव पडला असेल हें निश्चितपणें सांगणें खरोखरच कठीण आहे. परंतु साम्यवादी पक्ष त्यांनीं अमेरिकेंत चालविलेल्या प्रचार युद्धांतील तीन विजयांचें श्रेय 'सहप्रवाशांना'च देतो. हे तीन विजय म्हणजे स्टॅलिन जेव्हां (महायुद्धाच्या काळांत) दुसऱ्या आघाडीचा आग्रह धरत होता त्यावेळीं दुसऱ्या आघाडीविषयीं प्रभावी लोकमत तयार करण्यांतील यश, सो. राज्यकर्त्यांचा जेव्हां मा. टिटोशीं बेबनाव होऊ लागला होता त्यावेळीं मिखायलोव्हिच (Mikhailovitch) संबंधांत अमेरिकन धोरणांत बदल घडवून आणण्यांतील यश व चांग-कै-शेक हा जपान्यांशी लढणारा वीर नसून लांचखाऊं युद्धखोर आहे असें अमेरिकन लोकमत बनविण्यांतील यश. या विषयाचे अेक गाढे अभ्यासक डॉ. नॉर्बर्ट मुहलेन (Dr. Norbert Muhlen) यांनीं १९४६ मध्यें निरनिराळ्या अमेरिकन मतदानाच्या आंकड्याचा अभ्यास केला. त्यावरून त्यांनीं असा निष्कर्ष काढला कीं 'शंभर अमेरिकन नागरिकांत धड अेक जणहि साम्यवादी नाहीं. परंतु निरनिराळ्या विषयांवर त्यांना हवी तशीं मतें १०० पैकीं सात जणांचीं आहेत.' क्रेमलिन परदेशांत विक्रीसा ीं तयार करीत असलेला तात्विक मालमसाला पाहिला म्हणजे त्यांच्या या कर्तृत्वाचा आकार लक्षांत येईल. गेल्या महायुद्धानंतर ज्या उच्चपदस्थ रशियन नागरिकांनीं अमेरिकेचा आश्रय घेतला त्यांनीं केलेली कामगिरी लक्षांत घेण्यासारखी आहे. ते म्हणाले, रशियांतील 'स्वतंत्र व सुखी' समाजाबद्दलच्या भ्रामक 'रशियन जनतेपेक्षां अमेरिकन जनतेच्या मनांत समजुती उतरविण्यांत स्टॅलिननें अधिक यश मिळवलें आहे!' परंतु हें मत म्हणजे अमेरिकन भोळ्या भाबड्या जनतेला महायुद्धांतील आपल्या सहकाऱ्यांबद्दल वाटणाऱ्या उत्साहांतून निर्माण झालें होतें असें म्हणावयास प्रत्यवाय नसावा. त्यांना रशियन जनता व रशियन राज्यकर्ते यांच्यातील भेद ओळखता आला नाहीं. त्याचप्रमाणें सहप्रवाशांनीं सोव्हिअेट रशियांत अेका नव्या लोकशाहीचा अवतार झाला आहे असा अपप्रचार केला होता त्याला ते बळी पडले होते.

लोकमत तयार करण्याच्याबाबतींत सहप्रवासी किती वाकबगार असतात याचें अस्वस्थ करणारें अेक उदाहरण आहे. १९३९ सालीं साम्यवादी पक्षाच्या अेका आघाडीनें अेक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यांत नाझी राजवटीनें विज्ञानावर दडपशाहीचा वरवंटा फिरविला ह्याबद्दल तीव्र निषेध केला होता. त्यांत पुढें असेंहि जाहीर केलें होतें कीं : "विज्ञानाला देश, वंश, पंथ यांच्या मर्यादा असूं शकत नाहींत. जेथें शांतता असेल व बौद्धिक स्वातंत्र्य असेल तेथेंच तें बहरतें." या जाहीरनाम्यावर १,२८४ प्रमुख अमेरिकन शास्त्रज्ञांनीं सह्या केल्या होत्या. त्याच आघाडीनें त्याच वर्षी दुसरा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यांत फक्त फासिस्ट हुकूमशाह्यांचा धिक्कार केला होता. त्यावर अमेरिकन शिक्षण व प्रसिद्धी क्षेत्रांतील २१६९ विद्वानांनीं सह्या केल्या होत्या. परंतु १९४९ सालीं. सो. रशियांत प्रचंड प्रमाणांवर शास्त्रज्ञांची व कलावंतांची हकालपट्टी करण्यांत आली. तिच्यापुढें जर्मनींत झालेली अशा प्रकारची दडपशाही म्हणजे किस झाड कीं पत्ती. असें असूनहि रशियन दडपशाहीचा निषेध करावयास मूठभर देखील शास्त्रज्ञ आणि शिक्षणशास्त्रज्ञ तयार झाले नाहींत ! ज्यांनीं नाझी राजवटीच्या सांस्कृतिक क्षेत्रांतील दडपशाहीचा निषेध केला होता त्यांच्यापुढें जेव्हां रशियाच्या सांस्कृतिक क्षेत्रांतील जुलमाचा पुरावा आला, तेव्हां त्यांनीं काय केलें हें पहाणें उद्‌बोधक आहे. त्या वेळीं त्यांनीं रशियन राजवटींतील या घटनेविषयीं नापसंती व्यक्त केली पण ज्या दमांत त्यांनीं ही टीका केली त्याच दमांत अमेरिकेंतील तीन दक्षिणी संस्थानांत अस्तित्वांत असलेल्या पण अंमलांत न आलेल्या मूर्ख कायद्यावरून अमेरिकेवरहि टीकेची झोड उठवली ! १९४९ सालीं वाल्डॉर्फ (अॅस्टोरिया) येथें जागतिक शांततेकरितां भरलेल्या शास्त्रीय व सांस्कृतिक परिषदेच्या अध्यक्ष–पदावरून बोलतांना डॉ. हारलो शेपले म्हणाले, "विज्ञान बंधमुक्त झालें पाहिजे– दक्षिण अमेरिकन संस्थानांतून तें बंधमुक्त व्हायला पाहिजे आणि रशियांतूनहि !" (New York Times : March 20, 1949.)

ही परिषद म्हणजे साम्यवादी पक्षाचीच एक आघाडी आहे ही हेरॉल्ड आमिक्स यांनीं केलेली मीमांसा किती सार्थ होती हें यावरून उघड व्हावें. डॉ. शेपले यांनीं जेव्हां नाझी राजवटीचा धिक्कार केला होता त्या वेळीं त्यांना

अमेरिकेंतील दक्षिण संस्थानांत चालू असलेल्या वंशद्वेषाची किंवा तेथील कायदे पुस्तकांत पडून असलेल्या कांहीं मूर्ख कायद्यांची आठवणहि झाली नव्हती हें मोठें अर्थपूर्ण नाहीं कां ? पूर्वी रशियांतील वाविलॉव्ह या वंश-शास्त्रज्ञाला बेठबिगारीच्या छावणींत मृत्युमुखीं पडावें लागले आणि इतरहि कित्येक शास्त्रज्ञांची तीच गत झाली. त्या वेळीं डॉ. शोपले यांनीं या कृतींचें वर्णन 'बडतर्फी' असें केलें होतें याचीहि येथें आठवण व्हावी.

## सहप्रवासी कोणाला म्हणावें ?

सहप्रवासी कोणाला म्हणावें ? येथें वर्गवारी करणें आवश्यक आहे. जेव्हां जेव्हां एखाद्या लोकशाहीवाद्याला किंवा उदारमतवादी व्यक्तीला सह-प्रवासी म्हणून हेटाळण्यांत येतें किंवा एखाद्या पुरोगामी कायद्याला 'साम्य-वादी' वळणाचा कायदा म्हणून संबोधण्यांत येते तेव्हां तेव्हां साम्यवाद्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत असतात. एका विशिष्ट प्रतिक्रियेचा उपयोग दुसऱ्यांना व्हावा हा अनुभव सार्वत्रिकच आहे नाहीं का ? म्हणून स्वतंत्रपणें कोणालाहि 'सहप्रवासी' म्हणून ठरविण्याचा मोह आवरणें अिष्ट आहे.

सांस्कृतिक स्वातंत्र्य समितीच्या अमेरिकन शाखेचा पदाधिकारी म्हणून काम करीत असतांना त्या संघटनेंतील सहकाऱ्यांसह 'सहप्रवा-शां'च्या स्वरूपाचें साम्यक् आकलन व्हावें म्हणून साम्यवाद्यांच्या आघा-ड्यांचा प्रस्तुत लेखकानें अभ्यास केला होता. संबंधित आघाड्यांतील कांहीं आघाड्या या घातपाती आहेत असें न्यायखात्यानें स्पष्टपणें सांगितलें आहे अशा प्रकारच्या 'आघाड्या' संघटित कराव्या असा आदेश प्रथम कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे चिटणीस श्री. क्युसिनेन यांनीं दिला होता. "The Communist" या अमेरिकन नियतकालिकांत त्यानें उघडपणें लिहिलें कीं, " सूर्यमालिकेप्रमाणें आपणहि साम्यवादी पक्षाभोंवती संघटनांचे व लहानसहान समित्यांचें कडें निर्माण केलें पाहिजे. व त्या आपल्या पक्षाच्या प्रत्यक्ष प्रभावाखालीं कार्य करतील हें पहा-वयास हवें." फॉस्टर व अितरांनींहि अशाच प्रकारचीं वक्तव्यें केलीं आहेत. अशा संघटनांची ओळख पटण्याच्या सुपरिचित कसोट्या म्हणजे त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या लिखाणाचा आशय, त्यांचें पदाधिकारी व अधिकृत पक्षांच्या वृत्तपत्रांचें त्यांच्याविषयींचें धोरण वगैरे होत.

जी व्यक्ति कमीत कमी वीस आघाड्यांची सदस्य असेल ती व्यक्ति 'सहप्रवासी' असें समजून संशोधन करतां असें आढळून आलें कीं प्रमुख अशा १०० सहप्रवाशांपैकीं चोवीस जण प्राध्यापक होते, एकवीस जण लेखक किंवा संपादक वर्गांतले होते, नऊ नट किंवा निर्माते होते, आठ धर्मोपदेशक होते तर आठ वकील वर्गांतले होते आणि त्यांत सहा लखपतीहि होते.

साम्यवादी सहप्रवाशांची नाझी सहप्रवाशांशीं तुलना करणें बोधप्रद ठरावें. नाझी सहप्रवाशांचें त्यांच्या देशांतील व परदेशांतलें अस्तित्व उपेक्षणीय नव्हतें हें देखिल ध्यानांत ठेवावयास पाहिजे. नाझी सहप्रवासी बहुधा उत्कृष्ट वर्तुळांतील असत. उदाहरणार्थ लेनार्ड व स्टार्क हे दोघेहि नाझी सहप्रवासी विज्ञानशास्त्रांतील नोबेल पारितोषिक विजेते होते. त्यांनीं त्यांच्यासारख्या अितर शेंकडोंजणांप्रमाणें नाझी राजवटीचा पुरस्कार कधीं ना कधीं केला होता. 'जर्मन विज्ञाना'चा सिद्धान्त लेनार्ड यांनीं मांडला व त्याचा त्यांनीं विकास केला तर त्यांचा शिष्य स्टार्क यानें असें जाहीर केलें कीं, "भौतिक शास्त्रांतील स्वायत्ततेची (Formalism) ज्यूंची विचारसरणी सर्वस्वी त्याज्य मानली पाहिजे. अितरांनीं कलेंतील स्वायत्ततेविरुद्ध शस्त्र उचललें. शास्त्र व कला यांच्या स्वायत्ततेला सर्वच हुकूमशाही राजवटींचा विरोध असतो. कारण तसें केलें नाहीं तर तीं देश व वर्ग यांच्या सीमा ओलांडतात असा त्यांचा रास्त समज आहे.

स्वदेशांतील काय किंवा परदेशांतील काय नाझी सहप्रवासी हे खंबीर वृत्तीचे, राष्ट्रीय दृष्टिकोनाचे व सामाजिक बाबतींत कर्मठ असे होते. साम्यवादी सहप्रवाशांची स्थिति उलट आहे. सुरवातीला तरी त्यांची प्रेरणा पिळल्या गेलेल्यांच्या सहानुभूतींतून निर्माण झालेली असते. पण त्यांच्या तत्त्वज्ञानविषयक निष्ठेमुळें त्यांच्यांत हलके हलके फरक पडत जातो. मग त्यांना नाझींनीं केलेले अत्याचार निषेधार्ह वाटत असले तरी तसलेच अत्याचार सो. रशियानें केलें तर ते त्यांना क्षम्य वाटतात.

खऱ्या 'सहप्रवाशां'ची दोन भागांत विभागणी होते. पहिल्या भागांत साम्यवादी तत्त्वज्ञान पटलेल्या परंतु साम्यवादी पक्षांत शिरण्याचें धैर्य नसलेल्या अशा व्यक्ति असतात. त्यांच्या या विशिष्ट परिस्थितीमुळें त्यांच्या

मनांत एक प्रकारची अपराधीपणाची भावना असते. त्यामुळें साम्यवादी पक्षाला त्यांचा फार फायदा करून घेतां येतो. मात्र साम्यवादी कार्यकर्त्यांच्या मनांत या वर्गातील सहप्रवाशांबद्दल फारशीं आपुलकी नसते. कारण त्यांना त्या वर्गातील व्यक्तीसारखें रहातां येत नाहीं. उलट त्यांना धोक्याखालीं वावरावें लागतें; आणि त्याचा मोबदला काय तर 'ऐतिहासिक गरजेच्या नियमां'चे स्वतः प्रतिनिधि आहोंत या कल्पनेंत मश्गूल रहाणें हाच. शिवाय या नियमांचा अर्थ लावायचा तो क्रेमलिननें!

पहिल्या विभागांतील सहप्रवासी सामान्यपणें पक्षाच्या आघाड्यांचे चिटणीस किंवा असेच पदाधिकारी असतात. त्यांच्यावर बिकट कामगिरी सोंपविलेली असते त्यामुळें त्यांना कमालींचा दुटप्पीपणा व लबाडी करणें आवश्यक होतें. त्यामुळें त्यांची परिस्थिति चमत्कारिक होते. आपले पक्ष सदस्यत्व लपविणाऱ्या साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांची परिस्थिति अशी होत नाहीं. कारण त्यांना साम्यवादी पक्षाचें हत्यार म्हणून काम करीत असतांना किंबहुना तें करण्यासाठींच त्यांना आघाड्यांतून 'स्वतंत्र'पणें भाषणें करणें भाग पडते. कारण अशा आघाड्यांचे बहुसंख्य सभासद बिगर साम्यवादी असतात. त्यांच्या कार्यामुळें ते कधीं कधीं अशी परिस्थिति निर्माण करतात कीं त्यांचा साम्यवादी पक्षास फारसा उपयोग होण्यासारखा नसतो. त्यावेळीं त्यांना पक्षाचें सदस्यत्त्व उघडपणे स्वीकारणें भाग तरी पडते किंवा त्यांच्या जागीं नवे आणि फारसे प्रसिद्ध नसलेले सहप्रवासी आणावे लागतात.

परंतु पहिल्या वर्गातील सहप्रवाशांपेक्षां दुसऱ्या वर्गातील सहप्रवाशांची संख्या कितीतरी पटीनें अधिक असते. त्या वर्गांतील स्त्री–पुरुष हे अत्यंत कळकळीचे आणि प्रामाणिक असतात. आपापल्या खास क्षेत्रांत त्यांची बुद्धिमत्ता लक्षांत येण्याइतक्या तीव्र गतीनें चालते. खालील गोष्टीवर त्यांचा विश्वास असतो. कुणाचा त्यांच्यावरील विश्वास अधिक तीव्र तर कुणाचा कमी असेल इतकेंच.

## सहप्रवाशांचीं श्रद्धास्थानें

(१) सोव्हिएट रशियांतील समाजरचना ही पुरोगामी समाजरचना

आहे. त्यांत ज्या थोडयाफार उणीवा असतील त्या तुलनेनें किरकोळ आहेत व त्या संक्रमणावस्थेंतील आहेत.

(२) सोव्हिएट रशियापेक्षां अमेरिकेकडूनच जागतिक शांततेला अधिक धोका आहे. सो. रशियाला अितर देशांत क्रांति घडवून आणावयाची नाहीं. स्वतःचा विकास घडवून आणण्यांतच तो मश्गूल आहे.

(३) उदारमतवादी सुधारणा घडवून आणण्यासाठीं चाललेल्या महान् आंदोलनाचा साम्यवादी पक्ष हा एक भाग आहे. त्याचें तें ध्येय हें सर्व 'पुरोगामी वृत्ती'च्या लोकांना समान आहे. त्याचा शत्रू हा कधीच 'डावा' नसतो तो अपरिहार्यपणें 'उजवा'च असतो. येथें 'डावा' किंवा 'उजवा' हे शब्दप्रयोग कार्यक्रम किंवा धोरण यांमुळें निश्चित केलेले नसून अंतिम ध्येयाच्या अनुशंगानें हा शब्दप्रयोग करण्यांत येतो.

(४) चांगल्या कारणाकरतां साम्यवाद्यांबरोबर कोणत्याहि संघटनेंत काम करणें अिष्टच आहे. मग त्या संघटना कोणीहि नियंत्रित केलेल्या असोत. अशा सहकार्याविषयीं जे नाकें मुरडतात ते अंध साम्यवादविरोधक होत. (सहप्रवाशांच्या शब्दकोशांत 'अंध फासिस्ट विरोधक' हा शब्दप्रयोग नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. 'फासिस्ट' हा शब्द प्रतिगामी शब्दाचा व कधी कधीं सनातनी या शब्दाचा समानार्थी शब्द म्हणून वापरण्यांत येतो.)

त्यांचे हे मुद्दे क्रमानुसार तपासून पाहूं. आजच्या जमान्यांत सो. रशियांतील समाजरचना ही पुरोगामी आहे व फ्रेंच राज्यक्रांतीनें घालून दिलेल्या शिकवणुकीनें व अमेरिकन क्रांतीनें सुरवात करून दिलेल्या पुरोगामी मार्गानें सो. रशियाची प्रगति चालू आहे असें समजणें चुकीचें आहे. उपलब्ध पुराव्याच्या कसोटीवर ती समजूत जराहि टिकणार नाहीं. सो. रशियांत चालू असलेल्या प्रथा या दृष्टीनें फारच बोलक्या ठराव्यात. टीका करण्याच्या राजकीय स्वातंत्र्याचा तेथें संपूर्ण लोप आहे. कामगारांचा संप करण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. उत्पन्नांतील विषमता आणि जीवनाच्या दर्जांतील तफावत केवळ विदारक वाटावी अितकी प्रचंड आहे. तो देश म्हणजे सक्तीच्या वेठबिगारीच्या छावण्यांचें जणू पोळेंच झाला आहे. त्या छावण्यांत कोणकोण लोक आहेत, कितीजण आहेत याची बाहेरच्यांना कल्पनाहि नाहीं. शास्त्र आणि कला यांवर तेथें नियंत्रण आहे

पोलिस खात्याचें! फार काय परदेशीय व्यक्तीबरोबर लग्न करण्याची मुभाहि तेथील नागरिकांना परवांपर्यंत नव्हती!

साम्यवादांतील उद्‌घोषित ध्येयाकडे बोट दाखवून सहप्रवासी वरील प्रकारांचें स्पष्टीकरण करूं पहातील. स्पेनच्या घटनेच्या संदर्भांत स्पेनमधील वास्तव स्थितीचें कोणी वर्णन केलें व सो. रशियांतहि घटना आणि वस्तुस्थिति यांत अशीच तफावत आहे असें सूचित केलें तर ते केवळ टर उडवतील. कारण त्यांना असें वाटतें कीं सो. रशियाची घटना ही केवळ तेथील वस्तुस्थितीचें प्रतिबिंब आहे.

**खास तंत्र**

या संदर्भांत त्यांच्या एका तंत्राचा खास उल्लेख करावयास हवा. सर्व सहप्रवाशाचें तें वैशिष्टयपूर्ण लक्षणच म्हणावयास हरकत नाहीं. परदेशांवर टीका करतांना ते आपल्या देशांतील टीकास्पद गोष्टींचा उल्लेख कटाक्षानें टाळतील. परंतु सो. रशियावर कुणी टीका केली कीं ते ताबडतोब आपल्या देशांतील अनुचित गोष्टींचा उल्लेख करतील. मग त्यांना दोन्ही देशांतील अनुचित गोष्टींवर टीका करण्यांत यावी असें कोणी सुचविलें तर ते अचूकपणें सांगतील : "आपण आपल्या घरांत काय चाललं आहे याकडेच आधीं लक्ष द्यायला पाहिजे. इतर ठिकाणीं काय चाललें आहे त्याच्याशीं आपल्याला काय कर्तव्य?" परंतु जेव्हां साम्यवादी पक्ष इंग्लंड, फ्रान्स किंवा इस्त्रायलसारख्या अन्य देशांच्या निषेधाची मोहीम सुरू करतो तेव्हां सहप्रवासी किंचाळून सांगतील कीं मानवता, स्वातंत्र्य इ. मूल्यें धोक्यांत आलीं आहेत व हीं मूल्यें देशांच्या सीमा मानीत नाहींत. परंतु जेव्हां रशियांत मानवतेविरुद्ध गुन्हा करण्यांत येतो तेव्हां मात्र ते 'आपलें घर आधीं सुधारा' असा उपदेश करतील. नाझींच्या राजवटींत 'Reichstag Fire Trials' या नांवानें कुप्रसिद्ध असलेले विरोधकांवरील खटले भरण्यांत आले तेव्हां त्यांविरुद्ध सहप्रवाशांनीं लोकांच्या सदसद्‌विवेकबुद्धीला आवाहन केलें. पण 'Moscow Trials' म्हणून गाजलेले रशियांतील तशाच प्रकारचें खटल्याचें वृत्त बाहेर येऊं लागलें, तेव्हां त्याच्यांत अधिकच तकलुपीपणा आहे असें दिसून आलें. त्यावेळीं आरोपींना बचावाची संधि मिळावी व सत्य काय तें समजावें म्हणून प्रयत्न कर-

णारांना त्यांनीं सांगितलें काय तर 'आपल्या देशांत जे कायदेशीर अन्याय होतात त्याचें निराकरण करणें हेंच आपलें प्राथमिक कर्तव्य आहे'. या प्राथमिक कर्तव्याच्या जाणीवेनें त्यांनीं नाझींचा निषेध करण्यास नकार दिला असें घडलें नाहीं. नाझींची जोरदार निषेध-मोहीम त्यांनीं चालविली तेव्हां ही त्यांना आपल्या या प्राथमिक कर्तव्याचें विस्मरण पडलें होतें ! दोन महायुद्धांच्या मध्यंतरांत मध्य युरोपांत राजकीय मतभेद असणाऱ्या विद्यार्थ्यां-विरुद्ध पक्षपात करण्यांत येत असे. त्या वेळीं सहप्रवाशांनीं एका सुरांत निषेध चालविला होता. परंतु १९४८ सालीं साम्यवादी राज्यक्रांतींत शांततामय निदर्शनें करणाऱ्या झेक विद्यार्थ्यांवर निर्घृण गोळीबार करण्यांत आला त्या वेळीं मात्र त्यांनीं मौनच स्वीकारलें. पण तें मौनच त्यांच्या वृत्तीबद्दलचें बोलकें भाष्य नव्हतें का ? त्याबद्दल त्यांना प्रश्न केला तेव्हां त्यांनीं काय उत्तर द्यावें ? ते म्हणाले, "आमच्या देशांतील विद्यार्थ्यांचें शैक्षणिक स्वातंत्र्य हा आमच्यापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे !"

मानवी मनाचा दुटप्पीपणा कोणत्या थरापर्यंत जाऊं शकतो याचें प्रत्यंतर साम्यवाद्यांच्या वर्तनांतून मिळतें. फ्रेंच छत्रीधारी सैनिकांनीं अल्जेरियांत अत्याचार केले त्यावेळीं फ्रेंच साम्यवाद्यांनीं निषेधाचा गदारोळ उठविला. परंतु त्याचबरोबर रशियाच्या लाल सेनेनें 'पोलादी पडद्या' आडील देशांतील बेगुनाह जनतेवर जे अनन्वित अत्याचार केले त्याचें त्यांनीं हिरीरीनें समर्थन केलें. सहप्रवासीदेखील कांहीं वेळां हा पल्ला गांठतात व मॉस्को खटले व हत्याकांड ते क्षम्य समजतात व त्यांचा निषेध मात्र ते चुकूनसुद्धां कधीं करीत नाहींत.

त्यांच्यापैकीं कांहीं वजनदार सहप्रवासी आपल्या सुरुवातीच्या ध्येयवादी वृत्तींतून नवी वृत्ति धारण करतांना दिसतात. त्याला ते 'कठोर वास्तववाद' म्हणतात. ते सो. रशियांतील वस्तुस्थिति मान्य करतील. परंतु प्रगतीकरितां आवश्यक अशी ती किंमत आहे म्हणून तिचें गांभिर्य कमी करण्याचा प्रयत्न करतील. दुसऱ्यांच्या दुःखाची व यातनांची त्यांना काडीमात्रहि क्षिति वाटत नाहीं.

### भ्रम निरासाचा मार्ग

सो. रशियानें कांहीं बाबतींत यश मिळविलें आहे ही गोष्ट निर्विवाद

आहे. परंतु त्यासाठीं मानवी यातनांची जी किंमत मोजावी लागली ती टाळणें शक्य होतें किंवा नाहीं, दुसऱ्या अधिक मानवी आणि विवेकी मार्गांनीं त्या गोष्टी हस्तगत करतां आल्या असत्या किंवा नाहीं याचा ते सहप्रवासी विचार करावयास तयार नसतात.

दुसऱ्या क्रमांकाच्या मुद्यावर सहप्रवासी कसा विश्वास ठेवतात बरे? त्याचें कारण माझ्या मतें असें आहे कीं सहप्रवाशांपैकीं नवागतांना प्रचंड साम्यवादी पक्षाच्या वाङ्मयाची कल्पनाहि नाहीं. त्या लिखाणांतच जागतिक क्रांतीचा आराखडा त्यांनीं काढून ठेवला आहे. तें वाङ्मय म्हणजे साम्यवाद्यांचें मार्गदर्शक तत्त्व आहे. निरनिराळ्या वेळीं कोणत्या प्रकारचे डावपेंच स्वीकारावे, सत्तासंपादनासाठीं कशा प्रकारें घातपाती मार्गांचा अवलंब करावा याचेंहि दिग्दर्शन त्यांत आहे.

ज्या सहप्रवाशांनीं साम्यवादी तत्त्वज्ञानाचा अंगीकार केला नाहीं त्यांना जागे करणें शक्य आहे असें मला वाटतें आणि त्यासाठीं साम्यवाद्यांच्या या वाङ्मयाच्या अभ्यासाइतका दुसऱ्या कशाचाहि फायदा होऊं शकणार नाहीं. सहप्रवाशांनीं मोठ्या मुष्किलीनें 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल' नांवाची एक संघटना अस्तित्वांत असल्याची कबुली दिली. परंतु तिचा सो. रशियाशीं कांहीं संबंध नाहीं असें त्यांचें आग्रहपूर्वक सांगणें होतें. याला आधार काय तर म्हणे सो. रशियाच्या घटनेंत त्या संघटनेचा उल्लेखच नाहीं! यावरून साम्यवादी वाङ्मयाच्या अभ्यासाची किती आवश्यकता आहे याची जाणीव व्हावी.

अमेरिकेबाबत बोलावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं त्या देशाच्या परराष्ट्रीय धोरणांतील कांहीं गोष्टींबाबत टीका करणें रास्त आहे असें एखाद्याला प्रामाणिकपणें वाटेल. एखाद्या चुकीच्या वाटणाऱ्या धोरणाविरुद्ध टीका करण्याचा कोणाहि देशभक्त नागरिकाला हक्क आहेच. अशा चुकीच्या वाटणाऱ्या धोरणामुळेंच सहप्रवाशांचें मन उसळून येतें. परंतु साम्यवादी पक्ष त्याचा पुरेपूर गैरफायदा घेतो आणि त्यांच्या या भावनेमुळें अखेरीला ते सोव्हिएट रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार करण्यापर्यंत जाऊन पोहोंचतात.

तिसरा व चौथा मुद्दा म्हणजे साम्यवादी पक्ष हा उदारमतवादी व

कामगार-चळवळीचा वारसा चालवतो असें सांगतात. हे मुद्दे फार महत्त्वाचे असून ते सहप्रवाशांच्या मनांत घर करून राहिलेले असतात. त्यामुळेंच त्यांना–साम्यवादी पक्षाला–एखाद्या कारणाकरितां सहकारी म्हणून स्वीकारणें चुकीचें वाटत नाहीं. या कल्पनांमुळें सहप्रवासी लोकशाही संघटनांत फूट पाडण्यास किंवा त्यांचा घात करण्यास कारणीभूत होतात.

**जाळ्यांत कसें पकडावें**

सहप्रवाशांना जाळ्यांत कसें पकडावें याबद्दल पक्षाच्या सूचना अगदीं स्पष्ट असतात. साम्यवादी पक्षाचें अमेरिकेंतील दैनिक 'Daily Worker'. त्यांत १६ जुलै १९४४ रोजीं लिहिलें आहे कीं "साम्यवादी क्लबानें बाल-संगोपन केंद्राची चर्चा जरूर करावी. पण स्वतःच्या नांवानें अशीं केंद्रें चालविण्यापेक्षां अस्तित्वांत असलेल्या इतर संघटनांच्या चालकांना भेटून त्यांच्या सहकार्यानें या कार्यासाठीं योजना आंखावी" अशा प्रकारचे कार्यक्रम हे स्थानिक पातळीवर असतात, तर राष्ट्रीय पातळीवर शांतता, नागरिक हक्क किंवा फासिझमविरोधी निर्वासितांना मदत असे प्रश्न हाताळण्यांत येत असतात.

पुढील पायरी म्हणजे अशा कारणासाठीं (उदा. शांतता आंदोलन) एखाद्या सुप्रतिष्ठाचें नांव हुडकून काढणें. अशा सुप्रतिष्ठितांपैकीं जो कोणी कार्यक्रमाला आपली अर्धवट संमति असल्याचें दर्शवील त्याचें नांव घेऊन निरनिराळ्या क्षेत्रांतील महत्त्वाच्या व्यक्तींकडे विचारणा केली जाते कीं आपणहि सुप्रतिष्ठित आहांत. तर आम्ही काढीत असलेल्या संयुक्त पत्रकावर सही करावयास तयार आहांत काय ? एका नांवामुळें दुसरें नांव सहज मिळूं शकतें. थोड्याच दिवसांत एक संघटना उभी रहाते. तींत आपले पित्ते मोठ्या हुशारीनें पेरलेले असतात. जर अजूनहि श्री. सुप्रतिष्ठित संदेहांत असले तर इतरांच्या नांवाच्या प्रभावामुळें–जीं नांवें यांचें नांव पुढें केल्यानेंच मुख्यतः मिळालेलीं असतात–आपली अर्धवट संमति त्यांना पुरी करावी लागते.

एकदां कां त्याचें नांव यादींत आलें कीं तें तसेंच रहावें असें साहजिकपणेंच त्याला वाटत असतें. त्याचबरोबर त्याला ज्यांच्या संगतींत आपण रहावें असें वाटतें अशीं चारदोन नांवेंहि त्या संघटनेच्या यादींत

असतातच. आपणाला संघटनेंत ओढण्यांत आलें हें दिसूं नये अशीच त्यांचीं इच्छा असते. कारण कुणालाहि आपण भोळे किंवा बावळट ठरलों हें दर्शविणें आवडत नाहीं. राजिनामा देणें हें भेकडपणाचें वाटतें. त्यांचें नांव घालण्यांत पुढाकार घेणारे ही गोष्ट त्यांच्या नजरेला चटकन आणून देतात. त्याचबरोबर राजिनाम्यामुळें वाईट रीतीनेंच प्रसिद्धि होत असते. त्याला संघटनेंत काम करायला वेळहि नसतो आणि गटबाजींत पडणें त्याला आवडतहि नसतें. निष्क्रीय रहाणें हाच उत्तम मार्ग असें त्याला वाटल्यास नवल नाहीं. जे कुणी त्याला याबाबतींत जागे करूं पाहतात त्यांना कृतज्ञतेचे दोन शब्द ऐकायला मिळावयाचे नाहींत; उलटी त्याच्या क्रोधालाच बळी पडण्याची शक्यता अधिक. 'League against War & Fasism' ही साम्यवाद्यांची अमेरिकेंतील एक प्रबळ आघाडी. त्यांच्या संघटनेच्या मार्गदर्शक पुस्तकांत सूचना दिली आहे : "समाजांत ज्यांच्या नांवाला मान आहे अशांपैकीं जे निष्क्रीय राहून आपलीं नांवें देऊं इच्छितात त्यांचीं नांवें तात्पुरत्या समित्यांवर जरूर घालण्यांत यावींत." बहुसंख्य आघाड्यांच्या संघटनांत असे निष्क्रीय कार्यकर्ते जास्त ! जेव्हां एखादी व्यक्ति अशा सुमारें वीस संघटनांचें सदस्यत्व स्वीकारते तेव्हां तिला खुशीचा मदतनीस समजावयास हरकत नाहीं. प्रामाणिक लोकशाहीवादी त्याला त्याच्यावरील संघटनात्मक जबाबदारीची जाणीव करून देतात. त्यांच्यामधील भेदांच्या रेषा पुसून टाकण्याच्या साम्यवादी उद्योगांची त्याला माहिती देतात. म्हणूनच जेव्हां तो अशा बऱ्याचशा आघाड्यांचा सदस्य बनतो त्या वेळीं आपण अज्ञानामुळे या गोष्टी केल्या असें तो म्हणूं शकत नाहीं.

क्रियाशील सहप्रवाशांवर मात्र पक्षाच्या धुरीणांचें बारीक लक्ष असतें. शांतता, युद्ध वगैरे प्रश्नांबाबत ते पक्षाच्या धोरणाप्रमाणें वळणें, वांकणें घेऊन पक्षीय डावपेंचांत अधिकाधिक अटकूं लागले तर ठीकच आहे. परंतु जर का त्यांतल्यापैकीं कुणाचेहि डोळे उघडले आणि त्याला समजून आलें कीं प्रत्यक्षांत संघटना एका पक्षाकडून चालविली जात आहे तर तो या गोष्टीचा निषेध करूं लागतो. त्या वेळीं त्याचा 'उपद्रवी प्राणी', 'अप्रामाणिक लोकशाहीवादी' आणि कधीं कधीं तो कणखर वाटला तर 'ट्रॉट्स्कीवादी', 'छुपा फासिस्ट' किंवा ज्यामुळें वातावरणांत धुरळा उडून मूळ गोष्टीवरून

लक्ष दूर होईल अशा शेलक्या शिव्यांचा त्याच्यावर वर्षाव करतात.

आघाडीचें सूत्रसंचालन पक्षाकडून होतें याचा निर्विवाद पुरावा पुढें दिसला म्हणजे प्रामाणिक सहप्रवाशांना नवल वाटतें आणि थोडी रुखरुखहि वाटते. ते मग बरेच वेळां प्रामाणिकपणें म्हणतात, "जसे साम्यवादी आम्हांला वापरतात तसें आम्हींहि साम्यवाद्यांना वापरतोंच. पण कसेंहि झालें तरी शांतता किंवा गरीब मुलांना मोफत दूध योजना वगैरेंचा फायदाच होतो" हें त्यांचें म्हणणें जर खरें असतें तर साम्यवादी, फासिस्ट किंवा इतर कोणताहि गट यांच्याबरोबर सहकार्य करून काम करण्यास खास कांहीं अर्थ लाभता. पण दुर्दैवानें तें खरें नाहीं.

'गरीबांच्या मुलांना मोफत दूध' या नांवानें उघडलेल्या आघाड्यांचें काय होतें तें पहाण्यासारखें आहे. जर खरोखरच दूध वांटण्यांत आलें तर त्याबरोबरच राजकीय प्रचारहि केला जातो. जर हें दूध परदेशीं पाठवावयाचें असेल तर तें बिगर साम्यवादी गरीबांच्या मुलांना मिळण्याची शक्यताच नसते. त्याचप्रमाणें एखाद्या सभेंत जेंव्हां सभासदांची उपस्थिति कमी असते त्या वेळीं चिटणीस महाशय सरकारच्या एखाद्या धोरणाच्या निषेधाचा ठराव मांडतो. या ठरावाचा येथें संबंधच काय असा कुणी प्रश्न केलाच तर तो प्रतिगामी आहे म्हणून त्याचा पाणउतारा करण्यांत येईल. याशिवाय या आघाडीनें गोळा केलेला निधि त्याचे हिशेब हिकमतीनें लिहून दुसऱ्या साम्यवादीप्रणित आघाड्यांकरितां आणि त्या पक्षाच्या राजकीय कार्याकरितां वापरण्यांतहि येतो.

शेवटीं सर्व वस्तुस्थिति प्रकाशांत येते तेव्हां गरीबांच्या मुलांना मोफत दूध देण्याची योजना कुठेतरी तडजोड करून गुंडाळण्यांत येते. नाझी-विरोधी बहिष्कार समिति ( Anti Nazi Bycott League ) सारखी कधीं तिची स्थिति होते. त्यासंबंधीच्या पक्षाच्या धोरणानें एका रात्रींत कोलांटी घेतली आणि तिच्या माथीं खिळेठोक झाली. किंवा 'शांतता व लोकशाहीसाठीं अमेरिकन संघ' या आघाडीचें झालें तसें तिचें होतें. ( हीच आघाडी पूर्वीं युद्ध व फासिझम विरोधी संघ म्हणून ओळखली जात होती.) सोव्हिएट रशियाच्या परराष्ट्र धोरणाच्या सोयीसाठीं ती आघाडी खोल गाडण्यांत आली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि.



ज्यांना असें वाटतें कीं आपण साम्यवाद्यांना वापरूं शकूं त्यांनाच साम्यवादी वस्तुतः वापरीत असतात. जे कोणी **साम्यवाद्यांबरोबर** काम करतात ते परिणामाच्या दृष्टीनें **साम्यवाद्यांकरितां** काम करीत असतात आणि ज्या उद्दिष्टांकरितां संयुक्त आघाडी उभारलेली असते त्या उद्दिष्टांच्या बाबतींतच तडजोड केली जाते. या साऱ्यांचें मोठें नाटयमय पण निर्णायक निष्कर्ष दाखविणारें उदाहरण म्हणजे हेन्री वॉलेस यांना आलेला अनुभव होय. ते १९४८ सालीं पुरोगामी पक्षातर्फे (Progress Party) निवडणुकीला उभे होते. त्यांनीं श्री. हर्बर्ट ए. फिल्ब्रिक यांना लिहिलेलें पत्र ता. १४ फेब्रुवारी १९५२ रोजीं The New York Herald Tribune च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. त्यांत त्यांचा विदारक अनुभव दिसून येतो. श्री. फिल्ब्रिक यांनीं पुरोगामी पक्षांत साम्यवाद्यांनीं जी खेळी केली होती ती श्री. वॉलेस यांच्या नजरेस तत्पूर्वी आणून दिली होती. त्या पत्रांत साम्यवाद्यांनीं पुरोगामी पक्षांतील मोक्याच्या जागा काबीज केल्या आहेत ही माहिती आपण उडवून लावली होती किंवा साम्यवाद्यांचा पाठिंबा मिळवला तर त्यांचेंच अधिक नुकसान होईल याची जाणीव आपणांस होती हें श्री. वॉलेस आपल्या पत्रांत नमूद करीत नाहींत. तें पत्र पुढीलप्रमाणें :

प्रिय श्री. फिल्ब्रिक,

काल मी आपल्याला जेव्हां पत्र लिहिलें त्यावेळीं मी आपल्या I Lead Three Lives या पुस्तकाचीं २४५ पानें वाचलीं होतीं. त्यानंतर मी त्यांतील माझ्या संबंधीचे उल्लेख वाचून काढले. बहुतांशी ते खरे आणि योग्य असे आहेत. माझी देवावरील श्रद्धा आणि 'पुरोगामी भांडवलशाही' वरील विश्वास यांचा साम्यवाद्यांना कांहीं उपयोग नव्हता ही गोष्ट खरी. त्याचप्रमाणें 'पुरोगामी पक्षां'त त्यांनीं माझ्याविरुद्धच कारवाया केल्या हें आपलें म्हणणें मला खरें वाटतें. १९४८ च्या हिवाळ्यांत त्यांच्यामुळें होणारें नुकसान माझ्या ध्यानीं आलें होतें. म्हणून सेंटर सँडविच येथें मी असें म्हटलें होतें कीं "जर साम्यवादी पक्ष स्वतःचा स्वतंत्र उमेदवार उभा करतील तर पुरोगामी पक्षाला ३०,००,००० मतें

निश्चित मिळतील." आतां मागें वळून पाहतां आपलें साम्यवादी पक्ष व पुरोगामी पक्ष यांच्या संबंधाबद्दलचें विवेचन अचूक वाटतें. जो पक्ष बहुमोल कामगिरी करूं शकला असतां त्या पक्षाचें त्यांनीं तीनतेरा केले. लोकशाहीवादी सत्प्रवृत्त लोकांचा व जे शांततेसाठीं आसुसले होते परंतु जे साम्यवाद्यांच्या हिंसा, कपटनीति, कटबाजी यांचा तिरस्कार करीत होते अशांचा तेजोभंग होण्यास तेच कारणीभूत झाले. मी व सौ. वॉलेस यांनीं काल आपलें टेलीव्हिजनवरील भाषण ऐकलें; आपल्या कळकळीचा व आपल्याला माहीत असलेली खरी हकीकत सांगण्याच्या आपल्या उत्कट इच्छेचा आमच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

आपला
अेच्. जे. वॉलेस.

९ फेब्रुवारी १९५२.

प्रामाणिक आणि कळकळीच्या सहप्रवाशांना त्यांच्या भ्रामक समजुतीपासून मुक्त करून त्यांना स्वतंत्र बुद्धीचे व विधायक टीकाकार बनवणें ही गोष्ट सोपी नाहीं. त्यांचा पिच्छा पुरवण्यांतहि अर्थ नाहीं किंवा त्यांना हौतात्म्य लाभूं देअूनहि कांहीं फायदा नाहीं. त्यांनाच नव्हे तर सर्वसाधारण नागरिकालाहि शिक्षित केले पाहिजे. त्यांना दाखवून दिलें पाहिजे कीं साम्यवाद हा पुरोगामी नसून तो प्रतिगामी आहे आणि एका प्रतिगामी गोष्टीला दुसरी प्रतिगामी गोष्ट पर्याय होत नाहीं.

## अुघडें नाहीं रिकामें मन

सहप्रवाशाला वाटतें कीं आपलें मन उघडें आहे. परंतु वस्तुस्थिति तशी नसते. त्याचें मन उघडें नसतें; तें असतें रिकामें. उघडें मन व रिकामें मन यांतील फरक आपण त्याला समजावून सांगितलें पाहिजेत. सहप्रवासीच नव्हे तर अितर कुणीहि इतिहासाची जाणीव ठेवल्याशिवाय राजकारणाचा विचार करूं पाहत असेल तर त्याचें मन रिकामें म्हणावें लागेल. उदाहरणार्थ हिटलरनें आपल्या विस्तारवादी पावलांची तयारी चालवलेली असतांनाच तो आपल्या भोंवतीं इतर राष्ट्रें कडे करीत असल्याचा कांगावा करीत होता. हें न जाणतांच जो राजकारणाचा विचार करूं

म्हणेल त्याचें मन रिकामेंच म्हणावयाचें नाहीं का ? आक्रमक आपल्या आक्रमणाची जी आंखणी वर्षानुवर्षें करीत असतो त्याची कल्पना आज इथली उद्या तिथली अशी घटना पाहून कांहीं लक्षांत येत नाहीं. सह-प्रवासी जरी आपल्या व्यवसायक्षेत्रांत फार काळजीनें काम करीत असला तरी तशीच काळजी तो राजकारणाचा विचार करतांना दाखवीत नाहीं. आपल्या व्यवसायांत तो निकर्ष काढण्यांत काळजीनें वागतो, घाओ करीत नाहीं आणि पुराव्याशिवाय निष्कर्ष लांबणीवर टाकण्याचें धैर्यहि दाखवितो. हे गुण तो राजकीय विचारांच्या बाबतींत दाखवीत नाहीं. एका क्षेत्रांतील शिक्षण तो दुसऱ्या क्षेत्रांत वापरूं शकत नाहीं. बव्लेन याला "शिक्षित अकार्यक्षमता" म्हणत असे. परतु ही गोष्ट राजकारणांत कां दिसून यावी याचें कांहीं तें उत्तर नव्हे.

'American Commonwealth' या पुस्तकांत एके ठिकाणीं लॉर्ड ब्राविस यांनीं केला आहे तो खुलासा अधिक समर्पक वाटतो.

अनेक वेळां असें दिसून येतें कीं गरीब वर्ग व श्रीमंत वर्ग यांची एखाद्या घटनेबद्दल मत भिन्नता दिसते. परंतु नवलाची गोष्ट अशी कीं गरीबांचें मतच योग्य असल्याचें पुष्कळवेळां सिद्ध होतें. आणि जें चांगल्या स्थितींत आणि सुशिक्षित आहेत त्यांचें मत चुकीचें ठरतें. याचें कारण बहुधा असें असेल कीं ज्या कठीण व राजकीय समस्येचें निदान करण्याकरितां ऐतिहासिक व शास्त्रीय माहितीची आवश्यकता असते ती गरिबांजवळ कमी प्रमाणांत असते व सुस्थितींतील लोकांपाशींहि ती त्याहून फारशी अधिक असते असें नाहीं. सामान्य शिक्षणामुळें किंवा पदवी परीक्षेमुळेंहि अशा समस्या सोडविण्याची पात्रता अंगांत येतेच असें नाहीं; परंतु आपल्या सुशिक्षितपणाच्या कल्पनेनें तो आपण अशा बाबतींत अधिक लायक आहोंत असा गैरसमज करून घेतो आणि विरोधी मत किंवा बिनतोड पुरावा यांचा विचारहि करावयास तयार होत नाहीं. सामान्य माणसाचें मन त्या मानानें मोकळें असतें व त्यामुळें त्याच्या अज्ञानाची भरपाई कांहीं अंशीं होते. निदान इंग्लंड व अमेरिका देशांतील सामान्य माणूस हा थोर पुरुष कोण आणि पुढारी कोण हें चाणाक्षपणानें ओळखूं शकतो."

'Fortune' या नियतकालिकानें दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस घेतलेल्या मतदानाचे निष्कर्षहि वरील सत्याशी जुळणारेच आहेत. त्यावेळीं सो. रशियाचें महायुद्धानंतर धोरण कसें राहील याविषयीं कॉलेज शिक्षण घेतलेल्यापेक्षांहि कामगार वर्गाचें भाकित अधिक बरोबर ठरलें. परंतु तसें असलें तरी मॅक्आर्थी व त्याचे सहकारी यांना तात्कालिक कां होईना पण पाठिंबा कां मिळावा तें स्पष्ट होत नाहीं. साम्यवाद्यांच्या मार्गाबद्दल कामगारच अधिक जाणते होते.

लोकशाहीवाद्यांनी साम्यवादी व सहप्रवासी एखाद्या चांगल्या उद्दिष्टाला सक्रिय पाठिंबा देतात म्हणून घाबरण्याचें कारण नाहीं. त्यांनीं साम्यवाद्यांपेक्षां अधिक जोराचे प्रयत्न करावेत. परंतु त्यांनीं स्वतंत्रपणें कार्य करावें. मात्र परराष्ट्राच्या तालावर जे नाचत नाहींत अशा गटाबरोबर सहकार्यहि करावयास हरकत नाहीं.

अमेरिकेंत लोकशाही जीवनाचा विकास करण्यास भरपूर वाव आहे. आणि अमेरिकेंतील अशा विकसित लोकशाहीचें अस्तित्व हेंच मुळी जागतिक स्वातंत्र्याचें प्रभावी समर्थन करूं शकेल. त्यासाठीं राष्ट्राध्यक्षांच्या नागरिक हक्क समितीनें केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करणें, शिक्षण क्षेत्रांतील वाहतुकींतील, घरबांधणींतील व इतरत्र सामाजिक जीवनांत असलेल्या वर्णभेदाला मूठमाती देणें, बहुसंख्यांकांच्या सत्तेला सुरुंग लावूं पहाणाऱ्यांच्या उद्योगावर करडी नजर ठेवणें, स्थानिक परिस्थितीमुळें जेथें शैक्षणिक सोयी करणें शक्य नसेल तेथें संघ–सरकारचें सहाय्य देवविणें अशा कांहीं गोष्टींना लोकशाहीवाद्यांना आपल्या कार्यक्रमांत अग्रहक्क द्यावा लागेल.

साम्यवाद हा आजच्या जगांतील स्वातंत्र्यवादी संस्थांना सर्वांत मोठा धोका आहे हें खरेंच पण त्याचबरोबर ही गोष्टहि आपण जाणली पाहिजे कीं साम्यवाद हीच कांहीं अस्तित्वांत असलेली अेकमेव हुकूमशाही नव्हे. कार्डिनल मिण्डस्झेंटी ( Cardinal Mindszenty ) याला हंगेरींत ठेंचून ठार केल्याबद्दल निषेध करतांना आपण बल्गेरिया, इटाली किंवा अर्जेन्टिनासारख्या देशांत प्रॉटेस्टंट पंथीय मंत्र्यांच्या मागें लागलेला ससेमिरा विसरतां कामा नये; रुमानियांतील ज्यूंवरील अत्याचार विस-

चनहि भागणार नाहीं; किंवा फ्रँकोनें ऑस्ट्रेलियन खाणकामगारांना जिवंतपणीं विहिरींत लोटून तेथें सुरुंगाच्या दारूनें त्यांच्या चिंधड्या चिंधड्या उडवल्या ही भयानक गोष्टहि विसरुन चालणार नाहीं.

जेफरसननें अमेरिकन उदारमतवाद्यांकरितां जी कांहीं आध्यात्मिक मूल्यें आपला वारसा म्हणून ठेवलीं त्यांतील कांहीं काळानें आणि यंत्र-युगानें कालबाह्य ठरविलीं असतील पण त्यानें "सर्व प्रकारच्या जुलमा-विरुद्ध निरंतर लढूं" अशी जी जाहीर घोषणा केली ती मात्र तत्कालीन त्याचप्रमाणें आजच्या अमेरिकन लोकशाहीवाद्यांचेंहि मनोगत बोलून दाख-विणारी आहे.

• • •

# हेरगिरीचें तत्त्वज्ञानाधिष्ठित तत्र

सो. रशियाचा अण्वस्त्रहेर क्लॉसफुच्श् ( Klausfuchs ) यांच्यावर ज्यावेळीं अमेरिकेंत खटला भरला गेला आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या पांच सहा अमेरिकन मदतगारांना अटक करण्यांत आली त्यावेळीं त्या गोष्टीचा अमेरिकन लोकमतावर फार खोलवर असा ठसा अुमटला. फुच्श् आणि गोल्ड यांच्या रहस्यपूर्ण हकीकती जसजशा अुलगडत गेल्या तसजसें मानसशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांचें तर कुतूहल वाढत गेलेंच; पण ज्या ज्या व्यक्तींना स्वातंत्र्याच्या संरक्षणाची काळजी व.टत होती त्यांचेंहि कुतूहल वाढत गेलें. त्यामुळेंच प्रे. ट्रूमन यांना हेरगिरींविरुद्ध कडक अुपाययोजना करण्याबद्दल काँग्रेसला विनंती करावी लागली. साम्यवाद म्हणजे केवळ एक मतप्रणाली आहे–तिचा संबंध केवळ तात्त्विक कल्पनांशींच येतो असा ज्यांचा गैरसमज होता त्यांना साम्यवादाच्या एका नव्या अंगाचा साक्षात्कार त्याच वेळीं झाला. तात्त्विक मतप्रणाली आणि देशद्रोही वृत्ति यांचें वैशिष्टचपूर्ण मिश्रण याचें दर्शन त्यांना त्यावेळीं झालें. व त्यामुळें ते गोंधळले आणि अजूनहि त्यांचा गोंधळ संपलेला नाहीं.

मुत्सद्देगिरीच्या अभिजात परंपरेंत वाढलेल्या कित्येक प्रमुख अशा अमेरिकन किंवा अिंग्रज मुत्सद्यांचा साम्यवादी हेरगिरीनें एवढी मजल मारली असेल यांवर सुरुवातीस विश्वासच बसेना. कॅनडाच्या अधिकाऱ्यांसमोर जेव्हां याबाबतींत पुरावा हजर केला तेव्हां त्यांनीं त्याची टिंगल केली आणि तो दाखल करून घेण्यास त्यांनीं जवळ जवळ नकारच दिला. साम्यवादी हेरगिरीचे महत्त्वाचे धागेदोरेहि सरकारी यंत्रणेनें शोधून काढले नाहींत. ते उघड केले हेरगिरीच्या यंत्रणेस रामराम ठोकलेल्या भूतपूर्व साम्यवादी भाअींनींच. अर्थात् असें करतांना त्यांनीं आपल्या जिवावर संकट ओढवून घेतलें होतें. सरकारी अधिकारी आणि राजकारणी व्यक्ति यांनीं या संदर्भात इतकी अुपेक्षावृत्ति दाखवावी यावरून सर्वसामान्य लोक याबाबतींत किती उदासीन असतील याची कल्पनाच

केलेली बरी. आणि दोन मोठे गाजलेले खटले झाल्यानंतर, अमेरिकेंतल्या सर्वश्रेष्ठ न्यायाधिशांनीं संबंधितांच्या शिक्षांवर शिक्कामोर्तब केल्यानंतर आणि पुराव्याचा डोंगर उभा असतांनाहि आजहि अमेरिकेंतील कित्येक उदारमतवादी व्यक्तींना वाटतें " हें कसें बरें शक्य आहे ? ", " हिस-सारखा माणूस " शत्रूंना आपलीं गुपितें देण्यासारखें बदकर्म करील यांवर त्यांना विश्वासच ठेवतां येत नाहीं. सर्वसामान्य चांगल्या वृत्तीच्या लोकांना असेंच वाटतें. त्यांच्या कामांतील उमदेपणा आणि खाजगी जीवनांतील चारित्र्यसंपन्नता यांचा अशा बदकर्माशीं मेळच कसा बसेल असें त्यांना वाटतें. ही वृत्ति स्वाभाविक नाहीं असें कोण म्हणेल ? तो अमेरिके-पुरतीच मर्यादित आहे असेंहि नाहीं. रोमन्सहि म्हणत " कोणतीहि व्यक्ति अेकाअेकीं नीच बनत नाहीं ! "

आपल्या आदर्श सहकाऱ्यांवर असा अभद्र आरोप केलेला ऐकणें या इतकी गोंधळांत टाकणारी दुसरी गोष्ट नसेल. कारण असा आरोप त्यांच्या व्यक्तिमत्वाशीं संपूर्ण विसंगत वाटत असतो. क्लॉसफुच्श् यांच्या सहकाऱ्यांची आणि त्यांच्या घरमालकिणीची त्यांच्या अटकेच्या वार्तेनें झालेली प्रतिक्रिया लक्षणीय होती. ते म्हणाले कीं ती वार्ता म्हणजे " उच्चार-ताहि येणार नाहीं इतकें अविश्वसनीय नवल होय. " घरमालकिणीनें त्याचें वर्णन " सौम्य आणि पुरा सद्‌गृहस्थ " असें केलें. त्यांच्या सह-काऱ्यांनींहि तसेंच सांगितलें. त्यांच्या मताप्रमाणें तो " अेक शिष्टाचार-संपन्न, आक्रमक वृत्ति नसलेला, नमुनेदार विद्वान " होता. गोल्ड, कॉप्लॅन, स्लेक वगैरेंच्या अटकेची बातमी जेव्हां समजली तेव्हां त्यांच्या सहकाऱ्यांचे उद्‌गार तंतोतंत फुच्श्च्या घरमालकिणीच्या उद्‌गारांसारखेंच होते.

व्यक्ति ज्या व्यवसायांत आहे त्याचें स्वरूप आणि त्याचें व्यक्ति-मत्व यांतील ही महान् तफावत यांची संगति कशी बरें लावावयाची ?

हेरगिरी ही कांहीं नवीन गोष्ट नाहीं. जेव्हांपासून मानवामानवा-मधील संघर्षानें संघटित स्वरूप धारण केलें तेव्हांपासून हेरगिरी अस्ति-त्वांत आली. बायबलमध्येंहि याचे उल्लेख सांपडतात. हेरगिरीच्या तप-शीलाच्या गोष्टी समजणें हें शक्य नाहीं आणि क्वचित् प्रसंगीं त्या उपलब्ध झाल्या तरी हेरगिरीच्या स्वरूपामुळें त्यांचा संपूर्ण इतिहास लिहिणें हें

अशक्यच आहे. मात्र विसाव्या शतकापर्यंत हेरगिरीला फारसें महत्त्व नव्हतें. विशेषतः शांतताकालांत तर त्याला महत्त्व नसायचेंच. ज्यांच्याकरवीं हेरगिरी होई त्यांना समाजांत फारसा मानहि नसे. त्यांचा कनक आणि कामिनी यांच्यामुळें सहज अधःपात होई, किंवा धमक्या किंवा संरक्षणाचें आश्वासन यांमुळें त्यांच्याकडून काम होई. ते ज्यांच्यासाठीं हेरगिरी करीत तेथेंहि त्यांना मान नसे. किंवा ज्यांच्याकडील माहिती ते पुरवीत तेथेंहि त्यांना प्रतिष्ठा नसे. नैतिक प्रतिष्ठेच्या दृष्टीनें ते 'खबऱ्या' पेक्षांहि हीन दर्जाचे असत. कारण 'खबऱ्या' हा स्वतःच्या कांहीं कारणामुळें माहिती देण्यास उद्युक्त होत असे; केवळ जास्तीत जास्त किंमत मोजणारांचे ते धार्जिणे होत नसत. ते काय करीत याची त्यांना नीट कल्पना असे. त्यांचें स्वतःबद्दल तरी चागलें मत असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे.

अलीकडच्या काळांत हेरगिरीची दोन प्रमुख लक्षणें आहेत. पहिलें म्हणजे सैनिकी आणि बिगर सैनिक हेरगिरी—ज्या मधील सीमारेषा कधींच स्पष्ट नव्हत्या—यांतील फरक पार पुसून गेला आहे. आजकालच्या सर्वंकष युद्धांत अुद्योगधंद्याची आणि शास्त्रीय माहिती त्याचप्रमाणें लोकांचें नैतिक धैर्य, विशिष्ट गटांच्या सहानुभूतीचा कल कुणाकडे आहे याची माहिती यांना महत्त्व आलें आहे. दुसरें लक्षण हें प्रामुख्यानें रशियन हेरगिरीचें लक्षण आहे. ते म्हणजे हेरगिरीला तात्त्विक स्वरूप आलें आहे. तात्त्विक स्वरूप अशा अर्थानें कीं पूर्वीप्रमाणें कांहीं फायद्यासाठीं हेरगिरीचें कृत्य करण्यांत येत नाहीं तर हल्लीं राजकीय निष्ठा ही हेरगिरीच्या कृत्याची प्रेरक शक्ति ठरली आहे.

या प्रकारच्या 'तत्त्वाधिष्टित हेरगिरीचें दूरगामी महत्त्व आणि रशियाला त्यापासून मिळणाऱ्या फायद्यांचें स्वरूप फार मोठें आहे. परंपरागत हेरगिरीच्या तंत्राहून या हेरगिरीचें तंत्र आणि स्वरूप भिन्न आहे हें त्याचें कारण. सो. रशिया परंपरागत हेरगिरीच्या तंत्राचा अवलंब करतोच. इतर देशांप्रमाणें धंदेवाईक हेर आणि साहसी लोक यांना त्यांच्या हेर खात्यांत स्थान आहेच. परंतु त्यांचें तें स्थान राजकीय हेतूंनीं प्रेरित होऊन करणाऱ्या हेरगिरीच्या यंत्रणेंत दुय्यम दुव्यांसारखें आहे. या हेरगिरीचें अस्तित्व व तिची परिणामकारकता केवळ अभूतपूर्व होय.

या तंत्राचा सो. रशियाला होणारा फार मोठा फायदा असा कीं निरनिराळ्या देशांतील अनेक व्यक्तींचा ' सांठा ' त्याच्यापाशीं असतो व त्यांतून ते आपल्या हस्तकांची नेमणूक करूं शकतात. हिटलरला हेरगिरीसाठीं परदेशांत एकरूप न झालेले असे जे जर्मन नागरिक असत त्यांच्यावर अवलंबून रहावें लागे. पण असे तद्देशियांशीं एकरूप न झालेले जर्मन लोक वेगळे पडलेले असत आणि त्यांच्याबद्दल लोकांना संशयहि येत असे. परंतु स्टॅलिनला मिळालेले हस्तक हें तद्देशीयच असत व समाजांतल्या अितरांसारखेच त्या देशाच्या परंपरेचा वारसा घेतलेले असत. अर्थातच असे हस्तक हुडकून काढणें कठीणच.

तात्त्विक प्रेरणेनें जे हेरगिरी करावयास सिद्ध होतात अशा हस्तकांसाठीं होणारा खर्च अितर हेरांपेक्षां फार कमी असतो. परंतु सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे असे हस्तक अितरांपेक्षां अधिक विश्वासार्ह असतात आणि अधिक धोका पत्करून ते काम करूं शकतात. धंदेवाअिक हस्तकांना जें काम दुर्घट वाटेल तें काम राजकीय हेर उत्सुकतेनें स्वीकारतील. एकदां का साम्यवादी निष्ठेचा स्वीकार केला म्हणजे आपल्या अीप्सितासाठीं ते समर्पणबुद्धीनें कार्य करतील; आणि वेळप्रसंगीं हौतात्म्य पत्करूनहि नेमून दिलेलें कार्य पार पाडतील.

अशा प्रकारच्या तत्त्वाधिष्ठित हेरगिरीचा उगम चुकीचा आदर्शवाद आणि मिशनरी वृत्ति यांच्या संगमांतून झालेला असतो हें लक्षांत घेतलें पाहिजे. असें म्हणण्यांत त्यांच्या प्रमादाचा गंभीरपणा कमी करण्याचा अर्थातच हेतु नाहीं. हेरगिरी करणारा सो. रसियाचा हस्तक हा क्वचितच आर्थिक दृष्टया हलाखींत असतो. परंतु आपल्या व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळांतच तो सामाजिक न्यायाच्या अमूर्त कल्पनेनें वहावलेला असतो. ही कल्पना कितीहि स्थूल आणि अस्पष्ट असली तरी तिची आंच कमी नसते. सो. रशियाच्या घोषणांवर तो अमर्याद विश्वास ठेवीत असतो; आणि लोकशाहीच्या जमेस जें कांहीं आहे त्याकडे दुर्लक्ष करून तो लोकशाहीच्या मंद गतीचा उतावीळ टीकाकार बनलेला असतो. या दोन्ही प्रवृत्तींचें विलक्षण मिश्रण त्याच्यामध्यें असतें. किंवा सोव्हिएट रशियाच्या शांततामोहिमेंतल्या प्रचाराला तो बळी तरी पडलेला असतो. आणि तो प्रचार सर्वस्वीं

खरा आहे असेंच तो मानत असतो. परिणामतः त्याला वाटतें कीं पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांचें सैनिकी बळ कमी केल्यानें जागतिक शांततेची सुप्रभात जवळ आणण्यास तो मदतच करतो.

युद्धकाळांत या प्रवृत्तींना एक संयुक्तिक आधार सांपडला होता. सो. रशिया हें जर अमेरिकेचें मित्रराष्ट्र तर अमेरिकेची गुप्त माहिती एका मित्र-राष्ट्राला देण्यांत काय चुकलें ? तसें केल्यानें राष्ट्रीय संरक्षणाचें उल्लंघन होत नाहीं. परंतु याच तर्कवादानें सो. रशियाची गुप्त माहिती त्याच्या पाश्चिमात्य मित्र–राष्ट्रांना समजावयास खरें म्हणजे हरकत नसावी. पण अशा सूचनेचा तत्त्वाधिष्ठित हेर तिरस्कारानें अव्हेरच करीत. या प्रकारचें ‘ सहकार्य ’ ही एकतर्फीच वाहतूक होती.

स्वतःच्या देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीनें काय योग्य आणि काय अयोग्य हें ठरविण्याचा खास निर्णयाधिकार स्वतःकडे असल्याप्रमाणें मानण्याची वृत्ति कॅनॅडाच्या हेरगिरी खटल्यांत आणि अमेरिकेंतील कांहीं खटल्यांतून दिसून आली. आपल्या शिक्षेला कांहीं सौम्य स्वरूप मिळाल्यास पहावे या दृष्टीनें केलेली क्लृप्ति म्हणजे कांहीं ही वृत्ति नव्हे. अुच्च व थोर अशा अंगी-कृत कार्यासाठीं करावयास लागणाऱ्या हीन गोष्टीचें समर्थन ते कशा प्रकारें करीत आणि त्या हीन गोष्टींना त्यांच्या खऱ्या स्वरूपांत पहाण्याचें ते नाकारीत तें तरी कशा प्रकारें याचा उलगडा त्या वृत्तीवरून होतो.

कोणतीहि व्यक्ति मूळची कितीहि थोर मनाची असली तरी आपलें अीप्सित साध्य करून घेण्यासाठीं जीं साधनें ती वापरते त्याचा तिच्यावर परि-णाम झाल्याशिवाय रहात नाहीं. जेव्हां दुटप्पीपणा, खोटारडेपणा व विश्वास-घात या गोष्टीं रोजच्याच होतात, नैतिक संवेदना कमी कमी होत जातात तेव्हां त्या व्यक्तीचें व्यक्तिमत्त्वच पार बदलतें. बहुधा सुरुवातीचा ध्येयवादी हा पुढें पाशवी व दोषैकदर्शी बनतो. सुरुवातीच्या काळांतील तात्त्विक विचार हे त्याच्या लेखीं केवळ मंत्र बनतात ! या प्रकारचे व्यक्तित्वांतील बदल हे सर्वच साम्यवादी पक्षाच्या सर्व थरांत कांहीं वर्षांनीं दिसून येतात. परंतु अलीकडच्या पुराव्यावरून हें ‘ सभ्य ध्येयवाद्या’-पासून दयामायाहीन व पश्चात्तापहीन माणसांत होणारें परिवर्तन भूमिगत हेरगिरी करणारांत अधिक जलद गतीनें होतें असें दिसतें.

वरील स्पष्टीकरण संपूर्ण झालें असें नाहीं. कारण साम्यवादी पक्षाचे हेरगिरीच्या कामांत गुंतलेले सभासद आणि नित्याचें राजकीय कार्य करणारे सभासद यांच्यांतील भेद येथें स्पष्ट केलेला नाहीं. ज्याप्रमाणें हेरगिरी करणारे सारे हस्तक हे साम्यवादी पक्षाचे सभासद असतातच असें नाहीं त्याचप्रमाणें साम्यवादी पक्षाचा प्रत्येक सभासद हेरगिरीच्या कामांत भाग घेतोच असें ही नाहीं. अधूनमधून अेखादें विशिष्ट काम करण्यासाठीं त्यांच्यावर थोडी बहुत जबाबदारी सोंपविली जातेहि; पण आपला उपयोग कशा प्रकारें केला जातो याचें त्यांना भानहि नसतें. अेका अर्थीं बदलत्या श्रमविभागणीचें येथें दर्शन होतें; मात्र या कार्यांत भाग घेणाऱ्यांच्या व्यक्तित्वांत ठळक विभाग असलेले दिसून येतात. हेरगिरीसाठीं निवड झालेल्यांपैकीं कांही जण आतुरतेनें हें काम स्वीकारतात; कारण त्यांचा असा गैरसमज असतो कीं आपण या निमित्तानें सत्ताधिशांच्या जवळ जाऊन पोहोंचूं. कांहीं जणांना आपण 'निवडक' किंवा 'वेंचक' लोकांपैकीं आहोंत या भावनेनेंच समाधान होतें. परंतु बहुतेकजण हे साधेभोळे असतात; आणि आपण कशांत गुंततों आहोंत हें त्यांच्या सुरुवातीस ध्यानांतहि येत नाहीं व जेव्हां तें लक्षांत येतें त्यावेळी फार अुशीर झालेला असतो. त्यांच्यापैकीं कांहीं जणांचा कल अद्‌भुतरम्यतेकडे फार असतो; त्यांना असें वाटतें कीं हेराचें जीवन हें बहुरंगी असतें, काव्यात्मक असतें. ही कल्पना वास्तवापासून अितकी दूर असते कीं सर्वसाधारण विवेकबुद्धीचा माणूस त्यावर विश्वास कसा ठेवतो याचेंच आश्चर्य वाटावें.

सोव्हिएट राज्यकर्ते याबाबतींत अनुभवानें शहाणे झाले आहेत. अशा हस्तकांनीं आपल्या कामाचा कांहींतरी मोबदला-- प्रसंगीं प्रतीकात्मक कां होअीना पण तो घ्यावा म्हणून त्यांचा आतां आग्रह असतो. या प्रकारचा मोबदला स्वीकारल्यानें पुढें कधींहि हेरगिरीच्या यंत्रणेपासून दूर होणें मानसशास्त्रीय दृष्ट्या त्यांना कठीण होतें. दुसराहि अेक फायदा त्यांत असतो. मोबदल्यामुळें केंद्राकडून कांहीं सूचना येतात त्यांच्या योग्यायोग्यतेचा विचार एक शुद्ध ध्येयवादी म्हणूनहि करणें त्यांना जमत नाहीं. या कार्यास जो पूर्ण वेळ देतो. त्याला या कामाचा त्याग करतां येत नाहीं. अेकदां त्यानें असें माघारीं न घेतां येणारें पहिलें पाऊल टाकलें त्याला अुशिरा कां होईना हा अनुभव बहुधां येतोच.

हेरगिरीच्या या नव्या तंत्राचा आणखी एक मोठा फायदा असा कीं अनेक मोक्याच्या ठिकाणीं असे हस्तक मिळूं शकतात आणि मोक्याच्या जागीं त्यांचें वाटपहि होऊं शकतें. साम्यवादी पक्षाच्या सभासदत्वाचा परिसर जितका विस्तृत तेवढाच या हस्तकांचा विस्तार असूं शकतो. अेखाद्या हत्याराच्या कारखान्यांतील तंत्रज्ञ, धक्क्यावरचा हमाल, न्यायखात्यांतील कारकून, सरकारी अधिकाऱ्याची पत्नी, विज्ञानप्रयोग शाळेंतील साहाय्यक- बहुमोल बातम्या मिळविण्याच्या दृष्टीनें हे सारें महत्त्वाच्या अशा मोक्याच्या जागीं नाहींत का ?

व्यवसाय व सामाजिक संबंध लक्षांत घेऊन साम्यवादी पक्षाच्या सर्व सभासदांची काळजीपूर्वक वर्गवारी करण्यांत येत असते. ही सर्व माहिती मॉस्कोला धाडण्यांत येते. हेरगिरीकरितां कुणाचीहि निवड करावयाचा प्रसंग आला म्हणजे या माहितीची बारकाअीनें पहाणी होते व मगच योग्य व्यतींची निवड करण्यांत येते. ओटावा (कॅनॅडा) मधील सोव्हिएट राजदूतावासांतील अिव्हान गाऊझेन्को हे सोव्हिएट राजदूतावासांतून पळून गेले. (त्यांनीं कॅनडांत आश्रय घेतला होता) त्यावेळीं त्यांनीं आपल्याबरोबर या माहितीचा दस्तऐवज घेतला होता. त्यावरून हें काम किती व्यवस्थित आणि पद्धतशीर रीतीनें करण्यांत येतें त्याची कल्पना येते. १९४५ सालीं रॉयल कमिशननें सॅम कार यांच्याबद्दलच्या माहितीच्या दस्तऐवजांच्या छायाप्रति (Photostatic Copies) प्रसिद्ध केल्या होत्या. त्यांत त्याला 'फ्रॅंक' हें टोपण नांव देण्यांत आलें असून "त्याच्याबद्दलची संपूर्ण आणि तपशीलवार माहिती कॉमिन्टर्नमधील केंद्रांत मिळेल" अशी नोंदहि केली आहे.

अशा प्रकारच्या हेरगिरीनें सोव्हिएट रशियानें मिळवलेलें यश व हेरगिरीची यंत्रणा हा एक मोठा विरोधाभासच आहे. कारण त्यांना या मार्गानें मिळालेलें यश डोळ्यांत भरण्यासारखें आहे तर ती यंत्रणा कच्ची आणि सुरक्षेचे साधे नियमहि न पाळणारी अशी आहे. जाणत्यांचें मत असें आहे कीं, सोव्हिएट रशियांतील हेरगिरीच्या केंद्राची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते अत्यंत अकार्यक्षम आहेत; शिवाय त्यांना आपल्यासाठीं कार्य करणाऱ्यांबद्दल फारशी काळजीहि वाटत नाहीं. या केंद्रांत अेकेकाळचे अिंग्लंड-

मधील कम्युनिस्ट नेते अलेक्झांडर फूट यांनीं दोन वर्षें काढलीं होती. सोव्हिएट नेत्यांनीं विश्वासू म्हणून त्यांना गणले होतें. साम्यवादी पक्षाला रामराम ठोकल्यावर त्यांनीं 'Hand Book for Spies' हें पुस्तक लिहिलें आहे त्यांत त्यांनीं नमूद केलें आहे कीं "सोव्हिएट हेरखात्याचें काम व्यवस्थित चालतें याचें कारण हेरगिरी करणाऱ्या हस्तकांची कार्यक्षमता व स्थानिक साम्यवादी पक्षाकडून त्यांना मिळणारें साहाय्य हेंच आहे; केंद्राची कार्यक्षमता किंवा मार्गदर्शनाची पात्रता किंवा संघटनेची समर्थता ही नाहींत."

अशा प्रकारचे तत्त्वनिष्ठेनें हेरगिरी करणारे हस्तक फुटून कां निघतात ? याचें कारण बहुधा राजकीय मतभेद हेंच असतें. (याचसाठीं एकदां हेरगिरीसाठीं निवड झाली म्हणजे त्याला राजकीय कार्यक्रमांत भाग घेण्यास सक्त मनाई असते.) पण हे मतभेद राष्ट्रनिष्ठा किंवा देशभक्ति यांमुळें निर्माण होत नाहींत हें लक्षांत ठेवावयास हवें. सोव्हिएट रशियाच्या धोरणाबद्दल जेव्हां त्याला शंका येते तेव्हांच त्याच्या मनांत नैतिक संघर्षाला सुरुवात होते. साम्यवादाबद्दलच्या फेरविचारांतून कधीं ही शंका निर्माण होते; तर कधीं साम्यवादी तत्त्वज्ञानास स्टॅलिननें दिलेल्या स्वरूपामुळें असमाधान वाटूं लागतें. साम्यवादाचा स्वीकार करावयास लावणाऱ्या व त्यासाठीं सर्वस्व अर्पण करावयाची तयारी निर्माण करणाऱ्या ध्येयवादाचा सोव्हिएट राजवटीचें पोलिसी स्वरूप पाहून भ्रमनिरास होतो. जे हस्तक जाहीर रीतीनें फुटून निघतात त्यांच्याबाबतींत हेंच प्रमुख कारण असतें.

## हेरगिरीची यंत्रणा

हेरगिरीची प्रत्यक्ष यंत्रणा, माहिती मिळविण्याची आणि ती पाठविण्याची पद्धति या अत्यंत गुप्त ठेवण्यांत येतात. वेळोंवेळीं त्यांत बदल होत असतो. संघर्ष व युद्धकाळांत त्यांत सुधारणाहि घडवून आणल्या जातात. परंतु त्यांचें सर्वसाधारण स्वरूप आतां स्पष्ट झालें आहे.

सोव्हिअेट रशियाबाहेर हेरगिरीचें काम करणाऱ्या तीन निरनिराळ्या संघटना आहेत. १) लाल सेनेचें परराष्ट्रीय हेर खातें, २) लाल दलाचें परराष्ट्रीय हेरखातें आणि ३) भयंकर अशी अेम्. व्ही. डी. ( पूर्वींची N. K. V. D., G. P. U., Cheka ) या तिन्हींपैकीं दुसरी संघटना फारशी महत्त्वाची नाहीं. अत्यंत महत्त्वाची म्हणजे तिसरी होय. प्रत्येक

देशांत अेक प्रतिनिधि मुख्याधिकारी म्हणून काम करतो. हा मुख्याधिकारी कधीं कधीं अेम्. व्ही. डी. चा सदस्य असतो पण बहुधा तो लाल सेनेचाच अधिकारी असतो. याचें कारणहि अुघड आहे. कारण हेरखात्याला पश्चिमी राष्ट्रांविरुद्ध युद्धोपयोगी अशीच माहिती बहुधा गोळा करावयाची असतें. ज्याची फेरचौकशी करणें आवश्यक असतें तें काम एम्. व्ही. डी. करते. शिस्तभंगादाखल अेखाद्याला पळवून नेणें, त्याचा खून करणें व खून करून तो अपघाती मृत्यु आहे किंवा आत्महत्येचा प्रकार आहे असें भासविणें हीं कार्येंदेखील त्या संघटनेच्या कक्षेंत येतात.

वर अुल्लेखिलेला मुख्याधिकारी स्थानिक साम्यवादी पक्षाच्या राजकीय समितीच्या विश्वासू सदस्यांशीं अेखाद्या मध्यस्थामार्फत संबंध ठेवीत असतो. साम्यवादी पक्षाच्या सदस्यांची माहिती गोळा करणें, ती तपासून व पडताळून पहाणें व ती केंद्राकडे पाठविणें हें त्याचें कार्य असतें. त्याचबरोबर तो पक्षाच्या सभासद संख्येविषयीचे अंदाज आणि मोक्याच्या जागीं असणारे हितचिंतक यांचीहि माहिती केंद्राला कळवीत असतो. जेव्हां अेखादा सदस्य किंवा हितचिंतक याची हेरगिरीसाठीं हस्तक म्हणून निवड करावयाचें ठरतें तेव्हां त्याच्याकडे दुसरा अेक मध्यस्थ जाअून त्याच्या मनाचा कानोस घेतो. आपल्या पक्षासाठीं किंवा 'पिळलेल्या जनतेची पितृभूमि' असलेल्या सोव्हिअेट रशियासाठीं कांहीं महत्त्वाची कामगिरी बजावण्याची त्या व्यक्तीची कितपत तयारी आहे हें तो पहातो.

अशा व्यक्तीची अनेक प्रकारें परीक्षा घेण्यांत येते, तपासणी करण्यांत येते आणि मगच त्याच्यावर हेरगिरीची कामगिरी सोपविण्यांत येते. ती व्यक्ति अेकाच मध्यस्थाशीं संबंधित असते. या मध्यस्थाचा संपर्क दुसऱ्या अेका मध्यस्थाशीच असतो व या दुसऱ्या मध्यस्थाचाच मुख्याधिकाऱ्याशीं प्रत्यक्ष संबंध असतो. अेखाद्या देशांत अशा प्रकारची परस्परांशीं कांहींएक संबंध नसलेलीं दोनपासून दहाबारापर्यंत हेरगिरी करणारी वर्तुळें असूं शकतात. त्यांचें कार्य अेकाचवेळीं पण स्वतंत्रपणें अेकमेकांस माहिती असल्याशिवाय चालू असतें. मुख्याधिकाऱ्याला पकडीपर्यंत हें कार्य सतत चालू ठेवण्याचा तशा हस्तकांना आदेश असतो.

पण आतांपर्यंत तरी कोणाहि मुख्याधिकाऱ्याला पकडून घेण्याचा प्रसंग आलेला नाहीं. त्यांच्यावर त्या देशांतून पळून जाण्याचे प्रसंग अनेकवेळां आले आहेत. अशावेळीं तुटलेले संबंध जोडण्याचें काम सोव्हिअेट किंवा इतर साम्यवादी देशांच्या दूतावासांतील सैनिकी प्रतिनिधि करीत असतात.

अशा हस्तकांचें जीवन फारसें सुखावह नसतें. सुरुवातीचा अुत्साह आणि साहसाचें आकर्षण नाहींसें झाल्यावर आपण अेका मोठ्या कार्यासाठीं त्याग करीत आहोत या भावनेशिवाय समाधानास दुसरा वावच नसतो. ही भावनाहि अबोलच रहाते. प्रत्येक हस्तकाला त्याला लालसेनेतील किंवा एम्. व्ही. डी. मधील अधिकारी मानण्यांत येतें असें सांगण्यांत येतें.आपण कांहीं देशद्रोही काम करीत आहोंत असें त्याला वाटूं नये म्हणून असें सांगण्यांत येतें असा कुणी समज करून घेअूं नये. कारण अशा हस्तकांना आपण जें कांहीं करतो तो देशद्रोह आहे असें वाटतच नाहीं. पण लाल सेनेतील किंवा एम्. व्ही. डी. मधील अधिकारी असल्याच्या कल्पनेनें सोव्हिअेट रशियाच्या सुखदु:खाबरोबर आपलें सुख-दु:ख निगडित आहे अशी त्यांची भावना होते. शिवाय हें काम सोडलें तर त्यासाठीं भयंकर किंमत द्यावी लागेल या भीतीचा पगडाहि त्यांच्या मनावर बसतो.

प्रत्यक्षांत या पदव्यांना फारशी किंमतहि नसते. त्या कांहीं जाहीर नसतात. त्या पदव्यांच्या दर्जानुसार आर्थिक फायदा होतो असेंहि नाहीं. कामगिरीच्या जरूरीवरून किंवा माहिती मिळविण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या कामावरून मोबदला ठरविण्यांत येतो.

अशा हस्तकांवर सोंपविण्यांत आलेलें काम प्रासंगिक नसेल किंवा प्रासंगिक असलें तर त्यानें त्यासाठीं द्रव्य स्वीकार केलेला असेल तर त्याला केंद्राकडून देण्यांत येणाऱ्या स्वातंत्र्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचें स्वातंत्र्य घेतां येत नाहीं. जर त्याला तसें कांहीं करावयाचें असेल तर या कामगिरीपासून 'काडीमोड' घेण्याचा धोका पत्करावा लागेल. त्याला आपला व्यवसाय किंवा रहाण्याचें ठिकाण बदलण्याचें स्वातंत्र्य नसतें. हेरगिरीच्या यंत्रणेला सोयीचें असेल त्याचवेळीं त्याला रजा घेतां येअील. अशा हस्तकांना लग्नाची बंदी केल्याची किंवा लग्न केल्यावर कुटुंबाची संख्या वाढविण्यास बंदी केल्याचीं उदाहरणें कांहीं थोडथोडकीं नाहींत.

'केंद्रा 'कडून येणाऱ्या आदेशांचें किती तंतोतंत पालन होतें हें खरोखर आश्चर्य वाटावयास लावणारें आहे. आदेशांचा भंग म्हणजे साम्यवादी तत्त्वज्ञानावरील अविश्वास असेंच गणलें जातें. मात्र स्त्रियांच्या बाबतींत या संदर्भांत थोडा उदारपणा दाखविला जातो. या कामगिरीचा त्याग केलेल्या सर्वांचें एका गोष्टीविषयीं अेकमत आहे. ती म्हणजे कामाबद्दल शाबासकी देण्यांत किंवा बक्षिस देण्यांत केंद्राकडून फार सावधपणा दाखविला जातो. परंतु अेवढें असून हस्तकांची मात्र कधीं वाण पडत नाहीं.

अेखादा हस्तक अविश्वासू बनला आहे किंवा त्याला बरेंच कांहीं समजून आलें आहे असा जर संशय निर्माण झाला तर त्याला सो. रशियांत वा अन्य साम्यवादी देशांत येण्यासाठीं मोह निर्माण करण्यांत येतो. कारण त्याला तेथून नाहीसें करणें सोपें जातें. लाल सेनेच्या युरोपांतील हेरखात्याचा प्रमुख म्हणून क्रिविट्स्की यांनीं बरींच वर्षें काम केलें होतें. ते म्हणतात कीं ' ज्या तत्परतेनें हस्तक ' केंद्रा 'कडे जाण्यास तयार होतो त्यावरून त्याची विश्वासार्हता अचूक ओळखता येतें. '

आपली माहिती अुघड करणाऱ्या कोणत्याहि भूतपूर्व हस्तकाचें जिणें सुरक्षित नसतें. परंतु स्वतःच्या कार्याविषयींची सर्व माहिती शक्यतों लवकर अुघड करण्यानें त्याचा सुरक्षितपणा वाढतो. ज्यानें स्वतःजवळ असलेली माहिती अुघड केली नाहीं, अशा भूतपूर्व हस्तकाचें तोंड बंद करण्यासाठीं एम्. व्ही. डी. कोणत्याहि मार्गाचा अवलंब करावयास मागेपुढें पहाणार नाहीं.

परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं माजी सोव्हिअेट हस्तक हा धडा शिकतच नाहींत. आपली संपूर्ण हकीकत सांगण्यास ते बिचकतात— ही वृत्ति त्यांच्या तत्त्वज्ञानविषयक पश्चात्तापांतून निर्माण होत असते. कारण क्रेमलिनचा तिटकारा करणाऱ्या साऱ्याच माजी सोव्हिअेट हेरांना पाश्चात्य राष्ट्राबद्दल जवळीक वाटते असें नाहीं. रैस (Reiss) व इतर सोव्हिएट हेरांनीं आपल्या हेरगिरीच्या कार्यापासून फारकत घेतल्यावर आपल्याला ज्ञात असलेला संपूर्ण तपशील सांगितला नव्हता हें सिद्ध होण्याजोगा पुरावा उपलब्ध आहे. 'केंद्रा 'ला या वस्तुस्थितीची जाणीव होती. म्हणूनच त्यांचा वध झाला.

## अुपाययोजना कोणत्या स्वरूपाची असावी

अशा प्रकारच्या ' तत्त्वाधिष्ठित हेरगिरीचा 'चा मुकाबला कोणत्या प्रकारें करावा ही अेक जटिल समस्या आहे. अशा गुंतागुंतीच्या प्रश्नांत अपक्व आणि हौस म्हणून कटांचा अुलगडा करावयास अुद्युक्त झालेल्यांचा कांहीं फायदा होणार नाहीं हेंहि अुघड आहे. अशा प्रकारचा हेर–ज्वर समाजांत पसरला म्हणजे खरोखरीचे धोकेबाज हेर निसटण्याचीच शक्यता अधिक. सरकारच्या खास खात्यांना याची जाणीव असावी. पण एक गोष्ट निश्चित कीं आतांपर्यंत ज्याची आवश्यकता भासली नव्हती अशा प्रकारचें राजकीय शिक्षण असल्याशिवाय या हेरगिरीशीं कुणीहि मुकाबला करूं शकणार नाहीं. खात्रीचा पण लांब पल्ल्याचा उपाय म्हणजे साम्यवादी पक्षाच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान लोकांना करून देणें आणि तत्त्वाधिष्ठित हेरगिरीला वाव मिळणार नाहीं अशी परिस्थिति तयार करणें हा होय. अमेरिकेंतील मॅक्कॅरन–किलगोर अंतर्गत सुरक्षा कायद्यासारखा कायदा उपयोगी नाहीं. तशा कायद्यांना या धोक्यास तोंड देअूं पहाणें म्हणजेच चिमटयानें पाणी काढूं पहाणें होय. तसला कायदा निरुपयोगीच असतो असें नाहीं तर निखालसपणें वाईटहि असतो. त्यामुळें सो. रशियाच्या माजी हस्तकांना तो संरक्षणहि देत नाहीं व त्यामुळें त्याच्यापाशीं असलेली बहुमोल माहितीहि बाहेर येत नाहीं.

साम्यवादाचें ध्येय आणि हेतु अेके काळीं कांहींहि असोत, आज साम्यवादी चळवळ– प्रत्येक देशांतील साम्यवादी पक्ष–म्हणजे इतिहासांतील सर्वांत निर्घृण व जुलमी राजवटीचें हत्यार बनलें आहे याची शिकवण सर्व शैक्षणिक माध्यमांतून दिली पाहिजे. आतां जे साम्यवादी चळवळींत आहेत ते म्हणजे साम्यवादी चळवळीचा कणखर गाभा होय. त्यांना आपण फारसें कांहीं करूं शकणार नाहीं. परंतु अननुभवी तरुण त्याला बळी पडतात तें मात्र जरूर थांबवता येईल.

व्यावहारिक ध्येयवाद कडवेपणानें पछाडलेला असावयास पाहिजे. त्यामुळें सर्वसामान्य सभ्यतेला तिलांजलि द्यावी लागली तरी चालेल असें समजणें केवळ खुळचटपणाचें आहे. एखादा ध्येयवाद त्याच्या अनुयायांवर काय परिणाम करतो व इतरावर काय परिणाम घडवूं पहातो

यावरून त्याची पारख करावयास हवी. अमेरिकन ध्येयवादांतील “ सर्वांना समान संधि ” हें तत्त्व सांप्रतच्या कोणत्याहि आव्हानाला पुरून अुरण्याइतकें गतिशील व प्रभावी आहे. लोकशाही तत्त्वप्रणालीचें योग्य रीतीनें–म्हणजेच विचक्षणेनें–शिक्षण दिलें म्हणजे त्याला प्रत्येक पिढींतील तरुणाची मान्यता आणि निष्ठा लाभल्यावांचून रहाणार नाहीं. परंतु हें शिक्षण नवयुवकांचा अुत्साह आटून जाण्याच्या आंत देणें आवश्यक असतें. जनतेंत स्वातंत्र्याकांक्षा प्रज्वलित असेल तर साम्यवादाचा प्रभाव पडूं शकत नाहीं हें सिद्ध झालेलें आजहि आपण पाहूं शकतों.

## केवळ सामाजिक सुधारणा साम्यवाद रोखण्यास असमर्थ

मात्र जेथें लोकशाही साम्यवादी चळवळीचे कट आणि हेरगिरी खपवून घेईल तेथें ती सुरक्षित रहाणार नाहीं. कारण तिच्या विनाशासाठीं सामर्थ्यवान् राष्ट्रें टपून बसलीं आहेत. आपण सामाजिक सुधारणा घडवून निश्‍चिंत राहिलों तर क्रेमलिन आपलीं जग जिंकण्याचीं स्वप्नें वाऱ्यावर सोडून देईल असें समजणें व्यर्थ आहे. हिटलर सत्तारूढ झाल्यावर इतर देशांतील कोणत्याहि प्रकारच्या सामाजिक सुधारणांनीं त्यानें आपली जगज्जेतेपणाची महत्त्वाकांक्षा सोडली असती असें म्हणतां येईल का ? सो. रशियाची लोकशाहीविरुद्धची मोहीम थांबेल असें समजण्यांतहि अर्थ नाहीं. अर्थात् आपल्या सांस्कृतिक अुन्नतिसाठीं अविरत प्रयत्न व्हावेत, समाजांतील प्रत्येक गटाला वाढत्या अुत्पादनांतील आणि वांटपांतील योग्य–हिस्सा मिळावा, आधुनिक सुखसोई प्रत्येकाच्या वाटचाला याव्यांत व कल्याणकारी संधीपासून कुणीहि वंचित होअूं नये म्हणून प्रयत्नशील राहण्यानें लोकशाहीची जपणूक अधिक परिणामकारक रित्या होते हेंदेखील अगदीं खरें आहे.

अविरत लोकशिक्षण आणि सतत सामाजिक सुधारणा यांनींच केवळ आपलें संरक्षण होईल असें नाहीं हें खरें; पण दूर दृष्टीनें विचार करतां हीच लोकशाहीच्या संरक्षणाची सर्वांत समर्थ अशीं साधनें ठरतील यांत शंका नाहीं.

● ● ●

# सोडसाम्यवाद्यांची समस्या

सोडसाम्यवाद्यांची—एके काळीं साम्यवादी असलेल्या परंतु नंतर त्या तत्त्वज्ञानापासून फारकत घेतलेल्यांची—समस्या गुंतागुंतीची असते. विशेषतः अमेरिकेंत ती प्रकर्षत्वानें आढळते. त्याचीं कारणेंहि तशींच आहेत. तिकडील परिस्थितीचें निरीक्षण केलें तर त्यावरून या समस्येचें स्वरूप समजून घेण्यास मदतच होईल.

आजमितीला अमेरिकेंत सोडसाम्यवाद्यांची संख्या सुमारें साडेसात लक्ष आहे असा अंदाज आहे. कोणत्याहि वेळीं साम्यवादी पक्षाची सदस्यसंख्या एवढी नव्हती. एवढेंच नव्हे तर अमेरिकेंतील साम्यवादी पक्षाला कोणत्याहि निवडणुकींत झालेलें मतदान यापेक्षां कमी आहे. साम्यवाद्यांना, त्याचप्रमाणें बिगर-साम्यवाद्यांनाहि सोडसाम्यवादी हा एक काळजीचा विषय झाला आहे. अर्थात दोघांचीं कारणें निरनिराळीं आहेत. त्या देशांतील, त्याचप्रमाणें त्या देशाबाहेरील सर्वच साम्यवाद्यांना या सोडसाम्यवाद्यांबद्दल एक प्रकारची भीति वाटते, त्यांच्याबद्दल राग येतो आणि नितांत तिरस्कार वाटतो. उलट बिगर साम्यवाद्यांची त्यांच्याबद्दलची प्रतिक्रिया ही बहुधा भावनात्मक, अविवेकी आणि जबरदस्त असते. पण मुख्यत्त्वें करून या सोडसाम्यवाद्यांच्या जमातीबद्दल त्यांना एक प्रकारचें कोडेंच वाटत असतें.

सोडसाम्यवाद्यांसंबंधीची साम्यवाद्यांची भावना समजणें कठीण नाहीं. त्याचीं कारणें उघड आहेत. साम्यवाद्यांच्या कोणत्याहि कटाचा किंवा डावपेंचांचा ज्यांच्यावर कधींहि आणि कोणताहि परिणाम होणार नाहीं असे फक्त सोडसाम्यवादीच असतात. (अर्थात याला अपवाद म्हणजे ज्या व्यक्तींनीं त्याच्या कुवतीबाहेरच्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात म्हणून साम्यवादी पक्ष सोडला असेल त्यांचा.) कारण साम्यवाद्यांच्या एकंदर कामाच्या पद्धतीबद्दल त्यांच्याइतकी कुणालाच कल्पना नसते. सोडसाम्यवाद्यांइतकें साम्यवादी पक्षाचें आजवर दुसऱ्या कुणीहि नुकसान केलेलें नाहीं. म्हणून साम्यवादी पक्ष सत्तेवर आल्यावर पहिल्या प्रथम कुणाचा कांटा काढीत असतील तर तो सोडसाम्यवाद्यांचा.

सर्वसाधारणपणें आपल्या शत्रूचा शत्रु तो आपला मित्र असें समजण्यांत येतें. सोडसाम्यवाद्यांच्या बाबतींत तसें नाहीं. साम्यवाद्यांना झोडपण्यासाठीं म्हणून सोडसाम्यवाद्यांचा उपयोग बिगर-साम्यवादी जरूर करतील. परंतु त्यांचे सोडसाम्यवाद्यांशीं मित्रत्वाचे संबंध असतात असें नाहीं. किबहुना अनकवेळां साम्यवाद्यांत आणि सोडसाम्यवाद्यांत कसलाहि फरक करण्याचें बिगर साम्यवाद्यांनीं नाकारलें आहे असें म्हटल्यास तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

असें सांगतात कीं, न्यूयॉर्कला एके ठिकाणीं सभा होती. मुख्य वक्ते होते जनरल क्ले. ते तेव्हा नुकतेच बर्लिनहून आले होते. साम्यवादी सभा उधळण्याच्या इराद्यानें तेथें आधींच आले होते व त्यांनीं लवकर येऊन पुढील जागा पटकाविल्या होत्या. त्यांनीं सभा मोडण्याचा प्रयत्न केला तेव्हां साम्यवाद-विरोधी कार्यकर्ते तेथें आले. त्यांना सभागृहाच्या तोंडाशींच पोलिसांनीं अडविलें. त्यांनीं पोलिस अधिकाऱ्यांना सांगितलें, "आम्हांला आंत जाऊं द्या- आम्ही कम्युनिस्ट विरोधक आहोंत."

अधिकाऱ्यानें थंडपणें उत्तर दिलें, "तुम्ही कोणत्याहि प्रकारचे कम्युनिस्ट असा. तुम्हांला —कोणत्याहि प्रकारच्या कम्युनिस्टांना— आंत सोडण्यांत येणार नाहीं !"

या दंतकथेंत अतिशयोक्ति असेल कदाचित्, पण तिला सत्याचा आधार आहे, हें कबूल करावें लागेल. सोडसाम्यवाद्यांकडे युरोपांतील देशांपेक्षां अमेरिकेंत अधिक लक्ष देण्यांत येतें. युरोपमध्यें सोडसाम्यवादी हा कांहीं नवलाचा प्रकार नाहीं. ते भूतकाळांत काय करीत होते यापेक्षां वर्तमानकाळांत ते काय करतात याला तेथें महत्त्व देण्यांत येतें. साम्यवादाला सोडचिठ्ठी दिल्यावर स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ तेथील भूतपूर्व साम्यवाद्यांनीं कंबर कसली. त्यांनीं आपल्या गतकालांतील चुकांबद्दल दिलगिरी दाखविली नाहीं कीं बायबलांतील कथेंतल्या उधळ्या मुलासारखें आपलें स्वागत व्हावें अशी अपेक्षाहि बाळगली नाहीं. अशा व्यक्तींत फ्रान्समधील मार्लो, इटालींतील सिलोने, इंग्लंडमधील स्पेंडर किंवा जर्मनीतले प्लीव्हीअर हे प्रमुख होत. समाजानेंहि त्यांना वीरपद बहाल करून त्यांचा गौरव केला नाहीं किंवा त्यांना खलपुरुष ठरवून त्यांचा

धिक्कारहि केला नाहीं. समाजानें त्यांचा विचार केला तो केवळ माणूस म्हणून.

अलीकडच्या काळांत पश्चिम युरोपमध्यें झालेल्या स्वातंत्र्यलढ्यांत अर्न्स्ट रूटर हे सर्वांत प्रमुख होत. ते बर्लिनचे महापौरहि होते. तेहि असेच सोडसाम्यवादी होते. ते म्हणत, "मी फारसा बदललों नाहीं; बदलला आहे साम्यवादच!" असें असलें तरी अमेरिकेंतल्या मॅक्आर्थीप्रमाणें तेथें एखादा मॅक्आर्थी त्यांच्या एकेकाळच्या साम्यवादी निष्ठेबद्दलचा उल्लेख करीत नसे. उलट साम्यवादाशीं फारकत घेतल्यानंतर जाकी डोरिअट सारख्यांनीं नाझीवादाशीं सहकार्य केलेलें आढळून येतें.

तत्त्वज्ञानाला तेथें फारशी किंमत देत नाहींत असें नव्हे; उलट अमेरिकेंतल्यापेक्षां युरोपमध्यें तात्त्विक प्रश्नांचा अधिक गंभीरपणें विचार करतात. तरीहि सोडसाम्यवाद्यांकडे पहाण्याची त्यांची वृत्ति अधिक उमदी व सारासार विचारावर आधारलेली असते. ते सोडसाम्यवाद्यांचा विचार करतांना मानवी प्रतिष्ठेचा विसर पडूं देत नाहींत. ते जें कांहीं बोलतात त्यांत अर्थ आहे किंवा नाहीं, सत्ताबाजांच्या हातांतील हत्यार म्हणून ते वागतात किंवा काय आणि त्यांच्या भ्रमनिरासांत सत्याचा अंश दिसतो किंवा नाहीं यावरूनच तेथें सोडसाम्यवाद्यांचा विचार होतो.

अमेरिकेंतील सोडसाम्यवाद्यांबाबतची वृत्ति दुर्दैवानें अशी नाहीं. आणि व्यक्तीच्या भूतकालापेक्षां त्याच्या वर्तमानकालीन विचारावरून त्याची परीक्षा केली जावी हें लोकशाही परंपरेचें महत्त्वाचें तत्त्व असूनहि त्याविरुद्ध परिस्थिति येथें आहे हें विशेष! शीत युद्धानें वातावरण भारलें गेलेलें असल्यामुळें सोडसाम्यवाद्यांचीहि साम्यवाद्यांसारखीच म्हणजे फुटबॉलसारखी स्थिति झाली आहे. अमेरिकेंतील निरनिराळ्या राजकीय गटांनीं जणूं जाहिरातीच लावल्या आहेत :

**सोडसाम्यवादी पाहिजेत : उपयोगी पडण्यासारखे असतील तरच विचार करण्यांत येईल.**

आणि उपयोग म्हणजे कसला, तर त्यांच्या धोरणास पुष्टि मिळणें हाच होय. उदाहरणार्थ त्यांच्यामुळें अमेरिकेची 'न्यू डील' योजना साम्यवाद्यांनाच फायदेशीर ठरली असें दाखवून द्यावें असें एका गटाला वाटेल

तर साम्यवादी पक्ष हा अेक निरुपद्रवी क्लबच होता; काकतालीय न्यायानें त्याचे आणि क्रेमलिनचे विचार जुळले असें दाखवून द्यावें असा आणखी कुणाचा विचार असेल.

या वृत्तीचा परिणाम असा होतो कीं मूलभूत आणि महत्त्वाच्या भेदाकडे दुर्लक्ष होतें. साम्यवादी पक्षाचा सभासद आणि पक्षाचा अधिकारी यांतील फरक जाणतां येत नाहीं. प्रासंगिक सहप्रवासी आणि जो आपलें बिंग बाहेर पडतें असें दिसतांच आपण सोडसाम्यवादी आहोंत असा गिल्ला करतो व पुन्हा आपल्या पूर्वमार्गाला लागतो असा निगरगट्ट प्रवासी यांच्यांत भेदच करतां येत नाहीं. एखादा सोडसाम्यवादी खरें बोलला व तें त्याचें बोलणें आपल्याला मानवत नसलें कीं तो केवळ 'खबऱ्या' होता असें म्हणून त्याची बोळवण करतां येते; उलट त्यालाच अमेरिकन काँग्रेसच्या समितीपुढें बिनबुडाचे प्रलाप काढूं द्या, लगेच राजकीय शेणखळचाचा उद्योग करणारे त्याच्या निवेदनाला वेदप्रामाण्य मानतील.

पूर्वीच्या काळांतील ज्यूद्वेष्टयांना ज्यू म्हणजे हातांतलें कोलीत वाटे. त्याप्रमाणें निरनिराळचा साम्यवाद-विरोधी गटांना सोडसाम्यवादी झाले आहेत. एका गटाला जो अधिकृत वाटेल तो दुसऱ्या गटाच्या दृष्टीनें किरकोळ 'खबऱ्या' ठरतो. एवढेंच नव्हे तर सोडसाम्यवाद्यांतहि एकमेकांत मतभेद आणि हाडवैर असतें. तें बहुधा ते कोणत्या साम्यवादी आंदोलनापासून कोणत्या हंगामांत फुटले त्यावर अवलंबून असतें. जितक्या आधीं साम्यवादास सोडचिठ्ठी दिलेली असेल तितके ते अधिक प्रामाणिक म्हणावयास साधारणपणें हरकत नाहीं. अर्थात् नेहमींच असें घडत नाहीं. या संदर्भांत एका अमेरिकन लेखक संघाची ( हा संघ साम्यवादी पक्षानें उभारलेला होता हें सांगणें नलगे ) वरिष्ठ जागा भूषविणाऱ्या सहप्रवाशाची हकीगत लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हा गृहस्थ १९३९ सालीं हिटलर व स्टॅलिन यांचा करार झाला त्यावेळींहि गप्प होता. त्यानें विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकांतच साम्यवादास रामराम ठोकलेले प्रसिद्ध कवि मॅक्स ईस्टमन हे सहप्रवासी आहेत असें अलिकडेच जाहीर केलें होतें. त्याला पुरावा काय तर त्याचे एकेकाळचे साम्यवादी पक्षाशीं असलेले संबंध !

याचा परिणाम असा झाला आहे कीं, सर्वच सोडसाम्यवाद्यांबद्दल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ................ वि: ...............
क्रमांक ........................ नों: दि: ..............


अमेरिकन लोकमत विरोधी बनलें आहे. कोणाहि सोडसाम्यवाद्याचें आतांचें चारित्र्य, त्याची विश्वसनीयता, त्याची निष्ठा यांचा विचारच केला जात नाहीं. एका कादंबरीकार सोडसाम्यवाद्यानें अलिकडेच म्हटलें आहे, " माझा साम्यवादी म्हणून जेवढा धिक्कार होत नव्हता त्याहून अधिक आतां एक सोडसाम्यवादी म्हणून होतो."

यामुळेंच साम्यवादी पक्षाचें सदस्यत्व कधींना कधीं स्वीकारलेले साडेसात लक्ष लोक असले तरी त्यांपैकीं त्या मानानें फारच थोडे लोक एके काळीं साम्यवादी होते हें निदर्शनास येतें. गतकालीन साम्यवादी पक्ष-सदस्यत्वाबद्दल मिळणारी शिक्षा मोठीच असते. त्यानें साम्यवादापासून फारकत कधीं घेतली, कोणत्या परिस्थितींत आणि कोणत्या भूमिकेवरून घेतली याचा विचारहि न करतां अनेक ठिकाणचे नोकरीचे दरवाजे त्याला बंद होतात. सोडसाम्यवादी हा स्वानुभवानें साम्यवाद्यांशीं मुकाबला करण्यास अधिक समर्थ असतो. तरीहि त्याला सरकारी नोकरींत प्रवेश हा नाकारलाच जातो. सोडसाम्यवाद्यांबद्दल बोलतांना अमेरिकन जनतेच्या डोळ्यांपुढें प्रसिद्धीच्या प्रकाशांतला, न्यायालयासमोर किंवा काँग्रेसच्या समितीसमोर निवेदन करणारा एखादा सोडसाम्यवादी उभा रहातो. पण अशा व्यक्ति फार थोड्या. त्यांच्यावरून इतरांबद्दल अनुमान काढतां येणार नाहीं. हे 'इतर' प्रचंड बहुसंख्येनें असणाऱ्या सोडसाम्यवाद्यांच्या परिस्थितीचें, इतिहासाचें प्रतिनिधित्व नाहीं करूं शकत. कारण एके काळीं मनांतून वाटत असलें कीं आपण नेतृत्वपदीं असावें, रोमहर्षक वाटणारें परंतु वास्तवांत त्रासदायक असणारें भूमिगत जीवन जगावें तरी बहुसंख्य सोड-साम्यवाद्यांना असें कांहींच करतां आलेलें नसतें हें लक्षांत ठेवावयास पाहिजे.

### योग्य धोरण कोणतें होईल ?

जे साम्यवादी पक्षाचे भूतपूर्व सदस्य होते त्यांच्यांत व जे केवळ सहप्रवासी होते त्यांच्यांत फरक केलाच पाहिजे. त्यांच्याविषयीं कोणतें धोरण ठेवावें ? लोकशाहीमध्यें सार्वजनिक जीवनांत अशा सोडसाम्य-वाद्यांना कोणतें स्थान असावें ? त्यांना बायबलमधील कथेंतल्या उधळ्या मुलाप्रमाणें वागवावें कां ? आणि त्यांच्या मतपरिवर्तनाचा उपयोग ज्या लोकशाहीमुळें हें परिवर्तन शक्य झालें त्या लोकशाहीची श्रेष्ठता दाख-

विण्यासाठीं करावा का ? कीं त्यांना दुबळे, देशद्रोही म्हणून, मवाळ झालेले माथेफिरू म्हणून, किंवा कितीहि कबुलीजबाब दिल्यानें ज्याचें पापक्षालन होणार नाहीं अशा बदकर्मांत कायमचें गोवून घ्यायचें धैर्य नसलेले भ्याड म्हणूनच त्यांची संभावना करावी ? कीं त्यांचें पूर्वचारित्र्य विसरून जावें आणि इतर स्खलनशील नागरिकांना ज्याप्रमाणें विश्वासाच्या व मोक्याच्या नोकऱ्या देतों त्याप्रमाणें त्यांनाहि द्याव्यात ? किंवा एका जर्मन सोड-साम्यवाद्यानें—श्री. इश्चर यानें — म्हटल्याप्रमाणें त्यांनीं राजकारणाच्या बाबतींत आपलें तोंड मिटून घ्यावें अशी अट त्यांच्यावर लादावी ? कीं या सर्वांपेक्षां दुसरा कोणता अधिक श्रेयस्कर असा मार्ग या बाबतींत चोखाळतां येण्याची शक्यता आहे ? या प्रश्नांची योग्य उकल करण्यासाठीं कांहीं गोष्टी स्पष्टपणें लक्षांत बाळगावयास पाहिजेत.

एखाद्या व्यक्तीनें साम्यवादी पक्षाचें सदस्यत्व स्वीकारलें म्हणजे तिच्यावर असे कांहीं संस्कार केले जातात कीं कांहीं काळानंतर तिचे विचार, तिच्या भावना आणि विशेषतः तिचें वागणें याला निश्चित् स्वरूप प्राप्त होतें. त्यामुळें साम्यवादी पक्षाच्या सदस्यांत वरील बाबतींत कमालीचा सारखेपणा आढळून येतो. त्यामुळें जरी त्यांच्यांतील व्यक्तिगत स्वरूपाचे बदल नाहींसे झाले नाहींत तरी कोणत्याहि ठराविक प्रसंगाबद्दल क्रियाशील पक्षसदस्यांचीं मतें काय असतील हें सहज ओळखतां येतें. सरकारी क्षेत्रांतील किंवा इतर क्षेत्रांतील मोक्याच्या जागीं नेमल्यास प्रत्येक साम्यवादी पक्षाचा क्रियाशील सदस्य कांहीं गैरवर्तन करीलच असें जरी नसलें तरी अशा जागांपासून त्यांना दूर ठेवणें खात्रीनें समर्थनीय ठरेल.

परंतु एकदां का साम्यवादी पक्षसदस्यानें त्या पक्षाचा त्याग केला म्हणजे तो समाजांतल्या इतरांसारखाच स्वतंत्र व्यक्तिमत्वानें वागूं लागतो. पक्षाचे सभासद असतांना ते इतरांहून वेगळे भासतात याला कारण आहे. ते त्या वेळीं भयगंडानें पछाडलेले असतात. ज्या संस्थेशीं आपलें जीवन निगडित झालें आहे, जिच्यासाठीं समर्पणाच्या भावनेनें कार्य केलें आहे व जिच्यामुळें आपल्या जीवनाला विशिष्ट आकार आणि आशय लाभला आहे, त्या संस्थेंतून आपल्याला हाकललें जाईल; आपण अलग पडूं अशी त्यांना भीति वाटत असते. त्यांनीं पक्ष सोडल्यावर ते कसे वागतील या बाबतींत निश्चित् असें

भाकीत करतां येणार नाहीं. मात्र एवढें खरें कीं सुरुवातीला तरी ते इतरांपासून आणि स्वतःपासूनहि दूर पळूं इच्छितात. भूतकाळांतील आपल्या भोळेपणाला प्रयत्नपूर्वक विसरण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न तरी होतो किंवा ते आपला भूतकाळ स्वतःशींच असा रंगवतात कीं आपण इतिहासाचे बळी किंवा वीर आहोंत असें त्यांना वाटूं लागतें. प्रत्येकाची वैयक्तिक हकीकत पाहिली असतां असें दिसून येतें कीं मानसशास्त्रदृष्ट्या साम्यवादी पक्षाचें सभासदत्व स्वीकारणें हें साम्यवादी पक्षापासून फुटून निघण्याहून कठीण आहे. यातनामय मनोवेदनांमुळें व सखोल आत्मशोधामुळें पक्षापासून दूर सरकणें त्यांना शक्य झालें असें दिसून येतें. कित्येकांच्या बाबतींत अनेक वर्षांच्या लांछनास्पद अनुभवाचा परिणाम झालेला असतो.

आपण साम्यवादी पक्षाशीं फारकत जाहीर केली तर आपण अितके दिवस त्या पक्षाचे सदस्य होतों ही गोष्ट जाहीर होईल व बिगर–साम्यवाद्यांकडून आपल्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जाईल अशी भीति त्यांना अेका बाजूनें ग्रासते तर दुसऱ्या बाजूनें साम्यवादी पक्षाचे कार्यकर्ते गुप्त रीतीनें आपण अजून साम्यवादीच असल्याचा परिणामकारक प्रचार आपल्या मालकाजवळ करतील अशी भीति त्याला छळत असते. त्यामुळें आपण साम्यवादी पक्ष सोडला तर आपण अुघडे पडूं आणि अेकाकी राहूं या कल्पनेचा त्यांच्यावर पगडा बसलेला असतो. तो जर फारसा प्रसिद्ध नसला तर तो स्वतःला सावरीपर्यंत अप्रसिद्धीच्या अंधारांतच आपल्या मनावरील व सद्सद्विवेक बुद्धीवरील ताण कमी करूं पाहतो.

## सोडसाम्यवाद्यांची राजकीय विचारसरणी

सोडसाम्यवाद्यांच्या मानसिक ठेवणीचा विचार करण्यापेक्षां त्यांची राजकीय विचारसरणी जाणून घेणें अधिक महत्त्वाचें आहे. आतांपर्यंतच्या पुराव्यावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते कीं 'सोडसाम्यवाद्यांचें राजकारण' अशी कांहीं चीज नसते. सोडसाम्यवादी हे राजकारणाच्या निरनिराळ्या रंगांत विभागले गेलेले दिसतात. त्यांच्यांतील कांहीं अुदारमतवादी आहेत, तर कांहीं लोकशाही समाजवादी आहेत. अमेरिकेंतील कांहीं जणांनीं डमोक्रॅटिक पक्षाची कांस धरली आहे तर कांहींनीं रिपब्लिकन पक्षाला जवळ केलें आहे. अमेरिकेंतील सुप्रसिद्ध साम्यवादविरोधक मॅक्आर्थी यांचे

कांहीं कट्टर अनुयायी हे सोडसाम्यवादी आहेत, तसेंच त्यांना पहिल्यापासून कडवा विरोध करणाऱ्यांतहि कांहीं सोडसाम्यवादी आघाडीवर आहेत. सोडसाम्यवाद्यांच्या विचारांतील ही एकांतिकतेचीं दोन टोकें न जाणणारे लोक सर्वसाधारणपणें त्रोटक माहितीच्या आधारावर आपलें त्यांच्याबद्दलचें मत ठरवून टाकतात. सोडसाम्यवादी हे अपरिहार्यपणें कोणत्या तरी सर्वाधिकारशाहीचे किंवा हुकूमशाहीचे किंवा तशा पक्षाचे पुरस्कर्ते बनतात असें साम्यवाद्यांचें मत आहे. पण तेंहि खोटें ठरलेलें दिसून आलें आहे. त्यांच्यापैकीं बहुतेक अुदारमतवादी व स्वातंत्र्यवादीच बनतात.

सोडसाम्यवाद्यांतील मूलभूत विभागणी वेगळीच आहे. ही विभागणी ते आतां कोणत्या राजकीय पक्षांत आहेत यावरून ठरत नाहीं. तर ज्या सामाजिक न्याय, प्रगति, स्वातंत्र्य आणि शास्त्रीय विचार या ध्येयांमुळें ते अेके काळीं चुकीनें साम्यवादी विचारसरणीकडे आकृष्ट झाले तीं आजहि ध्येयस्वरूपच आहेत असें मानणारा एक गट आहे. दुसऱ्या गटाला वाटतें कीं, साम्यवादी पक्षाचें अैतिहासिक अधःपतन आणि आजवरच्या काळांतील अत्यंत जुलुमी व संपूर्ण दडपशाहीची राजवट असें ज्याचें वर्णन करतां येईल अशा सोव्हिएट राजवटीचा अुदय यावरून अुदारमतवादाचें वैय्यर्थ स्पष्ट होतें. कारण त्यांच्या मतें अुदारमतवादांतूनच साम्यवादी विचारांचा जन्म झाला आहे. परंतु या दोन्ही गटांना अडचणीचे वाटतील असे कांहीं प्रश्न आहेत. त्यांची ते संयुक्तिक उत्तरें देअू शकणार नाहींत. पहिल्या गटाला आपल्या हातून घोड चुका कां झाल्या याचें अुत्तर स्वतःच्या पदरीं राजकीय अप्रबुद्धतेचें पुरेपूर माप टाकल्याशिवाय देतां येणार नाहीं. ते जर खरोखरीच अुदारमतवादी असते तर लेनिन व स्टॅलिन यांनीं ज्या बीजांची पेरणी केली त्याला कशीं रोपटीं येतील हें त्यांच्या ध्यानांत यावयास पाहिजे होतें, नाहीं का ? दुसऱ्या गटालाहि असाच बिनतोड प्रश्न करतां येईल. जेथील राजवट अुदारमतवादावर अधिष्ठित झाली होती तेथें कोठहि हुकुमशाही निर्माण झाली नाहीं. अुलट अुदारमतवादास कडाडून विरोध करणाऱ्या फासिस्ट वा साम्यवाद्यांनीं सत्तेवर येतांच लोकशाही पद्धति नष्ट केल्या. मग अुदारमतवादांतून साम्यवादाची निर्मिति झाली असें तरी कसें म्हणावयाचें आणि त्यांतील वैय्यर्थ तरी कसें मान्य करावयाचें ?

## अेकेरी धोरण असूं शकत नाहीं

वरील विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं सोडसाम्यवाद्यांचा प्रामाणिकपणा गृहित धरला तर त्या सर्वांच्या बाबतींत एकच एक असें एकेरी धोरण अवलंबतां येणार नाहीं. सोडसाम्यवादी काय करतात आणि कसा विचार करतात त्यावरूनच त्यांची पारख करावी लागेल. त्यांना परत स्वतंत्र लोकशाही समाजांत येण्याच्या मार्गांत अडचणी आणूं नयेत. परंतु ते एके काळीं साम्यवादी होते एवढ्या कारणावरून ते लोकशाहीचें संरक्षण कसें करावें याबद्दलचा गुरुमंत्र देण्यास समर्थ आहेत असा गैरसमजहि करून घेअूं नये. ते साम्यवादी होते त्यापेक्षां सोडसाम्यवादी म्हणून अधिक चांगले नागरिक होऊं शकतील हें निःसंशय. परंतु अुत्कृष्ट नागरिक हे कांहीं साम्यवादी नसतात किंवा सोडसाम्यवादीहि नसतात या वस्तुस्थितीकडेहि दुर्लक्ष करूं नये. ज्या साम्यवाद्याला रशियांतील 'कामगारांची लोकशाही' म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून 'सक्तीची मजूरी' आहे हा साक्षात्कार होतो त्याला फिरून लोकशाहीवाद्यांमध्यें प्रवेश मिळूं नये म्हणून समंजसपणाचीं आणि भूतदयेचीं कवाडें लावून घ्यावीं हें लोकशाहीविरोधी तर होईलच, शिवाय तें अमानुषहि होईल. अर्थात् याचा अर्थ आपण भावनेच्या आहारीं जावें असा नाहीं. त्यांच्या मतपरिवर्तनानंतर त्यांना विचार करण्यासाठीं व सर्व गोष्टींचें पुनः नव्यानें मूल्यमापन करण्यासाठीं कांहीं काळ जाअूं द्यावा. एकाएकीं होणारी अुपरति हें बहुधा स्मशान वैराग्य ठरतें. परंतु जो सोडसाम्यवादी एके काळीं कमकुवत मनामुळें वा मेंदुमुळें किंवा दोहोंमुळेंहि साम्यवादी झालेला असतो तो त्याकाळीं लोकशाहीच्या मुळावर अुठलेला असतो; ज्या लोकशाही वातावरणानें त्याला जोजविलेलें असतें तिच्यावरच घाला घालायला तो सिद्ध झालेला असतो ही वस्तुस्थिति बदलत नाहीं. जो साम्यवादी किंवा पक्षाचा नेता अधिकारी म्हणून कांहीं काळ वावरलेला असतो तो कांहीं आपल्या भोळेपणामुळें असें झालें असें म्हणूं शकत नाहीं. लोकशाही स्वातंत्र्यावर आघात करून तो पराभूत झाला आहे. दैवदुर्विलास असा कीं ज्या लोकशाही स्वातंत्र्यावर त्यानें आघात केला त्या समाजांत तो आहे म्हणूनच साम्यवादी पक्षाचा तो त्याग करूं शकला. त्याचें अुद्दिष्ट सफल झालें नाहीं हें त्याचें मोठेंच

भाग्य होय ! लोकशाही देशांतील पस्तावा न पावलेल्या साम्यद्यांनींहि ते लोकशाही स्वातंत्र्य असलेल्या देशांत आहेत याबद्दल दैवाचे आभार मानायला पाहिजेत. मग पस्तावा पावलेल्या सोडसाम्यवाद्यानें आपल्या दैवाची किती बरें थोरवी गावी ? तो जर सोव्हिएट 'लोकशाहीं'त असतां आणि साम्यवादाबद्दल त्याचा असा भ्रमनिरास त्यानें प्रकट केला असतां तर तो शिल्लकहि राहतां ना !

लोकशाही समाजांत सोडसाम्यवाद्यांना स्थान मिळू नये म्हणून कायमचे अडसर निर्माण करणें जर चुकीचे तर तसले तात्पुरते अडसर एकेकाळच्या सहप्रवाशांविरुद्ध उभारणें हेंहि चुकीचें हें सांगायलाच नको. त्यांना त्यांच्या लायकीप्रमाणें सरकारी खात्यांतहि काम मिळावयास हवें. सहप्रवासी म्हणजे जो प्रसंगविशेषी साम्यवादी पक्षाशीं सहमत होता किंवा त्यांच्या आघाड्यांत ज्यानें कधीं तरी भाग घेतला होता तो. अशांची संख्या खरोखरच गणति करण्यापलिकडे असावी. साम्यवादी कधीं कधीं राजकारणांत आपल्या पक्षाचें घोडें पुढें दामटण्याकरितां का होईना योग्य कारणांना आपला पाठिंबा देतात ही वस्तुस्थिति जरी थोडा वेळ बाजूला सारली तरी लोकाशाहींत एखाद्याचा चुकण्याचा हक्क, चुकीचा असला तरी प्रामाणिकपणें निर्णय घेण्याचा हक्क हा नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क समजला जातो. आणि जेव्हां या चुकीचें त्या व्यक्तीला आकलन होतें तेव्हां तर हक्क नाकारतांच येणार नाहीं. भूतपूर्व सहप्रवाशानें केलेल्या चुकीपेक्षां चुकीची कबूली देण्याची त्याची तयारी व त्याकरितां त्यानें दाखविलेलें धैर्य हें अधिक महत्त्वाचें नाहीं का ? कारण अशी तयारी व धैर्य राजकीय विचारांच्या परिपक्वतेचें लक्षण आहे. त्यामुळें गतकालांत त्यानें केलेल्या चुका भविष्य-काळांत पुन्हां होण्याचा संभव कमी. अशा ज्यांच्याबद्दल आपल्याला अधिक विचार करावयाचा आहे. अशा सोडसाम्यवाद्यांचा सर्वथैव धिःकार करणें हा मूर्खपणा ठरेल हें तर खरेंच. पण भूतपूर्व सहप्रवासी जेव्हां आपल्या विचारां-तल्या चुका अुगमतो आणि अशा चुका पुन्हा त्याच्या हातून होण्याचा संभव उरत नाहीं त्यावेळीं त्याचा निषेध करणें हें अधिकच मूर्खपणाचें ठरेल.

इंग्रज लोक हे परंपरेचे भोक्ते समजले जातात. परंतु तेथेंदेखील अेखाद्या व्यक्तीचें राजकीय पूर्वचारित्र्य त्याच्या वर्तमानकालीन राजकार-

णाच्या आड येत नाहीं. त्याच्या अंगीं गुणवत्ता असेल त्यामानानें त्याला राजकारणांत सेवेचीहि संधि मिळते. जॉ स्ट्रॅची हा इंग्लंडमधील प्रसिद्ध फॅसिस्ट पुढारी ऑसबाल्ड मोसले यांचा अनुयायी होता. पुढे तो साम्यवाद्यांचा सहप्रवासी बनला. असें असूनहि नंतर तो त्या दोघांपासूनहि दूर गेल्यावर आयुष्याच्या अखेरीस मजूर मंत्री मंडळांत युद्धमंत्रि म्हणून त्यानें काम केलें !

प्रस्थापित समाजाला विघटित करण्याचे साम्यवादी पक्षाचे जे अनंत मार्गांनीं सतत प्रयत्न चाललेले असतात ते सोडसाम्यवाद्यांना अवगत असतात. समाजाला त्यांचा मुख्य उपयोग होऊं शकतो तो त्याच्या या ज्ञानापासूनच होय. एखादा सोडसाम्यवादी खरोखरच कांहीं महत्त्वाची–विशेषतः त्यांच्या यशस्वी घुसाघुशीच्या तंत्राविषयींची माहिती देऊं शकेल. ही माहिती जितकी शांतपणें व गाजावाजा न करतां देण्यांत येईल तितका तिचा अधिक फायदा. त्याच्याकडून जाहीर कबुलीजबाब घेणें, त्याच्या पूर्वींच्या साथीदारांना जाहीर रित्या ओळखून काढावयास लावणें हें शहाणपणाचें खास नाहीं. असे प्रकार करणें नैतिक दृष्टया फायदेशीर होत नाहींच, उलट त्यांची वारंवार पुनरावृत्ति केल्यानें तो एक धंदेवाईक साक्षीदार बनतो आणि स्वतःचा पुरावा अगदीं बरोबर असला तरी तो स्वतःचीच किंमत कमी करून घेतो. जर त्याच्याजवळ खरोखरच महत्त्वाची माहिती असेल तर ती त्याला गौरविल्याशिवाय किंवा त्याची मानहानि केल्याशिवाय मिळणें शक्य व्हावें. जे त्यांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करतात किंवा त्यांच्या महत्त्वाच्या आणि लोकशाहीच्या जीवनमरणाच्या लढयाला उपयुक्त ठरेल अशी माहिती उडवून लावतात किंवा जे 'साम्यवाद्यांपेक्षां हे सोडसाम्यवादीच अधिक वाईट' असें म्हणतात ते एक तर साम्यवादाचे हितचिंतक तरी असले पाहिजेत किंवा त्यांच्यापाशीं सारासारबुद्धीचा दुष्काळ तरी असला पाहिजे. साम्यवादी पक्ष हा आपल्या मार्गावर कृतनिश्चयानें चालतो. विशेषतः जेव्हां चेहऱ्यावर हंसू आणून अपरिपक्व बुद्धीच्या व्यक्तीशीं संबंध ठेवून त्याला फसविण्याचा तो पक्ष प्रयत्न करतो तेव्हांहि अशाच प्रकारच्या कृतनिश्चयानें आणि कठोर बुद्धीनें तो वागत असतो. सोडसाम्यवाद्याइतकी याची चांगली कल्पना इतर कुणालाहि नसते. म्हणून तो अशा संभाव्य

व्यक्तींना याची पूर्वसूचना देऊन त्यांना साम्यवादी त्याचा न मिळत नसे. करून घेतात व शेवटीं त्यांच्या नाशाला कसे कारणीभूत होता ेल्या रासा- पण त्या वेळीं त्याला प्रतिसाद मिळतो तो अविश्वासाचा आणि ा रासा- शिव्यांचाहि. अशा अनुभवानें त्याला निराशा वाटली तर आश्चर्य क. त्या त्यामुळें एखादा माणूस नकळत अपघातांत सांपडत आहे, पण आपला आवा क त्याच्यापर्यंत जाऊं शकत नाहीं हें दिसून आल्यावर आपलें अवसान जसें सुटतें तसें त्याचें अवसान त्यावेळीं सुटतें व तो अतिशयोक्त बोलूं लागतो.

फारच थोडे सोडसाम्यवादी आपले विचार बोलून दाखवतात आणि जेव्हां चूप रहाणें हें त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीनें घातक ठरण्यासारखें असतें तेव्हांच ते आपलें तोंड उघडतात. ते स्वेच्छेनें बोलत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास किंवा साम्यवादी पक्षाबद्दल—ज्याच्या दृष्टीनें ते एक नंबरचे दुष्मन आहेत—माहिती सांगण्यास नकार दिल्यावरून त्यांनीं कोर्टाचा अगर संसदेचा उपमर्द केला अशा आरोपाखालीं त्यांना तुरुंगांत टाकावे अशी पोथीबंद उदारमतवाद्यांची अपेक्षा असते. पण अशी अपेक्षा करणें चुकीचें आहे. हे पोथीबंद उदारमतवादी साम्यवादी शब्दप्रामण्यावर निष्ठा ठेवून त्याप्रमाणें काम करणाऱ्या साम्यवाद्यांपेक्षां त्या निष्ठेला तिलांजलि दिलेल्या सोडसाम्यवाद्यांशींच अधिक शत्रुत्व धरतात हें त्यांच्या पोथीबंदपणाचें बोलकें उदाहरण आहे.

परंतु ज्या वेळीं सोडसाम्यवादी बोलतात तेव्हां त्यांचें सारेंच बोलणें ग्राह्य मानतां येईल का? ते सांगतील त्यांतील सत्यासत्य आपल्याला पडताळून पहावयाचा मार्ग कोणता? त्यांतील वैयक्तिक द्वेषाचा किंवा खुनशीपणाचा भाग किती आहे हें तपासून कसें पाहतां येईल? आणि सोड-साम्यवादी म्हणविणारा प्रत्येक जण खरोखरच प्रामाणिक सोडसाम्यवादी आहे, साम्यवाद्यांनीं लोकशाहीवाद्यांत घबराट माजविण्याच्या दृष्टीनें त्याला पुढें केलेलें नाहीं किंवा तो साम्यवाद्यांचाच हस्तक नाहीं याची निश्चिति कशी काय करून घेतां येईल? अमेरिकेंतील सोडसाम्यवादी म्हणविणारे चाम्बर्स किंवा बुण्डेझ हे खरोखरीच सोडसाम्यवादी आहेत किंवा काय अशी प्रामाणिक शंका सिनेटर फुल्ब्राईट यांनाहि आली होती.

वरील प्रश्नांतील पहिला प्रश्न आधीं घेऊं. सोडसाम्यवाद्यांच्या रूपानें

वावरणारा साम्यवाद्यांचा कोणताहि हस्तक रशियन सत्ताधाऱ्यांचा जाहीर निषेध चुकूनहि करणार नाहीं. याचें कारण ते त्यांचे प्रतिपरमेश्वर आहेत हेंच नाहीं; तर तसें केल्यानें ते खरोखर तसें मानतात किंवा काय याची खात्री साम्यवादी पक्षाला करतां यावयाची नाहीं. त्या हस्तकालाच मग दुटप्पीपणाच्या आरोपाखालीं पक्षांतून अर्धचंद्र देण्यांत येईल (व त्या वेळीं त्याला आपल्यातर्फे पुरावे सादर करतांना वेड लागावयाची पाळी येईल.) यावर चटकन् विश्वास बसणें सामान्यपणें कठीण जातें खरें; पण ज्याला साम्यवादी चळवळीच्या इतिहासाची व दस्तऐवजांची जाणकारी आहे त्याला यांत कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं. कारण वस्तुस्थिति अशी आहे कीं साम्यवादी पक्षाच्या कांहीं सदस्यांनीं ट्रॉट्स्की, नॉर्मन थॉमस वगैरे साम्यवाद्यांच्या शत्रूंवर टीकेचा भडिमार करणारें लेखन प्रामाणिकपणें केलें. पण त्यांनीं आपल्या लिखाणांत ट्रॉट्स्की, थॉमस वगैरेंच्या लेखनांतील उतारे फार दिले यावरून त्यांना प्रच्छन्नपणें साम्यवाद्यांच्या शत्रूंचाच प्रचार करावयाचा होता असा आरोप करून त्यांना पक्षांतून हांकलण्यांत आलें. साम्यवादी पक्षाचे आणि त्यांच्या क्रेमलिनमधील मालकांचे गुप्त हस्तक या सोडसाम्यवाद्यांत असतात. पण त्यांना असा अगोचरपणा करावा लागत नाहीं. त्यांना साम्यवाद्यांनीं सरकारी यंत्रणेंत शिरकाव केल्याबद्दल अतिशयोक्त आणि बेजबाबदार बोलणें करावें लागत नाहीं. जनतेचें नैतिक धैर्य खच्ची करण्याचा हा उद्योग कांहीं मूर्ख साम्यवाद-विरोधक करतातच. मॅक्आर्थी हे त्यांच्यापैकींच एक.

परंतु दुटप्पी हस्तकांच्या काल्पनिक प्रश्नापेक्षां प्रामाणिक सोडसाम्यवाद्यांच्या शब्दावर आपण कितपत विश्वास ठेवावा हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. सामान्य सारासारबुद्धीनें मनुष्य हा स्खलनशील आहे. प्रत्येकाची स्मरणशक्ति सारखीच नसते. सुसंगत वाटणारी हकीगत संपूर्ण खोटी असूं शकते आणि थोड्याफार विसंगत वाटणाऱ्या हकीगतींत सत्याचा बराच भाग असूं शकतो या गोष्टी आपण समजूं शकतों. म्हणून सोडसाम्यवाद्यांची परीक्षा घेतांना ज्यूरी ज्या मार्गांचा अवलंब करतात त्या मार्गांचा अवलंब करून, म्हणजेच सारासार विवेक वापरून त्याबद्दलचें मत बनविलें पाहिजे. मात्र आपल्या सारासार बुद्धीला साम्यवादी पक्ष-संघटने-

बद्दलच्या, त्याच्या कार्यपद्धतीच्या आणि तो आपल्या कार्यकर्त्यांना कोणती शिकवण देतो याच्या ज्ञानाची जरुरी असते. हें ज्ञान मिळविण्याकरितां साम्यवादी पक्षाचें वाङमय तपासून काम भागण्यासारखें आहे. त्याकरितां सोडसाम्यवाद्यांची आवश्यकता नाहीं. कांहीं महत्त्वाच्या बाबतींत त्यांच्याकडून अधिक तपशील मिळूं शकेल एवढेंच.

याबाबतींत लक्षांत ठेवावयाची पहिली गोष्ट म्हणजे पक्षहितासाठीं आवश्यक असेल त्यावेळीं शपथेवर खोटें बोलण्यानें आदेश साम्यवादी पक्ष-सदस्यांना असतो. म्हणून त्यांच्या संदर्भांत ही गोष्ट शक्य आहे; सोड-साम्यवाद्यांच्या बाबतींत नाहीं. खोटी साक्ष देण्याबद्दल अमेरिकेंत अनेक साम्यवाद्यांना शिक्षा झाल्या आहेत आणि जर पांचव्या दुरुस्तीमुळें (fifth Amendment) त्यांना संरक्षण न मिळतें तर कितीतरी अधिक साम्यवाद्यांना शिक्षा झाल्या असत्या. खोटें बोलल्याने खोटी साक्ष दिल्याचा आरोप येतो व कांहींच न बोलल्यास न्यायालयाचा उपमर्द केल्याचा ठपका लागतो म्हणून साम्यवाद्यांनीं पांचव्या दुरुस्तीचा जणू धांवा केला. अर्थात् याच्या उलटहि खरें आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. आतांपर्यंत तरी अमेरिकेंत एकाच सोडसाम्यवाद्यानें खोटी साक्ष दिल्याची नोंद आहे. अर्थात् मागाहून त्याचें पूर्वचारित्र्य समजून त्याला मानसिक व्याधींचा विकार होता हें सिद्ध झालें. इतर कांहीं सोडसाम्यवाद्यांवर असे आरोप आहेत; पण ते कांहीं अजून शाबीत झालेले नाहींत. या संदर्भांत ही गोष्ट लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं ओळख पटण्याच्या बाबतींत किंवा अपुऱ्या पुराव्यावरून केलेल्या निश्चितीच्या बाबतींत थोडा फार गोंधळ होऊं शकेल आणि सोडसाम्यवाद्याची या ठिकाणीं चूक होत असली तरी तो मुद्दाम (शपथेवर) खोटें सांगतो असें म्हणतां यावयाचें नाहीं. बऱ्याच वेळां होतें काय कीं, साम्यवादी पक्षसदस्यांना एकमेकांशीं व आपल्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशीं आपल्या कामगिरीबद्दल बोलतांना हाताच्या ठिकाणीं दीड हात करून बोलावयाची संवय असते. एखादा सदस्य "क्ष" बद्दल दुसऱ्या सदस्याशीं बोलतांना म्हणतो कीं तो पक्षाच्या अमुक एका आघाडीवर काम करतो आणि तो "आपल्यांतीलच" आहे. जेव्हां तो दुसरा सदस्य साम्यवादी पक्षाचा त्याग करतो त्यावेळीं त्याचा असा प्रामाणिक समज असतो कीं

"क्ष" हा पक्षसदस्यच आहे. अशा वेळीं त्याच्या या सांगण्याला 'क्ष'चे विशिष्ट आघाडीवरील संबंध सोडल्यास पुरावा म्हणजे तो साम्यवादी पक्षाचा सभासदच होय! मात्र ज्यावेळीं सोडसाम्यवाद्यांची माहिती अशी सांगोवांगीची नसते व स्वतःच्या अनुभवाची असते त्यावेळीं ती फार मोलाची ठरते.

सोडसाम्यवादी म्हणतो म्हणून तो सांगतो तशीच वस्तुस्थिति असेल असें नाहीं किंवा तो सांगतो म्हणून ती तशी नसेलच असेंहि नाहीं; किंवा तो म्हणतो तें संशयास्पद असतेंच असेंहि नाहीं. मागील अनुभव काय आहेत, त्यानें सांगितलेल्या गोष्टींना दुसरीकडून पुष्टि मिळाली आहे किंवा नाहीं या सर्वांचा विचार करून त्याच्या सांगण्याचा विचार करतांना सबंध संदर्भ लक्षांत आणावा लागेल. त्याच्या सांगण्यांतला खरेखोटेपणा, काय संबद्ध आहे व काय असंबद्ध आहे याचा विवेक ठेवून शांतपणें तपासणी करून अजमावतां येण्यासारखा आहे. केवळ देशप्रेमामुळें हें जमणार नाहीं. साम्यवाद्यांविरुद्ध उन्माद माजवूं पहाणाऱ्यांना कांहीं गोष्टी खऱ्या असल्या तरी पटत नाहींत. अशांच्या हुल्लडबाजीला बळी पडल्यानेंहि तें जमणार नाहीं.

## याचें कारण काय ?

सोडसाम्यवाद्यांकडून साम्यवादी पक्ष व क्रेमलिन यांचे संबंध कसे आहेत हें उजेडांत आल्यावर अधिकाधिक साम्यवादी पक्षाला रामराम ठोकून त्यापासून दूर कां होत नाहींत किंवा जे दूर झालेलेच आहेत ते त्यांना माहीत असलेली माहिती अधिकाधिक प्रमाणांत जाहीर कां नाहीं करीत या प्रश्नांचीं उत्तरें सर्व सोडसाम्यवाद्यांनीं एकजात सारखींच दिलीं आहेत. तीं म्हणजे पक्ष सोडणाऱ्यांचा साम्यवादी पक्ष बदला घेतल्याशिवाय रहात नाहीं. त्याचप्रमाणें समाजांतल्या बहुसंख्य लोकांना वाटतें कीं 'क्षणाचा साम्यवादी हा कायमचा साम्यवादी' असतो. त्यामुळें सोडसाम्यवाद्यांचा एकमुखी धिक्कार होत असतो. धिक्काराच्या भीतीनेंहि साम्यवाद्यांपैकीं कांहींना तरी निदान अडविलें जातें.

विचारपूर्वक आणि जबाबदारीनें बोलणाऱ्या सोडसाम्यवाद्यांपासून आपणास किती तरी बोध घेतां येईल. विशेषतः मतपरिवर्तनामागचें

मानसशास्त्र, साम्यवादाचें आकर्षण, राजकीय हेतूनें शिरकाव करण्याचें तंत्र आणि परिणामकारक शैक्षणिक उपाय या गोष्टी त्यांच्यापासून शिकतां येण्यासारख्या आहेत. सोडसाम्यवाद्यांनीं साम्यवादी पक्षापासून घेतलेली फारकत ही प्रामाणिक आहे, वैयक्तिक सोयीसाठीं ती घेतलेली नाहीं हें दिसून आल्यावर त्याला नोकरीचे सर्व मार्ग उपलब्ध करून देण्यांत यावेत. कोणत्याहि पोलिसी उपायापेक्षां या मार्गानें साम्यवादी पक्षाची सभासद संख्या कमी करतां येईल. अमेरिकेंत कांहीं कामगार–संघटनांनीं याबाबतींत पुढाकार घेतला आहे. त्याचप्रमाणें कांहीं चर्चेस्‌नींहि त्यांचें अनुकरण केलें आहे. मात्र सोडसाम्यवादी एक प्रकारच्या राजकीय चर्चेतून सुटका करून घेऊन आल्यानंतर ते धार्मिक चर्चेकडे वळतील किंवा दुसऱ्या कोणत्याहि आध्यात्मिक वादाच्या पाठीमागें लागतील हें संभवनीय नाहीं. स्वतंत्र बुद्धिवाद व स्वायत्त नैतिकता यांवरील विश्वास त्यांनीं मोठ्या प्रयासानें मिळविलेला असतो. तो त्यांना अशा मार्गापासून दूर ठेवतो.

या सोडसाम्यवाद्यांपैकीं कांहींजण असे आहेत कीं जे आपल्या सभोंवतीं दिसणारीं सामाजिक दुःखें नाहींशीं करावयास उतावीळ झाले होते. साम्यवाद प्रत्यक्षांत उतरतो तेव्हां यापेक्षांहि मोठीं दुःखें बरोबर घेऊन येतो याची शिकवण त्यांना मिळाली नव्हती. त्यामुळें साम्यवादी पक्षांत सामील होणें हा आपल्याला आपल्या बांधवांबद्दल वाटणाऱ्या कळकळीचा पुरावाच असें त्यांना वाटे. या भावनेंतून त्यांनीं साम्यवादी पक्ष कवटाळला होता. निराश झालेल्या या ध्येयवाद्यांपैकीं कांहीं कमालीचे आत्मकेंद्रित झाले आहेत तर कांहीं राजकीय दृष्ट्या अश्रद्ध व तुच्छतावादी बनले आहेत. परंतु यासंबंधीच्या वाङ्मयाचें परिशीलन केलें तर असें दिसून येतें कीं त्यांच्यापैकीं बहुसंख्य व्यक्तींना स्वातंत्र्याच्या लढ्यांत आपल्या प्रयत्नांची शिकस्त करावी असें वाटतें. त्यांची स्थिति प्रेमभंग झालेल्या पण उत्कटतेनें प्रेम करण्याची तृष्णा असणाऱ्यांसारखी झालेली असते आणि पूर्वायुष्यांतील आपल्या चुकीच्या आणि दुःखद निवडीमुळें तर त्यांच्या भावनेला अधिकच धार आलेली असते. त्यांचा सुरवातीचा ध्येयवाद आतां अधिक विचारी बनलेला असतो. त्यांतील साम्यवाद आणि दुसऱ्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना सुधारण्याचा आवेश ओसरलेला असतो आणि इतिहासां-

तून निघालेल्या तत्त्वज्ञानापेक्षां स्वप्नसृष्टींतील आदर्शवाद हा पृथ्वीवर नंदनवन उभारण्याच्या कामीं अधिक मार्गदर्शक ठरूं शकेल याचीहि त्यांना जाणीव झालेली असते. अशांना विविध क्षेत्रांतून काम करण्यापासून वंचित करणें हें कोठल्याहि निकषावर घांसून पाहिलें तरी अयोग्यच ठरेल.

सोडसाम्यवाद्यांपासून भूतकालाविषयींची माहिती मिळवणें आणि त्यांच्या सूचना ऐकणें ही एक गोष्ट आणि ते आपले भविष्यकाळांतील मार्गदर्शक आहेत असें समजणें ही अगदीं वेगळी गोष्ट आहे. साम्यवादाच्या विरुद्ध लढ्यासाठीं लोकशाही समाजानें नेतृत्वासाठीं सोडसाम्यवाद्यांकडे पहावयास हवें व त्यांच्या नेतृत्वाखालीं सोव्हिएट रशियाच्या आव्हानाला उत्तर देण्यासाठीं सक्रिय कार्यक्रम निर्माण करावयास हवा असें नाहीं. कारण आपण पाहिलेंच आहे कीं सोडसाम्यवाद्यांचीहि आपापसांत मतभिन्नता असते. आणि अर्न्स्ट रूटरसारखा सन्मान्य अपवाद वगळतां त्यांना लोकांत विश्वास निर्माण करण्याएवढी नैतिक पात्रता नसते आणि तेवढी व्यक्तिमत्वाची उंचीहि त्यांच्यापाशीं नसते.

'साम्यवाद आणि सोडसाम्यवादी' या आपल्या रोचक पुस्तकांत अर्न्स्ट व लोथ यांनीं एका सोडसाम्यवाद्याच्या तोंडचे शब्द घातले आहेत. तो म्हणतो, "साम्यवादाशीं मुकाबला करण्यास सोडसाम्यवादी आणि मार्क्स-वाद, लेनिनवाद व स्टॅलिनवाद यांचा अभ्यास केलेले भूतपूर्व सहप्रवासी हेच सर्वांत लायक आहेत!"

हें संघटनेच्या पातळीवरच खरें आहे. चोराला चोराच्या वांटा माहीत असाव्यात हें ठीकच आहे. परंतु राजकीय व तात्त्विक पातळीवर साम्यवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणें व त्यावर प्रभुत्व मिळविणें हें जे साम्यवादी नाहींत व पूर्वीं कधीं नव्हते अशांना अधिक चांगल्या रीतीनें शक्य होईल. बुद्धिवान् सोडसाम्यवादी हे बुद्धिवान् सल्लागार होऊं शक-तील. पण त्यांचा सल्ला एकांतिक किंवा मार्क्सवादी, लेनिनवादी तत्त्वज्ञाना-संबंधी भ्रमनिरास झाल्यावर लाभलेल्या नव्या दृष्टिकोनांतून तोलून उपयोग नाहीं; तर तो तदनिरपेक्ष प्रत्यक्ष सामाजिक व राजकीय दृष्टि-कोनानें पारखून घ्यावयास पाहिजे.

• • •

# परिशिष्ट पहिलें

पुढील दोन पत्रांवरून अमेरिकन सहप्रवाशांचीं कांहीं वैशिष्टयें ध्यानांत यावींत.

जागतिक शांततेकरिता सांस्कृतिक व शास्त्रीय परिषदेचें अधिवेशन वॅलडॉर्फ (न्युयॉर्क) येथें ता. २५, २६ मार्च १९४९ ला भरलें होतें. त्याचें निमंत्रक होते थॉमस मान. ही परिषद म्हणजे १९४६ मध्यें पोलंड देशांत भरलेल्या जागतिक बुद्धिवाद्यांच्या शांतता परिषदेंतून निघालेलें पिल्लूंच होतें. त्यावेळीं मान यांना लिहिलेलें पत्र पहिल्यांदा दिलें आहे. पॅरिसला एप्रिल २० ते २३, १९४९ पर्यंत भरणाऱ्या जागतिक शांतता परिषदेच्या पाया-भरणीचें कार्य तिला करावयाचें होतें.

दुसरें पत्र अमेरिकेंतल्या शांतता परिषदेच्या अध्यक्षांना दुसऱ्या एका निमंत्रकानें लिहिले आहे. हे दुसरे निमंत्रक म्हणजे शिकागो विश्वविद्यालयाचे प्राध्यापक अँटन जे. कार्लसन हे होत.

## थॉमस मान यांना लिहिलेलें पत्र

प्रिय श्री. मान. १४ मार्च १९४९

न्यूयॉर्कमध्यें ता. २५–२६ मार्चला वाल्डॉर्फमध्यें 'जागतिक शांततेकरिता सांस्कृतिक व शास्त्रीय परिषद' भरणार आहे. तिच्या संबंधांत आपल्याला पुन्हा एकवार लिहूं अिच्छितों. या परिषदेच्या निमंत्रक गटानें मला माझा निबंध वाचून दाखविण्यास परवानगी नाकारली आहे. या निबंधांत मी तीन विषयांचा उहापोह करण्याचा विचार केला होता. हे विषय आज सर्वांत अधिक महत्त्वाचे आहेत अशी माझी कल्पना आहे.

(१) शास्त्राच्या संदर्भांत 'राष्ट्रीय सत्यें' असा कांहं प्रकार असू शकत नाहीं. त्या शास्त्रांतील उणिवामुळेंच ते एखाद्या विशिष्ट 'राष्ट्राचें शास्त्र' आहे असें भासू शकेल.

(२) शास्त्रांत "वर्गीय सत्यें" किंवा "पक्षीय सत्यें" असा प्रकार नसतो. कोणताहि सिद्धांत आणि त्यापासून होणारे उपयोग–

मग ते चांगलें असोत, वाईट असोत-कोणत्याहि देशांत सारख्याच रीतीनें अंमलांत येऊं शकतात असा भरपूर पुरावा आहे. त्याच्याशीं वरील प्रकारच्या विचारसरणीचा मेळ बसत नाहीं.

(३) शास्त्रांत 'राष्ट्रीय', 'पक्षीय' व 'वर्गीय' सत्यें असतात या कल्पनेच्या प्रभावामुळें विज्ञानविषयक आंतरराष्ट्रीय सहकार्यांत आणि जागतिक शांततेच्या उद्दिष्टांत अडथळे निर्माण झाले आहेत.

मला माझा निबंध कोणत्याहि चर्चासत्रांत सादर करण्याची परवानगी नाकारण्यांत आला. एवढेंच नव्हे तर विषयनियामक समितींतहि मला भाग घेण्यास परवानगी दिली नाहीं. मी १५ मिनिटांचा अवधि मागितला होता. कार्यक्रम समितीच्या डॉ. हर्बर्ट डेविस, डॉ. गाय अेमरी शिल्पर प्रभृति सभासदांनींहि अध्यक्ष प्रा. शॅपले यांना मला बोलूं देण्याची विनंति केली होती. तरी मला बोलण्याची संधि मिळाली नाहीं.

आपलें नांव निमंत्रकांच्या यादींत आहे म्हणून मी आपल्याला विनंति करतों कीं, मला माझा निबंध विषयनियामक समितीपुढें मांडण्याची परवानगी देण्यांत यावी. ज्या दृष्टिकोनाचें मी प्रतिनिधित्व करतों तो परिषदेपुढें मांडला जाण्याची कार्यक्रम समितीनें तजवीज केली नाहीं हेंदेखील मी आपल्या निदर्शनास आणूं अिच्छितों. त्याचबरोबर गेल्या कांहीं वर्षांत हुकूमशाहीविरुद्ध—त्यांत स्टॅलिनची हुकूमशाहीदेखील आली—ज्यानें ज्यानें एखादा शब्दहि उच्चारला असेल अशांना वगळण्यांत आलें आहे. जॉन ड्युअी, अर्न्स्ट नागेल, हॉरेस कालेन, जेम्स टी फारेल, डॉस पासस, अेडमंड विल्सन, मेयर शॅपिरो व अशा कितीतरी व्यक्तींना या शांतता परिषदेचें आमंत्रण नाहीं.

अमेरिकेंत असणारे व नोबेल पारितोषिक—विजेते वंशशास्त्रज्ञ प्रा. एच्. मुल्लर यांना आमंत्रण नाहीं. परंतु त्यांनीं लियेन्स्को (Lyensko) यांच्या सिद्धांतावर टीका केली म्हणून सोव्हिएट विज्ञान अकादमींतून त्यांच्या उचलबांगडीस कारणीभूत झालेल्या जे. जोपरिन या त्या अकादमीच्या चिटणीसाला मात्र आमंत्रण आहे.

ता. ४ मार्चच्या The New York Times च्या अंकांत निमंत्रकांपैकीं कोलंबियाचे प्रा. आर्विन अेडमन यांनीं राजीनामा दिल्याचें वृत्त आहे. राजिनाम्याच्या पत्रांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं 'ही परिषद साम्यवाद्यांची किंवा तत्सम विचारसरणीची तळी उचलून धरावी म्हणून भरवण्यांत आली आहे.' हें खरें नसावें अशी माझी प्रामाणिक अपेक्षा आहे. परंतु ज्या रीतीनें ही परिषद भरविली जात आहे आणि मला आतांपर्यंत तिचा जो कांहीं अनुभव आला आहे त्यावरून पहातां पोलंडच्या शांतता परिषदेच्या धर्तीवरच ही परिषद चालली आहे असें मला वाटूं लागलें आहे.

आपला

सिडने हूक.

ता. क.–वरील पत्र लिहिल्यावर माझ्या असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं पोलंडमध्यें भरलेल्या शांतता परिषदेच्या 'प्रसार' समितीचे (continuation committee) सभासद म्हणून डॉ. हार्लो शॅप्ले, हॉवर्ड फास्ट, जो डेविडसन आणि कुप्रसिद्ध साम्यवादी कार्यकर्ते व न्यूयॉर्क राज्य साम्यवादी पक्षाच्या कार्यकारिणीचे सभासद आल्बर्ट अी. काहन या अमेरिकन नागरिकांची वर्णी लावण्यांत आली होती. डॉ. शॅप्ले यांच्याशिवाय सर्वांनीं तें मान्य केलें आणि डॉ. शॅप्ले यांच्यासह सर्वांनीं प्रस्तुत शांतता परिषदेचा घाट घातला होता. एवढेंच नव्हे तर परिषदेच्या निमंत्रकांत कमीत कमी नव्वद जण सुप्रसिद्ध सहप्रवासीच होते हें मी प्रत्यक्ष नांवें मोजून पाहिलें आहे.

माझी खात्री आहे, जरी आपलें नांव निमंत्रकांच्या यादींत असलें तरी तें खोटया कारणांनीं मिळविलेलें आहे. कांहीं असलें तरी आपल्या चांगल्या नांवलौकिकाच्या हिताच्या दृष्टीनें मला कार्यक्रमांत भाग घेण्यास व माझा दृष्टिकोन परिषदेसमोर मांडण्यास परवानगी द्यावी अशी आग्रहपूर्वक विनंति करावीशी वाटते. यासंबंधांत आपण डॉ. शॅप्ले यांना जें पत्र पाठवाल त्याची एक प्रत मला पाठवल्यास मी उपकृत होईन. प्रा. अेडमन यांच्या राजिनाम्याचें पत्र संघटना–

समितीनें दाबून ठेवल्यानें त्यांना स्वतःच तें प्रसिद्धीसाठीं देणें भाग पडलें. यासाठीं मला आपल्याला अशीहि विनंति करावयाची आहे कीं आपण परिषदेला कांहीं तारा किंवा पत्रें पाठविलीं असतील तर त्यांच्या प्रतीहि मला पाठवाव्यात.

मला तर असें वाटतें कीं आपल्यासारख्यांनीं कांहीं विशिष्ट व्यक्ति व गट—ज्यांचें प्रधान उद्दिष्ट सोव्हिएट रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाची तळी उचलणें हेंच आहे—यांच्यापासून निःशेषपणें संबंध तोडल्यानेंच जागतिक शांतता कार्याची अधिक सेवा होईल.

## जे. जे. कार्लसन यांचें पत्र

९ मार्च, १९४९

प्रिय डॉ. शॅप्ले,

आपण विनंति केल्यावरून 'जागतिक शांतता' परिषदेच्या निमंत्रकांत मी नांव दिलें. त्यावेळीं माझी कल्पना होती कीं परिषद नांवाप्रमाणेंच शास्त्रीय वृत्तीची व सर्व कारभार उघडपणें करणारी असेल.

माझे एक कर्तबगार सहकारी डॉ. सिडने हूक यांना परिषदेच्या कार्यक्रमांत भाग घेण्यास नकार दिला आहे हें ऐकून मी फार अस्वस्थ झालों आहे. शास्त्रासंबंधीची माझी कल्पना जर बरोबर असेल तर मला वाटतें डॉ. सिडने हूक ज्या विषयांवर विचार मांडू इच्छित होते ते तीन विषय (सोबतचे कागद पहा) शास्त्राच्या दृष्टीनें मूलभूत असे आहेत. आपण माझ्याशीं सहमत व्हाल आणि परिषदेचें स्वरूप न्याय्य ठेवाल अशी आशा आहे. आपणांसारख्या शास्त्राच्या अभ्यासकांनीं याहून कांहीं कमी करून भागण्यासारखें नाहीं.

आपला

जे. जे. कार्लसन.

प्रत : थॉमस मान.
डॉ. सिडने हूक.

• • •

# परिशिष्ट दुसरें

## हॅरी गोल्ड यांचें निवेदन

प्रामाणिक व कळकळीच्या लोकांवर प्रभाव पाडण्यासाठीं वापरांत येणाऱ्या सोव्हिएट तंत्राविषयीं माझे स्वत:चे जे अनुभव मी मांडत आहे त्यासाठीं:

१) सोव्हिएट हस्तकांशीं माझा व्यक्तिगत संबंध आला असतांना व नंतर सो. रशियासाठीं हेरगिरी करीत असतांना घडलेल्या कांहीं विशिष्ट घटना मी पहिल्यांदा नमूद करणार आहे. व नंतर

२) या घटना एका मोठ्या मोहिमेचे भाग म्हणून कशा चपखल बसतात तें मला दाखवावयाचें आहे. वस्तुत: याच क्रमानें मलाहि या गोष्टीचें आकलन झालें. म्हणजे पहिल्यांदा दूर दृष्टीच्या परंतु वरवर पाहतां असंबद्ध आणि अर्थहीन भासणाऱ्या घटना आणि नंतर त्यांच्या महत्त्वाचें फार उशिरा झालेलें आकलन.

**सुरुवातीला :**

रासायनिक प्रक्रियांविषयक माहिती मी १९३४–३५ मध्यें सो. रशियासाठीं मिळविली. त्यांत बऱ्याचशा 'औद्योगिक द्रावणां'च्या (Industrial Solvents) उत्पादनाच्या पद्धति होत्या. या पद्धतींचा लाखेची व अितर अनेक प्रकारचीं रोंगणें तयार करण्यासाठीं उपयोग होत असतो. 'आमचे लोक (रशियन) फार हालाखींत दिवस काढतात. ही माहिती मिळवून देऊन तुम्हीं त्यांना माणसासारखें जगावयास मदत करूं शकाल.' असें मला त्यावेळीं सांगण्यांत आलें. ही माहिती मला माझ्या मालकापासून चोरून मिळवावी लागणार होती. माझे मालक म्हणजे पेनिसिल्व्हिया शुगर कंपनीचे संशोधन खात्याचे मुख्याधिकारी डॉ. गुस्टाव टी रामिश हे होत. ते केवळ माझे मालकच नव्हते तर रासायनिक संशोधन क्षेत्रांत सुरुवातीला मी अडखळत असतांना माझ्याशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागणारे दिलदार सद्‌गृहस्थहि होते. म्हणजे ही कामगिरी करण्यांत विश्वासघात आणि चोरी या दोन्ही गोष्टींचा अंतर्भाव होत होता. (परंतु

यांपैकीं कशाचेंहि मला त्यावेळीं कांहीं वाटलें नाहीं; कारण हें सारें ज्यासाठीं करावयाचें तें ईसिन चांगलें होतें. पेनिसिल्व्हिया शुगर कंपनीचें कांहीं नुकसान होत नव्हतें; कुणाचेंच कांहीं नुकसान न होता दुसऱ्यांचें थोडेंफार चांगलेंच घडून येणार होतें.)

३) १९३७ च्या फेब्रुवारी–मार्चमध्यें पेनिसिल्व्हिया शुगर कंपनींत मोठा हिंसक संप घडून आला. सुमारें ६०० स्त्री–पुरुष कारखान्यांत सुमारें ५ आठवडे वेढले गेले होते आणि किमान तितकेच लोक बाहेर होते. विरोधकांमधून वाट काढणें म्हणजे जिवावरचा प्रसंग होता. कारखाना देलावार (Delawar) नदीकांठीं असल्यामुळें लाँचमधून कारखान्यांत अन्न पुरवठा करण्यांत येत असे. या सुमारास आम्ही साधारणपणें ३० जण प्रयोग शाळेंत काम करीत होतों. आमचा व तंत्रज्ञांचा या संपाशीं तादृश संबंधच नव्हता. पण आम्हांला कारखाना चालविण्यासाठीं मदत करावी लागली असती हें उघड होतें. डॉ. राअिश यांच्या नोकरवर्गापैकीं फक्त एकानेंच काम करावयास नकार दिला– तो म्हणजे हॅरी गोल्ड ! असें करण्यांत माझे हेतु शुद्धच होते असें नाहीं. ज्या दुपारीं संपाला सुरुवात झाली त्या दिवशीं तेथें राहणें मला शक्य नव्हतें. कारण त्याच दिवशीं सायंकाळीं माझी महत्त्वाची भेट ठरली होती. ती मी टाळूं अिच्छित नव्हतों. त्यामुळें मी गोंधळलोंहि होतों आणि माझ्या मनाचा तोलहि गेला होता. सुरुवातीला थोडेसें त–त प–प केल्यावर मी डॉ. राअिश यांना स्पष्ट सांगितलें कीं 'मी कारखान्यांत राहणार नाहीं.' तेव्हां ते भयंकर चिडले. (अितके कीं त्यांनीं पाण्याचा ग्लास जोरांत आपटला आणि त्याचे तुकडे तुकडे झाले.) ते म्हणाले, "तुम्हांला ओळखले मी. चालते व्हा आणि लक्षांत ठेवा तुम्हांला रसायनशास्त्रज्ञ म्हणून कुठेंच काम मिळणार नाहीं." मी बाहेर पडलों. बाहेर जातांना संपवाल्यानें फेंकलेल्या विटेमुळें माझा कपाळमोक्षच व्हायचा; पण अगदी थोडक्यांत वांचलों. माझी मन:स्थिति द्विधा झाली होती. एक म्हणजे संप फोडेपणा करणें ही वाईट गोष्ट आहे असें मी मानीत आलों होतों आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्या ठिकाणची माहिती सो. रशियाला पाहिजे होती त्या ठिकाणच्या नोकरीला मला मुकावें लागणार होतें. मी जें कांहीं केलें तें योग्य केलें का ? माझ्या मनाला शंका सतावूं लागली. पण

या गोष्टीची वाच्यता मी माझ्या सोव्हिएट वरिष्ठाजवळ केली– त्याला मी फक्त स्टीव्ह ( Steve) म्हणून ओळखत असे–तेव्हां त्यानें माझ्या मनांतील संघर्ष ओळखला आणि सहानुभूतिपूर्वक म्हटलें कीं "कांहीं झालें तरी तुम्ही स्वाभिमान गमावतां कामा नये– तुम्हीं संपकाळांत कामावर राहिला असतां तर तुमच्या स्वाभिमानावर प्रहार झाला असता." स्टीव्ह विश्वासपूर्वक पुढें म्हणाला, "डॉ. राअिश आपली धमकी खरी करील असें मला वाटत नाहीं. तो सूडबुद्धीचा नाहीं. आतां तो केवळ रागावला आहे एवढेंच." स्टीव्हनें पुढें असेंहि आश्वासन दिलें कीं जरी मला पुन्हा तेथें काम मिळालें नाहीं तरी माझा तो उपयोग करून घेऊं शकेल (कसा तें मात्र त्यानें स्पष्ट केलें नाहीं). या वेळीं मला वाटलें कीं सो. रशिया क्षमाशील आणि समजुतदार आहे; आपलें नुकसान होत असतांनाहि तें उमदेपणानें सहन करण्याची त्याची तयारी आहे– पण वस्तुस्थिति अशी होती कीं या वेळपर्यंत पेनिसिल्व्हिया ह्या कंपनीचेंच जबर नुकसान झालें होतें. हें सारें आतां मूर्खपणाचें आणि भाबडेपणाचें वाटेल. परंतु मी ज्या काळांतील घटनेबद्दल सांगतों आहे तो काळ वेगळा होता आणि घटना जशी घडली तशी येथें नमूद केली आहे.

४) या ठिकाणीं अेक गोष्ट जरूर नमूद केली पाहिजे. या संपांत कामगारांचा जय झाला आणि नंतर जो करार केला गेला त्यांत कोणाहि कामगाराला संपांत भाग घेतल्याबद्दल शिक्षा होऊं नये असें अेक कलम होतें. प्रयोगशाळेंतील नोकरवर्ग कामगार संघाचे सभासद नसले तरीहि तें कलम त्यांना लागूं होतें. डॉ. राअिश मनांत कोणतीहि अढी अथवा कोणतेंहि किल्मिष न ठेवतां माझ्याशीं वागूं लागले. अेवढेंच नव्हे तर मी परत कामावर रुजूं झाल्यावर मला बढत्या मिळण्यांतही कांहीं अेक त्रास झाला नाहीं. जणू मी संपांत भाग घेऊन त्यांच्या दृष्टीनें ठरणारा मोठा गुन्हा केलाच नव्हता.

१९४२ च्या मार्च किंवा अेप्रिलच्या सुमारास मला सैन्यांत भरती होण्याची वेळ आली होती. मी माझ्या सोव्हिअेट अधिकाऱ्यांशीं, **सॅमशी**– त्याचें सांव सेमन मार्कोव्हिच सेमोनॉव्ह होतें हें पुढें समजून आलें–**माझें** काम कुणावर सोपवतां येईल याची चर्चा करावयास गेलों. मला वाटत

१९४५ पर्यंत याहि प्रकारानें सैन्यांत भरती होण्याचें टाळण्याबद्दलच तो नांव जनातो करील. पण तसें घडलें नाहीं. 'कांहीं हरकत नाहीं. जा मधून न तुमचें भलें करो' असा त्याच्या बोलण्याचा रोख होता. त्याच्या सोड चा सारांश असा कीं फासिझम विरुद्धच्या लढ्यांत आघाडीवरील त क म्हणून लढण्याच्या माझ्या इच्छेचें सोव्हिअेट रशियाला (त्याला नव्हे तर सोव्हिअेट रशियाला बरें) कौतुकच वाटतें. असें करण्याचें मी टाळूं नये हें उत्तम. कारण तसें केल्यास मी अेक प्रगल्भ माणूस म्हणून जगण्यास नालायक ठरेन. तें सारें मला मुकाट्यानें अैकावें लागलें.

पण मला रक्तदाबाच्या विकारामुळें सैन्यांत प्रवेश नाकारण्यांत आला. तो दिवस बहुधा २० अेप्रिल १९४२ चा असावा. त्याबरोबर मी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गेलों आणि मला सैन्यांत दाखल करून घ्या अशी मी त्यांना विनंती केली. त्यांनीं मला स्वच्छ सांगितलें कीं मी त्यांचा वेळ वायां दवडीत आहे. नंतर मी अेकदां आरमारांत व नंतर नाविक दलांत सामील होण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचाही कांहीं उपयोग होऊं शकला नाहीं.

सेमेनॉव्हकडे मी परत गेल्यावर त्यानें माझें स्वागत केलें. मी त्यावेळीं कांहींहि करावयास तयार होतों. कोणतीहि आज्ञा पाळावयास तयार होतों.

आतां घडलेली गोष्ट नेमकी कधीं—कोणत्या तारखेला घडली तें सांगतां येणें कठीण आहे. १९४३ च्या सुमारास कधींतरी ती घडली अेवढें खास. परंतु त्याच्या आधीं आणि नंतरहि थोड्याफार फरकानें असे प्रसंग घडून आले. माझ्या बाबतींत या तंत्राचा अवलंब पहिल्यापासून म्हणजे १९५५ मध्यें जेव्हां मी सोव्हिअेट मध्यस्थाच्या संपर्कांत आलों तेव्हांपासून करण्यांत येत होता. (सो. रशियाकरितां मी हेरगिरीचें काम १९३४ पासून जरी करूं लागलों होतो तरी सोव्हिअेट मध्यस्थाची आणि माझी भेट नंतर वर्षभरानें झाली.) १९४३ सालीं मला अमेरिकन रासायनिक तंत्रज्ञ अेब ब्रॉथमन यांच्यापासून कांहीं माहिती काढावयाची होती. ती मिळवायला मला प्रयास पडत होते. ब्रॉथमन माहिती देण्यास तयार नव्हता असें नाहीं. तो स्वतःच्या कामाची माहिती पुरवीत असे. पण आम्हांस

ती नको होती. आम्हांला पाहिजे ती माहिती त्याच्याकडून– त्याला मी (पाहिजे असलेली माहिती म्हणजे अमेरिकेंत "यशस्वी" झाल्या मनांतील यनिक प्रक्रिया. " यशस्वी " याला खास अर्थ होता. अमेरिकेंत ज्यरी तुम्ही यनिक प्रक्रिया पैसे कमावण्याच्या दृष्टीनें उपयोगी पडल्या असतील मतां यशस्वी. पण ज्यांचा वापर करण्यांत आला नाहीं अशा त्याहूनहि अधिकें सुधारलेल्या आणि चांगल्या पद्धति त्यांना नको असत.)

......मी अेका आठवड्यांत फिलाडेल्फिया ते न्यूयॉर्क अशा तीनचार खेपा (पेनिसिल्व्हिया शुगर कंपनींत दिवसभर काम करून) केल्या होत्या. शेवटच्या खेपेला मी फार थकलों होतों, कंटाळलों होतों. अेब मला हवी ती माहिती पुरवूं शकला नाहीं. त्या दिवशीं सायंकाळीं पुन्हा अपयश आल्याचें कळविण्याकरितां मी सेमेनॉव्हच्या भेटीला गेलों. मी फार त्रासलों होतोंच, पण सेमेनॉव्हदेखील फार कंटाळलेला दिसला. मग आम्ही गप्पा मारीत बसलों. निरनिराळ्या व्यक्तींकडून तांत्रिक माहिती मिळण्यांतील अडचणी, त्यांत वेळोवेळीं पदरी येणारी निराशा, अनेकांची खुशामत करण्याची, स्तुति करण्याची पडणारी जरूरी, वेळप्रसंगीं गळ घालण्याची आणि लबाडी करण्याची आवश्यकता, वारंवार अनुभवावे लागणारे वचनभंग, रस्त्यावर वाट पहात रहाणें आणि शेवटीं निराशा पदरीं घेणें, वेळप्रसंगीं धमक्या देणें, या सर्व उबग आणणाऱ्या प्रकाराबद्दलच आमची चर्चा चालली होती. " हें काम म्हणजे केवळ रुक्ष, गलिच्छ आणि भावना मारून टाकणारें आहे." सेमेनॉव्ह म्हणाला, "तुम्ही अेक रासायनिक संशोधक आहांत तर मी अेक गणितज्ञ. दोघांनाहि हें घाणेरडें काम करण्यांत कांहीं अेक आनंद नाहीं. आपआपल्या क्षेत्रांत काम करण्यांत आम्हा दोघांनाहि अधिक आनंद वाटतो. हें हेरगिरीचें काम खरोखरच उबग आणणारें आहे. पण तेवढेंच तें आवश्यकहि आहे आणि कांहीं म्हटलें तरी आम्ही तें जिकरीनें करतों हें आम्हांला भूषणावह आहे. परंतु अेक दिवस हिटलरचा पराभव होईल, जगांत शांतता नांदेल आणि अशीं बदकर्मं करण्याची आवश्यकताहि उरणार नाहीं." हें त्याचें बोलणें साजेसेंच होतें.

५) याच काळांत म्हणजे १९४३-४४ मध्यें आणि त्यानंतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों दि ............


१९४५ पर्यंत सेमेनॉव्ह आणि त्याचा अुत्तराधिकारी 'जॉन' ( त्याचें खरें नांव जनातोली अॅण्टॅनॉव्हिच् याकोव्हलेव्ह असल्याचें मागून समजलें ) मधून मधून नव्या विषयास हात घालीत. सेमेनॉव्ह थोड्या दिवसांत अमेरिका सोडून जाणार होता. परंतु त्याचें मातृभूमीला जाणें म्हणजे कायमची ताटातूट नव्हती. युद्धानंतर त्याची आणि इतर मित्रांची ( हे मित्र म्हणजे ज्यांच्या सांगण्यानुसार मी हेरगिरीचीं कामें करीत असें ते रशियन अधिकारी ) गांठभेट जरूर होणार होती. युद्धानंतर रशियांत आणि मॉस्कोला (मॉस्कोचा खास अुल्लेख करण्यांत येई.) लोकांना अनिर्बंधपणें येतां जातां येईल. मलाहि अुघडपणें तेथें जातां येईल. कारण सर्व देश एकमेकांचे मित्र बनतील. मग आम्हां सर्व मित्रांची मोठ्या मजेची पुनर्भेट होईल.

१९४५ च्या अुन्हाळ्याच्या सुरुवातीला सॅनफ्रान्सिस्को येथें अस्तित्वांत येअू घातलेल्या 'संयुक्त राष्ट्रसंघटने' विषयीं बोलतांना याकोव्हलेव्हचा अुतू जाणारा उत्साह मला अजून आठवतो. त्याच वर्षाच्या जूनमध्यें माझी आणि क्लॉअुस फुश्ची साण्टाफे येथें भेट झाली. मात्र त्याच्या आधींच हा विषय याकोव्हलेव्हनें माझ्यापाशीं काढला होता. त्या सुमारास पश्चिम किनाऱ्यावर प्रवाशांची विलक्षण गर्दी होईल म्हणून तो मला प्रवासांतील जागा राखून ठेवण्याबद्दल वारंवार सुचवीत होता. संयुक्त राष्ट्रसंघटनेला मी दोष देअू इच्छित नाहीं हें कृपा करून ध्यानीं ठेवा. जागतिक शांततेचें तें एकमात्र आशास्थान आहे. माझ्यावर त्यावेळीं कोणत्या कल्पनेचा प्रभाव पाडण्याचा प्रयत्न होत होता तें मी दाखवू अिच्छितों. "आम्ही सारे आतां मित्रच तर होणार आहोंत. मग तोंपर्यंत थोडेंफार बेकायदेशीर कृत्य केलें, थोडी फार गुप्त माहिती हस्तगत केली तर काय बिघडलें ?" अशा आशयाचा तो प्रयत्न होता.

६) माझ्यावरील प्रभाव कायम टिकविण्याच्या दृष्टीनें सो. रशियानें अनेक क्लृप्त्या वापरल्या. त्यांतील कांहींचा वापर १९३५–४६ पर्यंतच्या ११ वर्षांच्या काळांत कायम होत होता. त्यांतील कांहींचाच मी अुल्लेख करतों.

अ) जर नाझींचा जय झाला तर ज्यू जमात खतमच झाली असें समजा. सो. रशिया हाच फासिझमचा अेकमेव आणि त्याचा पिच्छा न सोडणारा विरोधक आहे. त्यामुळें सो. रशियाला मदत करणें म्हणजे

पर्यायानें ज्यू जमातीच्या संरक्षणाला मदत करणें होय.... मला हेरगिरी-साठीं अुद्युक्त करण्यांत या विचाराचा फार मोठा वांटा आहे. त्यांतील फोलपणा मला समजतों आणि त्यावेळीं मी करीत असलेल्या गोष्टींचा बेकायदेशीरपणा मला तेव्हांहि जाणवत नव्हता असें नाहीं. परंतु १९४८ पर्यंत मी सर्व शंकाकुशंका बाजूला सारीत असे. ( कारण त्या-नंतर सुमारें ३ वर्षे माझ्या बरोबरचा संबंध सोडून देण्यांत आला होता आणि त्या अवधींत अेकहि रशियन मला भेटला नाहीं. )

ब) **पैसे घेणाऱ्या हस्तकांबद्दल तिरस्कार :** त्या वेळीं मी पैसे वांटपाचें काम करीत असे. 'पैशाच्या मोबदल्यांत माहिती देणाऱ्यांनाहि फार महत्त्व आहे; परंतु केवळ ध्येयवादानें काम करणाऱ्या हॅरी गोल्डची कुणाशींच बरोबरी करतां येणार नाहीं' अशी भलावण माझ्याजवळ नेह-मींच होत असे.

क) **अमेरिकन साम्यवादाबद्दल तिरस्कार :** अमेरिकन साम्य-वादी पक्षाबद्दल ते म्हणत, " हा काय क्रांतिकारक पक्ष झाला काय ? मूर्ख लेकाचे ! ' डेलीवर्कर 'चे अंक रस्त्याच्या कोपऱ्या कोपऱ्यांवर विकून ते काय मिळवणार आहेत तें त्यांचें त्यांनाच माहीत ! " ( ही मोठी नामी क्लृप्ति होती. मी कधींच साम्यवादी पक्षाचा सभासद नव्हतो, नव्हे त्या पक्षाच्या सभासदत्वाच्या विचाराचीहि मला घृणा वाटत होती.) वर उल्लेखिलेलें बोलणें १९४२ च्या सुमाराचें होतें. त्यावेळीं आम्हांला जेब ब्राथमनकडून माहिती मिळण्यास त्रास पडत होता आणि तो त्या सुमारास हेरगिरीचें काम सोडून परत साम्यवादी पक्षांत जाअूं इच्छित होता.

### अुघड आणि तोंडासमोर स्तुति :

१) प्रसग १ ला : येथें तीन व्यक्तींचा संबंध आहे. काळ आहे डिसेंबर १९४२किंवा जानेवारी १९४३ मधील.न्यूयॉर्कच्या लिंकन हॉटेलमधील खोलींत मी, जेब ब्रॉथमन व सेमेनोव्ह यांची बैठक भरली होती. मी ब्रॉथमनला " जॉर्ज "ची ओळख करून दिली. ( सेमेनोव्ह माझ्याशीं ' सॅम ' म्हणून व अेब्शीं " जॉर्ज " म्हणून वावरण्याची काळजी घेत असे ) अेब् अुच्चपदस्थ रशियन अधिकारी असल्याची बतावणी करून सेमेनॉव्हनें अेब्च्या तांत्रिक माहितीची वारेमाप स्तुति करून सांगितलें कीं तिची बरो-

बरी सैन्यदलाच्या अेका ब्रिगेडशीं ( कदाचित् 'कित्येक' ब्रिगेडशीं असेंहि तो म्हणाला असेल; मला तें आतां अगदीं स्पष्ट आठवत नाहीं. ) होअू शकेल, इतकी ती महत्त्वाची आहे. अेब् त्यावेळीं त्याच्या इतर दोन भागीदारांबरोबर स्वतःचा धंदा चालवीत असे. त्यानें तो धंदा सोडावा व अेखाद्या मोठ्या कारखान्यांत विशेषतः तेलशुद्धीच्या कारखान्यांत नोकरी करावी म्हणजे तेलशुद्धीच्या बाबतींतली अमेरिकेंतील अत्याधुनिक तंत्राबद्दलची माहिती तो सो. रशियाला पुरवूं शकेल हें त्याच्या मनांवर बिंबविणें हा या भेटीमागील प्रधान हेतु होता. ( अेब् हेंण्ड्रिक आणि कंपनींत असतांना त्यांना असाच फायदा झाला होता. ) त्यावेळीं सेमेनॉव्हनें अमेरिकन तंत्रज्ञांच्या कुशलतेबद्दल रशियन जनतेला कमालीचा आदर वाटत असल्याचें सांगितलें. अमेरिकन कंपन्यांच्या अवाढव्य स्वरूपाकडे तर, तो म्हणाला कीं, रशियन जनता जवळ जवळ भक्तीभावानें पहाते !

प्रसंग २ रा : या प्रसंगाला फार प्रसिद्धि मिळाली आहे. ' ऑर्डर ऑफ द रेड स्टार ' हा किताब मला १९४३ च्या ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्यें बहाल करण्यांत आला होता. त्याच वर्षाच्या डिसेंबरमध्यें मी अेखाद्याच्या वांट्याला क्वचितच येणारी मोठी कामगिरी स्वीकारावयास तयार आहे का अशी माझ्याजवळ पृच्छा करण्यांत आली. ( पृच्छा केली हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ) या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी मला तीन तीन वेळां विचार करावयास पाहिजे होता आणि जानेवारी १९४४ मध्यें मी क्लाअुसफुशना भेटलों.

ट ) मानवी स्पर्श : हा प्रसंग १९४२ च्या मध्याचा असावा. या काळांत मी अेब्कडून रासायनिक प्रक्रियांच्या कांहीं साधनांच्या विषयीं माहिती मिळविण्याच्या खटाटोपांत होतों. ती माहिती फार आवश्यक होती. मी रोज या कामासाठीं न्यूयॉर्कला जात असे पण त्याचा अुपयोग होत नव्हता. असाच अेके दिवशीं त्याला भेटून मी सेमेनॉव्हकडे गेलों आणि त्याला सांगितलें, " येत्या शनिवारीं तो निश्चितपणें माहिती काढून देईल. त्यानें तसे आश्वासन दिलें आहे. " " खड्ड्यांत जाअू दे तो" सेमेनॉव्ह खवळून म्हणाला, " त्याला ती शनिवारीं मिळणार नाहीं, पुढील

शनिवारीं नव्हे पुढें कित्येक आठवडे आणि महिनेंहि मिळणार नाहीं. "( सेमेनॉव्हचा अंदाज बरोबर ठरला. कारण हवी असलेली माहिती सो. रशियाला नोव्हेंबर १९४२ मध्यें पाठविण्यांत आली. ) सेमेनॉव्ह पुढें बोलूं लागला, " तुझ्या शरीराकडे तूं कधीं काळजीपूर्वक पाहिलें आहेस? हल्लीं काय दशा झाली आहे तुझी? तूं भूतासारखा–नव्हे भूतच दिसतो आहेस! तुझ्या आईला काय वाटेल ही तुझी दशा पाहून ? चल माझ्या-बरोबर;" मग त्यानें मला शांत अशा अुपहारगृहांत नेले. तेथें आम्ही खाद्य पदार्थ आणि पेयें घेतलीं. त्यानें मला टॅक्सींत बसवून स्टेशनवर नेंले आणि फिलाडेल्फियाला जाण्याकरितां वरच्या वर्गाचें तिकीट काढाव-यास बजावलें. त्याचप्रमाणें आठवडा अखेर घरींच विश्रांतीसाठीं रहाण्यास त्यानें मला सांगितलें आणि मग तो परतला. त्यांत तसें विशेषसें कांहीं नव्हतें. फक्त माझ्याबद्दल त्याला वाटणारी काळजी. पण त्याचा माझ्या मनावर फार खोलवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

त्याचप्रमाणें मी जेव्हां अेखाद्या व्यक्तीकडे माहिती मिळविण्याच्या अुद्देशानें जात असे तेव्हां त्या व्यक्तीला देण्यासाठीं अेखादी चांगल्यापैकीं भेट घ्यावी असें मला सांगण्यांत येत असें. या भेटी विचारपूर्वक आणि त्या व्यक्तीला आवडतील अशाच हव्यात; केवळ कांहींतरी घेअून आला आहे असें त्या व्यक्तीला वाटूं नये अशाहि सूचना मला मिळत असत.

फ) १९३५च्या ओक्टोबर महिन्यांत मी ज्या रशियन अधिकाऱ्याच्या संपर्कांत पहिल्याप्रथम आलों त्याचें नांव 'पॉल'. त्यानें माझा व माझ्या कुटुंबाचा बारीकसारीक तपशीलासह 'इतिहास' मागितला. माझ्या अगदीं लहानपणापासूनच्या आठवणी व माझ्या जन्मापूर्वींपासूनची आईबापाविषयीची माहिती, त्यांचे विचार,श्रद्धा या विषयींची माहिती इ. सर्व कांहीं त्यानें विचारून घेतलें. नंतर कांहीं दिवसांनीं मी ज्यांच्याकडून माहिती गोळा करणार होतों अशा अमेरिकन लोकांचें काळजीपूर्वक केलेलें 'व्यक्तिमत्वाचें मूल्यमापन' मी त्याला सादर केलें.... मला नेहमींच सांगण्यांत येई कीं माझ्या ताबडतोब वर जो अधिकारी असे त्याला अगदींच किरकोळ गोष्टी सोडल्या तर निर्णय घेण्याचा कांहीं अेक अधिकार नव्हता. प्रत्येक गोष्टीला " मी आमच्या लोकांशीं याबाबत बोलेन " हें त्याचें

अुत्तर ठरलेलें असावयाचें. अर्थात्, त्यांची अेखादी समिति होती हें अुघड आहे.

कांहीं प्रसंगांचें वर्णन करून या निवेदनाचा पहिला भाग तर संपला. आणखीन बरेंच कांहीं येथें सांगण्यासारखें आहे. परंतु गोळा-बेरीजवजा सारांश सांगूनहि ते काम भागावें.

'ज्याला जें अैकायला आवडेल तेंच त्यांच्याशीं बोला' हें त्या तंत्राचें सूत्र आहे. तें इतकें सोपें आहे कीं त्यामुळेंच तें फसवें ठरलें आहे. त्यामुळेंच विरोधाला वाव रहात नाहीं आणि तें कमालीचें परिणामकारक ठरतें. सर्वांत साधी आणि जिचा सर्रास वापर करण्यांत येई ती रीत म्हणजे सर्वमान्य व वादातीत अशा अेखाद्या चांगल्या कारणाचा पाठ-पुरावा करणें. माझ्या बाबतींत असें तयार कारण ज्यूद्वेष्टेपणा हें होतें. ज्यूद्वेषाची भयानकता मला जाणवत होती आणि सो. रशियालाहि ती तशी जाणवत होती. आणि त्याच्या अनुषंगानें त्याला सुसंगत असे दुसरे गौण विषयहि असत. तें म्हणजे :

(१) लांडीलबाडी करण्यास त्यांना अुद्युक्त करावें. अगदीं लहान प्रमाणांत– कोणत्याहि प्रकारानें का होईना पण आधीं सुरुवात करावी. त्यामुळें सो. रशियासाठीं काम करण्याची त्यांना संवय लागते.

(२) ज्याच्या मनाला नैतिक अधिष्ठान आहे आणि जो मतभेद दर्शविण्याचें धैर्य दाखवतो त्याला पाठिंबा द्यावा..... त्यामुळें प्रस्थापित व्यवस्थेबद्दल त्याच्या मनांत तिरस्कार निर्माण करण्यास मदत होते..... आणि मग अपरिहार्यपणें तो कायदा स्वतःच्या हातांत घेतो.

(३) व्यक्तीच्या अहंकाराला खाद्य पुरवणें : हा मार्ग फार साधा वाटतो. त्यामुळें कांहीं फायदा होईल असेंहि चटकन् वाटत नाहीं. परंतु त्यामुळें कार्य किती सूकरतेनें होतें हें पहाण्यासारखें आहे. मला आणि माझ्या अुच्च ध्येयवादाला असें खाद्य दिलें गेलें. अमेरिकेंतील साम्यवादी पक्षाबद्दल मला वाटणारा तिटकारा ध्यानांत घेअून त्यांनीं त्याच्याशीं सुसंगत असें धोरण ठेवलें.

(४) चांगुलपणाला मिळणारा प्रतिसाद : चांगुलपणाचें कृत्य फार मोठें किंवा महत्त्वाचें असतें असें नाहीं. त्यासाठीं पैसा खर्च झालेला

असतो असेंहि नाहीं–झालाच असेल तर तो अगदींच थोडा असावा अशी काळजी घेण्यांत येते. कारण मोठ्या देणगीपेक्षां व्यक्तिमनावर लहान-सहान, निरपेक्ष बुद्धीनें व विचारपूर्वक केलेल्या चांगुलपणाच्या कृत्यांचा अधिक प्रभाव पडतो आणि अशा कृत्यांमुळें ती व्यक्ति आपल्याशीं निगडित होते.

(५) जेथें आवश्यक असेल तेथें रशियन हस्तक अुघड अुघड वारेमाप स्तुतीचा अवलंब करावयास मागें पुढें पहात नाहींत. एखाद्या गोष्टीबद्दल खात्री करून घ्यावयाची इच्छा असेल त्यावेळीं विशेषेंकरून या तंत्राचा ते अवलंब करतात. या तंत्राचा अुपयोग होतोच होतो. इतक्या अुघडपणें कुणी लबाडी करील असें कुणाला वाटत नाहीं. एखाद्या व्यक्तीच्या जवळच्या मित्रानें तसें कांहीं कारण नसतांना त्याला सांगावें कीं "मी आतां तुझ्या गळयावरून सुरी फिरवणार" आणि तसें करावेंहि, तसा हा प्रकार होतो. मित्रानें 'तुझ्या गळयावरून सुरी फिरवणार' म्हटल्यावर ती व्यक्ति ती चेष्टाच समजून हंसू लागेल, पण तिला फार वेळ हंसावयासहि मिळणार नाहीं. अशा प्रकारचें हें प्रभावी तंत्र आहे.

रशियन तंत्रांतील शेवटचें वैशिष्टच हें खास महत्वाचें आहे. त्याला या तंत्रांत कांहीं खास स्थान आहे सर्व देश शांततेत रहातील या त्यांच्या भुलावणीचा या संदर्भात अुल्लेख करावयास हवा.

पण 'ज्याला जें ऐकावयास आवडेल त्याला तें सांगा' हें सूत्र कधींहि विसरावयाचें नाहीं.

मी स्वत:च नेहमीं एक अमेरिकन नागरिकच समजायला हवें ही गोष्ट वारंवार माझ्यावर बिंबविण्यांत येत असे. सो. रशियाकरितां लपूनछपून काम करण्याची पाळी अुद्योगपति आणि राजकारणी यांनीं निर्माण केलेल्या अडथळयांमुळें येते. महाप्रयासानें घडवून आणलेल्या माझ्या मॉस्को–भेटीच्या वेळीं देखील मला परत अमेरिकेंतच यावयास हवें हें बजावून सांगण्यांत आलें होतें. 'हॅरी गोल्ड म्हणजे एक अेकनिष्ठ अमेरिकन नागरिक' या कल्पनेला त्यांनीं खतपाणी घालून वाढवलें होतें. पण माझ्या मतें रशियन जीवन–पद्धति "विकत" घेण्यांतला सर्वांत मोठा धोका पैशाची मागणी करण्यांत असतो. पैसा हा मानवाचा आत्मा बनला आहे.

आणि त्याचा अुपसिद्धान्त म्हणजे त्याच्यामुळें कोणतेंहि निंद्य काम करावयास माणूस मागेंपुढें पहात नाहीं.

सोव्हिअेट रशियाच्या क्लुप्त्यांबद्दल माझ्या प्रतिक्रिया मी गडद रंगानें रंगविल्या आहेत याची मला जाणीव आहे. मी आधीं सांगितल्याप्रमाणें आतां मला ते दिवस वेगळेच वाटतात, तो काळच वेगळा वाटतो आणि सारें जगू निराळयाच दुनियेंत घडून आल्याप्रमाणें वाटतें. तरीहि जें कांहीं घडलें आणि जें कांहीं मी केलें तें मी जाणतोंच.

• • •

९०२४१
REFBK-0010241
REFBK-0010241